म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें.
विषय बा. वाङमय
दा. क्र. ६६८९

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

ना :- खाली दिले ... पुस्तक परत करावे.

# उजळतें क्षितिज

( उत्कृष्ट आनंदपर्यवसायी कादंबरी )

लेखक

महादेव नारायण देशपांडे

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. ...६८८८७... नों दि .............
वि. ........................

श्री गजानन प्रकाशन, पुणें २.

मूल्य तीन रुपये

प्रकाशक :

**दि. व. कुलकर्णी,**
श्रीगजानन प्रकाशन,
४७६ नारायण, पुणें २.

* * *

सर्व हक्क सुरक्षित.

* * *

प्रथमावृत्ति :
वर्षप्रतिपदा, शके १८८०
दि. २१ मार्च १९५८.

* * *

मुद्रक :

**द. शं. गांगण,**
अक्षर मुद्रणालय,
४३८ अ सदाशिव, पुणें २.

★

**समर्पण—**

माझी परमपूज्य मातृदेवता कै. **मथुराबाई** हिच्या पवित्र स्मृतिसमाधीवर हें वाङ्मयपुष्प निरतिशय भक्तिभावानें अर्पण केलें आहे.

—**महादेव नारायण देशपांडे**

★

## आर्जव—

*" A book may be amusing with numerous errors; or it may be dull without single absurdity."*

--Goldsmith

माझी ही पहिली वहिली ललित वाङ्मयकृति महाराष्ट्र रसिकांच्या सेवेला सादर करतांना माझी चित्तवृत्ति नव्यानें संसारांत पदार्पण करणाऱ्या नवविवाहित कुलवधूसारखी संभ्रमित होत आहे. सर्वस्वीं अपरिचित कुटुंबांत वावरतांना नववधू पदोपदीं बुजते, लाजते, बावरते. वडीलधाऱ्या मंडळींचा आपल्याकडून नकळत मर्यादातिक्रम तर होत नाहीं ना, अशी आगंतुक धास्ती वेळोवेळीं तिला बेचैन करीत असते. पण असें असूनहि संसाराची तीव्र ओढ, आसक्ति तिच्या नसानसांतून सारखी उसळी मारीत असते. तो आवेग टिकविण्याची उमेदहि तिच्या ठिकाणीं भरपूर असते. फक्त संसारांतील वडीलधाऱ्या मंडळींच्या आपल्याविषयींच्या आपुलकीच्या वागणुकीनें व प्रोत्साहनपर कौतुकाच्या शब्दांनीं आपली ही उमेद सतत ताजीतवानी रहावी याविषयीं तिचें मन हपापलेलें असतें. प्रस्तुत कादंबरीच्या रूपानें साहित्यसंसारांत पहिलें पाऊल टाकतांना माझी अवस्थाहि अगदीं अशीच झाली असल्यामुळें साहित्यसंसारांतील ज्येष्ठांनीं व श्रेष्ठांनीं माझ्या या अप्रगल्भ वाङ्मयकृतीकडे औदार्यानें व सहृदयतेनें पाहावें यापरती माझी अपेक्षा तरी दुसरी काय असायची !

# आर्जव

प्रस्तुत कादंबरीच्या हस्तलिखिताची ठाकठीक अशी मुद्रणप्रत तयार करणें व तिचा तांत्रिक घाट नीटनेटका सुधारणें या कामीं माझा ज्येष्ठ पुत्र चिरंजीव अरविंद यानें आपला नित्याचा व्यवसाय संभाळून अत्यंत परिश्रम घेतले; अर्थात् त्याच्या अभिजात वाङ्मयाभिरुचीमुळें हें सारें त्यानें उत्स्फूर्त उत्साहानें पार पाडलें. तसेंच कादंबरीच्या प्रकाशनाची अत्यंत महत्त्वपूर्ण अशी जबाबदारी स्वीकारून ती पार पाडण्याच्या कामीं माझे मुद्रणव्यवसायांतील दीर्घानुभवी आप्त श्री. दि. ब. कुलकर्णी यांनीं अत्यंत परिश्रम घेतले. त्यांच्या मार्गदर्शनावांचून हें कार्य होणें प्रायः अशक्यच होतें. या बहुमोल कामगिरीबद्दल उभयतांचें यथायोग्य कौतुक करण्यास पुरेसें शब्द-भांडार माझ्याजवळ नाहीं. पण उभयतांविषयींच्या माझ्या विशुद्ध वात्सल्यास व अकृत्रिम प्रेमास औपचारिक आभाराचें गालबोट मात्र मी लावूं इच्छित नाहीं.

त्याचप्रमाणें पुणें येथील अक्षर मुद्रणालयाचे तरुण व कर्तबगार व्यवस्थापक श्री. गांगण, त्यांचे उत्साही मदतनीस श्री. साठे व अन्य कर्तव्यदक्ष कर्मचारी यांनीं अल्प मुदतींत सुबक छपाईचें अवघड काम पुरें केलें, याबद्दल त्या सर्वांचा मी अत्यंत आभारी आहें.

कादंबरीचें बहिरंग लोभसवाणें करण्यांत चित्रकार श्री. पाथरकर व पुण्यांतील सुप्रसिद्ध ब्लॉकमेकर्स ॲण्ड आर्ट प्रिंटर्स मेसर्स के. जोशी ॲण्ड को. यांचें श्रेय मोटें आहे. या गोष्टीचा उल्लेख केल्याविना प्रस्तावना अपुरीच राहील.

शेवटीं सुप्रसिद्ध आंग्ल लेखक गोल्डस्मिथ यांच्या वर उद्धृत केलेल्या सुपरिचित उक्तींतील अभिप्रायास अनुसरून माझी ही वाङ्मयकृति महाराष्ट्र रसिकांच्या मनोविनोदनास अंशतः जरी समर्थ ठरली तरी तिच्यांतील प्रमादबाहुल्याबद्दल मी बेफिकीर राहीन.

उगारखुर्द,<br>
वर्ष प्रतिपदा,<br>
२१ मार्च १९५८.

रसिकांचा कृपाभिलाषी<br>
**महादेव नारायण देशपांडे**

# लेखकासंबंधीं थोडेंसें–

श्री. म. ना. देशपांडे यांची ही पहिलीच कादंबरी आहे. तथापि वाङ्मय-क्षेत्रांतच ते नवखे आहेत असें मात्र मुळींच नाहीं. यापूर्वी अनेक मराठी नियतकालिकांतून त्यांच्या कथा, कविता, लघुनिबंध प्रसिद्ध झाले आहेत.

श्री. देशपांडे यांचा संस्कृत व मराठी भाषांचा व्यासंग प्रदीर्घ आहे. दैनंदिन जीवनाच्या धकाधकींत आपला व्यवसाय सांभाळून ते आपलें लिखाण करीत असतात. कै. प्रा. माट्यांप्रमाणें वाङ्मय-क्षेत्रांत त्यांनीं बराच उशिरा प्रवेश केला आहे. उशिरा प्रवेश करूनहि त्या क्षेत्रांत प्रा. माटे हे फारच प्रभावीपणें चमकले. श्री. देशपांडे यांच्या बाबतींतहि अशी उमेद बाळगली तर तें अस्थानीं होणार नाहीं असें वाटतें. त्यांच्या निवडक लघुकथांचा संग्रह लवकरच रसिकांच्या सेवेस सादर करण्याचा आमचा मानस आहे. त्यांच्या '**उजळतें क्षितिज**' या ललित कृतीचें मराठी रसिक खुल्या अंतःकरणानें स्वागत करतील अशी खात्री वाटते.

**—प्रकाशक**

# उजळतें क्षितिज

## —१—

कमलापूर म्हणजे सारें आठ-नऊ हजार लोकसंख्येचें गांव. अशा गांवांत शहरांतल्याप्रमाणें लांबच लांब, रुंद व प्रमाणबद्ध आंखलेले सुंदर रस्ते, रस्त्यांच्या दोन्ही बाजूंना शोभविणारे प्रासादतुल्य सुंदर बंगले, निरनिराळीं व्यवसाय-केंद्रें, मनाला रिझविणारीं क्रीडामंदिरें, रमणीय नगरभवनें व इतर अनेकविध विलोभनीय दृश्यें हीं सारीं कोठून पाहायला मिळणार? यावरून कमलापूर हें ओबडधोबड रस्त्यांचें, पडकीं घरें असलेलें, दिसण्यांत ओसाड व ओंगळ असें एखादें गांव असावें असें अनुमान कोणीं काढील तर तें मात्र चुकीचें ठरेल. आणि तसें तें चुकीचें ठरावें असेंच खरोखर कमलापूर गांव होतें. गांवांतील रस्ते टांगे, मोटारी वगैरे वाहनांच्या अनिरुद्ध संचारास योग्य असे रुंद व सपाट होते. रस्त्यांच्या कडेचे वाडे—मधून मधून डोकावणारीं क्वचित् कांहीं झोपडीवजा घरें सोडल्यास—टोलेजंग व मजबूत असे होते. गांवच्या मध्यभागीं सर्व रस्ते एका ठिकाणीं मिळाल्यानें एक प्रशस्त चौक बनलेला होता. चौकाच्या एका बाजूस सरकारी चावडीची दुमजली भव्य इमारत होती; व तिच्या पलीकडे थोड्याशा अंतरावर मोटारस्टँड होता. चौकाच्या दुसऱ्या बाजूस सरकारी शालागृह, ग्राम-पंचायतीचें कार्यालय अशा इमारती होत्या. कमलापूर हें तालुक्याचें गांव असल्यामुळें गांवापासून सुमारें अर्ध्या मैलावर सरकारी कोर्ट-कचेऱ्यांच्या अद्ययावत् पद्धतीनें बांधलेल्या सुंदर व भव्य इमारती होत्या. गांवाचे दोन प्रमुख विभाग असून एका विभागास 'व्यवहार आळी' व दुसऱ्यास

'महाजन आळी' अशा त्यांना संज्ञा होत्या. व्यवहारआळींत मुख्यतः व्यापारी, वाणी, कापडवाले, शेठसावकार व इतर कारागीर अशा लोकांची वस्ती असून महाजनआळींत गांवचे इनामदार, वतनदार व इतर मुखवस्तु पांढरपेशे लोकांचे वाडे होते. नोकरीच्या निमित्तानें आलेले सरकारी नोकरलोकहि याच विभागांत राहात असत. गांवाच्या सभोंवार गांवठाणापासून थोड्या अंतरावर संत्रीं, मोसंबीं वगैरे फळांच्या बागा, पानमळे, आंब्यांचीं व नारळीचीं झाडें विपुल असल्यामुळें त्यांच्यामधून दृग्गोचर होणारें गांवाचें ओझरतें दृश्य पाहणारास मोठें मनोवेधक वाटत असे. गांवांतील बहुतेक सर्व घरांवर पत्र्यांचें आच्छादन होतें. गांवाचें शिवार गांवठाणापासून अगदीं नजिक एका अंगास असल्यामुळें हंगामाच्या दिवसांत लांबच लांब पसरलेल्या हिरव्यागार शिवारांवरून गांवठाणाकडे विहंगम दृष्टीनें पाहाणारास ते निसर्गदेवीच्या हिरव्या शालूला जोडलेल्या जरतारी पदरासारखेंच भासत असे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे कमलापूर हें गांव टुमदार व निसर्गरमणीय असेंच होतें. आणि जवळपास दहा-बारा कोसांत त्याच्याएवढें मोठें व आधुनिक सर्व सुखसोयींनीं परिपूर्ण असें दुसरें गांव नसल्यामुळें नागर-जीवनाचा फारसा परिचय नसलेल्या आजूबाजूच्या खेड्यांतील खेडुतांना कमलापूर हें एक शहर वाटत असल्यास नवल नव्हतें

सकाळचा दहा वाजण्याचा सुमार होता. महाजनआळींतील एका जुन्या पद्धतीच्या टोलेजंग वाड्याच्या दुसऱ्या मजल्यावरील दिवाणखान्याच्या एका खिडकींत मध्यम वयाच्या एक बाई बसलेल्या होत्या. शरीरानें त्या कृश दिसत असल्या तरी तजेलदार अंगकांतीमुळें त्यांचें कुलीनत्व पाहणाराच्या नजरेंत चटकन् भरत असे. त्यांचा भव्य व शुभ्र निटिलभाग त्यांच्या सच्छीलाची व पवित्र आचरणाची साक्ष देत होता; मुद्रेवरील गांभीर्याचें तेज त्यांच्या संयमी व त्यागी वृत्तीचें निदर्शक होतें; शांत व सोज्वळ दृष्टि त्यांच्या निर्मळ, थोर व प्रेमळ अंतःकरणाचें प्रतीक होतें; व सरळ पाणीदार नासिका त्यांच्या करारीपणाची, बाणेदारपणाची व मानीपणाची निःसंदिग्धपणें ग्वाही देत होती. पाहणारास सकृत्दर्शनीं त्या एखादी शापभ्रष्ट देवताच वाटत असत; आणि त्यांच्याबद्दल आपोआप

त्याच्या ठिकाणीं आदरभाव निर्माण होत असे. हनुवटीला उजव्या तळहाताचा आधार देऊन विचारमग्न स्थितींत त्या बराच वेळ बसल्या होत्या. मनाला कांहींतरी रुखरुख लागली असल्याचें त्यांच्या चिंताव्याप्त चेहऱ्यावरून स्पष्ट दिसत होतें. मधून मधून एकदमच त्या उठत, खिडकींत उभ्या राहून रस्त्याच्या समोंवार दृष्टि टाकीत व पुन्हां निराश होऊन खालीं बसत. कोणाची तरी त्या मार्गप्रतीक्षा करीत असाव्यात. असें बराच वेळ त्यांचें चाललें होतें. शेवटीं मनाची अधीरता असह्य होऊन त्या पुटपुटल्या—

"जीवन अजून कां बरं आला नाहीं? वास्तविक कालच येणार असल्याचं तो जातांना सांगून गेला होता. जमिनी ताब्यांत देतांना पुन्हां सावकारांकडून कांहीं हरकत तर आली नसेल ना?— "

आणि या शंकेनें त्यांच्या अंतःकरणाला इतकें विव्हल करून सोडलें कीं, आधींच पुत्रदर्शनासाठीं अधीर झालेल्या त्यांच्या नेत्रांत चटकन् अश्रू उभे राहिले. इतक्यांत वाड्याच्या दरवाजासमोर टांग्याची घंटा वाजून टांगा थांबल्याचा आवाज झाला; व लगेच खालीं सोप्यांत खेळत असलेल्या मुलांनीं 'आप्पा आले, आप्पा आले' असें आनंदानें ओरडून एकच गोंगाट केला. विद्युद्दीपाचें बटन दाबतांच एखादा तमोव्याप्त भाग क्षणार्धांत तेजाळून जावा त्या प्रमाणें त्या आनंददायक वार्तेनें रमाबाईंचा चिंतायुक्त चेहरा एकदम प्रफुल्लित होऊन दिवाणखान्यांत भरून राहिलेलें औदासीन्य क्षणार्धांत पार नाहींसें झालें.

जीवन वर जो आला तो जणूं धांवतच. कार्यसफलतेचें समाधान त्याच्या चेहऱ्यावर पूर्णपणें प्रतिबिंबित झालें होतें. त्यामुळें त्याचा मूळचाच उमदा असलेला चेहरा त्यावेळीं अधिकच प्रफुल्लित दिसत होता. वर येतांच एखाद्या अल्लड बालकाप्रमाणें आनंदातिशयानें त्यानें आपल्या मातेला घट्ट मिठी मारली. मातृवात्सल्यानें रमाबाईंनीं त्याला आपल्या पोटाशीं धरून त्याच्या मुखावरून व पाठीवरून आपला प्रेमळ हात फिरविला. त्यांच्या आनंदाला तर आज पारावार राहिलेला नव्हता. आनंदातिशयाचा तो क्षण संपल्यावर घरांतून गेल्यापासून ज्या ज्या गोष्टी घडत गेल्या त्या क्रमवार जीवननें रमाबाईंना सांगण्यास सुरुवात केली. रमाबाईंहि त्या

मोठ्या उल्हासानें व एकाग्रचित्तानें ऐकत होत्या. ज्या ज्या गांवीं आपल्या इनामी जमिनी होत्या त्या त्या गांवीं आपण कसें गेलों, आपला त्राता— आपला जीवनदाता परत आपणांस लाभला अशा भावनेनें जमिनींच्या पूर्वापार कुळांनीं प्रत्येक गांवीं आपलें स्वागत करून आपली कृतज्ञता कशी व्यक्त केली, सावकारांच्या डोईजड खंडाच्या भाराखालीं चेंगरून पिळून निघालेल्या व त्यांच्या अमानुष छळांनीं संत्रस्त झालेल्या कुळांच्या तोंडून त्यांच्या दुर्दशेची व हालअपेष्टांचीं हृदयद्रावक वर्णनें आपणांस कशीं ऐकावयास मिळालीं, सावकारांनीं जमिनींचा ताबा सोडतांना वेळोवेळीं नवीन नवीन हरकती उत्पन्न केल्या पण न्यायप्रिय अधिकाऱ्याच्या मदतीनें आपण त्या कशा दूर करूं शकलों, व अखेर जमिनींचा ताबा कसा मिळविला वगैरे हकीकतींचें वर्णन तो मोठ्या उत्साहानें व रसाळपणानें करीत होता. दोघेहि त्या प्रसंगांत इतके रंगून गेले होते कीं, पोष्टमननें दरवाजांत उभा राहून ' जगजीवन भगवंतराव मुतालिक ' या नांवानें दोनदां मोठ्यानें पुकारलें तरीहि त्यांना समजलें नाहीं. आणखी एकदां जेव्हां त्यानें जीवनच्या नांवानें मोठ्यानें हांक मारली तेव्हां ते भानावर आले. पोष्टमनला पाहतांच ' बहुतकरून आपल्या राजाभाऊंचंच पत्र असावं ' असें म्हणत जीवन लगबगीनें उठला व धांवत जाऊनच पत्र घेऊन आला. तांबूस रंगाचें पाकीट होतें तें. त्यावरील मायन्याच्या अक्षरांवरून पत्रासंबंधीं त्यानें केलेला तर्क खराच ठरला. त्याचा धाकटा भाऊ राजेश्वर ऊर्फ राजाभाऊ याच्याकडूनच इस्लामपूरहून तें पाकीट आलें होतें. मोठ्या अधीरतेनें त्यानें तें फोडलें व आंतील मजकुरावरून घाईघाईनें तो आपली दृष्टि फिरवूं लागला. जसजसा तो पत्रांतील मजकूर वाचूं लागला तसतसा त्याच्या चेहऱ्यावर विविध भावनांचा पालट क्षणाक्षणाला होऊं लागला. सूर्याच्या देदीप्यमान प्रकाशानें तेजोमय दिसणारें नभोमंडळ संध्यासमयीं ज्याप्रमाणें क्षणांत तांबूस तर क्षणांत धूसर अशा निरनिराळ्या रंगछटा धारण करतें व सूर्यास्तानंतर थोड्या वेळांतच तें पूर्णपणें तमोव्याप्त होतें तद्वतच क्षणापूर्वी आनंद, उल्हास, समाधान यांच्या योगानें प्रफुल्लित दिसणाऱ्या जीवनच्या मुखमंडलावर पत्र वाचत असतांना आश्चर्य, खेद, उदासीनता, निराशा इत्यादि भावनांच्या छटा एकामागून एक भराभर उमटूं लागल्या आणि

जेव्हां त्याचें सबंध पत्र वाचून झालें तेव्हां त्यांतील मजकुराचा त्याच्या कोमल हृदयावर इतका जबरदस्त परिणाम झाला कीं, त्याचें सारें अवसान एकदम नाहींसें होऊन पत्र त्याच्या हातांतून गळून पडलें. राजानें जीवनला उद्देशून लिहिलें होतें—

" आपलें पत्र मिळालें. आज चाळीस वर्षें कर्जापायीं सावकारांच्या ताब्यांत गेलेली वडिलार्जित वतनवाडी ऋणमुक्त होऊन आपल्या ताब्यांत आली हें वाचून मलाहि आपल्याप्रमाणेंच आनंद होणें साहजिक आहे. फक्त आपणां उभयतांमधील स्थितिभिन्नत्वामुळें आपल्या आनंदाहून माझ्या आनंदाचें स्वरूप भिन्न असेल एवढेंच. परक्याच्या ताब्यांत गेल्यानें दुष्प्राप्य वाटणाऱ्या आपल्या मालकीच्या एखाद्या प्रिय वस्तूच्या पुनर्लाभानें मनुष्याला जसा आनंद वाटतो तसाच आपुलकीच्या अभिमानानें फुललेला आपला आनंद; तर माझा आनंद मालकाच्या आनंदांत आनंद मानून घेणाऱ्या त्याच्या एखाद्या आश्रिताच्या आनंदाप्रमाणें भाडोत्री. असल्या आनंदांत आपुलकीचा जिव्हाळा कोठून असणार ? आणि तो तरी माझ्या आनंदांत कां निर्माण व्हावा ? आपल्या घरांत मला माझें असें अभिमानानें म्हणतां येईल अशा एकाहि वस्तूवर माझी सत्ता नाहीं. आपल्या एखाद्या आश्रिताप्रमाणें आपण आजवर मला वागविलें, आणि तशा लाचार स्थितींत मी वागलोंहि. अखेर त्या गुलामगिरीला कंटाळून घराचा त्याग करून परठिकाणीं अज्ञातवासांतल्याप्रमाणें परावलंबी, लाचार जिणें मी आज जगत आहें. जोंपर्यंत माझ्या या स्थितींत बदल होणार नाहीं तोंपर्यंत आपल्या घराबद्दल, आपल्या वडिलार्जित वतनवाडीबद्दल माझ्या ठिकाणीं आपुलकीची भावना कधींहि निर्माण होणार नाहीं. अपमान, तिरस्कार, अवहेलना यांचाच माझ्या घरीं मला अनुभव आला; आणि त्याबद्दल आलेली चीड आजवर मीं मोठ्या प्रयत्नानें मनांत दाबून ठेविली होती. ती उघड करून दाखविण्याची संधि आपल्या पत्राच्या निमित्तानें आज मला मिळाली असल्यामुळें मी माझें सर्व हृद्गत स्पष्टपणें आपल्यापुढें मांडीत आहें. आपण आपल्या पत्रांत मला एक उपदेशवजा गंभीर इशारा दिला आहे; तो असा—" आपली बरींच वर्षें कर्जांत गुंतलेली स्थावर मिळकत—जमिनी—ऋणमुक्त होऊन पूर्ववत् आपल्या ताब्यांत मिळाल्या-

बद्दल व आपल्या घराण्यावरील हें लांछन दूर झाल्याबद्दल आपल्या हितचिंतकांना आज जितका आनंद वाटत आहे तितकाच मत्सर आपल्या वाइटावर असलेल्या लोकांना वाटत आहे. विशेषतः आजपर्यंतच्या आपल्या सावकार लोकांना याचा हेवा वाटणार व आपल्या घराण्याची अप्रतिष्ठा व्हावी या हेतूनें ते आपल्या प्रयत्नांची शिकस्त केल्यावांचून राहणार नाहींत. म्हणून आपण यापुढें आपले खाजगी मतभेद अजिबात विसरून जाऊन पूर्ण एकोप्यानें, सलोख्यानें व नीतीनें वागलें पाहिजे; तरच आपल्या घराण्याची प्रतिष्ठा वाढून भरभराट होणार आहे...वगैरे."

मला हा उपदेश करण्याचा आपण जो ढोंगी आव आणला आहे, तो अत्यंत अर्थपूर्ण व कार्यसाधूपणाचा आहे. या उपदेशाच्या बुडाशीं आपला स्वार्थी डाव आहे हें न समजण्याइतका मी आतां साधा राहिलों नाहीं.

पत्राच्या शेवटीं माझ्या भावी आयुष्याच्या सुखाबद्दलची जी चिंता आपण व्यक्त केली आहे; ती तर अगदीं एखाद्या कसलेल्या नटाला शोभण्यासारखी आहे. आपण पत्रीं लिहितां—"तुझें भावी जीवन सुखमय होण्यासाठीं तुझ्या आयुष्याचा मार्ग निश्चित व्हावा अशी माझी उत्कट इच्छा आहे. म्हणून या बाबतींत तुझ्याशीं विचारविनिमय करण्यासाठीं तूं इकडे यावें असें मला वाटतें." माझ्या आयुष्याचा मार्ग निश्चित होण्यासाठीं आपण आपल्या पदरीं एखादी हुद्याची जागा देण्याचें तर ठरविलें नाहीं ना? बाकी आपल्यासारख्या श्रीमंत इनामदारांना त्यांच्या इभ्रतीला साजेसे नोकरचाकर आतां ठेवावे लागणारच; पण मी आपल्याला स्पष्टच सांगूं इच्छितों कीं, मी जो तिकडे लवकरच येणार आहें तो आपला आश्रित म्हणून राहण्यासाठीं नव्हे, तर मुतालिक इनामदारांच्या वडिलार्जित इस्टेटीच्या निम्म्या हिश्शाचा मालक व आपल्या बरोबरीचा एक स्वतंत्र इनामदार म्हणून गांवांत मानानें मिरविण्यासाठीं. झाल्यागेल्या गोष्टींचा कोळसा जास्त उगाळीत बसण्याची माझी इच्छा नाहीं. अतिप्रसंगाची पाळी न आणतां यापुढें सामोपचारानें व समंजसपणानें सर्व गोष्टी करण्यांतच आपलें उभयतांचें हित आहे. अधिक उणें लिहिल्याबद्दल माफी करालच.

आपला उपेक्षित बंधु,

**राजेश्वर**

एखाद्या विषदग्ध बाणाप्रमाणें पत्रांतील मजकुरानें जीवनच्या हृदयाच्या चिंधड्या करुन तें रक्तबंबाळ करून सोडलें. त्यानें मनांत योजिलेल्या भावी आकांक्षांचा चक्काचूर झाला. वैभवाच्या कल्पनेनें उभारलेला मनोरा ढासळून जमिनदोस्त झाला; आणि त्याच्या कर्तृत्वशक्तीच्या अहंकाराला एक जबरदस्त धक्का बसला. त्याला कळूं लागल्यापासून आतांपर्यंत त्याचें आयुष्य अनेक प्रकारच्या हालअपेष्टा व संकटें यांच्याशीं टक्कर देण्यांतच खर्च झालेलें होतें. सुखवस्तु घराण्यांत जन्म झालेला असूनहि विपरीत दैवगतीमुळें आतांपर्यंत जीवनांतील सुखाचा, स्वास्थ्याचा कल्पनेनेंहि अनुभव घेण्यापुरती शांति त्याच्या मनाला मिळाली नव्हती. शेवटीं या झगड्यांत तो विजयी झाला होता. त्यामुळें आयुष्यांत पुढें येणाऱ्या कसल्याहि बिकट परिस्थितीला आपल्या अंगच्या कर्तबगारीच्या जोरावर आपल्या मर्जीप्रमाणें वळण देण्याची हिंमत व आत्मविश्वास त्याच्या ठिकाणीं उत्पन्न झाला होता. आतां कोठें जीवनांतील सुखाची माधुरी चाखण्याकडे त्याच्या मनाचा कल होत चालला होता. तोंच हें नवीन संकट दत्त म्हणून त्याच्या पुढें त्याची परीक्षा पाहण्यासाठींच जणूं उभें राहिलें. बाहेरील कोणत्याहि संकटांना त्यानें आतांपर्यंत तोंड दिलें तसें धैर्यानें तोंड दिलें असतें. परंतु ज्याच्यावर आपण आजपर्यंत आपल्या प्राणापलीकडे प्रेम केलें त्या आपल्या धाकट्या भावानेंच आपल्याशीं सामना देण्यासाठीं उभें राहावें, या विचारानें त्याचें अंतःकरण शतशः विदीर्ण झालें. याखेरीज आणखी निराळ्या कारणामुळें त्याच्या मनाला मरणप्राय दुःख झालें. आपल्या भावाभावांतील भांडणामुळें कुटाळ लोकांत आपल्यासंबंधीं वेडेवांकडे तर्क-वितर्क सुरू होतील, आपल्या वाइटावर असलेले लोक या संधीचा फायदा घेऊन आपल्यावर नानाप्रकचीं संकटें आणतील व समाजांत आपली प्रतिष्ठा कमी करण्याचा प्रयत्न करतील, ही भीतीच त्याला अधिक असह्य होऊन त्याची स्थिति अत्यंत केविलवाणी झाली.

जीवनच्या लहानपणीं त्याच्या वडील-माणसांकडून त्याच्या पूर्वजांसंबंधीं घडलेल्या कांहीं विशेष गोष्टी वेळेवेळीं त्याच्या कानांवर आलेल्या होत्या. त्या म्हणजे घराण्यांतील कर्त्या पुरुषाचें आयुष्य संकटमय असावयाचें, मधून मधून सुखाचे थोडे दिवस लाभतात न लाभतात तोंच एखादी अनपेक्षित

संकटपरंपरा त्याच्यावर कोसळून पुन्हां तो दुःखाच्या खोल दरींत जाऊन पडावयाचा असा प्रकार लागोपाठ तीन कर्त्या पुरुषांच्या बाबतींत घडून आलेला होता. त्याच्या वडिलांच्या आयुष्यांतहि याच प्रकारची पुनरावृत्ति झाली होती. लहानपणीं ऐकलेल्या या प्रसंगाची जीवनला एकाएकीं आठवण झाली. त्याबरोबर इतक्या हालअपेष्टा सोसून परत मिळविलेल्या आपल्या जमिनी कांहीं अनपेक्षित संकट येऊन पुन्हां आपल्या ताब्यांतून जाणार तर नाहींत ना ही शंका आतां नव्यानें त्याला भेडसावूं लागली.

जीवनच्या घराण्याचा पूर्ववृत्तान्त थोडक्यांत, असा होता—छत्रपति राजाराम महाराजांच्या कारकीर्दींत हें मुतालिक घराणें प्रथम उदयांस आलें असें म्हणतात. या घराण्याचा मूळपुरुष महाराजांच्या पदरीं चाकरीस होता. महाराजांच्या जिवावर बेतलेल्या एका आणीबाणीच्या प्रसंगीं या मूळपुरुषानें ऐनवेळीं आपला जीव धोक्यांत घालून महाराजांची प्राण-संकटांतून मुक्तता केली होती. या उपकाराची फेड म्हणून महाराजांनीं प्रसन्न होऊन कमलापूर व त्याच्या आजूबाजूचीं कांहीं खेडीं मिळून दरसाल सुमारें पंचवीस हजार रुपयांच्या उत्पन्नाचीं गांवें त्या मूळपुरुषास वंशपरंपरा देणगी म्हणून दिलेलीं होतीं. पुढें वेळोवेळीं या घराण्यांत जे कर्ते पुरुष होऊन गेले ते मोठे कर्तबगार व धडाडीचे निपजल्यामुळें त्यांनीं या उत्पन्नांत बरीच भर घातली होती. पण पुढें पुढें त्यांच्या वंशजांत कांहीं स्वार्थी व घरबुडवे लोक निर्माण झाल्यामुळें भाऊबंदकीच्या पायांत त्यांच्यांत गृहकलह सुरू होऊन त्यांचें अपरिमित नुकसान झालें. कर्जाचा प्रवेश त्यामुळेंच या घराण्यांत प्रथम झाला. कर्जापायीं बऱ्याच जमिनी सावकारांच्या ताब्यांत जाऊन घराण्याच्या पूर्वीच्या वैभवास उतरती कळा लागली. जीवनचे आजोबा श्रीपतराव मुतालिक यांच्यावर ज्यावेळीं घराण्याच्या कर्तेपणाची जबाबदारी येऊन पडली त्या वेळीं कर्जामुळें घराण्यास बरीच हलाखीची स्थिति प्राप्त झालेली होती. परंतु श्रीपतराव हे बुद्धिमान, व्यवहारचतुर आणि धडाडीचे पुरुष असल्यामुळें त्यांनीं थोड्याच काळांत आपल्या इस्टेटीचा चांगला जम बसविला. सरकारदरबारीं त्यांचें चांगलें वजन असल्यामुळें गांवांतील लोकांनाहि त्यांचा वचक फार वाटत असे. आपल्या कर्तबगारीनें थोड्याच काळांत त्यांनीं वडिलार्जित कर्जाचा बोजा बराच

हलका करून घराण्याची खालावलेली स्थिति सुधारण्याच्या कामीं बरेंच यश मिळविलें. श्रीपतरावांना भगवंतराव हा एकुलता एकच मुलगा होता. तो बापाप्रमाणेंच बुद्धिमान्, तडफदार व बाणेदार पुरुष होता. श्रीपतराव हे शिक्षणप्रेमी असल्यामुळें त्यांनीं भगवंतरावाला शिक्षण देण्याच्या कामीं कधींहि अनास्था दाखविली नाहीं. भगवंतरावाची मॅट्रिकची परीक्षा पास झाल्यानंतर श्रीपतरावांनीं त्याला कॉलेजच्या शिक्षणासाठीं मुंबईस ठेविलें होतें. भगवंतराव मुंबईस कॉलेजांत शिकत असतांना त्याचा सुहासिनी कुलकर्णी या नांवाच्या त्याच्याच कॉलेजांत शिकत असलेल्या मुलीशीं परिचय झाला. पुढें त्यांचा तो परिचय उत्तरोत्तर वाढत जाऊन त्याची परिणति त्यांच्या उत्कट प्रेमांत झाली. पुढें कांहीं दिवसांनीं सुहासिनीच्या ठिकाणीं भावी मातृत्वाचीं पूर्वचिन्हें स्पष्ट दिसूं लागतांच दोघांनाहि आपल्या प्रेमाचें स्वरूप स्पष्ट कळून चुकलें. त्यांनीं तावडतोब विवाहबद्ध होण्याचें ठरविलें; व आपल्या वडिलांची संमति मिळविण्यासाठीं सुहासिनीस घेऊन भगवंतराव कमलापुरास आला. आपल्या प्रेमाची परिस्फुटता त्यानें आपल्या वडिलांजवळ केली. श्रीपतरावांना आपल्या मुलाचा प्रेमसंबंध मुळींच आवडला नाहीं. आपल्या प्रतिष्ठित घराण्याच्या कीर्तीस कलंक लागेल असें चारित्र्यहीन वर्तन प्रत्यक्ष आपल्या मुलाच्या हातून घडावें याचा त्यांना मनस्वी संताप आला. त्यावद्दल त्यांनीं त्याची तीव्र शब्दांनीं निर्भर्त्सना करून त्यांच्या विवाहास अनीतिमूलक म्हणून संमति देण्याचें साफ नाकारलें. एवढेंच नव्हे तर इतःपर सुहासिनीचा नाद न सोडल्यास मुतालिक घराण्याच्या इस्टेटीवरचा वारसाहक्क कायमचा नष्ट करण्याचा धाक त्यांनीं भगवंतरावास घातला. सुहासिनीला आपल्या भवितव्याचें भेसूर चित्र स्पष्टपणें दिसूं लागलें. तिची स्थिति अत्यंत केविलवाणी झाली. सर्व जग आपल्याभोंवतीं गरगर फिरत असल्यासारखें तिला वाटूं लागलें. तिच्या प्रेमाखातर वाटेल तो त्याग करण्याची भगवंतरावाची तयारी होती. पण तिचेंहि त्याच्यावर निस्सीम प्रेम असल्यामुळें प्रियकराच्या सुखासाठीं आपल्या सर्वस्वाचा होम करण्याची तिनें आपल्या मनाची तयारी केली. दूर कोठें तरी निघून जाण्याचा तिनें आपल्या मनाचा निर्धार केला. आपण नाहींसें होतांच आपल्यावरील उत्कट प्रेमामुळें आपला प्रियकर आपला

शोध केल्याशिवाय राहणार नाहीं याची तिला कल्पना असल्यामुळें तिनें कमलापूर सोडतांना भगवंतरावास एक पत्र लिहून ठेवलें होतें. पत्रांतील मजकूर पुढीलप्रमाणें होता—

" हृदयेश्वरा, तुमच्या सुहासिनीचें आतां तुम्हांला हें शेवटचें प्रेम-निवेदन आहे. झाल्या गोष्टीबद्दल मी तुम्हांला तिळमात्र दोष देत नाहीं. आपला प्रेमसंबंध त्या परमेश्वराला रुचला नाहीं म्हणून; त्याचा अंत करण्यासाठीं मी आज जगांतून कायमची निघून जातांना तुमचा शेवटचा निरोप घेत आहें. माझ्याबद्दल आपल्या मनाला बिलकूल वाईट वाटूं न देतां तुमच्या वडिलांच्या इच्छेप्रमाणें आपल्या इभ्रतीला शोभेलशा मुलीशीं विवाह करून संसार थाटावा अशी माझी अंतिम 'इच्छा आहे. जीवितेश्वरा, तुमच्या भावी सुखी संसाराकडे स्वर्गांतून डोळे भरून पाहतांना या तुमच्या लाडक्या सुहासिनीच्या आत्म्यास समाधानच वाटेल.

तुमच्या सहवासास कायमची अंतरलेली तुमचीच

**सुहासिनी.** "

पत्र वाचून भगवंतरावास अत्यंत दुःख झालें. एखाद्या भ्रमिष्टासारखी त्याची स्थिति झाली. सुहासिनीच्या वियोगानें तो अगदीं वेडा झाला. कुठल्याच गोष्टींत त्याचें मन रमेना. शिक्षणासाठीं पुन्हां तो मुंबईस गेला नाहीं; व तशा स्थितींत त्याला पाठविण्याचा श्रीपतरावांनींहि आग्रह धरला नाहीं. सुहासिनीच्या अहर्निश चिंतनाचा भगवंतरावाच्या प्रकृतीवर परिणाम झाल्याशिवाय राहिला नाहीं. दिवसेंदिवस तो निस्तेज दिसूं लागला. आपल्या आततायीपणामुळें आपण मुलाच्या दुःखास कारणीभूत झालों या जाणीवेनें श्रीपतरावांनाहि पश्चात्ताप झाला, परंतु आतां त्याचा कांहीं उप-योग नव्हता. सुहासिनीच्या पत्रामुळें तिचा शोध करण्यांतहि आशेला कांहींच जागा राहिली नव्हती. पश्चात्तापाच्या तीव्र जाणिवेनें व भगवंत-रावाच्या प्रकृतीविषयींच्या काळजीनें श्रीपतरावांची प्रकृतीहि खंगत चालली. संसारावरचें त्यांचें लक्ष अजिबात उडालें. जमिनींची पाहणी करण्यासाठीं आपल्या इनाम गांवीं एरव्हीं दर दोन दिवसांनीं नेमानें जाणारे श्रीपतराव आतां दोन दोन महिने तिकडे फिरकलेसुद्धां नाहींत. तशांतच आणखी

अवर्षणामुळें या वर्षी जमिनींत अजिबात पीक आलें नाहीं. अशा बिकट परिस्थितीमुळें त्यांच्या घरांत कर्जानें पुन्हां आपले हातपाय पसरण्यास सुरवात केली. परंतु त्यालाहि न डगमगतां ते मुलाची प्रकृति सुधारण्याचा हरएक उपाय योजूं लागले.

सर्व दुःखांचा उपशम होण्यास काळासारखें दुसरें प्रभावी औषध नाहीं. या नियमानुसार जसजसा काळ जाऊं लागला तसतसें भगवंतरावाचें सुहासिनीबद्दलचें वेड कमी होऊं लागलें. त्याच्या प्रकृतींतहि सुधारणा होत जाऊन तो दिवसेंदिवस प्रसन्न दिसूं लागला. श्रीपतरावांचा आनंद गगनांत मावेनासा झाला. मुलास अनुरूप पत्नी मिळाल्यास तिच्या प्रेमळ सानिध्यांत तो पूर्ववत् सुखी होईल व मग सुहासिनीची त्याला आठवणहि होणार नाहीं अशा समजुतीनें श्रीपतरावांनीं आपल्या माहितींतल्या एका कुलीन व संपन्न घराण्यांतील मुलीशीं भगवंतरावाचा विवाह लावून दिला. भगवंतरावाची पत्नी रमाबाई ही रूपसंपन्न, प्रेमळ व मोठी चाणाक्ष स्त्री होती. आदर्श आर्य युवतीच्या ठायीं प्रामुख्यानें आढळून येणारे सर्व सद्‌गुण तिच्या ठिकाणीं वास करीत असल्यामुळें आपल्या दैवी गुणांनीं ती आपल्या पतीची मर्जी सदैव प्रसन्न राखूं लागली. रमाबाईच्या सहवासांत भगवंतराव पूर्ववत् प्रसन्न दिसूं लागतांच श्रीपतरावांना मुलाच्या प्रकृतीच्या काळजींतून मुक्त झाल्याचें समाधान वाटूं लागलें. पण त्यांची स्वतःची प्रकृति काळजी करण्यासारखी झाली होती इकडे त्यांचें कुठें लक्ष होतें! मध्यंतरींच्या काळजीमुळें त्यांची प्रकृति जी एकदां खालावली होती ती पुन्हां सुधारलीच नाहीं. ते दिवसेंदिवस खंगत जाऊन अखेर त्यांतच त्यांचा अंत झाला. श्रीपतरावांच्या मृत्यूनंतर संसाराचा सर्व भार एकट्या भगवंतरावावर पडला. रमाबाईच्या प्रेमळ सहवासांत जरी त्याचे दिवस आनंदांत चालले होते तरी सुहासिनीबद्दलचें त्याचें वेड मात्र अजिबात गेलें नव्हतें. मधून मधून तिच्या आठवणीनें तो बेचैन होत असे. त्यांत आणखी संसाराची नवीन जबाबदारी त्याच्यावर येऊन पडल्यामुळें तो वरचेवर आजारी पडूं लागला. जमीनजुमल्याकडे तो मुळींच लक्ष घालीनासा झाला. त्यामुळें उत्पन्न भरपूर येईनासें झालें; व दरवर्षी मागील कर्जांत पुन्हां नवीन कर्जाची भर पडत चालली. अशा स्थितींत दहाबारा वर्षें गेलीं.

वरचेवर आजारी पडूं लागल्यामुळें प्रकृति खालावत चाललेली, त्यांत आणखी मधून मधून सुहासिनीच्या प्रेमस्मृतीनें होणारा मानसिक त्रास, यामुळें शेवटीं भगवंतरावास क्षयानें गांठलें व थोड्या दिवसांच्या आजारानंतर त्यांतच तो मरण पावला. मरणसमयीं भगवंतरावानें रमाबाईस जवळ बोलावून सुंदर सोनेरी चौकटींत बसविलेला एक फोटो तिच्या स्वाधीन केला होता; व तिच्याकडून त्या फोटोचा अवमान कधींहि होऊं नये व तो सतत आपल्या फोटोशेजारीं ठेवण्यांत यावा अशी अंतिम इच्छा प्रगट केली होती. तो फोटो दुसऱ्या कोणाचा नसून सुहासिनीनें तिचा भगवंतरावाशीं प्रथम प्रेमसंबंध घडून आल्यावेळीं त्यास आपल्या प्रेमाची खूण म्हणून अर्पण केलेला तिचाच तो फोटो होता. त्या फोटोच्या मुळाशीं असलेलें आपल्या पतीचें प्रेमरहस्य रमाबाईला ठाऊक झालेलें होतें. परंतु ती अत्यंत थोर मनाची, पतिनिष्ठ व प्रेमळ स्त्री असल्यामुळें आपल्या पतीच्या इच्छेस अनुसरून तिनें त्या फोटोचा कधींहि तिरस्कार केला नाहीं. उलट जिच्या प्रेमापुढें आपल्या पतीला सर्व जग तुच्छ वाटलें ती फोटोंतील स्त्री खरोखरीच अलौकिक असली पाहिजे अशी तिची खात्री होऊन त्या फोटोविषयीं तिच्या ठिकाणीं आदरभाव निर्माण झाला. त्या फोटोस पूज्य मानून तिनें तो सतत आपल्या पतीच्या फोटोशेजारीं टांगून ठेवला. पतीच्या फोटोबरोबर त्याचीहि पूजा ती नित्य करूं लागली.

भगवंतराव व रमाबाई या जोडप्यास दोनच अपत्यें झालीं. भगवंतराव ज्यावेळीं निधन पावले, त्यावेळीं त्यांचा थोरला मुलगा जगजीवन हा बारा वर्षांचा होता व धाकटा राजेश्वर चार वर्षांचा होता. भगवंतरावाच्या मृत्यूनें रमाबाईवर दुःखाचा डोंगर कोसळला. मुलें अज्ञान, घराण्यांतील कर्त्या पुरुषाचा मृत्यु, स्थावरापैकीं बहुतेक जमिनी कर्जापायीं कब्जेगहाणानें सावकाराच्या ताब्यांत गेल्यामुळें घराण्यास आलेली हलाखीची स्थिति, अशा बिकट परिस्थितींत रमाबाईच्या ठिकाणीं दुसरी एखादी कमकुवत मनाची सामान्य स्त्री असती तर तिनें हाय खाऊन स्वर्गाचाच रस्ता धरला असता. पतिभक्तिपरायण आर्यस्त्रीला पतिनिधनाइतकें दारुण दुःख दुसरें कोणतें असूं शकेल? पण रमाबाई या खंबीर मनाच्या, बाणेदार स्त्रियांपैकीं एक होत्या. आपण अशा वेळीं धीर सोडल्यास आपल्या घराण्याचा

नाश झाल्याशिवाय राहणार नाहीं, असा पोक्त विचार करून पतिनिधनाचें दु:ख त्यांनीं निमूटपणें गिळलें व सर्व संकटांना धैर्यानें तोंड देण्याचा निर्धार केला. भगवंतरावचे कॉलेजांतील एक सहाध्यायी त्यावेळीं सरकारी नोकरींत मोठ्या हुद्याच्या जागेवर होते. त्यांच्या सहाय्यानें त्यांनीं आपली कर्जांतून जी थोडी स्थावर मिळकत मोकळी राहिली होती ती अज्ञानाची म्हणून सरकारव्यवस्थेखालीं राहण्यास दिली. भगवंतरावाच्या मृत्यूनंतर त्यांच्या राहिलेल्या जमिनीहि रमाबाईसारख्या स्त्रीच्या असहाय्यतेचा फायदा घेऊन आपणांस सहज पचवितां येतील अशी आशा त्यांच्या सावकारांस वाटत होती. परंतु रमाबाईनीं शहाणपणानें वरीलप्रमाणें मिळकतीची व्यवस्था केल्यामुळें त्यांची निराशा झाली. मुलें जसजशीं मोठीं होऊं लागलीं तसतशी त्यांच्या शिक्षणाची त्यांनीं व्यवस्था केली. थोरला मुलगा जगज्जीवन हा सुस्वभावी, प्रेमळ व मातृभक्त होता. तो जात्याच बुद्धिमान् असल्यामुळें प्रत्येक परीक्षेंत उत्तीर्ण होत जाऊन यथाकालीं तो पदवीधर झाला, व आपल्या गांवांतील सरकारी हायस्कुलांत अध्यापक झाला. धाकटा मुलगा राजेश्वर हा मात्र उनाड निघाला. शेंडेफळ म्हणून लहानपणापासून लाडांत वाढविल्यामुळें तो स्वच्छंदी, अहंमन्य व मिजासखोर निघाला. पहिल्यापासूनच त्याचें शिक्षणाकडे दुर्लक्ष असल्यामुळें मॅट्रिकपर्यंत त्याचें शिक्षण कसेंबसें झालें होतें. व्यवहारआळींतील सावकारांच्या दुर्व्यसनी उनाड मुलांच्या संगतीनें तो व्यसनी व कुमार्गी बनला. त्याचे उनाड मित्र त्याच्याकडून कांहींतरी निंद्य कर्म करवीत व त्याचे परिणाम रमाबाई आणि जीवन यांना भोगावे लागत असत. त्या बाबतींत त्यांनीं अनेक वेळां त्याची प्रेमळ शब्दांनीं कानउघाडणी करण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याच्या उनाड मित्रांची त्यास आंतून जाणूनबुजून फूस असल्यामुळें तो आपल्या आईला व भावाला मुळींच जुमानिनासा झाला. म्हणून घराण्याच्या इभ्रतीसाठीं शिस्त म्हणून त्यांनीं पुढें पुढें त्याला धाकांत ठेवण्याचा प्रयत्न केला; पण त्याचा परिणाम असा झाला कीं, तो रमाबाई व जीवन यांचा द्वेष करूं लागला; व क्षुल्लक कारणावरून घरांत वरचेवर तंटे करून त्यांना उपद्रव देऊं लागला. दुर्व्यसनी व दुराचरणी सोबत्यांच्या नादानें अपेयपान, अभक्ष्यभक्षण, निंद्याचरण असे गांवांत त्याचे रोजचे व्यवहार चालूच होते.

या रोजच्या व्यसनासाठीं [illegible] पैशाची नड सतत भासत असे. म्हणून ती दूर करण्यासाठीं घरांतील एखादी मूल्यवान् वस्तु अगदीं कमीं किंमतीस तो आपल्या मित्रांना खुशाल विकून टाकीत असे. किंवा तें न जमल्यास गांवांतील कोणाकडून तरी तो हातउसने कर्ज काढीत असे, बिचारा जीवन रोजच्या नोकरींत व प्रापंचिक कारभारांत नेहमीं चूर असल्यामुळें त्याला या गोष्टींची कल्पनाहि नसे. अशाच एका हातउसन्या व्यवहाराच्या बाबतींत तो पुरा करण्याच्या कामीं कबुलीप्रमाणें राजाकडून वर्तन न झाल्यामुळें त्याच्या सावकारानें एकदां भररस्त्यावर त्याची फजिती केली व व्यवहारासंबंधींची सर्व हकीकत जीवनच्या कानांवर घातली. त्यावरून जीवननें त्या बाबतींत राजास खुलासा विचारतांच जीवनला बोलूं नये ते अपशब्द बोलून व त्याच्याशीं तंटा करून तो एके दिवशीं घरांतून जो पळून गेला तो पांचसहा वर्षे झालीं तरी गांवीं परत आला नाहीं.

जीवन सज्ञान झाल्यावर सरकारव्यवस्थेखालीं असलेली त्याची मिळकत सरकारांतून त्याच्या ताब्यांत मिळालेली होती. मिळकत सरकारव्यवस्थेखालीं असतांना अज्ञानांच्या जमिनींचा लागणीचा लिलांव दरसाल सरकारमार्फत होत असे. त्या रकमेंतून रमाबाई व अज्ञान मुलें यांच्या पोटगीसाठीं ठरलेली रक्कम वजा होऊन शिल्लक राहिलेली रक्कम अज्ञानाच्या खातीं सरकारांत जमा होती. एकंदर मिळकत ताब्यांत मिळतांना ही रक्कमहि जीवनला मिळालेली होती. नोकरीच्या पैशांतून त्यानें बरीच रक्कम शिल्लक टाकलेली होती. शिवाय रमाबाईनीं पोटगीसाठीं मिळणाऱ्या रकमेंतून अत्यंत काटकसर करून दरसाल थोडी थोडी रक्कम शिल्लक ठेवलीच होती. या सर्व रकमेंतून जीवननें वडिलार्जित सर्व कर्जाची फेड करून कर्जांत गुंतलेल्या सर्व जमिनी सावकारांच्या ताब्यांतून नुकत्याच आपल्या ताब्यांत घेतलेल्या होत्या. आपल्या सर्व प्रयत्नास, कर्तबगारीस व त्यागास शेवटीं गोड फळ आलें, यापुढें गांवांत मानानें जगतां येईल अशी स्थिति आपणांस प्राप्त झाली अशा आनंदांत रमाबाई व जीवन दोघेहि मग्न झाले होते. जीवन हा प्रेमळ व अत्यंत थोर अंतःकरणाचा पुरुष असल्यामुळें आपल्या धाकट्या भावाचे पूर्वींचे सर्व अपराध तो पूर्णपणें विसरून गेला होता. राजाभाऊवर त्याचें अत्यंत प्रेम होतें. त्यामुळें त्यानें अशा स्थितींत आपल्यापासून या घराण्याचा

या गोष्टीच्या कार्यकारणसंबंधाविषयीं आपलें मत प्रदर्शित करूं लागला. अर्थात् या कुटाळकंपूच्या न्यायसभेच्या कक्षेंत ही गोष्ट आल्यावांचून राहिली नाहीं. पिंपळाच्या पारावर दररोज याच एका गोष्टीची चर्चा सुरू झाली. कोणी म्हणत, "जीवण मुतालिकाला लईच आपसौरात. भावाचं समदं त्येला एकल्याला गिळाया व्होवं ! म्हमावैनिबी तसल्याच ! दोनीबी ल्याक त्यांचंच; पन एकल्या जीवणापायी त्येंचा जीव तुटतुया ! मंग धाकल्याला कसंवं ग्वाड वाटावं ?" यावर दुसरे कोणीं हें विधान खोडून काढीत व म्हणत, "कुनी कायबी म्हनू द्या; पन राजा लई वंगाळ वागनुकीचा मानूस हाय ! आवं असल्या वागनुकीच्या पायींच आईभावा-संगं भांडान करून त्यो इकल्या दिवस गाव सोडूनशान पळून गेला व्हता. सावकाराचं समदं रीनपानी एकल्या जीवणानं फेडलया; आन् आतां आयत्या बिळांतल्या नागुबावानी जिम्नीची वाटनी मागतुया !" याप्रमाणें कुणी जीवनची बाजू घेऊन राजाला दोष देत तर कुणी राजाच्या कृतीचें समर्थन करून चुकीचें माप सर्वस्वीं जीवनच्या पदरांत टाकीत. जीवनच्या कानांवर जेव्हां या गोष्टी येऊं लागल्या तेव्हां त्याला अत्यंत वाईट वाटलें. लोकांना तोंड दाखविण्याची त्याला खंत वाटूं लागली. त्याच्या मनाची स्थिति एखाद्या गुन्हेगारासारखी झाली. वास्तविक जीवनच्या मनाची स्थिति अशी होण्याचें कांहींच कारण नव्हतें. लोकांना दोषार्ह वाटेल असें कोणतेंहि कृत्य त्याच्या हातून आजपर्यंत झालेलें नव्हतें. वडिलार्जित बहुतेक जमिनी कर्जापायीं सावकारांच्या ताब्यांत गेल्यामुळें आतांपर्यंत जरी त्याची स्थिति हलाखीची होती तरीही त्यानें आपल्या लाचारपणाचें प्रदर्शन लोकांत कधींहि केलेलें नव्हतें. आपल्या घराण्याच्या इभ्रतीला व नांवलौकिकाला साजेल अशाच मानीपणानें व बाणेदारपणानें तो आजपर्यंत वागत आलेला होता. दुसऱ्या कोणाकडूनहि कसल्याच प्रकारच्या मदतीची अपेक्षा न करतां त्यानें स्वतःच्या हिंमतीवर आपलें शिक्षण पुरें केलेलें होतें, स्वतःच्या हिंमतीवर द्रव्य संपादन केलें होतें, व स्वतःच्या हिंमतीवर वडिलार्जित कर्ज फेडून जमिनी ऋणमुक्त केलेल्या होत्या. तो कुणाचा कशालाहि मिंधा नव्हता. शिवाय त्याचें वर्तनहि

सर्वांशीं प्रेमळपणाचें व मनमिळाऊपणाचें होतें; आचरण पवित्र होतें. त्यामुळें गांवांत बहुतेकांना तो हवासाच वाटे. परंतु तो अब्रूदार असल्या-मुळें आपल्या भावाच्या गैरवागणुकीमुळें व फुटीर वृत्तीमुळें आपल्या खाजगी बाबीसंबंधीं व गृहछिद्रासंबंधीं लोकांत जाहीररीतीनें चर्चा सुरू व्हावी हें त्याला अत्यंत कमीपणाचें वाटलें. म्हणूनच त्याला लोकांत उजळ माथ्यानें हिंडण्याफिरण्याची शरम वाटूं लागली. गांवांतील इंग्रजी शाळेंत जे शिक्षक होते त्यांत गांवचा रहिवासी असा एकटा जीवनच होता. व्यवहारआळींत राहणारे त्याचे पूर्वींचे सावकार लोक व कांहीं छिद्रान्वेषी मत्सरी लोक सोडल्यास गांवांतील सर्वांना तो प्रिय असल्यामुळें गांवांतील एखाद्या सार्वजनिक उत्सवांत, शाळेतर्फे होणाऱ्या एखाद्या समारंभांत, अगर एखाद्या सार्वजनिक कार्यक्रमांत पुढारीपणाचा मान बहुतेक जीवनलाच मिळत असे. आणि त्यालाहि अशा सामुदायिक कार्यांत भाग घेण्यास एक प्रकारची हौस व उत्साह वाटत असे. परंतु आतां तो कसल्याहि सार्वजनिक कार्यक्रमांत भाग घेण्याचें टाळूं लागला. कुटाळकंपूच्या सदस्यांना मात्र या साध्या गोष्टींमुळेंसुद्धां चर्चेला एक नवीनच विषय मिळाला. त्यांच्या रोजच्या न्यायसभेंत कोणींतरी हा विषय उपस्थित केल्यावरून दुसऱ्या एकानें त्यावर भाष्य केलें—“ आवं त्येला आतां बाहिर पडाया त्वांड नग का ? गांवकरी त्वोंडांत × × घालत्याल ना ? ” आणि हें त्याचें अचूक निदान त्याच्या सर्व सहकाऱ्यांना पसंत पडून हास्यकल्लोळांत सर्वांनीं त्याचें स्वागत केलें. अशा प्रकारें प्रत्यक्ष आपल्या भावाच्या फुटीर व घरभेद्या वृत्तीमुळें आंतून होणारा मानसिक त्रास व बाहेरून अशा दोषैकदर्शी, परपीडनानंदशील कुटाळ लोकांकडून निष्कारण सहन करावे लागणारे निंदेचे वाग्बाण यांमुळें जीवनसारख्या मानी परंतु हळव्या मनाच्या निष्पाप तरुणाची अत्यंत शोचनीय अवस्था झाली असल्यास व त्याच्या एकंदर वागण्यांत एक प्रकारच्या उदासीनतेची छाया पसरलेली असल्यास नवल नव्हतें.

जीवनच्या उदासीनतेचें याखेरीज दुसरें एक कारण होतें. तें म्हणजे त्याला त्याच्या भावी परिस्थितीबद्दल वाटत असलेली तीव्र निराशा हें होय. त्याचा धाकटा भाऊ राजा जेव्हां गांवीं परत येऊन त्याच्यापासून

फटकून वेगळा राहूं लागला तेंव्हां तो आपणहून त्याच्याकडे गेला होता. त्याला आपल्याकडे नेण्यासाठीं त्यानें त्याची परोपरीनें विनवणी केली होती; त्याची समजूत घालण्याचा हरएक प्रयत्न केला होता; गांवांतील वजनदार लोकांच्या मध्यस्थीचा उपयोग करून पाहिला होता; परंतु त्यांपैकीं कशाचाच उपयोग झाला नव्हता. राजा हा जात्याच दुष्ट, कपटी, हेकेखोर असल्यामुळें त्यानें जीवनचा अपमान करून त्याच्या सर्व उपायांना साफ धुडकावून दिलें होतें. रमाबाईनींहि त्या बाबतींत पुष्कळ प्रयत्न करून पाहिले होते व त्याच्या मनावर परिणाम होण्यासाठीं दोनदोन दिवस अन्नत्यागहि केला होता. पण त्याला त्याच्या या अदूरदर्शी कृत्यापासून परावृत्त करण्याच्या कामीं त्यांनाहि यश आलेलें नव्हतें. यापुढें आपण व आपला भाऊ कायमचे एकमेकांना दुरावलों, आपल्याला आपल्या भावाचें पाठबळ यापुढें मिळणार नाहीं या जाणिवेनें जीवनचें कोमल अंतःकरण शतशः विदीर्ण झालें होतें व त्यानें मनांत योजिलेल्या त्याच्या भावी आशा-आकांक्षांच्या मंदिराला जबरदस्त हादरा बसला होता. या एकंदर कारणांमुळें त्याच्या मनोवृत्तींत उदासीनता आलेली होती.

जीवनला राजाचें मन वळविण्याच्या कामी अपयश येण्याचें कारण त्याच्या बुडाशीं राजाच्या सोबत्यांची त्याला आंतून असलेली चिथावणी हें होतें. राजाचे सोबती हे त्याच्यासारखेच दुष्ट, बदमाष व कारस्थानी होते. राजाला एकत्रांत राहण्याचा आग्रह करण्यांत त्याला पूर्ण परावलंबी करून आपल्या हातांतील खेळणें बनविण्याचा, स्वतंत्र संसार चालविण्यास असमर्थ व नालायक करण्याचा, वडिलार्जित इस्टेटीसंबंधींच्या एकंदर व्यवहारांत अडाणी ठेवण्याचा व अशा तऱ्हेनें सर्व इस्टेट आपल्या घशांत टाकण्याचा जीवनचा स्वार्थी कावा असल्याबद्दल त्यांनीं राजाच्या मनांत पूर्ण भरवून दिलेलें होतें. राजा हा मूर्ख, अहंमन्य, परप्रत्ययनेयबुद्धि व व्यवहारशून्य होता हें त्याच्या धूर्त सोबत्यांनीं पूर्णपणें ओळखलें होतें. म्हणून त्याला हाताशीं धरून त्याच्या इस्टेटीवर चैन मारण्याचा व बेताबातानें पुढें त्याच्या जमिनीहि गिळंकृत करण्याचा त्यांचा नीच डाव होता. आणि तो साध्य होण्यासाठीं राजाला जीवनपासून वेगळा काढून असहाय्य करणें व

जीवनच्या सहानुभूतीला पारखा करणें यांतच त्यांच्या नीच कारस्थानाचें बीज होतें. म्हणून जेणेंकरून जीवनविषयीं राजाच्या मनांत पूर्ण तिरस्कार उत्पन्न होईल अशी प्रत्येक गोष्ट करण्याची त्यांनीं खबरदारी घेतली होती; आणि अखेर त्यांच्या इच्छेप्रमाणें सर्व गोष्टी घडून आलेल्या होत्या. राजा पूर्णपणें त्यांच्या कह्यांत गेला होता; व सर्वस्वीं त्यांच्याच तंत्रानें वागत होता. भावाच्या सहकार्यानें शेतींत सुधारणा करून उत्पन्न वाढवावयाचें, एकजुटीनें व प्रेमानें राहून घराण्याची भरभराट करावयाची व गांवांत मानानें जगतां येईल अशी स्थिति प्राप्त करून घ्यावयाची अशी उमेद जीवननें प्रथमपासून आपल्या उराशीं बाळगली होती. राजाला एकत्रांत आणण्यांत हाच त्याचा उदात्त हेतु होता. परंतु राजाला तो त्याच्या दूषित दृष्टीमुळें मानभावीपणाचा व स्वार्थी वाटत असल्यामुळें त्याचें मन वळविण्याच्या कामीं जीवनला यश आलें नाहीं. अशा प्रकारें राजाच्या बाबतींत पूर्ण निराश झाल्यामुळें जीवननें अखेर त्याचा नाद सोडला होता व दैवावर हवाला ठेवून उदासीनवृत्तीनें तो रोजचे व्यवहार पाहात होता.

भावापासून विभक्त होऊन राजा स्वतंत्रपणें आपला संसार पाहूं लागला खरा, पण पदोपदीं त्याला पैशाची अडचण भासूं लागली. आतांपर्यंत भावाच्या जिवावर त्यानें बेजबाबदारपणानें आळसांत आणि चैनींत आपलें आयुष्य घालविलें असल्यामुळें स्वतःच्या हिंमतीवर द्रव्यार्जन करतां येईल इतकें पुरेसें शिक्षण किंवा एखाद्या उपयुक्त धंद्याचें ज्ञान अगर एखादी कला यांपैकीं कोणतेंहि धनोत्पादक साधन त्याच्याजवळ नव्हतें. चैनीच्या व ऐश-आरामाच्या वागणुकीमुळें त्याचें शरीर आळशी व मन दुर्बल बनलेलें होतें. जबाबदारीनें एखादें कार्य शिरावर घेऊन तें पार पाडण्याची हिंमत त्याच्या ठिकाणीं नव्हती. त्यामुळें संसाराची जबाबदारी जरी त्यानें शिरावर घेतली होती तरी ती पार पाडण्यास लागणारी कर्तबगारी व आत्मविश्वास यांचा त्याच्या ठिकाणीं संपूर्ण अभाव असल्यामुळें व त्यांतच आणखी आर्थिक असहाय्यतेची भर पडल्यामुळें त्याची पदोपदीं वुजल्यासारखी स्थिति होऊं लागली. पैशाच्या टंचाईमुळें आजपर्यंत चैनीस चटावलेल्या त्याच्या मनाचा कोंडमारा होऊं लागला. शिवाय नादान मित्रांच्या नादानें त्याला कांहीं नवीन व्यसनें जडलेलीं होतीं. किंवा त्याच्या मित्रांनीं त्याला तीं मुद्दाम

जडविलेली होती. आणि त्यांत त्याला अडकवून ठेवण्यासाठीं प्रथम त्यांनीं त्याच्यासाठीं पदरचा पैसा खर्च केलेला होता. पण पुढं तो व्यसनांच्या पूर्ण आहारीं जातांच त्याला पैशाची मदत करण्याचें त्यांनीं बंद केलें होतें. त्यामुळें अलीकडे रोजच्या प्रापंचिक खर्चासाठीं व व्यसनांच्या तृप्तीसाठीं लागणाऱ्या पैशाच्या विवंचनेंत तो रात्रंदिवस गुरफटलेला होता. ह्या त्याच्या मनःस्थितीचा फायदा त्याच्या धूर्त मित्रांनीं ताबडतोब घेतला. पैशाची अड-चण दूर करण्याचा त्यांनीं त्याला एक नवीन मार्ग सुचविला.

कमलापूर गांवांत व त्याच्या आसपासच्या सातआठ खेड्यांत जीवन-च्या मालकीच्या ज्या वडिलोपार्जित जमिनी होत्या त्या ऋणमुक्त होऊन थोड्याच दिवसांपूर्वी सावकारांच्या ताब्यांतून जीवनच्या कबजांत आल्या होत्या. जीवनच्या वाडवडिलांपासून चालत आलेल्या कुळांच्या वंशजांकडेच त्या दरसाल ठरीव पैशाचा खंड देण्याच्या करारानें लागणीस होत्या. जमिनींची निगा कुळांकडून कशी ठेवली जाते तें पाहण्यासाठीं आणि त्यांच्यांत उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीनें कांहीं विशेष सुधारणा करण्यासारख्या असल्यास त्या जमिनींच्या त्या त्या कुळांच्या सल्ल्यानें करवून घेण्यासाठीं मधून मधून चारआठ दिवसांनीं जीवन आपल्या जमिनींच्या गांवीं नेमानें जात असे. परंतु मध्यंतरीं रमाबाई ह्या कांहीं दिवस वातविकारानें आजारी असल्या-मुळें व त्यानंतर स्वतः जीवनचीच प्रकृति कांहीं किरकोळ आजारानें बरी नसल्यामुळें तो बरेच दिवस तिकडे अजिबात फिरकला नाहीं. या संधीचा फायदा घेऊन राजानें आपल्या मित्रांच्या सल्ल्यानुसार जमिनींच्या गांवीं जाऊन, व रमाबाई व जीवन यांच्या आजारीपणाचें कारण पुढें करून त्यांच्या औषधपाण्याच्या खर्चासाठीं म्हणून खंडाच्या पैशांपैकीं कांहीं रक्कम जमिनींच्या कुळांकडून आगाऊ वसूल केली. जमिनींच्या कुळांचें आपल्या नवीन मालकावर—जीवनवर—अतिशय प्रेम होतें. जमिनी सावकारांच्या ताब्यांत असतांना सावकारांच्या जुलुमाखालीं तीं कुळें भरडून निघालेलीं होतीं व मूळ मालकाकडे जमिनी केव्हां जातात याची वाट पाहात होतीं. त्यामुळें जमिनी जीवनच्या ताब्यांत आल्यावर त्यांना साहजिकच आनंद झालेला होता. शिवाय जीवननेंहि त्यांना तसेंच प्रेमानें व सहानुभूतीनें वागविलें होतें व जमिनी लागणीस देतांना त्यांना अनेक सवलतीहि दिलेल्या होत्या. रमाबाई तर

त्यांना प्रत्यक्ष आपल्या माउलीच वाटत होत्या. म्हणून रमाबाई व जीवन आजारी असल्याचें जेव्हां त्यांना राजाच्या तोंडून समजलें तेव्हां त्यांनीं त्या उभयतांवरील प्रेमामुळें कांहीं आढेवेढे न घेतां राजाला त्याच्या मागणीप्रमाणें आगाऊ पैसे दिले. शिवाय जीवनबरोबर भांडण करून राजा वेगळा राहिला असल्याचें त्यांना माहीत नव्हतें. पुढें कांहीं दिवसांनीं आजारांतून पूर्ण बरा झाल्यावर जीवन आपल्या जमिनींच्या गांवीं गेल्यावेळीं जेव्हां कुळांकडून ही हकीकत त्याला समजली तेव्हां त्याला अत्यंत आश्चर्य वाटलें. राजाच्या नैतिक अधःपतनाबद्दल त्याला अत्यंत चीड आली; पण लगेच त्याच्या असहाय्य स्थितीची त्याला कींवहि आली. तो मनाचा अत्यंत थोर होता. आपल्या बंधूच्या दुर्लौकिकाची कहाणी परक्यांपुढें सांगून आपलें गृहछिद्र लोकांपुढें उघडें करून दाखविण्याची त्याला अत्यंत शरम वाटली. म्हणून त्या प्रकरणाचा अधिक ऊहापोह न करतां ज्या ज्या कुळांकडून राजानें आगाऊ पैसे वसूल केले होते त्या त्या कुळाला पैसे पोहोंचल्या-बद्दलच्या आपल्या सहीच्या पावत्या त्यानें मुकाट्यानें दिल्या.

दुर्व्यसनी मित्रांच्या संगतीनें राजा स्वैरपणानें वागत असून तो आपल्या-पासून विभक्त राहूं लागला असल्याची हकीकत जीवननें जरी आपल्या कुळांना त्यावेळीं कळूं दिली नाहीं तरी पुढें लवकरच ती त्यांना समजल्या-शिवाय राहिली नाहीं. राजाच्या त्या अविवेकी कृत्याबद्दल जो तो त्याला दोष देऊं लागला. आणि पुढें वेळोवेळीं त्याच्या दुर्व्यसनाच्या गोष्टी जसजशा त्यांच्या कानांवर जाऊं लागल्या तशी त्याच्याबद्दल त्यांना बिलकूल सहानुभूति वाटेनाशी झाली.

राजानें कुळांकडून वसूल केलेला पैसा थोड्याच दिवसांत हलकट सोबत्यांच्या नादानें चैनींत उधळून टाकल्यामुळें पुन्हां तो पैशाच्या फिकिरींत पडला. एके दिवशीं तो कुळांकडे जाऊन पुन्हां पैशाची मागणी करूं लागला. तो व त्याच्याबरोबर आलेले त्याचे हलकट सोबती यांना पाहतांच सर्वच कुळें एकदम बिथरलीं. त्यांनीं त्यांच्या तोंडावर त्यांची हेटाळणी करण्यास सुरुवात केली. भावापासून विभक्त झाल्याबद्दल त्यांनीं राजाची खूप निर्भर्त्सना करून थोरल्या धन्याच्या—जीवनच्या संमतीशिवाय त्यास पैसा देण्याचें त्यांनीं साफ नाकारलें. कुळांनीं आपल्या सोबत्यांच्या समक्ष

आपल्या तोंडावर आपल्या भावाला धनी म्हणावें व त्याच्या संमती-शिवाय आपणांस पैसा देण्याचें नाकारून पर्यायानें जमिनींच्या वसुलांतील आपला मालकी हक्क साफ उडवून लावावा या गोष्टीचा राजाला अत्यंत अपमान वाटून त्याचा राग एकदम भडकला. त्या आवेशांत जमलेल्या कुळांच्या अंगावर धांवून जाऊन तो खेंकसून ओरडला—“ तो जीवन तुमचा तेवढा धनी; आणि मी कोणी चोर आहे का रे लेकांनो ? थांबा; मी कोण आहें तें तुम्हांला आतांच दाखवितों, ” असें बोलून त्यांच्या-पैकीं एकदोन पुढाऱ्यांना धरून मारण्याबद्दल त्यानें आपल्या सोबत्यांना आज्ञा दिली. त्याचे सोबती मूर्ख व अविवेकी असल्यामुळें त्याच्या आज्ञेप्रमाणें करण्यास ते पुढें सरकतांच अगोदरच खवळून गेलेल्या कुळांच्या जमावांतून दोघांनीं राजाला एका ठिकाणीं घट्ट धरून ठेवलें व बाकीच्या पांचसात जवानांनीं राजाच्या सोबत्यांना धरून लाथाबुक्क्यांचा त्यांना यथेच्छ प्रसाद देण्यास सुरुवात केली. त्याबरोबर ते शाळूसोबती माराला भिऊन वाट दिसेल तिकडे पळत सुटले. राजा रागानें दांतओंठ खात व कुळांना शिव्यांची लाखोली वहात चरफडत गांवाकडे परत आला.

या अपमानाचें शल्य राजा व त्याचे सोबती यांच्या मनांत रात्रंदिवस सलत राहिलें. विशेषतः तें राजाच्या सोबत्यांना अधिक बोंचत होतें. त्याचें कारण त्यांना जीवनच्या कुळांकडून चोप मिळाल्याबद्दलची हकीकत त्यानंतर थोड्याच दिवसांनीं कमलापूर गांवांत सर्वांना समजली व त्याबद्दलची चर्चा रोज पिंपळाच्या पारावर कुटाळकंपूच्या न्यायसभेंत होऊं लागली. राजाचे सोबती अगोदर जात्याच दुष्ट व खुनशी असल्यामुळें व त्यांत आणखी वरील अपमानाची भर पडल्यामुळें झाल्या प्रकाराबद्दल जीवनच्या कुळांवर सूड उगविण्याचा त्यांनीं निश्चय केला. कुळांच्या गांवांतील गुंड लोकांपैकीं कांहींना पैशाचें आमिष दाखवून त्यांनीं वश करून घेतलें व त्यांच्या साह्यानें कुळांना सतावून सोडण्यास सुरुवात केली. अर्थात् ह्या सर्व कटाला राजाची संमति होतीच. राजाच्या सोबत्यांनीं गुंडांच्या मदतीनें कुळांपैकीं कोणाचीं उभीं पिकें कापून नेलीं, तर कोणाचीं निघालेल्या पिकांची मळणीसाठीं रचून ठेवलेलीं बुचाडें जाळून टाकलीं;

कोणाच्या शेतांच्या ताली फोडल्या तर कोणाच्या विहिरींचे वरवंटे ढासळून दिले; कोणाच्या बैलांना व दुभत्या जनावरांना विषप्रयोगानें ठार मारलें तर कोणाच्या घरावर दरोडा घालून आंतील चीजवस्त लुटून नेली; कोणाच्या बायकांची दिवसाढवळ्या इज्जत घेतली तर कोणाचीं नांदतीं घरें पेटवून दिलीं. अशा अनेक प्रकारांनीं कुळांचें नुकसान करून त्यांना सतावण्याचा त्यांनीं नित्यक्रम सुरू ठेवला. या वरचेवर घडणाऱ्या आपत्तींना तोंड देतां देतां कुळांना अगदीं नकोसा जीव झाला. जीवनच्या कानांवर त्यांच्या तक्रारी वरचेवर येऊं लागल्या. आपल्या निरपराध कुळांचें झालेलें नुकसान व हाल पाहून जीवनला पराकाष्ठेचें दुःख झालें. कुळांच्या या आपत्तींना कारण राजा व त्याचे सोबती हेच असल्याचें लोकांनीं ओळखलें व त्याबद्दल ते जीवनला जबाबदार धरूं लागले. जीवननें आपल्या धाकट्या भावाला त्याच्या हिश्शाची निम्मी इस्टेट बिनबोभाट वांटून दिली असती तर जमिनींच्या कुळांना अशा आपत्ति सोसाव्या लागल्या नसत्या असें कांहीं लोक उघड उघड जीवनच्या तोंडावर बोलून त्यास दोष देऊं लागले. रोजच्या त्रासाला कंटाळून कांहीं कुळांनीं जमिनी सोडण्याची त्याला धमकी दिली.

अशा तऱ्हेनें चोहोंकडून बिकट परिस्थिति निर्माण होऊन जीवनला आपलें भवितव्य निराशामय दिसूं लागलें. कांहीं कांहीं वेळां त्याचा मनस्ताप इतका तीव्र झाला कीं, त्या आवेगांत त्याला आपल्या जिण्याचा अंत करावा असें वाटूं लागलें. धाकट्या मुलाचा असा दुर्लौकिक ऐकून बिचाऱ्या रमाबाईंना लोकांना तोंड दाखविण्याची खंत वाटूं लागली; व पुढें काय होणार या निरंतरच्या काळजीनें त्यांनीं अंथरुण धरलें. आपल्या हिश्शाची निम्मी इस्टेट वांटून देण्याबद्दल राजाकडून मध्यस्तां-मार्फत वरचेवर जीवनला धमकीवजा निरोप येऊं लागले. गांवांतील संभावित म्हणविणाऱ्या लोकांकडूनहि जीवनला हाच सल्ला देण्यांत आला. तेव्हां इस्टेटीच्या वांटणीस रमाबाईंनीं नाइलाजानें आपली संमति दिली. भावी आकांक्षांचें आतापर्यंत आपण कल्पनेनें रंगविलेलें रम्य चित्र प्रत्यक्ष सृष्टींत अशा तऱ्हेनें विद्रूप व भेसूर झालेलें पाहून जीवनला मरणप्राय दुःख झालें. अखेर अत्यंत जड अंतःकरणानें त्यानें आपल्या वडिलार्जित

स्थावरजंगम इस्टेटीची फाळणी करण्यास कबुली दिली.

कित्येक पिढ्या आपल्या अखंडत्वानें मिरवत आलेली मुतालिक घराण्याची वास्तुदेवता आज अशा तऱ्हेनें दुभंग झाल्याबद्दल इकडे जीवन व रमाबाई यांचीं अंतःकरणें अक्षरशः दुभंग होऊन त्यांना सगळीकडे निराशेचा घनदाट अंधःकार दिसूं लागला; तर तिकडे श्रमाच्या घामाचा एक थेंबहि गाळावा न लागतां अनायासें निम्मी इस्टेट पदरांत पडल्याबद्दल जीवनचा धाकटा भाऊ राजा व त्याचे सोबती यांनीं आनंदोत्सव साजरा केला. आणि कुटाळकंपूतील लोकांना फुकट तमाशा पाहाण्यास मिळाल्याबद्दल मनांतून हास्याच्या गुदगुल्या होऊं लागल्या.

● ● ●

— ३ —

राजानें जीवनकडून आपल्या हिश्शाची निम्मी इस्टेट वांटून घेतल्याला आतां जवळजवळ पांच वर्षें झालीं होतीं. या पांच वर्षांच्या काळांत त्याच्या विभक्त सांसारिक आयुष्यांत बरींच स्थित्यंतरें घडून आलेलीं होतीं. एकत्रांत असतांना वडिलार्जित सर्व जमिनींची व्यवस्था जीवनच पाहात असल्यामुळें जमिनीसंबंधीं बारीकसारीक सर्व गोष्टींची त्याला पूर्ण माहिती झालेली होती. शिवाय त्याचा स्वभाव शांत, प्रेमळ व मनमिळाऊ असल्यामुळें जमिनींच्या कुळांना त्यांच्या एखाद्या चुकीबद्दल तो कधींहि त्रास देत नसे. एवढेंच नव्हे तर त्यांच्या एखाद्या अडचणीच्या प्रसंगीं तो त्यांना सढळ हातानें मदत करीत असे. त्यामुळें सर्व कुळें त्याला देवमाणूस मानून त्याच्याशीं प्रामाणिकपणानें वागत असत; व जमिनींच्या खंडाचा वसूल ठरल्याप्रमाणें त्याला बिनबोभाट आणून देत असत. परंतु जीवन व राजा यांच्या दरम्यान जमिनींची वांटणी झाल्यानंतर सर्व मनु एकदम पालटला होता. राजाच्या वांटणीस ज्या जमिनी गेल्या होत्या त्या जमिनींचीं कुळेंहि अर्थात् राजाच्या मालकीचीं झालीं होतीं. जमिनींचा सर्व कारभार ज्या-वेळीं एकटा जीवनच पाहात होता त्यावेळीं राजानें त्यांत बिलकूल लक्ष घातलें नव्हतें. त्यानें सर्व आयुष्य आळसांत आणि चैनींत घालविलें होतें. त्यामुळें जमिनीसंबंधीं सर्व व्यवहारांत तो पूर्ण अडाणी राहिला होता. शिवाय आपल्या तामसी, हेकेखोर, चढेल व खुनशी स्वभावामुळें तो आपल्या सर्व कुळांना अप्रिय झालेला होता. जमिनींची वांटणी होण्यापूर्वी त्यानें जमिनींच्या कुळांना वेळोवेळीं दिलेला त्रास तीं कुळें विसरलेलीं नव्हतीं. राजाबद्दल त्यांना बिलकूल सहानुभूति वाटत नव्हती. उलट जमिनीच्या बाबतींतील त्याच्या अडाणीपणाचा फायदा घेऊन तीं त्याला

नेहमीं अडचणींत आणण्याचाच प्रयत्न करीत असत.

राजाचे सोबती हे नीच, स्वार्थी व अधमवृत्तीचे लोक होते. त्यांनीं राजाशीं जोडलेला स्नेहसंबंध खऱ्या मित्रत्वाच्या पवित्र भूमिकेवर आधारलेला नसून स्वार्थमूलक होता. राजाचा स्नेह संपादन करण्यांत स्वतःचा स्वार्थ साधण्यापलीकडे त्यांचा दुसरा कांहीं हेतु नव्हता. राजा मूर्ख व परप्रत्ययनेयबुद्धि आहे हें ते जाणून होते. म्हणूनच धूर्तपणानें त्यांनीं त्याला हाताशीं धरलें होतें. जीवनच्या जमिनींवर त्यांचा पहिल्यापासून स्वार्थी डोळा होता. त्यांच्यापैकीं बहुतेक लोक जीवनचे पूर्वीचे सावकारच असल्यामुळें त्यांच्या ताब्यांतून जमिनी सोडवून जीवननें आपल्या ताब्यांत घेतल्याबद्दल त्यांना वैषम्य वाटत होतें. म्हणून येनकेन प्रकारेण पुन्हां जीवनच्या जमिनींत आपला हात शिरकाविण्याचा त्यांनीं चंग बांधला होता. आणि तो यशस्वी होण्यासाठीं त्यांनीं जें कारस्थान रचलें होतें तें त्यांच्या अपेक्षेप्रमाणें फलद्रूप होण्याच्या मार्गाला लागलें होतें. राजा मूर्ख व व्यवहारशून्य असल्यामुळें कोणतेंहि जबाबदारीचें काम स्वतःच्या अकलेच्या व हिंमतीच्या जोरावर पार पाडण्याची पात्रता त्याच्या ठिकाणीं नसल्याची त्याच्या सोबत्यांची पक्की खात्री होती म्हणून अशा नालायक माणसावर इस्टेटीची व्यवस्था पाहण्याची जोखीम पडल्यास त्याच्या अपात्रतेमुळें ती त्याच्या हातून पार पाडली जाणार नाहीं व अनायासें त्यांत हात शिरकविण्याची आपणांस संधि मिळेल या हेतूनेंच त्यांनीं राजाला त्याच्या भावापासून विभक्त राहण्याचा सल्ला दिला होता. शेवटीं जीवनपासून त्याला वेगळें करण्यांत यश मिळवून त्यांनीं आपल्या कारस्थानांतील यशाचा पहिला टप्पा जिंकला होता; व नंतर जीवन व राजा यांच्या एकत्रांत असलेल्या संघटित मिळकतीची चिरफाड करून राजाचा हिस्सा राजाच्या पदरांत टाकविण्यांत त्यांनीं यशाचा दुसराहि टप्पा गांठला होता. आणि आतां राजाच्या वांटणीस आलेल्या त्याच्या मालकीच्या जमिनी त्याच्याकडून छिनवून घेऊन त्या घशांत घालण्याच्या कारस्थानांत पूर्ण यश मिळवून यशाचा अखेरचा निर्णायक टप्पा गांठण्यासाठीं त्यांचे प्रयत्न चालले होते व अपेक्षेप्रमाणें त्यांत त्यांना यशहि येत चाललें होतें. राजाच्या कुळांना चिथरवून राजाविरुद्ध उठविणें हा त्यांच्या वरील प्रयत्नाचाच एक भाग होता.

राजा व त्याचीं कुळें यांच्यामध्यें पूर्वींपासूनच बेबनाव झालेला असल्याचें त्याच्या धूर्त सोबत्यांनीं ओळखून फाळणीनंतर राजाच्या हिश्शास आलेल्या जमिनींचा वसूल त्यास न देण्याबद्दल त्यांनीं राजाच्या कुळांना आंतून चिथावणी दिलेली होती. राजाला त्याच्या भावाकडून त्याच्या हिश्शाची जी वांटणी मिळाली ती आपल्याच प्रयत्नांमुळें व कारवाईमुळें मिळाली, एरव्हीं जीवननें राजाला त्याच्या हिश्शाची जमीन मुळींच वांटून दिली नसती असें राजाच्या मित्रांचें म्हणणें होतें; आणि या आपल्या उपकाराचा मोबदला म्हणून राजाच्या जमिनींचा वसूल कांहीं वर्षें त्याला न देतां तो आपण परभारें कुळांकडून घेण्याचा डाव त्यांनीं रचला होता. त्यासाठींच त्यांनीं कुळांशीं संगनमत करून व त्यांना पैशाचें आमिष दाखवून राजाविरुद्ध आपल्या कटांत ओढलें होतें. लाभाच्या आमिषानें कुळें त्यांना सामील झालेलीं होतीं पण आपल्या इच्छेविरुद्ध मिळकतीची वांटणी झाल्यामुळें येनकेन प्रकारेण आपल्या भावाला त्याच्या हिश्शाचा उपभोग सुखानें घेऊं द्यायचा नाहीं या इराद्यानेंच जीवननें राजाच्या कुळांना राजाच्या विरुद्ध वागण्याची चिथावणी दिली आहे व त्यामुळेंच तीं अशा प्रकारें वागत आहेत अशी राजाच्या सोबत्यांनीं राजाची समजूत करून दिली होती. जीवनबद्दलच्या मत्सरातिरेकानें सारासार विचारशक्ति नष्ट झाल्यामुळें व दृष्टि तारवटून गेल्यामुळें राजाला आपल्या सोबत्यांचें हें म्हणणें खरें वाटत होतें. आपल्या भावाचे पक्षपाती असणाऱ्या अशा नाठाळ कुळांना आपल्या जमिनींतून काढून टाकण्याचा त्यानें बराच प्रयत्न केला. त्या कामीं आपल्या सोबत्यांकडे त्यानें मदतीची याचना करून पाहिली; पण असें करण्यानें कुळें जास्तच बिथरून जाऊन तीं उघडउघड जीवनला जाऊन मिळतील व मग त्यांना वठणीवर आणणें अधिक त्रासाचें होऊन बसेल म्हणून तूर्त त्यांच्याच तंत्रानें चालणें भावी हिताच्या दृष्टीनें श्रेयस्कर आहे असा कावेबाजपणाचा पण भीतिवजा इशारा राजाच्या सोबत्यांनीं राजाला दिला व त्याला सहाय्य करण्याचें साफ नाकारलें. आपल्या सोबत्यांच्या या दुटप्पी वागणुकीची राजाला मनस्वी चीड आली. परंतु त्यांचें पारिपत्य करण्याची कुवत व धैर्य त्याच्या अंगीं नव्हतें. म्हणून मुकाट्यानें मनांत चरफडत बसण्याखेरीज त्याला गत्यंतर नव्हतें. अशा तऱ्हेनें राजाला

अनुक्रम: २८५२५

विभक्त राहिल्यानंतर चारपांच वर्षें त्याच्या सोबत्यांनीं कुळांच्या मदतीनें कारवाई करून जमिनींच्या वसुलाचा एक पैसाहि मिळूं दिला नाहीं. उलट त्याच्या जमिनींत वेळोवेळीं निरनिराळ्या भानगडी निर्माण करून त्या निस्तरण्यासाठीं त्याला लागणारा पैसा कर्जाच्या रूपानें त्याच्या शिरावर लादण्यास त्यांनीं सुरुवात केली. कुळांकडून जमिनींच्या खंडाचा पैसा मिळत नसल्यामुळें रोजच्या प्रापंचिक खर्चासाठीं व स्वतःच्या चैनीसाठीं राजाला त्याच्या सोबत्यांकडून वेळोवेळीं कर्ज काढावें लागलें. किंबहुना त्याच्या सोबत्यांनीं तें जाणूनबुजून त्याच्या गळ्यांत बांधण्यासाठींच वरील कारस्थान केलेलें होतें. वास्तविक वांटणीनें राजाच्या हिश्शाला इतक्या जमिनी आलेल्या होत्या कीं, त्यांच्या खंडाच्या वसुलांतून त्याला सुखानें बसून प्रपंच करतां आला असता व लोकांचें एकहि पै कर्ज काढण्याचें कारण पडलें नसतें. परंतु त्याला कोणाकडून तरी कर्जांत बुडवून त्यांत त्याच्या जमिनी लाटण्याचा त्याच्या नीच सोबत्यांचा स्वार्थी डाव असल्या-मुळें त्यांनीं वरीलप्रमाणें त्याच्या कुळांना त्याच्याविरुद्ध उठविण्याचें कुटिल कारस्थान केलेलें होतें.

राजाच्या शिरावर त्याच्या सोबत्यांनी अशा तऱ्हेनें लादलेल्या कर्जाच्या ओझ्याखालीं तो इतका दडपून गेला होता कीं, आतां त्यांतून निभावून जाणें त्यांस शक्य नव्हतें. हें ओळखूनच त्याच्या सोबत्यांनीं त्याला कर्ज देण्याचें बंद केलें. शिवाय कर्जास भरपूर असें तारण देण्या-सारखें आतां त्याच्याजवळ कांहीं शिल्लकच राहिलें नव्हतें. राजाशीं स्नेह जोडण्यांत त्याच्या सोबत्यांचा जो स्वार्थी हेतु होता तो अशा तऱ्हेनें सफल झाल्यामुळें यापुढें तो स्नेहसंबंध चालू ठेवण्याचें त्यांना आतां कारण उरलेलें नव्हतें. उलट तो तोडण्याच्या योग्य संधीचीच ते वाट पाहात होते. म्हणूनच अलीकडे त्यांनीं आपलें राजाकडे वरचेवर जाणें-येणें बंद केलें होतें. राजाला त्यामुळें अगदीं चुकल्या चुकल्यासारखें वाटत होतें. आपल्या प्रेमळ आईच्या व बंधूच्या मायेच्या छत्राखालीं सुखानें राहण्याचें सोडून हलकट स्नेह्यांच्या बदसल्ल्यावरून आपण आपल्या आईला व बंधूला दुखविलें, त्यांची इच्छा नसतांना त्यांच्यापासून विभक्त राहिलों, संघटित असलेल्या वडिलार्जित मिळकतीची चिरफाड केली

व नादान मित्रांच्या नादानें वागून इस्टेटीचें वाटोळें केलें असे पश्चात्तापाचे विचार अलीकडे त्याच्या मनांत मधून मधून डोकावून त्याला बेचैन करूं लागले. पैशाच्या अभावीं रोजच्या खर्चाच्या जिकिरीनें होणारा मानसिक त्रास, सोबत्यांची अलीकडे झालेली त्याच्याविषयींची तुटक वागणूक व बेपर्वाई, कृतकर्माचा मधून मधून होणारा पश्चात्ताप यामुळें मूळचाच त्याचा असलेला तामसी स्वभाव अलीकडे अधिकच चिडखोर बनत चालला. आतांपर्यंत त्याचे ढोंगी, स्वार्थसाधु, लुच्चे मित्र त्याला आवडेल असा शाब्दिक मोठेपणा देऊन त्याला फुगवीत आले असल्यामुळें आपण खरोखरी कोणीतरी मोठी असामी असल्याचें त्याला वाटत होतें; व तो अहंमन्य बनला होता. परंतु आतांशा त्याचे मित्र भर रस्त्यांत उघड उघड त्याची टवाळी करूं लागले व इतरांकडून करवूं लागले; त्यामुळें त्याच्या अहंकाराला जबरदस्त धक्का बसला.

अशाच एके दिवशीं संध्याकाळचे सुमारास राजा देवदर्शनासाठीं देवालयाकडे निघाला होता. देवालयाकडे जाणारा रस्ता कुटाळकंपूची नित्य बैठकीची जागा असलेल्या पिंपळाच्या पारासमोरून जात होता. पिंपळाच्या पारावर नित्याप्रमाणें कुटाळकंपूच्या न्यायसभेची बैठक रंगांत आली होती. राजाला समोरून येतांना पाहून तो जवळ आल्यावर कुटाळकंपूच्या सभासदांपैकीं एकजण त्याला म्हणाला, "काय राजं, द्याव दर्सनाला आज एकलंच निघालाय्! सायेबासंगं त्येचा नेहमींचा लवाजमा आज कुठं दिसत न्हाय? म्हागाईच्या दिसामुळं खरच कमी केलाया जनुं?" त्यावर फिदीफिदी हंसत दुसरा उद्गारला—"कौन रं राजं? ह्यो व्हय? ह्यो रं कुठला राजा? पत्त्यांतला व्हय? पन् इस्पिकाचा की किलावरचा रं? आन् कशाला व्होवा ह्येला आतां लवाजमा? ऐपत नग का? आतां ह्येलाच उपासमारीनं मरन्याची येळ आली हाय? लवाजमा ह्यो कसला संबाळतुया!" यावर सर्वांचा एकच हास्यकल्लोळ उठला. राजाच्या सर्वांगाचा रागानें तिळपापड झाला. हंसणाऱ्या त्या कुटाळांच्या कंपूंत राजाच्या आतांपर्यंतच्या सोबत्यांपैकीं कांहींजण होते. त्यांनाहि निर्लज्जपणानें हंसतांना पाहून राजाचा राग अनावर होऊन त्या आवेशांत त्यानें आपल्या सोबत्यांना अद्वातद्वा शिव्या देण्यास सुरवात

केली. त्याबरोबर त्या कुटाळ लोकांपैकीं एकानें उठून फाडकन् राजाच्या एक श्रीमुखांत भडकावली; लगेच दुसऱ्यानें दुसरी ठेवून दिली. राजाच्या रागाचा पारा झरकन् खालीं उतरला. तेव्हां तेथें असलेल्या त्याच्या सोबत्यांपैकीं एकजण त्याच्याकडे तुच्छतेनें पाहात म्हणाला—"मिजास राजाची आन् नांदनूक कैकाड्याची! आजपातुर आमच्या पैक्यावर चैन मारलीस ते काय तुज्या बाचा पैका म्हनून काय रं? आतां गुमान आमचा पैका टाक; नायतर तुज्या इनामदारीची धिंड दारोदार काढीन तरच नांवचा ह्यो पठ्या हुईन!"

राजाचें सर्वांग अपमानानें जळूं लागलें. तो निमूटपणें खालीं मान घालून घराकडे परत फिरला व एकांतांत बसून झालेल्या प्रकाराबद्दल स्वतःला दोष देत एखाद्या असहाय्य स्त्रीप्रमाणें मुळूमुळूं अश्रु ढाळूं लागला. झालेल्या प्रकाराची बातमी तावडतोब सगळ्या गांवभर झाली. जीवन व रमाबाई यांच्याहि कानांवर ती गेली. एका प्रतिष्ठित इनामदार घराण्यांतील व्यक्तीवर तिच्याच गांवांत हलकट लोकांनीं हात टाकावा हें जीवन व रमाबाई यांना अत्यंत मानहानीचें वाटलें.

या प्रकारानंतर राजाच्या सावकारांनीं आतांपर्यंतच्या त्याच्या सोबती म्हणविणाऱ्यांनीं—त्याच्या पाठीमागें पैशाबद्दल सारखा लकडा लावला. व शेवटीं कंटाळून तारण-गहाणदस्तांवरून कमलापूरच्या स्थानिक दिवाणी कोर्टांत त्याच्याविरुद्ध दावा गुदरला.

दावा गुदरल्याची हकिकत जेव्हां जीवन व रमाबाई यांना समजली तेव्हां तर रमाबाईंचा धीर फारच खचून गेला. त्या गोष्टीची त्यांच्या मनानें जबरदस्त हाय खाल्ली. त्यांच्या ठिकाणीं अगोदरच निर्माण झालेली एक-प्रकारची वैफल्याची भावना पराकोटीला पोहोंचली. जीवननें त्यांची परोपरीनें समजूत करून त्यांना धीर देण्याचा प्रयत्न केला; पण त्याचा परिणाम अल्पकालिकच ठरला. त्याच्या सान्निध्यांत असतांना त्यांच्या मनानें आणलेलें धैर्याचें उसनें अवसान तो दृष्टिआड होतांच पार गळून गेलें. कसलें तरी आगामी संकट अमूर्त स्वरूपांत भेसूरपणानें आपल्या नजरेसमोर नाचत असून आपणांस भेडसावीत आहे. असा क्षणभर त्यांना भास होऊन भीतीनें त्यांच्या सर्वांगाचा थरकांप झाला. आत्यंतिक मानसिक असहाय्यतेच्या तशा

निर्वाणीच्या क्षणीं त्यांची नजर समोर भिंतीवर टांगलेल्या आपल्या पतीच्या छायाचित्राकडे गेली. आणि त्याचबरोबर लगेच आपल्या पाठीमागून कोणी तरी आपल्या पतीच्या आवाजासारख्या आवाजांत अस्पष्टपणें 'भिऊं नकोस ! घाबरूं नकोस ! धीर धर; परमेश्वर तुझा पाठीराखा आहे !' असा आपल्याला धीर देत असल्याचा त्यांना भास झाला. पतिविषयींच्या पूज्य भावनेनें त्यांचें अंतःकरण कांठोकांठ भरून वाहूं लागलें. हात जोडून भक्तियुक्त अंतःकरणानें थोडा वेळ त्या पतीच्या छायाचित्राकडे पाहात उभ्या राहिल्या. पतिवियोगाचें दुःख असह्य होऊन एकाएकीं त्यांचा कंठ भरून आला गहिंवरलेल्या कंठानें त्या बोलूं लागल्या—

"स्वगर्स्थ पतिदेवा, आपल्या वियोगाचं दुःख आज इतकीं वर्षं माझ्या मनाला रात्रंदिवस जाळीत असतांना माझ्या या दोन चिमण्या जीवांच्या कल्याणासाठीं व कुळांच्या प्रतिष्ठेसाठीं केवळ कर्तव्य म्हणून मी आतांपर्यंत प्राण धारण केला; आज बरींच वर्षं जमिनींच्या रूपानं कर्जाच्या पारतंत्र्यांत पिचत पडलेली मुतालिक घराण्याची भाग्यलक्ष्मी ऋणांतून मुक्त करण्याच्या कामीं अनेक हालअपेष्टा सहन केल्या; देहांतील रक्ताच्या जलसिंचनानं प्रयत्नांची वेल अखंड टवटवीत ठेवली; आणि आतांच कुठं तिला सुखाचीं मधुर फळें लागतात न लागतात तोंच त्यांना घरांतील दुफळीच्या पोटीं निर्माण होऊं पाहणारी आत्मनाशाची विषारी कीड जाळून टाकते कीं काय या शंकेनं माझ्या मनांत भीति निर्माण झाली आहे ! माझ्या दुर्दैवानं तसं कांहीं घडून येणार असेल तर त्याचे दुष्परिणाम भोगण्याचा प्रसंग येण्यापूर्वींच मला आपल्या पायाजवळ आश्रय द्यावा ! ते दुष्परिणाम सहन करण्याची, हृदयेश्वरा ! आतां माझ्या ठिकाणीं शक्ति राहिली नाहीं हो !— "

...बोलतां बोलतां रमाबाई थांबल्या. दुःखातिशयानें त्यांच्या मुखांतून शब्द बाहेर पडेनासा झाला. क्षणभर त्यांना दुःखाचा एक अनावर हुंदका आला आणि लगेच दुसऱ्याच क्षणीं नेत्रावाटे अश्रूंच्या प्रचंड धारा अविरतपणें त्यांच्या दोन्ही गालांवरून झरझर खालीं ओघळूं लागल्या.

● ● ●

## —४—

कमलापुरांत आज जिकडे तिकडे गडबड उडालेली दिसत होती. खरं सांगायचं म्हणजे गेले ३-४ महिने सगळ्या देशांतच अशी गडबड चालू होती. तीन महिन्यांपूर्वीं १५ ऑगस्ट सत्तेचाळीसला देश स्वतंत्र झाला आणि हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत प्रचंड प्रमाणावर स्वातंत्र्योत्सव साजरे करण्यांत आले. तथापि तेवढ्यानें स्वातंत्र्यप्राप्तीच्या आनंदाचा जन-मनावरील कैफ अद्याप उतरलेला नव्हता. कुठल्या ना कुठल्या समारंभाचें निमित्त करून जनता नवजात स्वातंत्र्यबालकाचें कौतुक करीत होती. कमलापुरहि या बाबतींत अपवाद नव्हतें. तीन महिन्यांपूर्वीं न भूतो न भविष्यति अशा धडाक्यांत स्वातंत्र्याचें स्वागत करूनहि कमलापुरवासियांच्या मनाचें अद्याप समाधान झालें नव्हतें. आणि म्हणूनच खाजगी रीतीनें फंड जमा करून स्थानिक नगरपालिकेच्या सहाय्यानें खास गोरगरिबांकरितां नव्यानेंच बांधून काढलेल्या विद्यामंदिराच्या उद्‌घाटनाच्या निमित्तानें एकत्र येऊन व पुन्हां स्वातंत्र्याचा असंख्य वेळां जयजयकार करून तें करून घेण्याचें त्यांनीं ठरविलें होतें. आजच्या ह्या समारंभाचें अध्यक्षस्थान स्वतंत्र भारताच्या लोकशाहीप्रधान राजवटींतील एक सन्मान्य अधिकारी म्हणून ह्या गांवांत नव्यानेंच आलेल्या मुनसफसाहेबांच्याकडे होतें.

शालागृहासमोर एक भव्य मंडप उभारण्यांत आला होता. त्यांत सर्व ठिकाणीं व्यवस्थित बैठक घालण्यांत आलेली होती. मंडपाच्या प्रत्येक खांबावर लो. टिळक, महात्माजी, सुभाषचंद्र, पंडित नेहरू आदि प्रमुख दिवंगत व विद्यमान राष्ट्रीय पुढाऱ्यांच्या तसबिरी लावलेल्या होत्या. एका बाजूस आठदहा माणसांना बसतां येईल असें उच्चासन तयार करण्यांत

आलेलें होतें. त्यावर मध्यभागीं एक सुंदर खुर्ची व तिच्यापुढें खादीच्या शुभ्र वस्त्रानें आच्छादिलेलें टेबल मांडण्यांत आलेलें होतें. त्याच्या दोन्ही बाजूस तीनतीन खुर्च्या ओळीनें मांडण्यांत आलेल्या होत्या. उच्चासनाच्या खालीं त्याच्या दोन्ही बाजूंस प्रतिष्ठित लोकांकरितां दहादहा खुर्च्यांची एक याप्रमाणें दोन सरळ रांगा होत्या व त्यांच्या पलीकडे पुरुषांसाठीं व स्त्रियांसाठीं वेगवेगळ्या जागा राखून ठेवण्यांत आलेल्या होत्या स्वयंसेवक आपल्या ठराविक गणवेषांत आपल्यावर सोंपविलेलीं कामें दक्षतेनें पार पाडीत होते. निमंत्रित मंडळी ठरलेल्या वेळेच्या अगोदरच मंडपांत येऊं लागली होती. मंडपाचें मुख्य प्रवेशद्वार हिरव्यागार लतापल्लवांनीं, अनेकविध पुष्पांनीं व चित्रविचित्र रंगांच्या तोरणांनीं शृंगारलेलें होतें. आणि त्याच्यावर ' वन्दे मातरम् ', ' जय हिन्द ', ' सुस्वागतम् ' अशीं अक्षरें असलेले मोठमोठे फलक झळकत होते. प्रवेशद्वाराच्या समोर कांहीं अंतरावर एक सुंदर दगडी चबुतरा होता आणि त्यावरील उंच ध्वजस्तंभावर स्थानिक बालवीर पथकाची सलामी घेत, नागरिकांचें अभिवादन स्वीकारीत सन्मान्य पाहुण्यांच्या हस्तें आज पुन्हां राष्ट्रध्वज डौलानें फडकणार होता.

त्या सगळ्या कार्यक्रमाचा सूत्रधार जीवन होता. आणि तें नेहमींच्या शिरस्त्यास धरूनच होतें. कमलापुरांत अनेक सुविद्य, निरलस, निष्ठावंत माणसें होतीं. जीवन त्यांपैकीं एक होता, परंतु सर्वांत तरुण होता. त्याच्या कार्यतत्परतेबद्दल सर्वांना विश्वास होता. म्हणूनच गांवांतल्या कसल्याहि समारंभाची योजना सर्वांनीं मिळून नक्की केलेली असली तरीं ती कार्यान्वित करण्याची जबाबदारी मात्र जीवनवर येई. योजनेच्या अंमलबजावणीवर त्याचें नियंत्रण असे. आणि अशा स्वरूपाची जबाबदारी त्याच्यावर सोंपविण्यांत अनुभवी वयोवृद्ध मंडळींना जितका आनंद वाटे तितकाच आनंद त्याच्या नेतृत्वाखालीं काम करण्यास त्याच्या समवयस्क तरुण मंडळींना वाटत असे. आजच्या समारंभाची तशीच स्थिति होती. समारंभाची सर्व जबाबदारी त्याच्यावर सोपवून वृद्ध मंडळी निश्चिंत होती व तरुण मंडळी त्याच्या मार्गदर्शनानुसार राबत होती. जिकडे तिकडे उत्साह होता. अगदीं जीवनच्या मनांतसुद्धां !

मध्यंतरींच्या चारपांच वर्षांच्या काळांत राजाभाऊंच्या कुटुंब व घर-

भेदी वागणुकीमुळें जीवनचें मन अत्यंत उदास झालें होतें. भविष्यकाळांतील आपल्या घराण्याच्या भवितव्यतेबद्दलच्या एकप्रकारच्या भयंकर नैराश्यजनक कल्पनेनें त्याच्यांतील उत्साह, आनंद, कार्यक्षमता पार मावळून गेलेली होती. जागतिक परिस्थिति झपाट्यानें बदलत होती. प्रथम तो तिच्या बाबतींत उदास होता. परंतु नंतरच्या काळांत भारत-भूच्या दास्य-विमोचनाचा काळ जवळ येत चालल्याचा रागरंग दिसूं लागला व मायभूमीला स्वातंत्र्य प्राप्त होणार अशाविषयींच्या आनंददायक बातम्या रोज वृत्तपत्रांतून झळकूं लागल्या. तेव्हां मात्र जीवनचें मन हललें. देशाच्या भाग्योदयाच्या कल्पनेनें स्वतःच्या भवितव्यतेबद्दलचें काल्पनिक दुःख तो विसरला. आणि त्याच्या वागणुकींत नवचैतन्य भरल्यासारखें दिसूं लागलें. पूर्वीप्रमाणें गांवांतल्या प्रमुख मंडळींत तो मिसळूं लागला, देशाच्या राजकीय परिस्थितीसंबंधानें चाललेल्या चर्चेत उत्साहानें भाग घेऊं लागला; आणि पुढें जेव्हां लवकरच भारताच्या भाग्याचा तो सुदिन—त्याच्या स्वातंत्र्याचा मंगल दिवस—पंधरा ऑगस्ट एकोणीसशें सत्तेचाळीसचा स्वातंत्र्यसूर्य भारताच्या राजकीय क्षितिजावर उगवला तेव्हां भारतवर्षांतील कोटि कोटि जनतेप्रमाणें तोहि आनंदानें बेहोष होऊन नाचला.

नंतरच्या काळांत त्याचें मन प्रामुख्यानें देशाविषयींच विचार करीत राहिलें. कारण तशाच घटना घडत होत्या. जातीय विद्वेषाच्या प्रचंड ज्वालांनीं राष्ट्रमंदिराचे कांही भाग धडधडून पेटले आणि सारा देश त्यामुळें होरपळून निघूं लागला. सामान्य भारतीय जनता अजूनहि स्वातंत्र्यप्राप्तीच्या आनंदांत होती. परंतु विचारी माणसांना देशापुढील संकट दिसत होतें. म्हणूनच आजच्या समारंभाच्या निमित्तानें एकत्र आलेल्या जनतेला देशापुढील संभाव्य संकटाची कल्पना आपल्या भाषणांतून द्यावयाची असा बेत जीवननें मनाशीं नक्की केलेला होता.

ठरलेल्या वेळीं मुनसफसाहेब कांहीं प्रमुख मंडळींच्या समवेत समारंभस्थळीं आले. ' जय-हिंद 'च्या प्रचंड घोषांत आणि टाळ्यांच्या कडकडाटांत ध्वजारोहणाचा कार्यक्रम पार पडला. मस्तक नम्र करून व दोन्ही हात जोडून अत्यंत आदरानें मुनसफसाहेबांनीं ध्वजास अभिवादन केलें. त्यांची राष्ट्रध्वजाबद्दलची भक्ति पाहून जीवन गहिंवरला. मुनसफसाहेबांची दृष्टि

आपल्याकडे वळतांच अत्यंत आदरानें त्यानें त्यांना अध्यक्षीय स्थानाकडे पाचारिलें. हंसतमुखानें लोकांचे प्रणाम स्वीकारीत ते व्यासपीठापर्यंत पोहोंचले. सारा समाज त्यांच्याकडे श्रद्धायुक्त अंतःकरणानें पाहात होता. त्यामुळें मुनसफसाहेबांनाहि थोडेंसें भारावून गेल्यासारखें झालें. कमलापूर या गांवाशीं यापूर्वी त्यांचा अर्थाअर्थी कसलाहि संबंध नव्हता. तथापि त्यांचें आडनांव मात्र कमलापूरकर होतें. आडनांवाच्या दृष्टीनें तरी ते कमलापूरचे नागरिक होते. आणि त्यामुळेंच कमलापुरवासियांच्या त्या प्रचंड सभेच्या व्यासपीठाकडे जात असतांना क्षणभर त्यांना आपण आपल्याच गांवांत आहोंत असा भास झाला.

सुरुवातीच्या छोट्याशा प्रास्ताविकानंतर जीवननें मुनसफसाहेबांना अध्यक्षस्थान मंडित करण्याची विनंति करतांच समारंभास उपस्थित असलेल्या प्रचंड जनसमुदायानें टाळ्यांचा गजर करून तीस आपली अनुमति दर्शविली आणि मुनसफसाहेब जीवनकडे सस्मित मुद्रेनें पाहात अध्यक्षीय खुर्चीवर स्थानापन्न होतांच परत एकदां टाळ्यांचा प्रचंड गजर केला. नंतर गोड सुरेल आवाजांत स्वागतपर पद्य गायिलें जाऊन सभेच्या कामास सुरुवात झाली. प्रथम नगराध्यक्षांचें व गांवांतील कांहीं प्रमुख लोकांचीं समयोचित भाषणें झाल्यावर जीवन बोलावयास उठला. ज्योतीनें ज्योत पेटावी त्याप्रमाणें ध्वजारोहणाच्या वेळीं दिसलेली मुनसफसाहेबांची ध्वजाविषयींची भक्ति पाहून त्याच्या मनांतील देश-प्रीतीचा सागर हेलावला होता. आतांहि भाषणाकरितां उठत असतांना मुनसफसाहेबांकडे पाहातांच मघाच्या प्रसंगाची आठवण होऊन त्याच्या परिणामाची पुनरावृत्ति झाली. मोठ्या आवेशानें त्यानें आपलें भाषण सुरू केलें. त्याचा तो आवेश सगळ्यांना जाणवला. विषयांतराचा दोष पत्करून प्रथम त्यानें भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीच्या इतिहासाचा थोडक्यांत आढावा घेतला. ज्या भारत-पुत्रांनीं मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठीं खडतर हालअपेष्टा सहन केल्या व सर्वस्वाचा होम करून घेतला त्यांना आदरांजलि अर्पण केली. ज्या भाग्यवान हुतात्म्यांनीं मातृभूमीसाठीं आपल्या प्राणांचें बलिदान केलें त्या सर्वांचा रोमांचकारी इतिहास हृदयस्पर्शी भाषेंत कथन केला. आणि जातीय विद्वेषाच्या नरकासुरानें देशाला प्राणांतिक संकटांत लोटण्याचा कसा घाट

घातला आहे याची कल्पना देऊन महाप्रयासानें महान् त्यागानें मिळविलेलें भारतभूचें स्वातंत्र्य धोक्यांत येण्याचा संभव कसा निर्माण झाला आहे याची घनगंभीर आवाजांत जाणीव दिली; प्राणप्रिय मातृभूमीच्या स्वातंत्र्यरक्षणासाठीं प्रत्येक भारतपुत्रानें परस्परांतील मतभेद विसरून आणि स्वत्व पणाला लावून सांप्रतच्या अत्यंत बिकट परिस्थितींत देश-हिताच्या दृष्टीनें कसें जागरूक राहिलें पाहिजे तें सांगितलें व भाषणाचा समारोप करतांना सुनागरिक तयार करण्याच्या हेतूनें कमलापुरवासियांनीं नगरपालिकेच्या सहकार्यानें बांधलेल्या विद्यामंदिराचें उद्‌घाटन केल्याचें अध्यक्षांनीं जाहीर करावें असें सुचवून आपलें भाषण संपविलें.

त्याच्या आवेशपूर्ण भाषणानें सारा समाज चित्रासारखा तटस्थ झाला होता. मुनसफसाहेबसुद्धां या बाबतींत अपवाद नव्हते. जीवनचें भाषण संपल्यावर टाळ्या वाजविण्याचें स्मरणदेखील क्षणभर कुणाला राहिलें नाहीं. क्षणानंतर सार्‍यांनीं आपली चूक सुधारली. नंतर अध्यक्ष उभे राहिले. प्रथमच त्यांनीं शालागृहाचें उद्‌घाटन केल्याचें जाहीर केलें व ज्या महान् हेतूनें तें उघडलें जात आहे तो हेतु परमेश्वरकृपेनें तडीस जावा अशी शुभेच्छा व्यक्त करून ते भाषणाच्या इतर अंगांकडे वळले. जीवननें जें सांगितलें त्याचीच पुन्हां एकदां थोडक्यांत पुनरावृत्ति करून त्यांनीं मातृभूमीच्या स्वातंत्र्यरक्षणाचें महत्त्व प्रतिपादन केलें. भाषणाच्या ओघांत लोकशाही म्हणजे काय याची जनतेला कल्पना दिली. तिचे फायदेतोटे विषद करून सांगितले. आदर्श लोकशाहींत जनता व सरकारी अधिकारी यांचे संबंध कसे सहकार्याचे असतात तें सांगितलें व आपल्या देशांत लोकशाही यशस्वी व्हावयाची असेल तर आपल्यांतहि ते तसे असणे कसें आवश्यक आहे तें सांगून वैयक्तिकरीत्या आपल्या कारकीर्दीत आपण आपली बाजू सांभाळणार असल्याचें आश्वासन दिलें; व शेवटीं सर्वांच्या प्रगतीच्या दृष्टीनें देशाच्या स्वातंत्र्यरक्षणाचें महत्त्व सांगून आपलें भाषण आटोपलें. हार घालण्याचा विधि पार पडला आणि राष्ट्रगीत होऊन कार्यक्रम संपला.

लोक आपआपल्या जागेवरून हलले. प्रतिष्ठित मंडळींच्या समवेत मुनसफसाहेब एकदां शालागृहाच्या इमारतींतून हिंडून आले. मधून मधून

अनेक स्थानिक गोष्टींची माहिती बोलण्याच्या ओघांत ते विचारीत होते व जीवन ती त्यांना तत्परतेनें देत होता त्याच्या व्यक्तिमत्वाची मुनसफसाहेबांच्यावर विलक्षण मोहिनी पडली होती. त्याच्याविषयीं त्यांचे अंतःकरणांत कसलें तरी अबोल कुतूहल निर्माण झालेलें होतें. त्याचा नि आपला परिचय उत्तरोत्तर वाढत जावा अशी प्रबळ इच्छा त्यांचे मनांत निर्माण झालेली होती. त्यांनीं ती उघड बोलूनहि दाखविली. चारचौघांत त्यांनीं प्रदर्शित केलेल्या त्या इच्छेमुळें जीवनला थोडेंसें ओशाळल्यासारखें झालें पण मनांतून तो आनंदला. शेवटीं सगळ्यांचा निरोप घेऊन मुनसफ-साहेब जावयास निघाले. जातांना जीवनकडे पाहून स्मित करायला ते विसरले नाहींत. त्यांना घेऊन त्यांची मोटर त्यांचें निवासस्थान असलेल्या सरकार-वाड्याकडे भर वेगानें निघून गेली. त्या बिचारीला काय ठाऊक कीं, मुनसफसाहेबांना घेऊन जातांना त्यांचें अंतःकरण त्यांच्याबरोबर आलेलें नसून तें मागें जीवनभोंवतीं तसेंच घोटाळत राहिलें होतें !

निवासस्थानीं आल्यावरसुद्धां मुनसफसाहेबांच्या मनांतून जीवनबद्दलचा विचार नाहींसा होईना. उलट जों जों तो बाजूला सारायचा प्रयत्न करावा तों तों त्यानें त्यांच्या मनांत अधिकच खोल रुजण्यास सुरवात केली. ज्या गोष्टीची आठवण नको वाटते तीच गोष्ट माणसाला ध्यानीं मनीं-स्वप्नीं आठवत राहते ना, तशीच परिस्थिति झाली होती मुनसफसाहेबांच्या बाबतींत !

आणि एके दिवशीं एका अनपेक्षित क्षणीं आरशासमोर उभे राहून पोशाख करीत असतां एकाएकीं मुनसफसाहेबांना असें वाटून गेलें कीं, आपल्यांत आणि जीवनच्यांत बरेंच साम्य आहे. आणि ह्या वाटण्याचा परिणाम इतकाच झाला कीं त्यांची अस्वस्थता अधिकच वाढली.

कमलापुरांतील 'महाजन' आळीच्या उत्तरेकडील अगदीं शेवटच्या भागाला 'सरकार-वाडा' अशी संज्ञा फार पूर्वीपासून होती. या भागाला हें नांव पडण्याचें कारण मुनसफ, मामलेदार वगैरे ज्या सरकारी अधि काऱ्यांची नेमणूक कमलापूर भागांत होत असे त्यांना राहण्यासाठीं हा भाग राखून ठेवण्यांत आलेला होता. तो बराच विस्तीर्ण असून त्याच्या चोहोंबाजूस कांटेरी तारेचें मजबूत कुंपण होतें. आणि अंतर्भागांत

अद्ययावत् सुखसोयींनीं परिपूर्ण असे तीनचार छोटेखानी बंगले होते. त्यांपैकीं एक मुनसफसाहेबांचें निवासस्थान म्हणून शोभत होता.

जेमतेम तिशीच्या आसपासचे मुनसफसाहेब साधी राहणी व उच्च विचारसरणी या तत्त्वाचें मूर्तिमंत प्रतीक होते. नोकरीव्यतिरिक्तचा मोकळा वेळ ते निरनिराळ्या विषयांवर लेखन, वाचन करण्यांत घालवीत. राजकारण, अर्थशास्त्र, इतिहास व समाजशास्त्र ह्या विषयांचा त्यांचा व्यासंग गाढा होता. त्यांनीं आमरण देशसेवेचें व्रत अंगिकारलें होतें व त्यासाठीं आजन्म अविवाहित राहण्याचा त्यांचा कृतनिश्चय होता. मनमिळाऊ स्वभाव व सर्वांना सारखें लेखण्याची वृत्ति ह्या दोन गोष्टींमुळें ते सर्वांना प्रिय बनले होते. समाजकार्याच्या स्वभावजन्य आवडीमुळें कुठल्याहि सामाजिक कार्यांत ते आवडीनें पुढाकार घेत. ह्या समाजसेवेच्या आत्यंतिक आवडीमुळेंच कमलापुरांत आल्यावर त्यांनीं दर पंधरा दिवसांनीं जनतेच्या निरनिराळ्या थरांत समाजकार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांची आपल्याकडे बैठक घेण्याचा अभिनव उपक्रम सुरू केला. बैठक रात्रीं भरत असे व त्या रात्रीचें साऱ्या कार्यकर्त्यांचें भोजनहि त्यांच्याच घरीं होत असे. बैठकींत निरनिराळ्या सामाजिक प्रश्नांवर दिलखुलास चर्चा होई. एकमेकांचे दृष्टिकोन समजावून घेतले जात. त्या अनुरोधानें मुनसफसाहेब कांहीं विधायक मार्गदर्शन करीत. समाजसेवेचे कांहीं कार्यक्रम आंखले जात. थोडक्यांत म्हणजे कमलापूर व त्याच्या आजूबाजूच्या पंचक्रोशींत समाजकार्य करणाऱ्या तरुणांना मुनसफसाहेब म्हणजे मोठा आधार वाटे.

नित्यनियमानुसार वर उल्लेखिलेली सामाजिक कार्यकर्त्यांची बैठक मुनसफसाहेबांच्या बंगल्यावर भरणार होती. नेहमींप्रमाणें सर्व कार्यकर्त्यांना निमंत्रणें गेलेलीं होतीं. जीवन त्यांत होताच.

ठरलेल्या वेळेच्या थोडें अगोदरच जीवन मुनसफसाहेबांच्या बंगल्यावर हजर झाला. त्याच्याशिवाय अद्याप कोणीहि आलेलें नव्हतें. मुनसफसाहेबांनीं त्याचें स्वागत केलें. “श्रीयुत मुतालिक, सर्वच बाबतींत तुम्हीं अग्रेसर असतां बुवा.” मुनसफसाहेब त्याला उद्देशून हंसत म्हणाले.

“माझ्या थोड्याशा उतावळ्या स्वभावाचा परिणाम असेल तो

कदाचित्. " जीवननें हंसतच मुनसफसाहेबांनीं न विचारलेल्या प्रश्नाला उत्तर दिलें.

" छे ! छे !! माझ्या बोलण्याचा उद्देश तसा नव्हता. माझ्या म्हणण्याचा उद्देश इतकाच होता कीं, कुठल्याहि गोष्टींत मागें रेंगाळण्यापेक्षां अग्रणी असणं आपल्याला आवडत असावं. "—मुनसफसाहेब.

" कुठल्या गोष्टीच्या बाबतींत मला काय वाटतं हें ती गोष्ट पुढें नसतांना मलाहि सांगतां येणार नाहीं. परंतु आपल्या बैठकीच्या बाबतींत मात्र तिला हजर राहण्यास उशीर करण्यापेक्षां ती सुरू होण्यापूर्वी इथं हजर रहावं असं मला मनापासून वाटतं व त्याप्रमाणें हजर रहाणं अगदीं मनापासून आवडतं. "—जीवन.

त्याच्या ह्या बोलण्यावर मुनसफसाहेब अगदीं मनमोकळेपणानें हंसले. आणि त्यांच्या हास्यांत जीवनचेंहि दिलखुलास हास्य मिसळून गेलें.

जीवन व मुनसफसाहेब बैठकीच्या दुसऱ्या मजल्यावरील दिवाणखान्यांत आले. खिडकीसमोरील एका खुर्चीवर जीवन बसला व त्याच्या अनुज्ञेनें निमंत्रितांच्या भोजनाची व्यवस्था नोकरांनीं कशी काय केली आहे तें समक्ष पाहण्यासाठीं मुनसफसाहेब तळमजल्यांत गेले. जीवनची दृष्टि दिवाणखान्यांतून फिरूं लागली.

मुनसफसाहेबांचा बंगला दुमजली, चांगला प्रशस्त, हवेशीर व मोठा आकर्षक होता. दुसऱ्या मजल्यावरील बैठकीच्या दिवाणखान्यास लागून त्यांची प्रशस्त कामकाजाची खोली होती. त्यांचें लेखन, वाचन, मनन वगैरे सर्व कांहीं त्या खोलींत चाले. बैठकीचा दिवाणखानाहि मोठा आकर्षक होता. त्यास तीनचार हवेशीर खिडक्या असून प्रत्येक खिडकीस लागून एक एक खुर्ची ठेवण्यांत आली होती. एका कोपऱ्यांत एका उंच लांकडी चौपाईवर रेडिओ ठेवण्यांत आलेला होता व त्याच्या नजिकच एक भलेंमोठें पुस्तकाचें कपाट होतें. दिवाणखान्याच्या मध्यभागीं एक वर्तुळाकार टेबल असून त्याच्याभोंवतीं सातआठ खुर्च्या पद्धतशीर मांडलेल्या होत्या. भिंतींवर भारताच्या राजकीय पुढाऱ्यांचीं, अनेक थोर पुरुषांचीं, प्रख्यात कलावंतांचीं व मुनसफसाहेबांच्या कांहीं ऋणानुबंधी व्यक्तींचीं छायाचित्रें टांगलेलीं होतीं.

बसायचा कंटाळा आला म्हणून जीवन उठला व सहज तीं चित्रें पाहूं लागला. पाहतां पाहतां एका छायाचित्रावर त्याची नजर खिळून राहिली, आणि अभावितपणें त्याच्या तोंडांतून आश्चर्योद्गार बाहेर पडले— आँ ! बापूसाहेबांचा फोटो ! आणि हा इथं कसा ?

जीवनच्या तोंडांतून हे उद्गार बाहेर पडायला आणि जिन्यांत पाउलें वाजूं लागायला एकच गांठ पडली. कांहीं क्षणांतच प्रथम मुनसफसाहेब व त्यांच्यापाठोपाठ सातआठ कार्यकर्ते दिवाणखान्यांत प्रविष्ट झाले. जीवनला पाहातांच 'फार वेळ वाट पाहायला लावली ना तुम्हांला ?' असा प्रश्नवजा उद्गार काढून त्याच्या बोलण्याची अपेक्षा न करतांच मुनसफसाहेबांनीं दिलगिरी व्यक्त केली. आणि एकदोन कार्यकर्त्यांनीं त्याला पाहातांच 'अरे वा ! तुम्हीं आमच्याहि आधीं इथं हजर ?' असें म्हणून पुढें होत त्याच्याशीं हस्तांदोलन केलें. पण वडिलांचा फोटो अनपेक्षितरीत्या अनपेक्षित ठिकाणीं पाहून कुतूहलांत बुडून गेलेला जीवन नुसतें हंसण्यापलीकडे कांहींच बोलूं शकला नाहीं. आपण दिवाणखान्यांत येण्यापूर्वी काय घडलें आहे याची मुनसफसाहेबांसकट कुणालाच कांहीं कल्पना नसल्यामुळें जीवनची मुग्धता प्रथम कुणाच्याच लक्षांत आली नाहीं. हळूहळू कार्यकर्ते येत होते कांहीं वेळांतच सारा दिवाणखाना त्यांनीं भरून गेला. मुनसफसाहेबांच्याच अध्यक्षतेखालीं पूर्वनियोजित विषयावर अभ्यासपूर्ण अशी उलटमुलट चर्चा झाली—आणि अखेर ती संपली. एव्हांना जीवनची अपवादात्मक मुग्धता सगळ्यांच्या ध्यानांत येऊन चुकली होती.

"तुमची प्रकृति आज ठीक दिसत नाहीं मुतालिक ?" जेवणासाठीं उपस्थितांना उठण्याचा सल्ला देत असतांना मुनसफसाहेबांनीं एकदम जीवनला प्रश्न केला.

"छे ! मला कांहींहि झालेलें नाहीं. पण मातुश्रींची तब्येत गेले कांहीं दिवस बरी नाहीं. त्यांचे विचार डोक्यांत होते ना त्यामुळें—"

"आलें लक्षांत !" कोणीं तरी पुटपुटलें.

जेवणाचा कार्यक्रम संपल्यावर सर्व मंडळी जावयास निघाली. वडिलांच्या फोटोसंबंधीं मुनसफसाहेबांना खुलासा विचारण्याची तीव्र इच्छा जीवनचे मनांत होती. परंतु सर्व मंडळी जाईपर्यंत गप्प बसण्यावांचून त्याला गत्यंतर

नव्हतें. म्हणून तो स्वस्थ होता. पण त्याच वेळीं त्याच्या भागांत राहा-णाऱ्या कांहीं कार्यकर्त्यांनीं त्याला बरोबर चलण्याचा आग्रह केला. आणि अखेर जावें कीं न जावें अशा स्वरूपाचें द्वंद्व मनांत चालू असतांनाच कांहींशा अनिच्छेनें त्यानें इतर मंडळींबरोबर मुनसफसाहेबांचा बंगला सोडला. जातांना मुनसफसाहेबांनीं त्याला विचारलेंच—" फार नादुरुस्त आहे का मातुश्रींची प्रकृति ? " जीवननें फक्त नकारार्थी मान हलविली होती.

तो घरीं आला तेव्हां बरीच रात्र झालेली होती. तथापि रमाबाई जाग्याच होत्या. त्यांची प्रकृतीहि खरोखरच गेले कित्येक दिवस बरी नव्हती. दुर्वर्त-नाच्या पायीं राजानें आपल्या इस्टेटीचें वाटोळें करून लोकांत आपलें हंसें करून घेतलें ही गोष्ट त्यांच्या मनास लागून राहिली होती व त्याच मान-सिक आघातामुळें त्यांची प्रकृति दिवसेंदिवस खंगत चालली होती. आतांशा निवांत अशी झोंपदेखील त्यांना मुळींच येत नसे. बरीच रात्र करून आलेल्या जीवनचा विचारग्रस्त चेहरा पाहातांच त्यांना आश्चर्य वाटलें व अर्थातच त्यांनीं त्याला त्याचें कारण विचारलें. जीवननें सारी हकीकत सांगितली आणि ती ऐकून रमाबाईनाहि आश्चर्य वाटल्यावांचून राहिलें नाहीं. पण बाह्यात्कारी तें न दाखवितां जीवनला उद्देशून " तुझे वडील कॉलेजांत शिकत असतांना मुनसफसाहेबांच्या नात्यापैकीं कोणी तरी त्या-वेळीं कॉलेजांतील त्यांचे सहाध्यायी व स्नेही असावेत आणि मित्रप्रेमाची खूण म्हणून त्यांना तुझ्या वडिलांनीं आपलें छायाचित्र दिलेलें असावें व तेंच हल्लीं मुनसफसाहेबांच्या बंगल्यावर तुला पाहण्यास मिळालें असावें. " असें म्हणून त्याची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. परंतु जीवन गप्पच राहिला.

" काय नांव आहे रे मुनसफसाहेबांचें ? "—रमाबाई.

" 'गुणवंत कमलापूरकर' अशी पाटी आहे त्यांच्या बंगल्यावर. "—जीवन.

" आपल्या नांवापुढें वडिलांचें नांव न घालण्याची कसली बाई फॅशन पडलीय् अलीकडे "—मुनसफसाहेबांच्या वडिलांचें नांव जीवनला माहीत असल्यास त्याच्याकडून तें आपल्याला कळावें ह्या उद्देशानें रमाबाईंनीं

सूचक प्रश्न केला. पण त्या प्रश्नालाहि जीवनकडून कांहींच उत्तर मिळालें नाहीं.

" आपल्याकडे का कधीं घेऊन येत नाहींस त्यांना? तूं इतक्या वेळां त्यांच्याकडे जातोस, आपल्याकडे ते एकदांहि येणार नाहींत का?" रमाबाईंनीं पुन्हां प्रश्न केला.

" मी आणतोंच त्यांना एकदां आपल्याकडे आई." जीवन उद्गारला.

" घेऊन ये." असें म्हणून रमाबाईंनीं कुशी बदलली.

" मी झोंपतों जातों आतां आई! जाऊं ना?"

" जा बाळ! दमला असशील!"—रमाबाई.

आणि जीवन उठला व आपल्या झोंपावयाच्या खोलींत आला.

यापुढें भरणारी सामाजिक कार्यकर्त्यांची बैठक मुनसफसाहेबांच्या बंगल्याऐवजी आपल्या बंगल्यावर भरवायची म्हणजे मुनसफसाहेब आपो-आपच आपल्या घरीं येतील असा विचार अंथरुणावर पडण्यापूर्वी जीवननें आपल्या मनांत पक्का केला व दुसऱ्या दिवशीं अंथरुणावरून उठतांच प्रथम त्या दृष्टीनें मुनसफसाहेबांच्याकडे विचारणा केली. त्यांनीं तसें कां करावयाचें ह्या बाबतींत पुष्कळ विचारलें—आढेवेढे घेतले, परंतु अखेर जीवनचा निश्चय पाहून त्यांच्या म्हणण्याला होकार दिला.

नंतर सातआठ दिवस जमिनीच्या कामासाठीं जीवनला कमलापूर सोडावें लागलें. तथापि जातांना सर्व कार्यकर्त्यांना खास पत्रें लिहून बदललेल्या कार्य-क्रमाची कल्पना दिली होती. ज्या दिवशीं रात्रीं बैठक भरणार होती त्या दिवशीं सकाळीं जीवन परगांवाहून कमलापुरास परतला. ज्या कामासाठीं तो परगांवीं गेला होता त्यांत त्याचे तीनचार दिवस जादा मोडले होते. रमाबाईंनीं त्याच्या पूर्वसूचनेनुसार बैठकीची सर्व व्यवस्था नोकर माणसां-करवीं व्यवस्थित करून घेतली होती. आल्या आल्या जीवननें फक्त सर्व गोष्टी ठीक आहेत ना, हें पाहिलें. मुनसफसाहेब कधीं नव्हे ते आपल्याकडे येणार म्हणून जीवननें जेवणाचा साधा बेत न करतां मेजवानीचा कार्यक्रम आंखला होता. कार्यकर्त्यांच्या स्वागताची जबाबदारी रमाबाई व घरांतील एक उत्साही नोकर गोविंदा यांजवर टाकून मुनसफसाहेबांना आणण्यासाठीं जीवन स्वतः त्यांच्या बंगल्यावर रात्रीं आठच्या सुमारास

हजर झाला. आणि तेव्हां मात्र त्याला राहवलें नाहीं. त्यानें आपल्या वडिलांच्या फोटोबद्दल त्यांना विचारलेंच. प्रथम तो काय म्हणतोय् हें मुनसफसाहेबांच्या ध्यानांतच आलें नाहीं. परंतु जीवननें सर्व हकीकत सविस्तरपणें जेव्हां त्यांना सांगितली व त्यांना दिवाणखान्यांत नेऊन तेथील आपल्या वडिलांचा फोटो त्यांना दाखविला तेव्हां आश्चर्यानें थक्क होऊन ते त्याच्याकडे पाहातच राहिले. पण क्षणभरच! सेकंद चार सेकंद त्यांचें मन भूतकाळांत भटकलें आणि आपल्या आईचें ती मृत्युशय्येवर असतांनाचें एक वाक्य त्यांना आठवलें —'बाळ गुणवंत, तुझ्या जन्मामागें रहस्य आहे.' त्यांनीं चमकून जीवनकडे पाहिलें. आणि त्यांना परत एकदां कळून चुकलें कीं आपल्यांत आणि जीवनच्यांत बरेंच साम्य आहे ही बऱ्याच दिवसांपूर्वीं आपल्याला जाणवलेली गोष्ट खोटी नाहीं. त्यांचें अंतःकरण हाललें. पण त्यांनीं मनाचा निग्रह केला. अत्यंत अनपेक्षित रीतीनें आपण आपल्या जन्मरहस्याकडे खेचलें जात आहोंत या कल्पनेनें त्यांचें मन कावरेंबावरें झाल्याखेरीज राहिलें नाहीं.

"तुम्हांलाहि आश्चर्य वाटलं ना या योगायोगाचं?" जीवननें प्रश्न केला.

"होय, वाटलं खरं!" मुनसफसाहेब उद्गारले.

"कसा आला हा फोटो इथं?" जीवननं परत पृच्छा केली.

"कुणास ठाऊक. माझ्या जन्माच्या आधींचा फोटो आहे हा." मुनसफसाहेब स्वतःच्या मनांतील गोंधळ लपवीत म्हणाले.

पण त्या प्रश्नानें मुनसफसाहेबांचें अंतःकरण ढवळून निघालें. काय बोलावें हेंच त्यांना कळेना. स्वतःला सावरीत कसेंबसें ते म्हणाले, "माझ्या वडिलांच्या एका निकटच्या स्नेह्याचा फोटो आहे हा, श्रीयुत मुतालिक."

"खरं? म्हणजे माझे वडील आपल्या वडिलांचे निकटचे स्नेही होते तर! काय और योगायोग आहे नाहीं? आई म्हणत होती तेंच खरं ठरलं शेवटीं." जीवनचा चेहरा आनंदानें उजळून आला. मुनसफसाहेब आश्चर्यानें त्याच्या तोंडाकडे पाहात राहिले.

"आणखी एक प्रश्न विचारूं साहेब? तुमच्या आडनांवांत या गांवाचें नांव आहे. तुमचं खरं गांव कोणतं?"—जीवन.

"माझ्या कमलापूरकर आडनांवावरून म्हणताय् होय ? अहो एकाच नांवाचीं अनेक गांवं असतात. कुणी सांगावं गांवांतील नांवाच्या साम्या-मुळेंच कदाचित् तुमचे आमचे वडील एकमेकांचे दोस्त बनले असतील." मुनसफसाहेब मोठमोठ्यानें हंसत म्हणाले. त्यांचें म्हणणें अशक्य नसल्याचें पटून जीवनहि प्रसन्नपणें हंसला. मुनसफसाहेबांच्यासह जीवन आपल्या वाड्यावर परतला तेव्हां सर्व मंडळी त्यांचीच वाट पाहात होती. नंतर नेहमीं-प्रमाणें बैठकीचा कार्यक्रम यथासांग पार पडला.

मेजवानीची ठरलेली वेळ होत आली होती. वाड्याच्या दुसऱ्या मजल्या-वरील एकास एक लागून असलेलीं दोन प्रशस्त दालनें सदर कार्यक्रमासाठीं मुद्दाम नव्यानें रंगसफेती देऊन अत्यंत आकर्षक बनविण्यांत आलेलीं होतीं. विद्युद्दीपांच्या झगझगीत प्रकाशानें तीं तेजाळून निघालीं होतीं. एका दाल-नांत निमंत्रितांच्या बैठकीची व्यवस्था केलेली होती व दुसऱ्यांत भोजनाची सर्व सिद्धता करण्यांत आलेली होती. प्रस्तुत दालनाच्या चोहोंबाजूंच्या भिंतीवर देवादिकांच्या सुंदर तसबिरी, देशभक्तांचे व मुतालिक घराण्यांतील स्त्री-पुरुषांचे सुंदर फ्रेममध्यें बसविलेले फोटो ठिकठिकाणीं लावलेले होते. दालनाच्या समोरासमोरच्या दोन भिंतीलगत पाट मांडून भोजनाच्या दोन रांगा केलेल्या होत्या. पात्रासमोरील चित्रविचित्र रांगोळ्यांनीं व उदबत्त्यांच्या घमघमाटानें सारें वातावरण प्रसन्न झालेलें होतें. मुनसफसाहेबांसारखे सन्मान्य पाहुणे भोजनास येणार म्हणून त्यांच्या भोजनाची अगदीं पात्राच्या मांडणी-पासूनची सर्व व्यवस्था त्यांच्या इतमामास शोभेल अशीच ठेवण्यांत आलेली होती.

पानें वाढून तयार असल्याची सूचना मिळतांच सर्व मंडळी बैठकीच्या दालनांतून भोजनाची व्यवस्था केलेल्या दालनांत आली व आपआपल्या नेमलेल्या जागीं जाऊन बसली. नंतर मुनसफसाहेबांनीं जीवनबरोबर दालनांत प्रवेश केला व त्यानें आदबीनें दाखविलेल्या जागीं ते जाऊन बसले. कसल्या तरी शोधक दृष्टीनें त्यांनीं साऱ्या दिवाणखान्यांतून, समोरील व आजूबाजूच्या भिंतीवरून धावता दृष्टिक्षेप टाकला. या वेळीं अंगांतला शर्ट त्यांनीं काढला होता. त्यांच्या रेखीव, धष्टपुष्ट, गोऱ्यापान व कांतिमान देहामुळें ते ह्या वेळीं एखाद्या राजबिंड्याप्रमाणें शोभत होते. दोन्ही

दिवाणखान्यांत येण्यासाठीं तळमजल्यांतून एकच असलेल्या जिन्याच्या दारांत उभ्या राहून रमाबाई त्यांच्याकडे कुतूहलानें व वात्सल्यपूर्ण नजरेनें टक लावून पाहात होत्या. भोजनास प्रारंभ करण्याची सूचना जीवनकडून मिळतांच ते आतां भोजनास सुरुवात करणार तोंच त्यांच्या मस्तकावर आकस्मिक पुष्पवृष्टि केल्याप्रमाणें ताजीं सुवासिक फुलें टप्‌टप् पडूं लागलीं. हा अनपेक्षित प्रकार पाहून भोंवतालची मंडळी आश्चर्यचकित झाली व भोजनास सुरुवात करण्याचें विसरून जेथून फुलें पडत होतीं तिकडे साश्चर्य नजरेनें पाहूं लागली. मुनसफसाहेबहि ह्या प्रकारानें गोंधळले व फुलें कोठून पडत आहेत हें पाहण्यासाठीं फुलांच्या अनुरोधानें वर– छताकडे पाहूं लागले. दिवाणखान्याच्या ज्या भिंतीस लागून त्यांचा पाट मांडलेला होता त्याच भिंतीला बरोबर त्यांच्या डोक्यावर दोन फोटो जवळ जवळ लावलेले असून त्यांना सुंदर ताज्या फुलांचे हार घातलेले होते. त्यांपैकीं एका फोटोच्या हाराचा एक पदर सुटून हार फोटोवर लोंबत असल्याचें व त्यांतूनच एक एक फूल ओघळून आपल्या मस्तकावर पडत असल्याचें दृश्य त्यांना दिसलें. ज्या फोटोवरील हारांतून आपल्या मस्तकावर फुलें ओवळत आहेत तो फोटो एका स्त्रीचा आहे हें समजून येतांच स्त्री-जाती-बद्दलच्या त्यांच्या ठिकाणीं वसत असलेल्या नैसर्गिक आदरभावनेमुळें ते चटकन् जागेवरून उठले व आपल्या भोजनपात्राच्या जवळच एका चांदीच्या ताटांत असलेल्या तीनचार ताज्या फुलांच्या हारांपैकीं एक हार उचलून तो त्या फोटोला घालण्यासाठीं उभे राहिले. हार त्या फोटोला घालण्यासाठीं त्यांनीं हात उंचावले, पण विजेचा धक्का बसल्याप्रमाणें ते मागे आले व क्षणभर विस्मयचकित नजरेनें त्या फोटोकडे पाहातच राहिले. त्यांनीं शेजारच्या फोटोवर नजर वळवली, आणि अपेक्षित असें कांहीं सांपडावें त्याप्रमाणें त्यांचे डोळे लकाकले. त्यांनीं झटकन् शेजारीं उभ्या असलेल्या जीवनकडे पाहिलें. एखाद्या ग्रीक पुतळ्याप्रमाणें तो निश्चल उभा होता. एका क्षणांतच आपण कुठें आहोंत याची मुनसफसाहेबांना जाणीव झाली व प्रसंगावधान राखून त्यांनीं स्वतःला सांवरलें. हातांतील हार त्यांनीं त्या स्त्रीच्या फोटोला घातला. तो घालत असतांना त्यांच्या हृदयांत कालवाकालव होत होती. नेत्रांवाटें अश्रू येऊं पाहात होते. पण

तो भावनेचा कढ त्यांनीं निग्रहपूर्वक आंवरला व कांहीं झालेंच नाहीं अशा तऱ्हेचें स्मित तोंडावर आणून ते आपल्या पानावर बसले, आणि भोजनास सुरुवात झाली. मुनसफसाहेब जेवणाचें नुसतें नाटक करीत होते. आपल्या अंतःकरणांतील खळबळ कुणाला कळूं नये यासाठीं त्यांचा सारा खटाटोप होता. जीवननें खूप आग्रह केला; पण आपल्या आदरणीय पाहुण्याला पोटभर जेवविल्याचें समाधान त्याला लाभूं शकलें नाहीं. जीवननें दालनाच्या दाराकडे पाहिलें, पण रमाबाई तिथें नव्हत्या. त्याची निराशा झाली

जेवणें आटोपलीं. प्रकृति नादुरुस्त असल्याचें निमित्त सांगून मुनसफसाहेब जावयास निघाले तोंच एक गडी आला आणि मुनसफ साहेबांच्याकडे पाहात जीवनच्या कानांत कांहीं पुटपुटून निघून गेला. त्यानें कांहीं तरी सांगायचें असल्यासारख्या दृष्टीनें मुनसफसाहेबांच्याकडे पाहिलें.

" कांहीं सांगायचें आहे ? "—मुनसफसाहेब.

" मला नाहीं. पण आमच्या मातुश्रींना कांहीं सांगायचं आहे आपल्याला. आपली कांहीं हरकत नसेल तर..."—जीवन.

" मुळींच नाहीं. इतकी कांहीं बिघडलेली नाहीं माझी प्रकृति. आणि दिलगिरीच्या स्वरांत सर्व मंडळींना थोडा वेळ बैठकीच्या जागीं बसावयास सांगून मुनसफसाहेबांना घेऊन जीवन रमाबाईंच्या खोलींत आला. रमाबाई दारांत उभ्या होत्या. त्या उभयतांना येतांना पाहून त्या आंत गेल्या. मुनसफसाहेबांना घेऊन जीवन त्यांच्याजवळ आला. रमाबाईंची परम पवित्र अशी कृश मूर्ति पाहून मुनसफसाहेबांचें अंतःकरण आदरानें भरून आलें. त्यांना अभिवादन करण्यासाठीं ते त्यांच्या चरणांवर वांकले.

" चिरंजीव भव ! " स्वतःच्या मुलाला आशीर्वाद द्यावा त्याप्रमाणें रमाबाई गंभीर पण हळुवार आवाजांत पुटपुटल्या. त्यांच्या आवाजांतील हळुवारपणा जाणवून मुनसफसाहेब आश्चर्यानें त्यांच्याकडे पाहूं लागले.

" आश्चर्य वाटून घेऊं नका. मला जसा जीवन तसे तुम्ही. आतां माझी खात्री पटली. हें घर तुमचं आहे. तुम्ही वरचेवर इथं येण्यानें मला मोठा आनंद होणार आहे. "—रमाबाई.

मुनसफसाहेबांच्या मनाची स्थिति केविलवाणी झाली. तिथें राहाणें आतां त्यांना अशक्य झालें. 'मी पुन्हां भेटेन तुम्हांला' असें कसेंबसें म्हणून ते हालले व जीवनचा निरोप घेऊन तडक आपल्या बंगल्यावर आले.

ते घरीं आले तरी त्यांचें मन स्वस्थ थोडेंच राहणार होतें? त्यांत भावनांचें तुफान उसळलें होतें. जीवनच्या घरीं आज त्यांनीं प्रत्यक्ष आपल्या मातापित्यांचे फोटो पाहिले होते. नुसते फोटोच पाहिले नव्हते तर इतर अनेक फोटो असतांना त्याच दोन फोटोंना ताज्या फुलांचे हार घातल्याचें त्यांना दिसलें होतें. त्यावरून तशा स्वरूपाचे हार त्या फोटोंना घालण्याचा जीवनच्या घरांत नित्याचा परिपाठ होता हें उघड होतें. आणि तसा तो असल्यास त्याचें कारण काय? असा प्रश्न मुनसफसाहेबांच्या मनांत फिरून फिरून येत होता; त्यांचें मन ढवळून काढीत होता. आणि त्या मानसमंथनांतून एकच सत्य बाहेर येऊं पाहात होतें. तें म्हणजे जीवनचा आणि त्यांचा कांहीं संबंध होता; नुसता संबंध नव्हे तर घनिष्ठ संबंध होता. आणि मुनसफसाहेबांचं मन त्यांना आक्रंदून सांगूं लागलं, 'जीवनचा व तुझा पिता एक आहे.' त्यांनीं नकळत होकारार्थी मान हालविली. त्यांच्या चेहेऱ्यावर हास्य चमकलं. पण क्षणभरच! एकदम ते दचकले, आणि स्वतःशींच पुनःपुन्हां पुटपुटूं लागले, "तर मग जीवनचें आडनांव मुतालिक आणि माझें कमलापूरकर कसें?" ह्या स्वतःच्याच प्रश्नानें ते परत अधिकच गोंधळले—अस्वस्थ झाले. आणि शेवटीं जेव्हां त्याच प्रश्नाचें भूत त्यांच्या मनःचक्षूंसमोर थैमान घालूं लागलें, तसे ते ताडकन् जाग्यावरून उठले.

'बाळ, तुझ्या जन्मापाठीमागें रहस्य आहे.' कुणीतरी त्यांच्या कानाजवळ पुटपुटलें. आणि एकदम त्यांना मृत्युशय्येवरील मातेची आठवण झाली. तिचें सारें बोलणें आठवलें. झप्झप् पाउलें टाकीत ते आपल्या झोंपण्याच्या खोलींत आले. एक भलें मोठें कपाट उघडून एक छोटीशी मोहोरबंद पेटी त्यांनीं बाहेर काढली. बरीच रात्र झालेली होती. नोकरचाकर सगळे झोंपले होते. तरीहि त्यांनीं खोलीचें दार नीट लावून घेतलें. त्यांची छाती धडधडत होती. हात कांपत होते. पेटी उघडावी कीं न उघडावी हें ठरविण्यांत कांहीं क्षण गेले. शेवटीं त्यांनीं मनाचा हिय्या केला आणि पेटीची मोहोर फोडली. पेटी उघडीत असतांना मृत्युशय्येवरील

आईची आकृति त्यांच्या मनःचक्षूंना दिसत होती व तिचे शब्द कानांत घुमत होते—" बाळ गुणवंत, ऐहिक मायामोहाचे पाश तोडून इहलोक सोडतांना माणसाच्या मनाला किती असह्य यातना होत असतील नव्हे ! पण त्यांचा कांहीं उपयोग असतो का ? विषाची ही कडू गोळी प्रत्येक मर्त्य जीवाला आयुष्यांत एकदां केव्हां तरी निमूटपणें गिळावीच लागते. हा विधिसंकेत आहे. म्हणून मायामोहाचे हे पाश तोडतांना त्यांच्या यातना सुसह्य होतील अशाच अनासक्तीनं प्रत्येक मानवी जीवानं स्वतःला त्या पाशांत गुरफटून घेण्यांतच त्याच्या मनाला अंतिम शांति मिळणार आहे. जीवनांतील मायामोहांत रंगून जातांना मनुष्य जितका आनंद दाखवितो तितकंच धैर्य त्या मायामोहांचा त्याग करतांना त्यानं दाखवावं असाच त्या लीलालाघवी परमेश्वराचा हेतु असला पाहिजे. बाळ, हे असलेच विचार अलीकडे माझ्या मनांत सारखे येऊं लागले आहेत. मलाहि आतां लवकरच या इहलोकचा त्याग करून देवाघरीं रुजू व्हावं लागणार आहे. म्हणून आजवर अगदीं कटाक्षानं तुझ्यापासून गुप्त ठेवलेल्या कांहीं गोष्टी अखेर आज मी तुला सांगणार आहें. तूं सुज्ञ आहेस; विचारी आहेस; म्हणून गडबडून, गोंधळून न जातां तूं शांतपणें त्या ऐकून घेशील असा मला भरंवसा आहे.

बाळ, पिता हयात असतांना बालपणींच पितृवात्सल्यास कायमचं अंतराव लागण्याचा प्रसंग एखाद्या बालकावर येणं यापेक्षां त्या बालकाचं दुर्दैव दुसरं कोणतं असूं शकेल का ?..."

हें वाक्य उच्चारतांच त्यांची आई एकदम स्तब्ध झाली होती. बोलूं नये ती गोष्ट चुकून चटकन् बोलून गेल्यामुळें ती क्षणभर गोंधळल्यासारखी झाली होती. आईच्या मनाची ही गडबडलेली स्थिति मुनसफसाहेबांच्या त्यावेळीं ध्यानांत आल्याखेरीज राहिली नव्हती. मनाचा निग्रह करून पुन्हां त्यांची आई बोलूं लागली होती:

" ...मनांत कसलाच आडपडदा न ठेवतां, बाळ, मी तुला आतां स्पष्टच सांगून टाकतें कीं, तुझा जन्म म्हणजे एक रहस्यच आहे. तुझ्या मनाच्या निरभ्र आकाशांत दुःखी विचारांचं काहूर निर्माण होऊं नये

म्हणूनच आतांपर्यंत ही गोष्ट मी तुझ्यापासून लपवून ठेविली होती. आतांच ती तुझ्यापुढं उघड करीत आहे. हेतु इतकाच कीं, तुझ्या भावी आयुष्यांत स्थित्यंतर घडवून आणणारी एखादी घटना भाग्यवशात् निर्माण झालीच तर तशा आणीबाणीच्या प्रसंगीं तुला या गोष्टीचा उपयोग व्हावा व तुझा भ्रमनिरास होऊन तुझं कल्याण व्हावं ! माझ्या या संदिग्ध भाषणानं तुझा जन्म अनीतीच्या पोटीं झाला असल्याबद्दलची शंका येऊन तुला मनांत कदाचित् माझा तिरस्कार वाटूं लागेल. पण असली भलती सलती शंका मनांत बिलकूल आणूं नकोस. एका थोर कुलीन घराण्यांत व सुसंस्कृत, सदाचारसंपन्न आईबापांच्या पोटींच तुझा जन्म झालेला आहे. परंतु केवळ निष्ठुर विधिघटनेमुळें तुझ्या या दुर्दैवी मातेला तिच्या खऱ्या स्वरूपांत जगांत वावरण्याची चोरी झाल्यामुळं अशा अज्ञातवासांत एखाद्या परित्यक्तेसारखी लाजिरवाणी जीवितयात्रा अखेर संपवावी लागत आहे. ऐन तारुण्यांत सुखाच्या भव्य प्रासादांतून ओढून काढून निष्ठुर नियतीनं तिच्या नशीबीं खडतर वनवास आणला; तथापि त्या स्थितींतहि तुझ्या या दुर्दैवी मातेनं तुझ्या पित्याच्या प्रेमाशी एकनिष्ठ राहून तारुण्यसुलभ मोह, आशा, आकांक्षा या सर्वांचा होम केला; एखाद्या शापभ्रष्ट देवतेप्रमाणं कायेनं, वाचेनं, मनानं ती आतांपर्यंत पवित्र राहिली असून त्याच पवित्र स्थितींत अखेर तिच्या देहाची रक्षा होणार आहे. माझ्या आयुष्यांत परमेश्वरानं माझ्या वांट्याला सगळं दुःखच घातलेलं असलं तरी तुझ्यासारखा सुपुत्र माझ्या कुशींत जन्मास घालून त्या दयाघन प्रभूनं माझ्या सर्व दुःखांचं परिमार्जन केलं आहे. माझ्या जन्माचं सार्थक झाल्याचं समाधान आज मला वाटत आहे !

तुझ्या जन्मरहस्याविषयींची हकीकत यावेळीं मला विस्तारानं सांगवत नाहीं; व माझ्या तोंडून आतांच ती तुला कळण्याची गरजहि नाहीं. तुझ्या भावी आयुष्यांतहि तिची तुला गरज भासेलच हेंहि मला आतां सांगतां येणार नाहीं. पण त्या लीलालाघवी परमेश्वराच्या कृपेनं जर कदाचित् तिची जरूरी भासण्याजोगा एखादा आणीबाणीचा प्रसंग तुझ्या भावी आयुष्यांत निर्माण झालाच तर तिचा तुला उपयोग व्हावा म्हणून ती हकीकत कळण्याचं साधन मी आज तुझ्या हवालीं करणार आहें.

अनुक्रम २९३३५ विभाग ग्रा. वा. नों. दि. ९-२-६१

अगदीं जरूरीच्या प्रसंगींच त्या साधनाचा तूं उपयोग करावास अशी माझी-तुझ्या मातेची-अखेरची इच्छा आहे !

ती माझी खाजगी पेटी आहे ना ? मोहोरबंद आहे ती. तिच्या दुसऱ्या खणांत भगव्या रंगाच्या रुमालांत गुंडाळलेली एक चोपडी आहे. तींत माझ्या जीवनांतील कांहीं ठळक प्रसंगांची कहाणी मी स्वतः लिहून ठेवलेली आहे. तुझ्या जन्मरहस्याची सर्व हकीकत तिच्यांत तुला वाचावयास मिळेल. तुझ्या थोर घराण्याची प्रतिष्ठा वाढविण्याजोगं एखादं जरी कृत्य तुझ्या आयुष्यांत तुझ्या हातून घडलं तरी तेवढ्यानंसुद्धां स्वर्गांत तुझ्या आईच्या आत्म्याला आनंदच वाटेल ! झालं; संपलं माझं बोलणं ! तुला माझं हें अखेरचंच निवेदन आहे. वाईट वाटून घेऊं नकोस; पण वस्तुस्थितीची जाणीव देणं आतां भागच आहे. माझी सोबत तुला आतां फार दिवस नाहीं. या अफाट जगांत तूं आतां एकटा राहणार. आपलं म्हणणारं मायेचं माणूस तुला कोणी नाहीं. तथापि, बाळ, तूं प्रेमळ, सदाचारी, सच्छील व थोर अंतःकरणाचा पुरुष आहेस. म्हणून दुनियेंत जिथं जिथं तूं जाशील तिथं तिथं या गुणांमुळं सगळे तुझ्यावर प्रेम करूं लागतील. निरपेक्ष स्नेहाची तुला आयुष्यांत कधींहि वाण पडणार नाहीं. सर्व दुनिया तुझ्या मायेचं स्थान होईल, असा माझा तुला अखेरचा आशीर्वाद आहे ! सत्यानं, धर्मानं, नीतीनं वाग ! त्या परमेश्वरावर अढळ श्रद्धा ठेव; तो तुझं कल्याण करील ! कल्याण ! कल्याण !..."

—देवतातुल्य मातेचें मृत्युशय्येवरील सर्व बोलणें जसेंच्या तसें आठवून मुनसफसाहेबांच्या अंतःकरणांत मातृप्रेमाचा उमाळा दाटून आला आणि 'आई', 'आई' असें रुद्ध आवाजानें पुटपुटत ते मुसमुसूं लागले. त्यांच्या अश्रूंचा अभिषेक त्यांच्या हातांतील भगव्या वस्त्रांत गुंडाळलेल्या चोपडीवर होत होता. कांहीं क्षण तसेच गेले आणि नंतर भक्तिभावानें त्या चोपडीवर आपलें मस्तक टेंकून त्यांनीं ती उघडली.—मोत्यासारखीं सुंदर टपोरेदार अक्षरें—! होय तें हस्ताक्षर त्यांच्या आईचेंच होतें. त्या हस्ताक्षरांत त्यांचें जन्मरहस्य लपलेलें होतें. मुनसफसाहेब क्षणभर थांबले. डोळे मिटून एकदां त्यांनीं परमेश्वराचें व स्वर्गस्थ मातेचें स्मरण केलें आणि त्यांनीं तें आईचें 'आत्मवृत्त' वाचावयास सुरुवात केली,

" हें आत्मवृत्त मी कां लिहीत आहें हें मला कळत नाहीं. तें लिहून काढावें असें गेले कित्येक दिवस माझ्या मनाला फिरून फिरून वाटतें आहे. किंबहुना ही रुखरुख असह्य झाल्यामुळेंच आज मी कागदाला टाक लावीत आहें. न जाणो माझ्याकडून तें लिहून घेण्यांत परमेश्वराचाच कांहीं हेतु असेल.

उच्च शिक्षणासाठीं माझ्या वडिलांनीं मला मुंबईस ठेवलें. पहिल्यापासूनच मला वाङ्मयाची आवड. कॉलेजचें स्वतंत्रतेचें वातावरण या माझ्या आवडीस पोषकच ठरलें. वाङ्मयविषयक उत्तमोत्तम ग्रंथांचें परिशीलन करण्यास कॉलेजच्या वाचनालयाचा आपणांस आतां चांगला उपयोग करून घेतां येईल या विचारानें मी आनंदून गेलें होतें. कॉलेजांत दाखल झाल्यानंतर थोड्याच दिवसांनीं मी रोज नेमानें वाचनालयांत जाऊन बसूं लागलें. माझ्या कॉलेजांतील बी. ए.च्या वर्गात शिकत असलेले भगवंतराव मुतालिक या नांवाचे विद्यार्थी त्यावेळीं रीडिंगरूमचे सेक्रेटरी होते. शरीरानें सुदृढ, उंचेपुरे, गौर वर्णाचे— थोडक्यांत म्हणजे अत्यंत आकर्षक व्यक्तिमत्वाचे असे ते एक तरुण होते. निगर्वी, मनमिळाऊ, दिलदार स्वभाव, काव्यमय नादमधुर वाणी, तीव्र प्रज्ञा, बहुश्रुतपणा इत्यादि अनेक गुणांचा समन्वय त्यांच्या ठिकाणीं झाला असल्याचें मला थोड्याच दिवसांच्या अनुभवांनीं कळून आलें; व त्यांच्याबद्दल एकप्रकारची आदरयुक्त प्रेमभावना माझ्या हृदयांत नकळत अंकुरित होऊं लागली.

कॉलेजचें मॅगेझिन दर महिन्यास नियमितपणे प्रसिद्ध होत असे. त्याचे उपसंपादक मि. मुतालिक हेच होते. आणि कॉलेजांत बहुधा ते याच

नांवानें ओळखले जात असत. पुढें माझा त्यांच्याशीं परिचय झाल्यावर मीहि त्यांना मि. मुतालिक याच नांवानें संबोधूं लागलें.

मि. मुतालिक यांच्या ठिकाणीं वसत असलेल्या उपर्युक्त सर्व गुणां-पेक्षांहि त्यांच्या एका गुणानें मी त्यांच्याकडे अधिक आकर्षिलें गेलें. तो गुण म्हणजे दर महिन्याच्या मॅगेझिनच्या अंकांतील त्यांच्या लेखांत प्रतीत होणारी त्यांची अभिजात वाङ्मयाभिरुचि व वर्ण्य विषय रंगविण्याच्या कामीं त्यांनीं योजिलेली नवनवोन्मेषशालिनी भाषाशैली. मॅगेझिनच्या अंकांतील त्यांचे सर्वच लेख विचारपरिप्लुत व अभ्यासयुक्त माहितीनें रसरसलेले असेच असत. ते सर्व मी मोठ्या आवडीनें वाचत असें. मराठी साहित्यक्षेत्रांत अमर झालेल्या नामवंत साहित्यिकांच्या वाङ्मयगुणांसंबंधीं मार्मिक चर्चा करणारा ' मराठी वाङ्मयाचें दर्शन ' या मथळ्याखालीं प्रसिद्ध झालेला त्यांचा लेख तर मला फार आवडला. त्या निमित्तानें त्यांच्याशीं परिचय करून घेण्याची माझ्या मनांतील बऱ्याच दिवसांची इच्छा तीव्र झाली. तशा अधीर मनःस्थितींत कॉलेजच्या मधल्या सुट्टींत दुसऱ्या मजल्यावरील गॅलरीच्या कठड्यांना टेकून मी उभी होतें इतक्यांत माझी दृष्टि खालीं कॉलेजच्या बगीच्यांत एकटेच हिंडत असलेल्या मि. मुतालिकांच्या-कडे गेली. लगेच उतावीळपणानें जिन्याच्या पायऱ्या धडधड उतरून मी त्यांच्याजवळ गेलें. ते एकटे असतांना त्यांच्याशीं स्वतंत्रपणें संभाषणाचा प्रसंग त्यावेळपर्यंत मला कधींच आलेला नव्हता. त्यामुळें भीड वाटून बोलण्यास मन कचरूं लागलें. पण मनाचा हिय्या करून मी बोललेंच—

" मि. मुतालिक, आपला ' मराठी वाङ्मयाचें दर्शन ' हा लेख मला फार आवडला. नवोदित लेखकांना व मराठी साहित्याच्या अभ्यासकांना तो उत्कृष्टपणें मार्गदर्शन करील अशी मला खात्री वाटते ! " माझ्या त्या अनपेक्षित भाषणानें मि. मुतालिक किंचित् चपापले व मजकडे आश्चर्य-युक्त नजरेनें पाहून ओठांवर ईषत स्मित खेळवीत मला म्हणाले—

" माझ्या लेखांतील वाङ्मयगुणांचं ग्रहण करून त्याचा यथोचित गौरव करणारा आपल्यासारखा रसज्ञ वाचक लाभल्याबद्दल मला धन्यता वाटते ! माझ्या श्रमांचं सार्थक झाल्याचं समाधान आज मला लाभत आहे ! पण माझं वाङ्मय इतकं आस्थापूर्वक वाचणाराचं नांव मला कळावं अशी

माझी इच्छा आहे; हरकत नसेल तर... "

त्यांचें वाक्य पुरें होण्यापूर्वींच त्यांच्या जिज्ञासेची पूर्ति करण्याच्या इच्छेनें मी म्हणालें—" माझं नांव सुहासिनी कुलकर्णी ! "

" कॉलेजांत आपल्याला मी अलीकडेच पाहात आहें ! "

" यंदांच मी या कॉलेजांत दाखल झालें आहें. "

" आपला वाङ्मयव्यासंग बराच सखोल दिसतो ! "

" व्यासंग मुळींच नाहीं; आवड मात्र आहे. वाङ्मयाची नुसती आवड असणं आणि लेखनद्वारां त्याची प्रत्यक्ष सेवा करणं यांत महदंतर असतें. नुसती आवड बाळगणारे माझ्यासारखे फार आढळतात; पण निर्मितीच्या द्वारें त्याला समृद्ध करणारे आपल्यासारखे थोडेच. "

" अल्पशी का होईना पण कांहींतरी साहित्यनिर्मिति आपल्या हातून आजवर झाली असेलच ! "

" मुळींच नाहीं ! पण आपल्यासारख्या प्रतिभावंत साहित्यिकाचं सहकार्य लाभेल तर मात्र मी यापुढं त्या दृष्टीनं प्रयत्न करणार आहें ! "

यावर दोघांनीं परस्परांकडे आदरयुक्त प्रेमदृष्टीनें पाहून मधुर स्मित केलें. आम्ही आणखीहि कांहीं बोललों असतों; पण मधली सुट्टी संपल्याची कॉलेजची घंटा झाल्यामुळें तितक्यावरच आमचें बोलणें थांबलें. विद्यार्थ्यांचा घोळका गडबडीनं आपापल्या वर्गांत शिरूं लागला. कोणाच्याहि नजरेस न येईल अशा तऱ्हेनें एकमेकांकडे पाहात आम्हीहि आपापल्या वर्गांत गेलों. तेव्हांपासून मात्र संधि मिळतांच एकमेकांशीं बोलण्याचा एकहि प्रसंग आम्हीं वांया जाऊं दिला नाहीं.

अध्ययनाच्या निमित्तानें ज्या ज्या आंग्लकवींच्या काव्यांशीं माझा आतांपर्यंत थोडाफार परिचय झालेला होता त्या सर्वांत मला टेनीसनचें 'Enoch Arden' हें खंडकाव्य फार आवडत असे. त्या काव्यांतील नायक 'इनॉक' व नायिका 'ॲनीली' यांचा बालपणांतील तो निरागस, मुग्धप्रेमाचा प्रसंग; पुढें विपरीत दैवगतीमुळें त्या दोघांची ताटातूट झाल्यावर कालांतरानें परत आल्यानंतर अज्ञात वेशांत 'फिलिप'शीं सुखाचा संसार करणाऱ्या आपल्या 'ॲनी'ला पाहून तिच्या सुखासाठीं 'इनॉक'नें केलेला तो दिव्य त्यागाचा प्रसंग— हे दोन्ही प्रसंग मला

उत्कट भावनास्पर्शी वाटत असत. त्या काव्याचा माझ्या भावनावश अंतः-करणावर इतका खोल परिणाम झाला होता कीं, त्याच्या धर्तीवर आपणहि एखादें काव्य लिहावें अशी स्फूर्ति माझ्या भावनासुलभ मनाला अनेक वेळां झाली होती. तिचा परिणाम म्हणून मी 'भावगुंजन' या नांवाचें एक खंडकाव्य लिहिण्यास सुरुवात केली होती. पुढें जेव्हां मि. मुतालिक यांच्याशीं माझा परिचय होऊन तो दिवसेंदिवस वाढूं लागला, तेव्हां त्यांच्या मदतीनें तें काव्य पुरें करण्याचें मीं ठरविलें.

कॉलेजच्या वाचनालयांत मी अलीकडे नियमितपणें जाऊं लागलें होतें. तेथें जाण्यांत माझा हेतु मी लिहावयास घेतलेल्या खंडकाव्यास संदर्भा-दाखल उपयोगी पडणारीं कांहीं पुस्तकें मिळविण्याचा हा तर होताच; पण विशेषतः मि. मुतालिक यांच्याशीं परिचय वाढविण्याच्या दृष्टीनें संभाषण करण्याची मिळणारी संधि न दवडण्याचा प्रधान हेतु होता. वास्तविक कॉलेजांत प्रथम पाऊल टेविल्यापासूनच मीं वाचनालयांत जाण्यास सुरुवात केली होती. परंतु त्यावेळच्या माझ्या जाण्यांत व हल्लींच्या जाण्यांत माझ्या मनःस्थितीच्या दृष्टीनें विचार करतां फार फरक पडलेला होता. त्यावेळीं वाचनालयांत जातांना कसलीहि भावना माझ्या मनाला शिवलेली नव्हती. माझें मन त्यावेळीं अगदीं निर्विकार असे. वक्तशीर कॉलेजांत जाणें, वर्गांत विषयाच्या तासाला हजर राहणें अशा रोजच्या क्रमांपैकींच ही एक बाब असल्याचें मला वाटत होतें. वागण्याच्या, पोषाखाच्या वगैरे बाबींकडे माझें त्यावेळीं विशेष लक्ष नव्हतें. पण मि. मुतालिक यांच्याशीं माझा परिचय वाढल्यापासून मात्र सर्वच मन एकदम पालटला. पोषाखाच्या बाबतींत नीटनेटकेपणा व एकंदर वागणुकींत आकर्षकपणा आणण्यासंबंधीं मी अलीकडे विशेष दक्षता बाळगूं लागलें. माझ्याप्रमाणेंच मि. मुतालिकहि या बाबतींत विशेष दक्षता घेत असल्याचें माझ्या नजरेस येऊं लागलें. दोघेहि अशापरीनें एकमेकांबद्दलचें एकमेकांना वाटणारें आकर्षण टिक-विण्याची पराकाष्ठा करूं लागलों. या आमच्या वाढत्या सलगीचा सुगावा अर्थातूच कॉलेजांतील कुचाळ विद्यार्थ्यांना लागल्याशिवाय राहिला नाहीं.

अशीच एके दिवशीं रोजच्याप्रमाणें मी वाचनालयांत गेलें. त्यावेळीं वाचनालयाच्या एका खिडकीच्या गजांना डाव्या हातानें धरून मि. मुतालिक

पाठमोरे उभे असलेले व आपल्या उजव्या हातांतील कसल्याशा ग्रंथाच्या वाचनांत तल्लीन झालेले मला दिसले. वाचनालयांत त्यावेळीं दुसरें कोणींहि नव्हतें. मी आंत आल्याचें त्यांना समजलें नसावें. त्या शांततेचा भंग होऊं नये म्हणून आंतील एका बांकावर बसून पुढच्या टेबलावर पडलेलीं वृत्तपत्रें मी शांतपणें चाळूं लागलें. थोड्याच वेळांत वाचनालयाच्या बाहेरून वाचनालयाकडे येत असलेल्या कांहीं विद्यार्थ्यांचा मोठमोठ्यानें हंसण्याचा संमिश्र आवाज माझ्या कानांवर पडला. त्या आवाजानें मि. मुतालिक यांचीहि वाचनसमाधि भंग पावून किंचित् गोंधळलेल्या दृष्टीनें त्यांनीं सभों-वार पाहिलें व मला पाहून मंदमधुर स्मित केलें. आगामी वावटळीच्या निश्चितीनें विद्यमान शांतताहि माणसाला अस्वस्थ करून सोडते. माझीहि अवस्था त्यावेळीं कांहींशी तशीच झाली असल्यामुळें त्यांच्या हास्याचें तें मंदशीतल चांदणं माझ्या भावनातप्त हृदयाला जरी सुखदायक वाटलें तरी बाह्यतः त्याचें स्वागत मीं कांहींशा थंड वृत्तीनेंच केलें. कारण निव्वळ चारगटपणा करण्याच्या हेतूनें वाचनालयांत रोज नेमानें येणाऱ्या कांहीं निवडक उनाड विद्यार्थ्यांचा तो कंपू येत असल्याचें मीं तात्काळ ओळ-खलें होतें; व आतां वाचनालयांत आम्हां दोघांना पाहून त्या चारगटांच्या टवाळीला बहर येणार व आपणांला ती मुकाट्यानें ऐकून घ्यावी लागणार या विचारानें मी ओशाळून गेलें होतें. म्हणून जेणेंकरून मि. मुतालिक यांना आपल्याशीं संभाषण करण्यास प्रोत्साहन मिळेल असा कोणताच भाव त्यावेळीं मुद्रेवर न दर्शवितां येणाऱ्या प्रसंगास तोंड देण्याच्या तयारीनें स्वतःला जरा सांवरून घेऊन खाली मान घालून वाचनांत गढून गेल्याचा मी बहाणा केला. आंत आम्हां दोघांना पाहतांच त्या टवाळ-खोरांनीं अर्थपूर्ण नजरेनें एकमेकांकडे पाहून फिदीफिदी हंसण्यास सुरुवात केली. त्यांच्यापैकीं एका आचरटानें तर माझ्याकडे व मि. मुतालिक यांच्या-कडे आळीपाळीनें पाहून आपल्या बरोबरच्या सोबत्यांना नेत्रसंकेत केला व मिस्किलपणानें बडबडण्यास सुरुवात केली—" कवि आणि प्रतिभा ! आहे बुवा ! खासा योग जुळून आला आहे ! आतां भराभर काव्यप्रसूतीला कितीसा अवकाश ! " हे त्या चारगट विद्यार्थ्यांचे शब्द कानीं पडतांच मि. मुतालिक ओशाळल्या नजरेनें माझ्याकडे पाहूं लागले. लज्जेनें मी

गोरीमोरी झालेली पाहून त्या चारगटांच्या त्यांना मनस्वी संताप आला. विद्यार्थिनीसमोर तिचा उपमर्द करणारी असभ्य भाषा वापरल्याबद्दल खर-पूस शब्दांनीं त्यांनीं त्यांची कानउघाडणी करतांच ते टवाळखोर एकदम तेथून बाहेर पडले. आतां तेथें आम्ही दोघेंच राहिलों. मी हळूंच आपली मान वर करून त्यांच्याकडे पाहिलें. नुकत्याच घडलेल्या प्रकारामुळें किंचित् असमाधानाची छटा त्यांच्या मुद्रेवर उमटलेली मला दिसली. थोड्या वेळानें ते माझ्याकडे वळून अत्यंत नम्रतेनें मला म्हणाले, "झालेल्या अनुचित प्रकाराबद्दल मी अत्यंत दिलगीर आहें! यापुढं असले प्रकार इथं होऊं न देण्याची मी जरूर ती खबरदारी घेईन!" त्यांच्या या उद्गारानें माझें हृदय आनंदानें नाचूं लागलें. क्षणापूर्वींच्या त्या हलकटांकडून झालेली स्त्रीजातीची अवहेलना व निसर्गतःच स्त्रीजातीबद्दल वाटत असलेल्या आदरामुळें आपल्या शालीनतापूर्ण वर्तनानें यांनीं राखलेली स्त्रीजातीची प्रतिष्ठा व कदर या दोहोंमधला फरक मला ढळढळीतपणें दिसून येऊन मि. ुतालिक यांच्याबद्दल मला पराकाष्ठेचा आदर वाटूं लागला. त्यांच्याकडे प.हून मी मनमोकळेपणानें हास्य केलें. त्यांच्याहि मुद्रेवर समाधानाचें हास्य खेळूं लागलें. त्यांच्या मनाच्या निरभ्र आकाशांत थोड्या वेळापूर्वीं आलेले संदेहाचे ढग आतां पार वितळून जाऊन त्या ठिकाणीं प्रणयतारका चमचमत असल्याचें मला स्पष्टपणें दिसून आलें. नंतर लगेच पुस्तकांच्या कपाटांतून त्यांनीं एक पुस्तक बाहेर काढलें; व किंचित् हास्यमुद्रा करून तें माझ्या हातीं देत ते मला म्हणाले—"आपल्याला देण्यासाठीं मीं हें अगोदरच काढून ठेवलेलं होतं!" त्यांच्या हातांतून मीं तें घेतलें. टेनीसनचें 'लॅन्स-लॉट अॅण्ड इलेन' या काव्याचें तें पुस्तक होतें. पुस्तक पाहून साश्चर्य आनंदून मी म्हणालें—

"अगदीं नेमकं पाहिजे होतं तेंच पुस्तक मला मिळालं! आपणांस तें अगोदरच ठाऊक झालं होतं कीं काय?"

"ठाऊक झालं नव्हतं. पण कां कोणास ठाऊक माझ्या अंतःप्रवृत्तीनेंच तें आपणांस देण्यास मला सांगितलं!" चेहऱ्यावर किंचित् खोडकर हास्य खेळवीत ते उद्गारले. यावर आम्ही दोघांनींहि एकमेकांकडे पाहून मन-मोकळेपणानें निर्भर हास्य केलें. लायब्ररींतील नोकर वेळ झाल्यामुळें ती

बंद करण्यासाठीं तेथें उभा असल्याचें आमच्या लक्षांत येतांच प्रेमपूर्ण नजरेनें एकमेकांचा निरोप घेऊन आम्ही बाहेर पडलों. तेव्हांपासून आम्ही दोघेंहि एकमेकांवर पूर्ण अनुरक्त झालों असल्याचें दोघांनाहि एकमेकांच्या भावपूर्ण दृष्टीवरून कळून चुकलें.

मि. मुतालिक यांच्याशीं माझा परिचय आतां इतका निकटचा झाला होता कीं, आमच्याविषयीं पूर्वीची कांहीं माहिती नसलेल्या एखाद्या नव-शिक्या माणसाच्या दृष्टीला आम्ही अगदीं एकाच कुटुंबांतील असल्यासारखे दिसलों असतों. कॉलेजच्या नेहमींच्या गंभीर वातावरणांत आमच्या प्रेम-संबंधामुळें पूर्वीं उत्पन्न झालेल्या विविध मनोविकारांच्या वादळाचा आतां अगदीं मागमूस राहिला नव्हता. इतरांच्या दृष्टीनें आमच्या प्रेमसंबंधांत आतां कांहींच नाविन्य उरलें नव्हतें.

माझें काव्याचें लेखन चालूच होतें. त्यांतील एखादा प्रसंग अधिक हृदयस्पर्शी होण्याच्या दृष्टीनें, अगर एखाद्या विशिष्ट पात्राच्या स्वभावाचें चित्रण अधिक उठावदार दिसण्यासाठीं तें रंगविण्याच्या बाबतींत अभि-प्राय घेण्यासाठीं मि. मुतालिक यांच्याकडे मी वरचेवर जाऊं लागलें. तेहि माझ्या लेखनकार्यांत मोठ्या उल्हासानें मला मार्गदर्शन करूं लागले. दिवस मोठे मजेंत जात होते.

कॉलेजला नाताळची सुट्टी झाली. बी. ए.चें दुसरें वर्ष असल्यामुळें त्या वर्षीं सुट्टींत मि. मुतालिक आपल्या गांवीं गेले नाहींत. अभ्यासांत ते सदोदित गर्क असत. अभ्यासाची सबब पुढें करून सुट्टींत घरीं येण्यास आपणांस सवड नसल्याबद्दल मींहि आपल्या वडिलांस पत्रानें कळविलें व सुट्टींत आपल्या गांवीं गेलें नाहीं. माझें काव्याचें लेखन जवळ जवळ पुरें होत आलें होतें. त्यांतील नायक व नायिका यांच्या प्रणयप्रसंगांतील कांहीं सौंदर्यस्थळें मि. मुतालिक यांच्या विचारें मुक्रर करण्याच्या निमित्तानें मी सुट्टींतील एके दिवशीं त्यांच्या खोलीवर गेलें. त्यावेळीं संध्याकाळचा सुमार झाला होता. चाळींतील आजुबाजूच्या खोल्यांतील बहुतेक सर्व विद्यार्थी सुट्टींत आपापल्या गांवीं गेले होते. निवांत शांतता त्यावेळीं तेथें नांदत होती. खोलीचीं दोन्हीं दारें लोटलेलीं होतीं. विद्युद्दीपांचा झगझगीत प्रकाश सर्व खोलीभर पसरून व्हरांड्याच्या बाजूस असलेल्या खोलीच्या खिडक्यांतून

तो सर्व व्हरांड्यांत स्वच्छ पडलेला होता. थोडा वेळ मी खोलीच्या बाहेर थबकलें. दारें लोटून एकदम आंत जाण्याचा धीर मला झाला नाहीं. एकाएकीं मनाचा गोंधळ उडून माझ्या सर्वांगास कंप सुटला. हृदयाचें स्पंदन होऊं लागलें. थोडा वेळ अशा स्थितींत गेल्यावर मनाचा हिय्या करून मीं खोलीचें एक दार किलकिलें केलें. इतक्यांत आंतून आराम-खुर्चीचा करकर असा आवाज होऊन मि. मुतालिक एकदम खोलीचीं दारें उघडून दारांत उभे राहिले. माझ्या अनपेक्षित येण्यानें प्रथम त्यांना आश्चर्य वाटलें; पण लगेच आनंदहि झाला असल्याचें त्यांच्या उत्फुल्ल चेहऱ्यावरून मीं ताडलें. क्षणैक आश्चर्य व आनंद यांच्या संमिश्र छटा त्यांच्या तुकतुकीत गौरवर्ण चेहऱ्यावर स्पष्टपणें उमटल्या असल्याचें मला दिसून आलें. त्यांच्याकडे पाहून मी एकदां स्मित केलें व ते दारांत उभे असतांनाच आंत प्रवेश करून त्यांच्या कॉटजवळच्या खुर्चीवर जाऊन बसलें. मि. मुतालिक यांनीं पूर्ववत् खोलीचीं दारें लोटून घेतलीं व जवळच असलेल्या एका मेजाला टेकून ते उभे राहिले. खोलींत त्यावेळीं निःस्तब्ध शांतता वास करीत होती. बाहेर चाळीच्या सभोंवार असलेल्या बागेंतील पूर्णविकस पुष्पांचा मंदसुगंध सर्व खोलींत दरवळून राहिलेला होता. चाळींत त्यावेळीं कोणी चिटपांखरूंहि नव्हतें. मी चाळींत शिरतांना तिच्या बाहेरच्या फाटकाजवळच बागेचा माळी जेवणासाठीं आपल्या घराकडे निघालेला मीं पाहिला होता. तो समय मोठा उन्मादकारी होता. थोडा वेळ आम्हां दोघांपैकीं कोणी कांहींच बोललें नाहीं. ती स्थिति असह्य वाटून मला अगदीं चोरट्यासारखें होऊन गेलें. चोरट्या नजरेनें मीं त्यांच्याकडे पाहिलें. एखाद्या द्रव्यलोभी माणसाप्रमाणें आपली नजर माझ्या-वर स्थिर करून ते माझ्याकडे एकसारखे टक लावून पाहात असलेले मला दिसले. मूर्तिमंत प्रणय त्यावेळीं त्यांच्या नजरेंत अवतीर्ण झाला होता. माझ्या प्रणयार्त हृदयावर आपल्या नजरेच्या प्रोक्षणीनें ते प्रेमसुधेची शीतल वृष्टीच करीत असल्याचा भास मला होऊं लागला. त्यांच्या नजरेंतील तो प्रणयजन्य भाव मी चटकन् ओळखला. स्त्रीसुलभ लज्जेनें माझी नजर आपोआप खालीं वळली. तोंड गोरेंमोरें झालें. क्षणोक्षणीं मनाची अस्थिरता वाढूं लागली. आपली अशी गोंधळलेली स्थिती लपविण्यासाठीं मी बरोबर

आणलेली माझ्या काव्याची चोपडी उघडून तिच्यांतील मजकुरावरून वेगानेच आपली दृष्टि फिरविण्याचा आव आणला; व तिचीं भराभर एका-मागून एक पानें चाळूं लागले. इतक्यांत मि. मुनालिक माझ्याजवळ आले नि चटकन् माझा डावा हात त्यांनीं हलकेंच आपल्या हातांत धरला. एखाद्या भीतिग्रस्त माणसाप्रमाणें त्यावेळीं त्यांची स्थिति झालेली होती. त्यांच्या सर्वांगाला कंप सुटला होता. हात थरथरत होता. घोबडी वळल्या-सारखी होऊन तोंडांतून शब्द फुटत नव्हता. त्यांच्या हाताचा स्पर्श मला त्यावेळीं प्रथमच्च झाला. शरीराच्या एखाद्या तप्त भागावर शीतल जलतुषारांचा हळुवार हातानें केलेला नाजूक शिडकाव मनाला जसा आल्हादकारक वाटतो, अगदीं तसाच तो स्पर्श मला वाटला माझ्या सर्वांगांतून एक प्रकारच्या गोड झिणझिण्या होऊन त्यामुळं माझ्या शरीरावर कसली तरी धुंदी येत चालली अमल्याचा मला भास होऊं लागला. कसल्या तरी अननुभूत सुखाचा मी अनुभव घेत आहें असें मला वाटलें. त्यांच्या हातून आपला हात सोडवून घेण्याचा मी प्रयत्न केला नाहीं. तरीहि लज्जेमुळं मला अवघडल्यासारखें झालें होतें. परंतु क्षणार्धांतच आपल्याकडून घडलेली ही गोष्ट त्यांच्या लक्षांत येऊन त्यांनीं माझा हात सोडला व ते म्हणाले—

“ सुहासिनी ! सुहासिनी, क्षमा कर माझ्या या अतिप्रसंगामुळं मला पापी, अविवेकी, नीतिभ्रष्ट समजून तुला माझा तिरस्कार वाटूं लागेल; पण माझा नाइलाज झाला. हा मोह मला अगदीं अनावर झाला. आज-पर्यंत कोणत्याहि सुंदर तरुणीच्या सौंदर्यानं मी मोहवश झालों नाहीं; विवेकाचा तोल सुटूं दिला नाहीं; मनावरील नैतिक पकड ढिली होऊं दिली नाहीं. पण आज माझा हा पुरुषी अहंकार या अपार सौंदर्यराशीपुढं, या दिव्यगुणमंडित युवतिरत्नापुढं, प्रणयसाम्राज्याच्या या विजयशालिनी सम्राज्ञीपुढं निष्प्रभ ठरून तिच्या चरणीं लीन झाला आहे. प्रीतीच्या आराध्यदेवते, माझ्या हृदयसर्वस्वानं बांधलेली तुझ्या प्रीतीची षोडशोपचारी पूजा गोड मानून घे. तिचा अव्हेर करूं नकोस ! ” हे शब्द उच्चारून लगेच माझे दोन्ही हात त्यांनीं आपल्या हातांत धरले व आपलें मस्तक हलकेंच माझ्या उन्नत उरोजावर ठेवलं. आत्यंतिक मोहाच्या प्रसंगींहि मनोनिग्रहानें

प्रणयाची विशिष्ट मर्यादा राखून प्रियकरानें विशुद्ध अंतःकरणानें केलेली प्रेमाची आळवणी पाहून कोणत्या प्रियकरणीच्या प्रेमाला भरतें येणार नाहीं ? भावनोर्मींचा क्षोभ अनावर होऊन माझ्या दिलाचा अथांग दरिया थैमान घालूं लागला. मनाचे सारे लौकिक निर्बंध त्यानें पार झुगारून दिले. भावप्रवणतेनें पूर्णपणें असहाय्य होऊन मीं माझें शरीर त्यांच्या बाहुपाशांत लोटून दिलें. दोन प्रेमी जीवांचा परमोच्च संगमच तो. प्रीतीनें प्रीतीला ओळखलें. हृदयाची हृदयाला साक्ष पटली. प्रेमाच्या मूकभाषेनें दोन्हीं हृदयं एकमेकांना मंजुळ साद घालूं लागलीं.

* * *

आमचं प्रेममीलन झालें त्या दिवसापासून आम्ही दोघें अगदीं एकमेकांचे झालों. त्या गोड प्रसंगाच्या दुसऱ्या दिवशीं आम्ही आपआपल्या छायाचित्रांची एक एक प्रत आमच्या प्रीतीचें पवित्र स्मृतिचिन्ह म्हणून एकमेकांस नजर केली. दोघांनाहि एकमेकांचा क्षणभरहि विसर पडेनासा झाला. दोघांनाहि परस्परांच्या सहवासाची आतुरता लागून राहिली. वास्तविक लौकिकदृष्ट्या आम्ही एकमेकांस अगदीं परके होतों. पण मनानें, हृदयानें आम्ही अगदीं एकजीव झालों होतों. जणूं काय दोघांची श्वसनक्रिया एकाच हृदयक्रियेनें चालली होती. लौकिकदृष्ट्या आम्ही एकमेकांशीं विवाहबद्ध झालों नव्हतों तरीहि पण पतिपत्नींच्या विशुद्ध प्रेमानें आम्ही एकमेकांकडे पाहूं लागलों. आमच्या विवाहाचा वाङ्निश्चय पुरोहितासमक्ष झाला नव्हता; पण प्रत्येक भूतमात्राच्या देहांत वसत असलेल्या चिच्छक्तीच्या साक्षीनें आम्ही वाग्दत्त वधूवरें झालों होतों. मनाच्या मंगलमय बोहल्यावर, विशुद्ध भावनांच्या धडकत्या होमासमोर जगांत जें जें कांहीं पवित्र असेल त्या सर्वांची स्मृति मनांत जागृत ठेवून भूतमात्राच्या देहांत वास करीत असलेल्या परमेश्वरस्वरूपी आत्म्याच्या साक्षीनें आम्ही एकमेकांशीं विवाहबद्ध झालों होतों. लौकिक लग्नविधीची आम्ही पर्वा केली नाहीं. निर्जीव दगडमातीच्या बोहल्याची आम्हांला जरुरी वाटली नाहीं. वधूवरांच्या प्रेमाचा कोंडमारा करणाऱ्या धूम्रव्याप्त होमाची आम्हांस गरज भासली नाहीं; अगर विवाहविधींतील पवित्र वैदिक मंत्रांचें खरें मर्म न जाणतां पोपटपंची करणाऱ्या भट्टाभिक्षुकांच्या निरर्थक बडबडींची

आम्ही क्षिति ओलांडली नाहीं. पुरुषार्थत्रयीनें परिपूर्ण अशा पावित्र्यानेंच आमचीं हृदयें परस्परांशीं संलग्न झालीं असल्यामुळें त्यांना भाडोत्री पवित्रपणा आणण्यासाठीं गंगा, सिंधु, सरस्वती, यमुना इत्यादि नद्यांना पाचारण करण्याचें आम्हांला कारण पडलें नाहीं.

एकमेकांच्या सहवासांत आम्हांला बाह्य जगाची विस्मृति पडल्यासारखें झालें. प्रणयाच्या गोड तंद्रींत आम्ही सदोदित रममाण होऊन राहिलों. माझें काव्याचें लेखन तसेंच अपुरें राहिलें. त्याकडे माझें बिलकूल लक्ष लागेनासें झालें. कल्पनासृष्टींतील माझा काव्याचा संसार माझ्या दृष्टीआड होऊन सत्यसृष्टींतील माझ्या संसाराच्या काव्यकल्पना मला आतां सुचूं लागल्या. प्रेमाच्या मादक शराबाचे प्याल्यावर प्याले झोकून त्याच्या कैफांत आम्ही धुंद होऊन राहिलों. प्रेमाच्या गुलगुल गोष्टी बोलण्यांत, वेळ पडल्यास एकमेकांच्या प्रेमाखातर वाटेल तो स्वार्थत्याग करण्याच्या एकमेकांच्या तयारीनें आपापल्या प्रेमाची एकमेकांस उत्कटता पटविण्यांत, प्रेममय आदर्श संसाराचीं रम्य कल्पनाचित्रें रेखाटण्यांत आमच्या रात्रीमागून रात्री जाऊं लागल्या. अशाच एका रात्रीं मला एक स्वप्न पडलें. मी आपल्या खोलींत एकाग्रचित्तानें बसलें आहें; चित्रकलेचें सर्व साहित्य माझ्याजवळ पडलेलें आहे; एक शुभ्र फलक हातांत घेऊन त्यावर एक चित्र रेखाटण्यांत मी अगदीं गढून गेलेली आहें; तें चित्र आमच्याच एका प्रणयप्रसंगाचें आहे; मी आणि माझे जिवलग एकमेकांस अगदीं बिलगून बसलों आहोंत; प्रेमभरानें आम्ही एकमेकांच्या मानेभोंवतीं हातांचा विळखा घातलेला असून चुंबनातुर होऊन दोघांचीं तोंडें अगदीं एकमेकांजवळ आलेलीं आहेत असा प्रसंग मी रेखाटलेला आहे; चित्र काढून पुरें झालेलें असून मी त्याजकडे समाधानपूर्वक नजर लावून पाहात आहें; इतक्यांत माझे जिवलग हळूंच पाठीमागून येऊन माझ्या खांद्यावर हात ठेवून सस्मित मुखानें माझें चित्र पाहात आहेत व अत्यंत हर्षभरित होऊन चित्रकलेंतील माझ्या प्राविण्याची मुक्तकंठानें तारीफ करीत आहेत; स्तुतीनें ओशाळून गेल्यामुळें सलज्ज होऊन माझी दृष्टि आपोआप खालीं वळली आहे; त्यावेळीं माझ्या मुद्रेवर खेळणाऱ्या लज्जायुक्त ओझरत्या हास्यछटांकडे माझे जिवलग कौतुकानें पाहात आहेत; इतक्यांत एका द्वाड मुलानें चटकन् माझ्या खोलींत

येऊन माझ्या त्या सुंदर प्रणयचित्रावर शाई ओतून तें विद्रूप केलें. तें पाहून मला अत्यंत दुःख झालें. त्या द्वाड मुलाच्या व्रात्यपणाचा मला अनिवार संताप येऊन त्या भरांत मी त्याच्यावर जोरानें ओरडलें—आणि खरोखर झोपेंत मी एवढ्या मोठ्यानें ओरडलें कीं, माझ्या त्या ओरडण्यानें माझी मीच दचकून उठलें व एखादा भयंकर प्रसंग घडल्याप्रमाणें घामाघूम होऊन गेलें. मी मनाला धीर देण्याचा यत्न केला तरीसुद्धां झोपेंतील तें दृश्य माझ्या डोळ्यांपुढें हुबेहूब दिसत असल्यामुळें माझी स्थिति केविलवाणी झाली होती. परंतु स्वप्नांतील पाहिलेल्या त्या प्रकारामुळें अशा स्वरूपाचें स्वप्न मला कां पडावें अशी रुखरुख मधूनमधून माझ्या मनाला सारखी लागून राहिली.

मि. मुतालिक कामानिमित्त परगांवीं गेले असल्यामुळें २—३ दिवसांत त्यांची भेट झालेली नव्हती. दिवसामागून दिवस जात होते. एके दिवशीं मी आपल्या खोलींत एकटीच होतें. दोन प्रहरची भर उन्हाची वेळ होती. शरीर किंचित् भारावल्यासारखें वाटूं लागल्यामुळें विश्रांतीसाठीं मी जवळच्या कॉटवर अंग टाकलें; व पडल्यापडल्या स्वतःसंबंधीं विचार करूं लागलें. आपल्या मुद्रेभोंवतीं एक प्रकारचें तेजोवलय निर्माण झालेलें असून त्यामुळें ती नेहमींपेक्षां अधिक तजेलदार दिसत असल्याची व शरीरांतील नेहमींचा सुटसुटीतपणा व चपलता जाऊन तें पुष्ट व कांहींसें सुस्त होत चाललें असल्याची अलीकडे मला जाणीव होऊं लागली होती. शरीरांत कांहीं विकृति नसतांना गोड रुचकर अन्नावर नेहमींप्रमाणें माझी वासना नव्हती. एकंदर आहाराच्या बाबतींत मी अलीकडे अधिक चोखंदळ झालें होतें. हीं लक्षणें माझ्या ठिकाणीं दिसूं लागण्याचें कारण काय, या एकाच विचारानें माझ्या मनाला व्यग्र केलें. विचारांतीं गर्भसंभवजन्य लक्षणांमुळेंच माझ्या एकंदर शरीरांत हा फरक पडत चालला असल्याचें मीं ओळखलें. मी आपन्नसत्त्वा असल्याविषयीं माझ्या मनाची खात्री झाली. त्याबरोबर माझ्या छातींत एकदम धस्स झालें. मनाची क्षणैक भांबावल्यासारखी स्थिति झाली. प्रमाथी मनाच्या दुर्निवार संमोहावस्थेंत आपल्या हातून निंद्य आचरण घडलें अशी सदसद्विवेक बुद्धीची टोंचणी मनाला बोचूं लागली. वास्तविक तारुण्यसुलभ विषयभोगाच्या वासनातृप्तीसाठीं आमचें एकमेकांवर प्रेम जडलें

नव्हतें. एकमेकांच्या गुणांचें परस्परांस आकर्षण वाटल्यामुळेंच तें प्रथम उभयतांच्या भावनाप्रवण हृदयांत अंकुरित झालें होतें. पुढें जसजसा आमचा परिचय वाढू लागला तसतसें तेंहि वाढीस लागलें. आमच्या प्रेमाची मूळची बैठक अशाप्रकारें आमच्या परस्परांविषयींच्या नितांत आदरावर आधारलेली असून त्याच्या मुळाशीं कोणताहि हिणकस हेतु नव्हता. या आदरजन्य प्रेमाचेंच रूपांतर पुढें आमच्या पति-पत्निप्रेमांत झालें. अनुगुणरूप पति-पत्नि या नात्यानें आम्ही एकमेकांकडे पाहूं लागलों. एकमेकांवरील अशा निस्सीम, निःस्वार्थी, विशुद्ध प्रेमामुळेंच त्याच्या उत्कटावस्थेंत आमच्याकडून घडलेलें आचरण अनैतिक समजण्यास आमची मनें तयार नव्हतीं. माझ्या एकंदर शरीरांत होत चाललेला निसर्गप्राप्त बदल याच आमच्या प्रेमाचा परिपाक होता. मग त्याची मला इतकी भीति कां वाटली? कारण हेंच कीं, हृदयस्थ प्रेमस्वरूपी परमेश्वराला साक्षी ठेवून पवित्र मनानें जरी आम्ही एकमेकांशीं विवाहवचनानें बद्ध झालों असलों तरी लौकिकदृष्ट्या आमच्या विवाहाची जाहिरात झालेली नसल्यामुळें रूढिप्रिय समाजानें लादलेल्या व आजवर कटाक्षानें पाळल्या गेलेल्या धार्मिक चालीरीतींचा व नैतिक कल्पनांचा विचार करतां आमचा विवाहपूर्व प्रेमसंबंध अनैतिक आचरण—पापकर्म—या सदरांत मोडेल, समाजाच्या दृष्टीनें आम्ही बेजबाबदार दुर्वर्तनी ठरूं, आमच्या विशुद्ध प्रेमावर अनुदारदृष्टि समाजाच्या न्यायदेवतेकडून व्यभिचाराचा निर्दय शेरा मारला जाईल असा अभद्र विचार एकाएकीं माझ्या मनांत डोकावूं लागला; आणि अभद्र विचार एकएकटा कधींच येत नाहीं. तो तत्सदृश अनेक विचारांची मालिका आपल्याला जोडून आणीत असतो. माझ्याहि बाबतींत तसेंच झालें. वरील विचारांबरोबर अनेक तापदायक विचारांनीं माझ्या डोक्यांत काहूर माजवून दिलें. थोर, कुलीन, सदाचारसंपन्न अशा श्रीमंत घराण्यांत सुविद्य, सुसंस्कृत आईबापांच्या पोटीं आपण जन्मास आलों, मातापित्यांस पुत्रसंतान नसल्यामुळें व आपण त्यांची एकुलती एकच कन्या असल्यामुळें आजवर त्यांनीं आपणांस लाडानें वाढविलें, शिक्षण दिलें व उच्च शिक्षणाची आपली हौस पुरविण्यासाठीं आपल्या शीलावर भरंवसा ठेवून दूर ठिकाणीं शहरांत स्वतंत्रपणें राहण्याची आपणास मोकळीक दिली;

परंतु आपण आपल्या निंद्य वर्तनानें त्यांच्या लौकिकास काळिमा लावण्यास कारणीभूत होणार; समाजांत आपली अप्रतिष्ठा झालेली पाहून आपल्या मातापित्यांस पराकाष्ठेचें दु:ख होईल व लोकांत तोंड दाखविण्यास त्यांना शरम वाटेल— अशा अभद्र विचारांचा झंझावात माझ्या मनोदुर्गास हादरून सोडूं लागला. भावी परिणामांचें कल्पनेनें रेखाटलेलें चित्र भेसूर-पणानें मला भेडसावूं लागल्यामुळें माझ्या मनाची भेदरल्यासारखी स्थिति झाली. माझ्या तोंडावरचा तजेला मावळला. सगळा उत्साह गळून गेला. उदासीनता मनाला तीव्रतेनें जाणवूं लागली. तो सबंध दिवस मी तशा मानसिक अस्वस्थतेंत घालविला. संध्याकाळीं मि. मुतालिक पुण्याहून परत आले; आणि आले ते थेट माझ्या खोलीवर. त्यांचा तो रुबाबदार, कांति-युक्त सुंदर हंसरा चेहरा दृष्टीस पडतांच उदास विचारांनीं सारा दिवस मनाला आलेला शीण एकदम नाहींसा होऊन माझें मन पूर्ववत् उत्साह-भरित झालें. श्रीभगवान् सूर्यनारायण नभोमंडलांत आपल्या तेजस्वी प्रकाशानें तळपत असतां व त्या तेजोमय दिव्य प्रकाशांत सर्व चराचर सृष्टि न्हाऊन निघत असतां मध्येंच ज्याप्रमाणें थोडा वेळ कांहीं ढग आगंतुक-पणें त्या प्रकाशाच्या आड आल्यामुळें कांहीं वेळ तो लोपल्यासारखा होऊन ढगांची उदास छाया पृथ्वीवर रेंगाळावी; पण कांहीं वेळानें ते दूर होतांच त्या दिव्य प्रकाशानें पुन्हां पूर्ववत् सर्व सृष्टि तेजाळून जावी तद्वत्च माझ्या वल्लभाच्या अनुपस्थितीमुळें खोलींत भरून राहिलेलें उदासीनतेचें वातावरण त्यांच्या आगमनामुळें दृश्यमान झालेल्या त्यांच्या तेजस्वी मुख-मंडलावरील हंसऱ्या कांतीनें पार विरून जाऊन तेथें उल्हास, समाधान यांचें साम्राज्य पूर्ववत् नांदूं लागलें. भोजनाची वेळ होतांच खानावळीं-तील गड्यानें जेवणाचा डबा आणून ठेवला. उभयतांनीं आनंदांत भोजन उरकलें. भोजनोत्तर नेहमींप्रमाणें हास्यविनोदांत आमच्या गप्पांना सुरुवात झाली. संभाषणाच्या ओघांत निसर्गानें माझ्यावर लादलेल्या नवीन जबाब-दारीची कल्पना हळूंच मीं त्यांना दिली. त्याबरोबर साश्चर्य मुद्रेनें ते थोडा वेळ माझ्या तोंडाकडे पाहातच राहिले. नंतर आपली दृष्टि त्यांनीं दुसरीकडे वळविली. विचारमग्न स्थितींत ते कांहीं वेळ स्तब्ध राहिले.

त्यांचा चेहरा कांहींसा चिंतातुर दिसूं लागला. कसल्या तरी आगामी संकटाला आपणांस तोंड द्यावें लागणार या विचारानें कदाचित् त्यांना चिंतामग्न केलें असावें. थोड्या वेळानें ते मजकडे पाहून म्हणाले, " आपल्या प्रेमाचा निराकार परमेश्वर साकार रूपांत इतक्या लवकर आपणांस दर्शन देईल अशी मला कल्पना नव्हती. हरकत नाहीं. त्याच्या स्वागताच्या पूर्वतयारीला आपणांकडून आतां विलंब होता उपयोगी नाहीं. " त्यावर त्याच विषयासंबंधीं आमची बराच वेळ भवति न भवति होऊन यापुढें अधिक काळ न दवडतां लौकिक-दृष्ट्या एकमेकांशीं विवाहबद्ध होण्याचा आम्हीं निर्णय घेतला; व दुसऱ्याच दिवशीं आवश्यक तेवढें सर्व सामानसुमान बरोबर घेऊन आम्ही कमला-पुरास गेलों. कमलापूर ! माझ्या हृदयेश्वराचें गांव ! म्हणजे माझेंच गांव नव्हतें का तें ? त्यांचा तो प्रासादतुल्य वैभवसंपन्न भव्य वाडा म्हणजे माझेंच तें प्रेममंदिर ! आत्मीयतेच्या अभिमानानें माझें हृदय नुसतें फुलून गेलें.

* * *

मि. मुतालिक यांचे वडील श्रीपतराव ऊर्फ बाबासाहेब मुतालिक हे एक मध्यमवयीन गृहस्थ होते. त्यांचें उठावदार व्यक्तिमत्त्व त्यांच्या उच्च-कुलीनत्वाचें द्योतक होतें. मुद्रेवरून ते जितके प्रेमळ तितकेच करारीहि पण असावेत असें सकृद्दर्शनी त्यांना पाहणारास वाटत असे. आणि तें खरेंहि असल्याचें मला पुढें लवकरच कळून आलें. मुतालिक घराण्याचा एक श्रीमंत, प्रतिष्ठित इनामदार घराणें असा आजूबाजूच्या पंचवीस खेड्यांत नांवलौकिक होता. श्रीपतरावांची पत्नी मि. मुतालिक यांच्या लहानपणींच निवर्तल्यामुळें मि. मुतालिक हे त्यांचे एकुलते एकच पुत्र त्यांच्या वैभव-शाली इस्टेटीस वारस होते. कारण पुत्रावरील अपार प्रेमामुळें प्रथम पत्नी मयत झाल्यानंतर द्वितीय संबंधाच्या भानगडींत श्रीपतराव मुळींच पडले नव्हते. त्यांची सर्व मायाममता, सर्व प्रेम, किंबहुना त्यांचे पंचप्राण आपल्या एकुलत्या एका पुत्रावर—मि. मुतालिक यांच्यावर—केंद्रीभूत झालेले होते. सुदृढ प्रकृति, राजबिंड्यासारखें शरीरसौष्ठव, कुशाग्र बुद्धिमत्ता, प्रेमळ उमदा स्वभाव, शालीन आज्ञाधारक वृत्ति असे उच्चकुलीन, सदाचार-संपन्न, वैभवशाली घराण्यांतील पुरुषास शोभण्यासारखे प्रशंसनीय गुण

आपल्या पुत्राच्या ठिकाणीं असल्याबद्दलच्या अभिमानानें श्रीपतरावांना अस्मान ठेंगणें वाटत असल्यास नवल नव्हतें. आणि त्यांचा तो अभिमान अनाठायीं नव्हता. एक प्रेमळ गृहलक्ष्मीची उणीव सोडली तर एक थोर आतिथ्यशील घराणें,–लक्ष्मीचा पूर्ण वरदहस्त, सर्व गोष्टींची अनुकूलता, समाजांत प्रतिष्ठा, सेवकांनीं सदा गजबजलेलें भव्य निवासस्थान, कुलदीपक सुपुत्र अशा भाग्यवंताच्या वांट्यास येणाऱ्या सर्व गोष्टी परमेश्वरकृपेनें श्रीपतरावांना लाभलेल्या होत्या. गृहस्थाश्रमाची धन्यता यापेक्षां अधिक ती काय असायची? अशा घराण्याची कुलवधू म्हणून मिरविण्याचा मान आपणांस लवकरच मिळणार या गोड विचारानें माझें हृदय आनंदानें नुसतें नाचूं-बागडूं लागलें. आणि वाड्यांतील प्रत्येक वस्तूकडे मी जेव्हां आपुलकीच्या अभिमानानें पाहूं लागलें तेव्हां ती ती वस्तु आपली भावी स्वामिनी म्हणून जणूं माझें स्वागतच करीत असल्याचा मला भास होऊं लागला. आमचें आगमन म्हणजे वाड्यांतील माणसांना एक आनंदाची पर्वणीच झाली. मि. मुतालिक हे आपल्या प्रेमळ स्वभावामुळें सर्व गडीमाणसांचे लाडके असल्यामुळें आपल्या धाकट्या धन्याला खुष करण्यांत त्यांच्यांत जणूं अहमहमिका सुरू झाली. त्यांचें आपल्या मुलावरील तें प्रेम पाहून श्रीपतरावांना आपल्या पुत्राचें साभिमान कौतुक वाटलें. त्यावेळीं गडी-माणसांना उद्देशून विनोदानें ते म्हणालेसुद्धां, "उगवत्या सूर्यालाच अर्घ्य-प्रदान करण्यासाठीं जो तो धडपड करणार! भावी धन्याला सोडून आम्हांला आतां कोण विचारणार म्हणा!"—आणि या विनोदगर्भ भाषणानें सर्वांत एकच हास्यकल्लोळ उठला. वास्तविक मी त्या घरांत प्रथमच आलें असल्यानें सर्वांना अपरिचित होतें. परंतु त्या भाषणानें मलाहि माझ्या नवखेपणाचा विसर पडला. हंसें आवरेनासें होऊन इतरांप्रमाणें मीहि त्यावेळीं अगदीं मनमोकळेपणानें हंसलें. मि. मुतालिक यांची मी कोणीतरी पाहुणी आहे असें जो तो मला समजूं लागला. अर्थातच मि. मुतालिक यांच्याबरोबर माझीहि योग्य ती बडदास्त ठेवण्यांत कोणीहि कसूर केली नाहीं. अशा तऱ्हेनें आमचे पहिले दोन दिवस आनंदांत व हास्यविनोदांत गेले. श्रीपतरावांनींहि माझ्यासंबंधीं मि. मुतालिक यांच्याजवळ अधिक कांहीं विचारपूस केली नाहीं. मीहि मनांत संकोच न धरतां अगदीं

घरांतल्यासारखें गडीमाणसांशीं मनमोकळेपणानें वागूं लागल्यामुळें प्रत्येकाला माझा स्वभाव आवडूं लागला. त्या दोन दिवसांतच गडीमाणसांचें माझ्याबद्दल इतकें चांगलें मत झालें कीं, आपल्या धाकट्या धन्याला मालकीण मिळावी तर असलीच मिळावी असा एकमेकांशीं बोलतांना त्यांच्यापैकीं एकानें आपला अभिप्राय व्यक्त केला असल्याचें आड उभी राहून मी ऐकलेंसुद्धां. आमचा विवाहासंबंधीं ठरलेला बेत योग्य संधि पाहून आपल्या वडिलांच्या कानांवर घालण्याचा व त्यांची त्याबद्दल संमति मिळविण्याचा मि. मुतालिक यांचा विचार असल्यामुळें तशा संधीची ते वाट पाहूं लागले. परंतु श्रीपतराव कामाच्या गडबडींत असल्यासारखे दिसले. त्यांच्या इनामी जमिनी ज्या ज्या गांवीं होत्या त्या त्या गांवीं कुळां-कडील वसुलासाठीं ते जात असत व दोन्ही वेळेला जेवणाच्या वेळेसच घरीं परत येत असत. दिवसांतून घटकाभर विश्रांति घेण्याची अगर शांत-पणें आमच्याशीं बोलण्याची त्यांना बिलकूल फुरसत नसल्यानें त्यांच्या कानांवर आपला बेत घालण्याची योग्य संधि मि. मुतालिक यांना त्या दोन दिवसांत बिलकूल मिळाली नाहीं.

तिसरा दिवस उजाडला. सकाळचा नऊ वाजण्याचा सुमार होता. दुसऱ्या मजल्यावरील बैठकीच्या दिवाणखान्यांत लोडाशीं टेकून कसले तरी कागदपत्र चाळीत श्रीपतराव बसले होते. जमिनींचा वसूल घेऊन आलेलीं चारपांच कुळें जवळच बसलेलीं असून त्यांच्याशीं ते अधूनमधून जमिनी-संबंधींच कांहींतरी बोलत होते. दिवाणखान्याला लागून असलेल्या पलीकडच्या खोलींतून नेसल्या धोतराचा सोगा खांद्यावर टाकून मि. मुतालिक दिवाणखान्यांत शिरले; व श्रीपतराव ज्या ठिकाणीं बसले होते त्यांच्या जवळच असलेल्या एका कोचास धरून उभे राहिले त्यांना पाहातांच शेजारीं बसलेल्या कुळांपैकीं एकजण म्हणाला, " ऑं ! धाकलं धनीसाब कवां आलं ? आपल्या जिमनिच्या गांवीं आजपतूर ते एकदाबी आलं न्हाईत ! मंग आपलं धनी काळं हैत कां गोरं हैत हें आमच्या घरांतल्या समद्या मानसारनी कसं कळायचं ? " यावर श्रीपतरावांनीं मुलाकडे पाहून हास्य केलें व ते म्हणाले, " काय बापूसाहेब, आपला पिराजी काय म्हणाला तें ऐकलंत ना ? वसुलाच्या निमित्तानं तुम्ही आजपर्यंत एकदांहि

त्याच्या गांवीं गेला नाहीं म्हणून रुसला आहे तो तुमच्यावर !" नंतर लगेच आपलें तोंड त्या कुळाकडे वळवून त्याला म्हणाले, "बरं का पिराजी, तुझे धाकटे धनी आतांपर्यंत तुझ्या गांवीं आले नाहींत; पण आतां तुलाच तुझ्या घरचीं सर्वं मुलं-माणसं घेऊन लवकरच इकडं यावं लागणार आहे ! तुझ्या धाकट्या धन्याचं लग्न आतां लवकरच करण्याचा आमचा विचार आहे. त्यावेळीं तुझ्या धाकट्या मालकाला आणि त्यांच्या मालकिणीला जोडीनंच तुझ्या घरच्या सर्वं माणसांना दाखवूं म्हणजे झालं कीं नाहीं ?"

"धाकट्या धन्यासाठीं मालकीन बगितली है जनूं ?" कुळानें उत्सुकतेनें विचारलें.

"अरे, बघितली नाहीं अजून ! आमचे बापूसाहेब यंदांच बी. ए. होणार. त्यानंतर त्यांच्या लग्नाचा विचार. बहुतेक यंदांच्या मार्गशीर्षमासीं त्यांच्या लग्नाचा समारंभ घडवून आणण्याचा आमचा मानस आहे !" श्रीपतराव सानंद अभिमानानें उद्गारले. त्यानंतर कुळांबरोबर त्यांच्या जमिनीच्या व्यवहारासंबंधीं थोडा वेळ इकडच्या तिकडच्या गोष्टी होऊन कुळें निघून गेलीं. नंतर त्यांनीं आपली दृष्टि मुलाकडे वळविली. दिवाणखान्यांत आल्यापासून कुळें निघून जाईपर्यंत इतका वेळ कोचाला टेकून मि. मुतालिक तसेच उभे असल्याचें आतांपर्यंत त्यांच्या लक्षांतच आलें नव्हतें. तें ध्यानांत येतांच आपल्या बेफिकीरपणाचा त्यांच्या मनाला थोडासा खेद वाटला; पण त्याजबरोबर समाधानहि वाटलें. इतर सामान्य मुलांसारखा आपला मुलगा नाहीं; इतर मुलें थोड्याशा शिक्षणानें आव्यतेखोर बनून आपल्या वडीलधाऱ्या माणसांची मर्यादा राखीत नाहींत; परंतु आपला मुलगा सुशिक्षित असूनहि विनयसंपन्न आहे, आपल्या परवानगीशिवाय खालीं न बसतां इतका वेळ एखाद्या सामान्य नोकरासारखा आपल्यापुढें अदबीनें उभा आहे हें पाहून मुलाच्या मनाचा सुसंस्कृतपणा व विनयशीलवृत्ति याबद्दल त्यांना अत्यंत कौतुक वाटून ते म्हणाले—

"अहो बापूसाहेब, तुम्ही अद्याप उभेच ! या, बसा ना. तुम्हांला घरीं येऊन दोन दिवस झाले; पण या स्थावरविषयक कामांच्या धांदलीमुळें तुमच्याशीं निवांतपणानं बोलण्याची अगर तुमच्या बरोबर आलेल्या त्या

पाहुणींची विचारपूस करण्यासहि या दोन दिवसांत आम्हांला बिलकूल सवड मिळाली नाहीं तें तुम्ही पाहातच आहांत. आतां तुम्ही घरचेच असल्यामुळं तुम्हांला त्याबद्दल कांहीं वाटणार नाहीं हें खरं; पण पाहुण्यांच्या आदरसत्काराची आमची ही अभिनव रीत पाहून तुमच्या त्या पाहुणी मात्र मनांत आश्चर्य करीत असतील. बाकी त्यांची योग्य ती बरदास्त तुम्ही ठेवली असेलच. तुमच्या आत्याबाईंना तुमच्या आवडीनिवडी माहीत असल्यामुळं तुम्हांला आवडतील ते पदार्थ करून घालण्याची त्यांना पंचाईत पडणार नाहीं; पण संकोचामुळं तुमच्या त्या पाहुणींची मात्र खाण्या-पिण्याच्या बाबतींत गैरसोय होण्याचा संभव आहे म्हणून विचारलं. त्यांच्या आवडीप्रमाणं त्यांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था ठेवण्याबद्दल तुम्ही आत्या-बाईंना सूचना दिली आहे ना ?"

"त्यांच्यासाठीं तशी निराळी व्यवस्था करण्याबद्दल आत्याबाईंना सांग-ण्याचं कारणच पडलं नाहीं बाबा. कारण त्यांच्या नि माझ्या आवडीनिवडी जवळजवळ एकच आहेत. पण बाबा, त्या आपल्याकडं पाहुणी म्हणून आलेल्याच नाहींत मुळीं; आपल्या घरांतल्या माणसांपैकींच त्या एक आहेत असं समजण्यास हरकत नाहीं." मि. मुतालिक सूचकपणानें म्हणाले.

"असं म्हणून कसं चालेल बापूसाहेब ! आपल्या मनमोकळ्या व खेळी-मेळीच्या स्वभावानं आपण परके असल्याचें त्यांनीं आपणांस भासविलं नसेल तर तें त्यांचं सौजन्य; पण म्हणून त्याकडं आपण दुर्लक्ष करावं हें आपल्या घराण्याच्या आजवरच्या आतिथ्यशील रिवाजास केव्हांहि शोभून दिसणार नाहीं. आणि शिवाय तुमचे ते जीवश्च कंठश्च स्नेही—आपल्याकडं तुमच्या-बरोबर वरचेवर येणारे कोण ते ? सुखात्मेच नाहीं का ?—त्यांना आपल्या माणसाची तुमच्या घरीं यथोचित व्यवस्था झाली नाहीं असं जर समजलं तर थट्टेनं का होईना ते तुम्हांला त्याची जाणीव देतील; मग त्याबद्दल आम्हांला कमीपणा वाटल्याशिवाय कसा राहील ?" भाबडेपणानें श्रीपतराव म्हणाले.

"माझ्याबरोबर आलेल्या तरुणीस आपल्याकडं नेहमीं येणारे माझे स्नेही विलासराव सुखात्मे यांच्या पत्नी समजलांत कीं काय बाबा ?"

"होय ! आमची समजूत अजूनपर्यंत तरी तशीच होती ! गेल्या सहा

महिन्यापूर्वी सुखात्मे यांचा विवाह झाला असून ते आपल्या पत्नीसह एकदां आपल्याकडे येणार असल्याचं मागील खेपेस तुम्ही येथें आल्यावेळीं तुमच्या-कडूनच आम्हांला समजलं होतं. म्हणून तुमच्याबरोबर आलेल्या या तरुणी त्यांचीच नूतन विवाहित पत्नी असावी असा आमचा समज झाला. एकूण ह्या त्या नव्हेत तर ! म्हणजे प्रथमपासूनच माझा समज चुकीचा झाला कीं काय ? "

" होय, झालाय खरा. माझ्याबरोबर आलेल्या तरुणी मिसेस सुखात्मे नाहींत. माझ्याच कॉलेजांत एफ्. वाय. च्या वर्गात शिकत असलेल्या त्या एक अत्यंत बुद्धिमान् अशा विद्यार्थिनी आहेत. त्यांचं नांव सुहासिनी कुलकर्णी. उदयोन्मुख कवयित्री म्हणून कॉलेजांतील वाङ्मयीन क्षेत्रांत त्या नुकत्याच चमकूं लागल्या आहेत. माझा त्यांच्याशीं परिचय होण्यास हा त्यांचा गुणच कारणीभूत झाला आहे. "

" अस्सं ! अस्सं ! ! वाङ्मयाचे तुम्ही दोघेहि उपासक; तेव्हां तुमचा स्नेह जमणं अगदीं स्वाभाविक आहे. कॉलेजांतील तुमच्या दाट परिचयामुळं तुम्ही एकमेकांना घरांतल्यासारखे समजत असाल हेंहि आम्हांला कबूल आहे. पण घरांतलं असणं व घरांतल्यासारखं असणं यांत फार अंतर आहे बापूसाहेब ! हें अंतर तुमच्या तेथील परिचयजन्य वागणुकीस अनुसरून इथंहि त्यांना आपण तसंच वागविणं शिष्टाचाराच्या विरुद्ध आहे. परीक्षा संपून कॉलेजला सुट्टी झाल्यामुळं आपल्या घरीं जातांना निर्हेतुक स्नेहभावा-मुळं तुमचं घर पाहाण्याच्या इच्छेनं जरी त्या अनाहूत इथं आल्या असल्या तथापि पाहुणी म्हणूनच त्यांचा यथोचित आदरसत्कार करणं आपल्या-सारख्या गृहस्थाश्रमी माणसाचं कर्तव्य आहे. अहो, आपल्या घरीं त्या वरचेवर थोड्याच येणार आहेत ! " श्रीपतराव शुद्ध भावनेनें म्हणाले.

" त्या अनाहूत इथं आलेल्या नसून हेतुपुरस्सरच मीं त्यांना इकडं आणलं आहे ! " मि. मुतालिक यांच्या भाषणांत थोडीशी मिस्किलपणाची छटा होती.

" होय ! कसला बुवा हेतु आहे !——" जिज्ञासा जागृत होऊन हंसत श्रीपतराव उद्गारले. पित्याच्या कानांवर आपला हेतु घालण्यास ही संधि चांगली आहे असं मि. मुतालिक यांना वाटलें. पण लगेच आपल्या पित्याला

आपला हेतु न रुचून ते आपल्यावर रागावतील अशी धास्ती त्यांच्या मनाला वाटूं लागली. बोलावें कीं न बोलावें या परस्परविरोधी विचारांच्या आंदोलनानें त्यांच्या मनाची क्षणभर दोलायमान स्थिति झाली. शेवटीं मनाचा निग्रह करून ते म्हणाले, " बाबा, ज्या उद्देशानें आम्ही उभयतां इथं आलों आहोंत तो आपल्याला समजल्यावर आपण माझ्यावर रागावणार तर नाहीं ना ? माझ्याबद्दल गैरसमज तर करून घेणार नाहीं ना ! आजवर माझ्याबद्दल ज्या आकांक्षा आपण मनांत बाळगीत आलां आहांत त्यांना मी सर्वस्वीं अपात्र आहें अशी आपल्या मनाची समजूत आपण करून घेणार नाहीं ना ? ही एकच भीति आज दोन दिवस माझ्या मनाला सारखी वाटत आहे. " श्रीपतराव एकदम थांबले. मुलाच्या अनपेक्षित व संदिग्ध भाषणानें अगोदरच जागृत झालेली जिज्ञासा आतां अधिकच ताणली जाऊन आपला हेतु स्पष्ट शब्दांत सांगण्याच्या मुलाच्या दिरंगाईचा श्रीपतरावांना थोडासा राग येऊन ते म्हणाले, " बापूसाहेब, एखाद्या अपराधी माणसा-प्रमाणं तुमचं मन इतकं दुबळं झालेलं आजच आम्ही प्रथम पाहात आहों ! आम्हांला राग येईल असं एकहि कृत्य तुमच्या हातून आजपर्यंत कधीं झालं असल्याचं आम्हांला आठवत नाहीं. मग आमच्या रागाची कदर आजच तुम्हांला कां वाटावी ? बोला, बोला; तुमच्या मनांत जें आहे तें स्पष्ट बोला. उगीच अंधारांत चाचपडायला लावूं नका आम्हांला. "

" बाबा, माझ्याबरोबर आलेल्या तरुणीची, जन्माची सहचारिणी म्हणून मी निवड केली आहे. आमचं एकमेकांवर प्रेम आहे. अगदीं निस्सीम, निर्हेतुक प्रेम आहे; एकमेकांना एकमेकांविषयीं नितांत आदर आहे; आमचं वैवाहिक जीवन उभयतांच्या सहवासांत खात्रीनं सुखावह होईल असा आम्हांला आत्मविश्वास आहे. आमच्या विवाहास, बाबा, आपली संमति मिळावी, आपला मंगलमय आशीर्वाद लाभावा अशी आपल्याजवळ आमची याचना आहे. आमची संसारलता आपल्या अमृतमय प्रेमवृष्टीनं टवटवीत राहावी, आपल्या ममतेच्या आधारानं ती वाढीस लागावी, आपल्या कृपाकटाक्षाच्या संजीवक किरणानं बहरून तिच्या गुणसुमनांचा सौरभ चोहोंकडं दरवळत राहावा आणि तिच्या यशाचीं अमृततुल्य मधुर फळें मुतालिक घराण्यांत जन्म घेणाऱ्यांना निरंतर चाखण्यास मिळावींत

अनुक्रम २९३३९

अशी आमची इच्छा आहे !" पितृभक्तीच्या उमाळ्यानें मि. मुतालिक बोलत होते. भावनेचा आविष्कार त्यांच्या शब्दाशब्दांतून प्रतीत झाला होता. श्रीपतराव शांतचित्तानें पुत्राचें भाषण ऐकत होते. त्यांची मुद्रा पूर्ण निर्विकार दिसत होती. मुलाचें बोलणें संपल्यावर थोडा वेळ थांबून ते म्हणाले, "बापूसाहेब, तुमचं तें प्रेमबिम नि त्याच्या [illegible] आम्हांला कांहीं समजत नाहीं. जेणेंकरून तुमचं कल्याण होईल तेंच करणं एवढंच फक्त आम्हांला समजतं. आमच्या सर्व माया-ममता, आशा-आकांक्षा सर्व कांहीं या एकाच लक्ष्यावर केंद्रीभूत झालेल्या आहेत. या एकाच दृष्टीनं विचार करतांना तुमच्या प्रेममय सांसारिक जीवनांतील तुमच्या भावी सहधर्मचारिणीचं आमच्या कल्पनेनं काढलेलं रम्य चित्र कसं आहे तें सांगू का तुम्हांला ? ती एक अप्रतीम लावण्यवती युवती आहे; आदर्श गृहिणी आहे; शीलाची जान्हवी तर सद्‌गुणांची सिंधु आहे; बुद्धीनं सरस्वती असून पतिभक्तिपरायणतेंत विनयवती सीतेची आठवण करून देणारी आहे. आदर्श आर्यस्त्रीचं गुणसाकल्यानं युक्त असं चितारलेलं हें रम्य चित्र, बापूसाहेब, पटतें का तुम्हांला ? तुमची निवड जर या कसोटीस उतरत असेल तर तुमच्या विवाहास आम्ही आनंदानं संमति देऊं. आणि तुमची निवड बहुधा गैर असणार नाहीं अशी आमची खात्री आहे. तुमच्या विवाहासंबंधीं विचार यापूर्वीच आमच्या मनांत आलेला असून आम्हीं तो नुकताच बोलूनहि दाखविला असल्याचं तुम्ही ऐकलं असेलच. आपल्या घराण्याच्या नांवलौकिकास साजेलशी व तुम्हांला अनुरूप अशी वधू निवडून काढण्याची आम्हांला चिंता होतीच. परंतु तीहि अनायासें दूर झाली. तेव्हां येत्या मार्गशीर्षमासीं म्हणजे आणखी सहा महिन्यांनीं तुमच्या विवाहाचा मंगल समारंभ घडवून आणण्याचा आम्ही केलेला बेत आतां नक्की समजण्यास हरकत नाहीं !"

"हें कार्य येत्या मार्गशीर्षमासींच करण्याचं आपण हेतुपुरस्सरच ठरविलं असेल बाबा ?" मि. मुतालिक यांच्या बोलण्यांत खोंच होती.

"होय; पूर्ण विचार करूनच हें कार्य आम्हीं त्या मुदतीपर्यंत पुढं ढकललं आहे. असं पाहा, बऱ्याच वर्षांनंतर आपल्या घरांत हें पहिलंच कार्य होणार असल्यामुळं आपल्या घराण्याच्या इभ्रतीस साजेल अशा

थाटामाटानं तें करण्याचा आमचा विचार आहे; म्हणून त्यासाटीं भरपूर अवधी मिळणें जरूर आहे. विवाहाचे मुहूर्त आतां जवळ जवळ संपत आलेले आहेत. जे कांहीं थोडे अद्याप शिल्लक आहेत तेहि भरपूर अवकाशाचे नसल्यामुळं इतक्या थोड्या अवधींत हें कार्य आमच्या मनाप्रमाणं होणार नाहीं. शिवाय या विवाहाच्या निमित्तानं ज्या घराण्याशीं आपला कायमचा संबंध घडून येणार आहे त्या घराण्याच्या कुलशीलासंबंधीं जरूर ती माहिती आपणांस असणं आवश्यक आहे. वधूवरांच्या सांसारिक जीवनांत स्थित्यंतर घडवून आणणारा विवाहासारखा महत्त्वाचा प्रसंग केवळ भावनेच्या आहारीं जाऊन अविचारानं व घिसाडघाईनं घडवून आणणं अत्यंत अदूरदर्शीपणाचं आहे असं आमचं ठाम मत आहे. म्हणून अशा सर्व साधकबाधक गोष्टींचा विचार करूनच आम्ही आमचा बेत मुक्रर केला आहे ! " श्रीपतराव प्रांजळपणानें उत्तरले. मि. मुतालिक क्षणभर पेंचांत पडल्यासारखे दिसले. शेवटीं या प्रकरणाचा एकदांचा काय तो सोक्षमोक्ष करण्याच्या इराद्यानें ते म्हणाले,

" पण बाबा, आपला हा बेत मला दिरंगाईचा वाटतो ! "

आपला मुलगा विवेकी, संयमी व विनयसंपन्न असल्याबद्दलची श्रीपतरावांची खात्री होती. आणि तशी त्यांची खात्री होण्यासारखेंच मि. मुतालिक यांचें त्यांच्याशीं आजवरचें वर्तन असावें. म्हणून एखाद्या कामुक, उल्लू, बिनमुर्वतखोर तरुणाला शोभेल असा मुलाच्या तोंडून वरील अनपेक्षित उद्गार ऐकून श्रीपतरावांना आश्चर्याचा क्षणिक धक्का बसला. मि. मुतालिक यांचें बोलणें न आवडून किंचित् तिरसटपणानें ते म्हणाले,

" मग काय हें कार्य तडकाफडकीं उरकून घ्यावं असं तुमचं म्हणणं आहे ? "

" बाबा, लहानतोंडीं थोर घांस घेतल्याबद्दल क्षमा करा ! पण तसं होणं अत्यावश्यक आहे ! "

" कां ? "

" तें कारण निर्भिडपणानं मला कसं सांगतां येईल आपल्याला ? पित्यासमोर बोलतांना विनयपालनाचा सर्वसाधारण निर्बंध मोडला न जाण्याची दक्षता पुत्राला घ्यावी लागते बाबा ! "

" जें बोलण्याची तुमच्या मनाला इतकी भीड वाटते असं कोणतं कारण असावं बुवा ? " साश्चर्य कुतूहलानें श्रीपतराव म्हणाले. आपल्या प्रेमसंबंधांत आपल्या पित्याकडून अधिक चिकित्सा न होतां आपल्या इच्छेप्रमाणें आपल्या विवाहास तात्काळ संमति मिळेल अशी मि. मुतालिक यांची प्रथम अपेक्षा होती. परंतु सदरहू बाबतींत जेव्हां श्रीपतरावांनीं त्यांना खोदून खोदून विचारण्यास सुरुवात केली तेव्हां त्यांचा मूळचा भ्रम पार दूर झाला. वडिलांस त्यांच्या चिकित्साखोर स्वभावामुळें सर्व वस्तुस्थिति कळविल्याशिवाय आतां गत्यंतर राहिलें नाहीं अशी त्यांची खात्री झाली. पूर्ण अगतिक होऊन ते म्हणाले, " आमच्या उभयतांच्या सांप्रतच्या प्रेमास लौकिकदृष्ट्या दांपत्यप्रेमाचं स्वरूप जितक्या लवकर मिळेल तितकं तें आम्हां उभयतांस सुखावह होणार आहे बाबा ! "

" म्हणजे ! आम्ही नाहीं समजलों तुमच्या म्हणण्याचा अर्थ काय तो ? आमच्यापुढं एकामागून एकएक आश्चर्य निर्माण करून आज आम्हांला वेड लावण्याचा विचार दिसतो आहे बापूसाहेब तुमचा ! " पुन्हां आश्चर्याचा एक झटका येऊन श्रीपतराव उद्गारले.

" आपल्याला आतां अधिक बुचकळ्यांत न टाकतां मला स्पष्टपणानं जेवढं सांगतां येण्यासारखं आहे तेवढं मी आपल्याला सांगतोंच. बाबा, आमचा होणारा विवाह हा सहवासोत्तर आहे ! " अंगांत उसनें धैर्य आणून मि. मुतालिक यांनीं शेवटचें वाक्य कसेंबसें उच्चारलें व एकदम ते गप्प राहिले. पुढें कांहींतरी बोलण्याचा त्यांचा विचार होता; पण कसल्या तरी आंतरिक अस्थिरतेमुळें तें बोलून दाखविण्याचा त्यांना धीर झाला नाहीं.

" कबूल ! तरीहि पण तुमच्या सहवासजन्य प्रेमाला कालहरणाची भीति कां वाटावी ? " आणि ते एकदम थांबले व रोखून मि. मुतालिकांकडे पाहात राहिले. मुद्रेवर वरकरणी शक्य तितका शांतपणा धारण करून व अंगीं प्रसंगप्राप्त अवसान आणून मि. मुतालिक म्हणाले, " आमच्या प्रेमानं नैतिक निर्बंधाची रूढिसंमत विवाहपूर्व मर्यादा ओलांडली आहे म्हणून ! बाबा, आतां यापुढं आपण, मला अधिक छेडूं नये अशी माझी आपणांस नम्र विनंति आहे ! सदरहू बाबतींत आतां अधिक कांहीं मला

सांगतां यावयाचं नाहीं ! "

" आम्हांलाहि आतां यासंबंधीं अधिक माहिती समजून घेण्याची जरूरी वाटत नाहीं. सर्व कांहीं आम्ही समजलों आहोंत. दोन भावनाप्रवण तरुणतरुणी योगायोगानं एका ठिकाणीं आल्यावर दोघांना एकमेकांच्या गुणांचं आकर्षण वाटणं, त्यांच्यांत परस्परांविषयीं नितांत आदरभाव निर्माण होणं, चिरपरिचयानं पुढं तो आदरभाव परस्परांवरील प्रेमांत परिणत होणं या घटना अगदीं स्वाभाविक आहेत. परस्परांच्या गुणांवर प्रामुख्यानं अधिष्ठित झालेलं असलं प्रेम विशुद्ध, संयमशील व विवेकप्रधान असतें. असलं प्रेम म्हणजे तरुण स्त्री-पुरुषांचा स्वैराचारी, बेजबाबदार प्रणय नव्हे. विशुद्ध प्रेम स्वैराचाराला कधींच प्रवृत्त करीत नाहीं. त्याचा विषय झालेल्या प्रेमिकांना तें उल्हसित करतें; उच्छृंखल करीत नाहीं. त्याचा आस्वाद उत्तेजक असतो; पण उन्मादक असत नाहीं. तें प्रेमिकांची सद-सद्विवेकबुद्धि जागृत ठेवतें व त्यांच्या आचारविचारांचा कसल्याहि मोहाच्या प्रसंगीं तोल सुटूं देत नाहीं. अशा दिव्य प्रेमानें मंडित झालेले दोन प्रेमी जीव पुढं विवाहबंधनानं एक झाल्यावर आपल्या आदर्श प्रेमानं, सद्गुणसौरभानं व निष्कलंक चारित्र्यानं आमरण एकमेकांची कीर्ति वाढविण्यास कारणीभूत होऊन लोकांच्या प्रशंसेचा व कौतुकाचा विषय होऊन बसतात. पण केवळ इंद्रियभोगाच्या लालसेनेंच जे तरुण स्त्री-पुरुष एकमेकांकडं आकर्षिले जातात त्यांच्या प्रेमाचं स्वरूप अगदीं याच्या उलट असतें. तें स्वार्थी, स्वैराचारी व विवेकभ्रष्ट असतें. विशुद्ध प्रेमांतील उत्कटता व त्याग अशा प्रेमांत नसतो. अशा प्रेमानं कलंकित झालेलीं तरुण तरुणी त्यांच्या उन्मादावस्थेंत प्रथम प्रथम एकमेकांवर निस्सीम प्रेम करीत असलेलीं दिसतात. परंतु कालांतरानं त्यांच्या त्या नकली प्रेमावरचा वरपांगीं खऱ्या प्रेमासारखाच भासणारा मुलामा उडून जाऊन त्याचं उघडं नागडं हिडिस स्वरूप प्रत्ययास येऊन तें लोकांच्या उपहासास व निंदेस पात्र होतें. नानाविध भडक रंगांनीं चित्रित केलेल्या लांकडी बाहुल्या जगाच्या बाजारांत आपण प्रत्यहीं पाहातों. नवेपणामुळं प्रथम प्रथम त्या मनोवेधक दिसतात. कालचक्राच्या घर्षणानं त्यांचा बेगडी रंग थोड्याच दिवसांत निघून जाऊन त्यांचं मूळचं ओबडधोबड रूप नजरेस पडतांच

त्या नेत्रपीडनाचा विषय होतात. नकली प्रेमाची अगदीं अशीच अवस्था होते. प्रेम हें परमेश्वरस्वरूप आहे असं म्हणतात. पण आमच्या दृष्टीनं प्रेमाचं हें एकच स्वरूप नसून त्याला सैतानाचंहि दुसरं स्वरूप आहे. आणि हें दुसरं स्वरूप अत्यंत मायावी व फसवें असतें. म्हणून प्रेमाकडं पाहतांना पाहणारानं आपली दृष्टि दिव्य प्रेमज्योतीनं पाजळून त्याचं परमेश्वरस्वरूप नीट पारखून घेतलं तर त्यांचा संसार खरोखर प्रेममय व सुखमय होऊं शकेल. बापूसाहेब दुर्दैवानं लहानपणींच तुम्हांला तुमच्या मातेच्या निर्व्याज प्रेमाला आंचवावं लागलं. त्या प्रेमाचा तसल्याच पत्नीप्रेमाच्या रूपानं तुम्हांला आयुष्यभर मनमुराद उपभोग घेतां येऊन तुमचं संसारी जीवन पूर्ण सुखमय व्हावं अशी तुमच्या या प्रेमळ पित्याची इच्छा आहे. म्हणून हा विवाह घडून येण्यापूर्वीं तुम्ही त्याचा पूर्ण विचार करावा अशी आमची तुम्हांला कळकळीची सूचना आहे!"

"पूर्ण विचार करूनच मी हा माझ्या विवाहाचा बेत निश्चित केला आहे!"

"तुम्ही केलेली तुमच्या सहधर्मचारिणीची निवड अयोग्य आहे अशी आमची ठाम समजूत आहे!"

"परस्परांच्या गुणावगुणांचा विचार करूनच आम्ही दोघांनीं एकमेकांना पसंत केलेलं असल्यामुळं माझी निवड चुकीची आहे असं मला वाटत नाहीं!"

"नादान प्रेमाच्या उन्मादावस्थेंत असलेल्या अविवेकी तरुण स्त्री-पुरुषांच्या विकारवश दृष्टीला गुणावगुण पारखण्याची शुद्ध राहात नसते!"

"परस्परांच्या प्रेमाशीं पूर्ण एकनिष्ठ राहून सावधान, जागरूक दृष्टीनंच आम्ही एकमेकांची पतिपत्नी म्हणून निवड केली आहे; आमच्या एकनिष्ठ प्रेमाला नादान, अविवेकी कसं म्हणतां येईल?"

"तुमच्या दृष्टीला तुमचं प्रेम एकनिष्ठपणाचं दिसत आहे हाच मुळीं तुमच्या दृष्टीला झालेला विकार आहे. एकनिष्ठ प्रेम हें मोहातीत असतें. पराकाष्ठेची संयमशीलता हें त्याचं प्रमुख लक्षण आहे. अनिवार मोहाच्या प्रसंगींहि जें उच्छृंखल बनत नाहीं, विवेक सोडीत नाहीं, कुमार्गाकडं वळत नाहीं व आपली एकनिष्ठता ढळूं देत नाहीं तेंच खरें पवित्र, निष्ठावंत प्रेम!"

" हीं लक्षणें आमच्या प्रेमाला लागूं पडत नाहींत असं आपल्याला वाटतं काय बाबा ? "

" होय ! "

" कां ? "

" एकनिष्ठ प्रेमाची आत्यंतिक पावित्र्यनिष्ठा तुमच्या प्रेमांत नाहीं म्हणून ! परस्परांवर अनुरक्त झालेल्या तरुण स्त्रीपुरुषांच्या प्रेमाला नैतिक आचरणाची आपल्या धर्मशास्त्रानं घालून दिलेली विवाहपूर्व मर्यादा उल्लंघन करण्याची मुभा दिलेली नाहीं. अविचारी बनून तुमच्या प्रेमानं ती बिनदिक्कत उल्लंघन करून धर्मसंमत आचारविचारांची व रूढ नीतितत्त्वांची पायमल्ली केली आहे. यौवनसुलभ मनोविकारांच्या भडकल्या भट्टींतून खंबीर नीतिधैर्यानं आपलं पावित्र्य उज्ज्वल राखून तुमचं प्रेम जर तावून सुलाखून बाहेर पडलं असतं तर त्याला दिव्यता आली असती; व अशा दिव्य प्रेमावर अधिष्ठित झालेल्या तुमच्या विवाहाला आम्ही सानंद, सकौतुक संमति दिली असती. परंतु अनैतिक संबंधानं दूषित झाल्यामुळं तुमच्या प्रेमाला निव्वळ व्यभिचाराचं स्वरूप आलेलं आहे. धर्माची आज्ञा मोडून, नीतीची पायमल्ली करून व रूढिप्रणीत चालीरीतींना तुच्छ लेखून जें तुमचं प्रेम रतिसुखाच्या क्षणैक मोहाला बळी पडून निंद्याचरणास बेधडक प्रवृत्त झालं तें भावी आयुष्यांतील अनेक मोहाच्या प्रसंगींहि स्वैराचारी होणार नाहीं कशावरून ? निंद्याचरणाची एकदां संवय झालेल्या मनाला पापपुण्याचा पुढं बिलकूल विधिनिषेध वाटेनासा होतो ! "

" पण पतिपत्नी म्हणून आम्ही परस्परांशीं वचनबद्ध झाल्यानंतर दुर्दम्य मनोविकारांच्या आहारीं जाऊन मनावरील विवेकाची पकड सुटल्यामुळं जर आमच्याकडून रूढाचाराविरुद्ध चुकून एखादा अतिप्रसंग घडला तर तेवढ्यावरून आमच्या प्रेमास व्यभिचाराचं हीन स्वरूप कां यावं ? आमची अंतःकरणं एकमेकांशीं पूर्ण प्रामाणिक असून पुढंहि आजन्म तीं तशींच राहणार आहेत ! "

" तरीसुद्धां जें कृत्य धार्मिक विवाहसंस्कारानंतर नीतिदृष्ट्या कायदेशीर ठरलं असतं तें त्या संस्काराच्या अभावीं धर्मशास्त्राच्या दृष्टीनं अनीतीचं व पापमूलकच ठरणार आहे. नीतीच्या मार्गानं जाणाऱ्या वधूवरांना

त्यांच्या भावी संसारांत चारी पुरुषार्थांचा लाभ करून देणारा व सर्व संस्कारांत अत्यंत पवित्र मानला गेलेला असा जो विवाहसंस्कार त्या संस्कारानं पवित्र झालेल्या विवाहाचं मांगल्य, स्वैराचारी प्रेमानं पूर्वदूषित झालेल्या तुमच्या या विवाहास कदापि येणार नाहीं. अशा विवाहास जर आम्हीं संमति देऊं तर आपल्या उच्च व कुलीन घराण्याच्या प्रतिष्ठेस, अब्रूस व नांवलौकिकास हीनत्वाचा कायमचा कलंक लागल्याशिवाय राहणार नाहीं. समाजाच्या उपहासास व निंदेस आपण पात्र होऊं. म्हणून बापूसाहेब, विचार करा आणि या लग्नाचा नाद अजिबात सोडून द्या ! ”

“ बाबा, काय सांगतां आपण मला हें ! माझ्या प्रेमावर विश्वास ठेवून निस्सीम प्रेमानं मला आपलं सर्वस्व अर्पण करणाऱ्या एका विश्रब्ध, प्रेमळ अश्राप कुमारिकेचा विश्वासघात करून तिच्या जन्माचा सत्यानाश करूं मी ? समाजाच्या दृष्टीनं निंद्य ठरणाऱ्या आमच्या या विवाहानं आम्ही पतित, स्वैराचारी ठरूं; पण माझ्या या अधम कृत्यानं संभावित घराण्यांतील एका सुशिक्षित कुमारिकेला या निर्दय समाजांत बाजारबसवींच्या पंक्तीला जाऊन बसावं लागेल ! ”

“ पण तोच समाज तुमच्या या बेलगामी कृत्याबद्दल आपल्या उच्च घराण्याच्या कुलशीलाचे, प्रतिष्ठेचे, अब्रूचे, नांवलौकिकाचे निर्दयपणानं वाभाडे काढल्याशिवाय राहणार नाहीं. आपल्या वैभवाचा मत्सर करणारे आपले भाऊबंद या घटनेचा फायदा घेऊन आपल्यावर ग्रामण्याचें शस्त्र उचलतील; व खुनशीपणानं आपली बेअब्रू चोहोंकडे प्रसृत करतील. अशा तऱ्हेनं आपल्या घराण्याचं नांव एकदां बदनाम झाल्यावर त्याचीं कटु फळें तुम्हांलाच फक्त तुमच्या हयातींत भोगावीं लागणार नसून तुमच्या भावी पिढीलाहि तीं भोवल्याशिवाय राहणार नाहींत. आपलं थोर कुलीन घराणं समाजांतील हीन पायरीस कायमचं जाऊन बसेल; कुलीन घराण्यांतील कोणीहि संभावित मनुष्य आपल्या घराण्याशीं रोटीबेटी व्यवहार करण्यास धजणार नाहीं. तुमच्या बेजबाबदार दुष्कृत्याचे परिणाम अशा तऱ्हेनं दूरगामी होणार आहेत. आपल्या घराण्याची दुष्कीर्ति यापेक्षां अधिक ती कशानं होणार ? ”

“ बाबा, घराण्याच्या दुःस्थितीचं आपल्या कल्पनेनं रंगविलेलं हें

भविष्यकालीन भेसूर चित्र, माझ्या या विश्वासघातकी अधम कृत्यानं एका निष्पाप कुमारिकेच्या अब्रूचे निघणारे धिंडवडे व तिच्यावर ओढवल्या जाणाऱ्या आपत्ती यांपेक्षां खचित अधिक भेसूर असणार नाहीं. परस्परांवर निस्सीम, निर्व्याज प्रेम करणाऱ्या स्त्रीपुरुषांच्या हातून विशिष्ट परिस्थितींत समाजाच्या दृष्टीनं निंद्य ठरणारं एखादं कृत्य चुकून घडलं तर तेवढ्यावरून त्यांनीं धर्माचे, नीतीचे, रूढींचे निर्बंध मोडल्याच्या नांवाखालीं अनुदार दृष्टीनं समाजाकडून जर निर्दयपणानं त्यांचा छळ होणार असेल व त्यांत एका अश्राप कुमारिकेच्या अब्रूची नाहक राखरांगोळी होणार असेल तर मानवी आकांक्षा खुरटविणाऱ्या असल्या अनुदार धर्मबंधनांची पर्वा करण्यापेक्षां स्त्रीजातीच्या अब्रूची प्रतिष्ठा राखणं मला अधिक मोलाचं वाटेल बाबा !"

मि. मुतालिक यांच्या भाषणांत बेदरकार निर्भीडपणाचा नाद खणखणत होता. रूढिगत धार्मिक बंधनांविषयीं त्यांना आलेली मनस्वी चीड त्यांच्या भाषणांतील शब्दाशब्दांतून निनादून व्यक्त होत होती. श्रीपतरावांना हें भाषण अगदींच अनपेक्षित वाटलें असावें, कारण मि. मुतालिक यांचें भाषण संपलें तरी घटकाभर त्यांच्या तोंडाकडे आश्चर्ययुक्त मुद्रेनें ते पाहातच राहिले. पितापुत्रांचें इतका वेळ चाललेलें संभाषण मी आडून ऐकत होतें.

आमच्या विवाहाच्या कामीं श्रीपतरावांनीं घेतलेले आक्षेप व निर्माण केलेलीं काल्पनिक संकटें पाहून माझी सर्वस्वीं निराशा झाली होती. भावी आयुष्यांत मला चोहोंकडे अंधार—भयाण अंधार दिसूं लागला होता. पण मि. मुतालिक यांचे वरील भाषण ऐकून व त्यांत आमच्या प्रेमाच्या निस्सीमपणाबद्दलचा त्यांनीं दिलेला निर्वाळा पाहून तसल्याहि निराशामय स्थितींत मला आशेचा अंधुकसा प्रकाश दिसूं लागला. माझ्या प्रियकराचा मला अथांग अभिमान वाटूं लागला. त्यांच्यावरून आपले पंचप्राण ओवाळून टाकण्यास माझें मन अधीर झालें. थोड्या वेळानें मुद्रेवर किंचित् तिरस्काराचा भाव दर्शवीत श्रीपतराव म्हणाले, "पाश्चात्य चालीरीतींच्या अंधानुकरणानं आपल्या परंपरागत चालीरीतींची अवहेलना करणाऱ्या तुमच्यासारख्या ज्ञानलवदुर्विदग्धांना आपल्या आर्यसंस्कृतीची व धर्मशास्त्राची मातब्बरी काय वाटणार ! पण हा अप्रिय विषय आतां अधिक वाढविण्याची आमची इच्छा नाहीं. बापूसाहेब, आतां तुम्हांला एकच

सांगतों, घराण्याच्या इभ्रतीचा व तुमच्या भावी कल्याणाचा दूरदृष्टीनं विचार करतां आम्हांला तुमच्या या विवाहास संमति देतां येत नाहीं. प्रेमाचं तुमच्या डोक्यांतील हें वेड काढून टाका ! ”

“ हें नुसतं वेडच असतं आणि तें फक्त डोक्यांतच राहिलं असतं तर बाबा, आपल्या एका शब्दाबरोबर मीं तें माझ्या डोक्यांतून पार काढून फेंकून दिलं असतं; पण माझं प्रेम ही एक क्षणिक लहर नसून माझ्या देहाची तें एक संजीवक शक्ति होऊन राहिलं आहे; व अंतःकरणांत खोल खोल अशा मर्मस्थानीं तें ठाण मांडून बसलं आहे. शुक्राचार्यांच्या अहंकारी अंतःकरणांत लपून बसलेल्या कचासारखं माझं प्रेम माझ्या अंतःकरणांत लपून बसलं आहे. अंतःकरणाचा भेद केल्याशिवाय तें आतां बाहेर निघणं शक्य नाहीं. माझा प्राण कुडी सोडून प्रथम बाहेर पडेल आणि नंतरच माझं प्रेम माझ्या अंतःकरणाचा त्याग करील ! ”

मि. मुतालिक यांचें भाषण अत्यंत भावनास्पर्शी व मनाचा दृढनिश्चय व्यक्त करणारें असेंच होतें. त्यांच्या भाषणांत प्रतीत झालेली माझ्याविषयींची प्रेमैकनिष्ठा पाहून मला अस्मान ठेंगणें वाटूं लागलें. हृदयांत प्रेमाचा गहिंवर इतका दाटून आला कीं, लौकिक भीड, मर्यादा चट्सारीं गुंडाळून ठेवून माझ्या प्राणवल्लभाच्या गळ्याला एकदम जाऊन प्रेमातिशयानें कडकडून मिठी मारावी अशी इच्छा मला अनावर होऊं लागली. पण मीं ती पराकाष्ठेच्या आत्मसंयमनानें दाबून टाकली. श्रीपतरावांच्या मनावरहि या भाषणाचा परिणाम झाल्यासारखें दिसून आलें. विचारमग्न स्थितींत ते कांहीं वेळ स्तब्ध राहिले. एकीकडे कुलाच्या प्रतिष्ठेचा कट्टर अभिमान व दुसरीकडे अपार पुत्रवात्सल्य, या दोन परस्परविरोधी जोरदार भावनांच्या भोंवऱ्यांत सांपडल्यामुळें त्यांच्या मनाची तिरपीट उडाल्यासारखी दिसली. उंच वातावरणांत डौलानें डोलणारा पतंग विरुद्ध दिशांकडून एकमेकांना जोरानें दाबणाऱ्या दोन सोसाट्याच्या वातप्रवाहांत सांपडला असतां ज्याप्रमाणें उलटसुलट गिरक्या घेऊं लागतो— आणि त्यायोगानें विवक्षित ठिकाणीं स्थिर होऊं शकत नाहीं, तशीच कांहींशी श्रीपतरावांच्या मनाची स्थिति झाल्यासारखी दिसली. एका विशिष्ट निर्णयाच्या भूमिकेवर स्थिर

होण्यास त्यांचें मन असमर्थ झालें असावें असें त्यांच्या मुद्रेवरील त्रासिकपणावरून व कपाळावरील आंठ्यांवरून स्पष्ट दिसत होतें. थोड्या वेळानें मानेला किंचित् झटकल्यासारखें करून कांहींशा त्रासिक स्वरांतच ते म्हणाले, " एकूण तुम्ही आपला हट्ट सोडायला तयार नाहीं तर! संसारांत पुत्राच्या विरोधाला तोंड देण्याचा अप्रिय प्रसंग पित्यावर यावा हें त्या पित्याचं दुर्दैवच म्हणायचं! पण अपत्यप्रेमामुळं तुमचा हा हट्ट पुरविण्यांत पित्याचं कर्तव्य बजावतांना कुलाच्या प्रतिष्ठेकडं आम्हांला डोळेझांक करून चालणार नाहीं. कुलपति या नात्यानं कुलाची अब्रू मलिन होऊं न देण्याची खबरदारी घेणं आमचं कर्तव्य आहे. बापूसाहेब, तुमचा हा हट्ट आम्ही एका अटीवर अगदीं नाइलाज म्हणून मान्य करण्यास तयार आहोंत. या प्रेमसंबंधामुळं तुमच्यावर येणारी वैवाहिक जबाबदारी सोडण्यास तुम्ही तयार असाल व लौकिकदृष्ट्या कुळाच्या प्रतिष्ठेच्या आड तुमचा हा प्रेमसंबंध येणार नसेल तर तुमच्या या प्रकरणांत आम्ही बिलकूल लक्ष घालणार नाहीं!"

" म्हणजे! आपल्या म्हणण्याचा अर्थ तरी काय बाबा?"

" अर्थ इतकाच कीं तुम्हां दोघांना पति-पत्नी या नात्यानं समाजांत राजरोसपणें नांदतां येणार नाहीं!" अगदीं निर्विकार, भावशून्य हृदयानें श्रीपतराव उद्गारले.

" तें कधींहि शक्य होणार नाहीं; सहधर्मचारिणी म्हणून जिचा मीं एकदां स्वीकार केला ती आजन्म माझ्या संसारी जीवनांत धर्मपत्नी या नात्यानंच माझ्या सर्वस्वावर सत्ता चालवील; व त्याच पवित्र नात्यानं ती समाजांत उजळ माथ्यानं मिरवील!"

मि. मुतालिक यांच्या मनाचा झालेला निश्चय त्यांच्या भाषणांतील शब्दाशब्दांत अवतीर्ण झाला होता. ज्या आपल्या पुत्राला आतांपर्यंत आपण अत्यंत मर्यादशील व आज्ञाधारक समजत आलों त्यानेंच पुत्रधर्म विसरून आपला यत्किंचित्‌हि मान न ठेवतां आपल्या सूचनेस खुशाल धुडकावून द्यावें आणि उलट आपल्या हातून घडलेल्या निंद्य वर्तनाचें समर्थन करण्यास धजावें याचा श्रीपतरावांना प्रथम फार विस्मय वाटला व नंतर रागहि आला. त्याच भरांत ते म्हणाले, " आर्यसंस्कृतीला लाथाडून आपल्या

शीलाला कवडीमोल समजणाऱ्या व विवाहाच्या पूर्वी कुमारिकेचं पावित्र्य प्राणाच्या मोलानं जतन करण्याची कुलकन्येची जबाबदारी विसरून स्वैर-पणानं प्रेमाचा हुतूतू घालणाऱ्या एका बेजबाबदार स्वैराचारिणी तरुणीला आमच्या घरांत कुलवधूचा मान मिळालेला आमच्या हयातींत आम्हांला पाहवणार नाहीं. सच्छील ही अशी कांहीं एखादी चैनीची चीज नाहीं कीं जी शोभेखातर घटकाभर धारण करावी व कंटाळा येतांच ती खुशाल टाकून द्यावी. मानवजातीवर खुष होऊन परमेश्वरानं तिला आपला दिव्यांश शीलाच्या रूपानं बहाल केला आहे. कसल्याहि मोहाच्या प्रसंगीं त्याचं पावित्र्य अबाधित राखणं अर्थात् प्रत्येक मानवाचं आद्य कर्तव्य आहे. विशेषत: आर्य स्त्रियांची थोरवी याच गुणामुळं चारी खंडांत गाजलेली आहे. शील हें आर्य अबलेच्या प्रबलतेचं सुदर्शन आहे. किंबहुना सहस्ररश्मीची तेजस्वी दाहकता व चंद्राची आल्हादकारक शीतलता यांच्या मधुर संमि-श्रणानं विधात्यानं आर्य स्त्रीचं शील घडवलं आहे. अशा आदर्श शीलगुणानं मंडित झालेली आर्यकन्याच मुतालिक घराण्यासारख्या संस्कृतिसंपन्न घराण्यांतील कुलवधूच्या मानास पात्र होईल ! बापूसाहेब, तें पाहा तुमच्या मातेचं छायाचित्र ! आपल्या आदर्श गृहिणीच्या दुर्लभगुणसमुच्चयानं व निष्कलंक चारित्र्यानं जिनं आपल्या हयातींत आमचा संसार धन्य धन्य केला, व चिरवियोग होऊन पंधरा वर्षें झालीं तरी जिच्या गुणांची मोहिनी आजहि आम्हांस वेडें करून सोडीत आहे ती ही तुमची सद्गुणशालिनी माता आपल्या छायाचित्राच्या रूपानं मुतालिक घराण्याच्या वास्तूचं मांगल्य निरंतर वाढवीत आहे. आर्यगृहिणीच्या मुखावर ओसंडणारं पावित्र्याचं तेज कसं प्रभावी असतं याची साक्ष तुम्हांला हें निर्जीव चित्रसुद्धां पटवील ! त्याच्या पलीकडं आमच्या पुण्यशील मातु:श्रीचं—तुमच्या आजीचं छायाचित्र आहे. मुतालिक घराण्याची अधोगतीला जात चाललेली प्रतिष्ठा या देवतेच्या कर्तबगारीनं कशी सांवरली गेली या संबंधींची हकीकत तुम्ही कदाचित् ऐकली नसेल म्हणून सांगतों. आमचे तीर्थरूप २०-२२ वर्षांच्या वयाचे असतांना उनाड, व्यसनी सोबत्यांच्या नादानं त्यांना बाहेरख्यालीपणाचं व अपेयपानाचं व्यसन जडलं. त्या व्यसनापायीं त्यांनीं इस्टेटीची धूळदाण करण्यास सुरुवात केली. संसारांत ते बिलकूल लक्ष घालीनासे झाले,

मदिरेच्या धुंदींत वेश्येच्या घरीं ते रात्रंदिवस पडून राहूं लागले. त्यांच्या त्या स्वैर वर्तनाबद्दल गांवांत जिकडे तिकडे चर्चा होऊं लागली. कुलवान घराण्यांतील हा दिवटा पोर आपल्या कुळाला बट्टा लावणार व इस्टेटीचं वाटोळं करणार असं गांवांत जो तो म्हणूं लागला; व मुलाच्या गैरवर्तणुकीबद्दल आमच्या आजोबाला दोष देऊं लागला. तशांतच आमच्या तीर्थरूपांचा त्यावेळीं विवाह झालेला असल्यामुळं त्यांच्या संसाराबद्दलची आमच्या आजोबांना अहर्निश चिंता लागून राहिली. एकुलता एक मुलगा व तोहि असा व्यसनी निघाल्यानं आपल्या वैभवसंपन्न घराण्याची काय गत होणार या चिंतेनं त्यावेळीं आमच्या आजोबांची काय अवस्था झाली असेल ह्याची कल्पनासुद्धां आज मनाला दु:सह वाटते. अशा आणीबाणीच्या प्रसंगीं आमच्या या मातोश्रींनीं-मुतालिक घराण्याच्या या देवतेनं—आपल्या पुण्यप्रभावानं निष्कलंक चारित्र्यानं, विलोभनीय गुणसौंदर्यानं व अमृततुल्य रसवंतीनं आमच्या तीर्थरूपांना इतकं भारून टाकलं कीं त्या ब्रह्मानंदांत ते आपलीं व्यसनें हळूहळू पार विसरून गेले. त्यांच्या वर्तनांत घडून आलेलं हें विलक्षण परिवर्तन पाहून व्यसनांत आकंठ बुडून गेलेल्या माणसाला व्यसनांचा एकाएकीं इतका वीट कसा आला याचा लोकांना मोठा अचंबा वाटला. आमच्या आजोबांना आपला वठलेला जीवनपुष्पतरु आशापुष्पांनीं पुन्हां भरगच्च फुलल्यासारखा वाटूं लागला. हा चमत्कार आमच्या पुण्यशील मातुश्रींच्या सद्‌गुणसंजीवनीनं घडून आला असल्यामुळं आमचे आजोबा आमच्या मातुश्रींस मुतालिक घराण्याची साक्षात् कुलदेवता म्हणून मानीत असत व आपलं वय, नातं विसरून अत्यंत आदरभावनेनं ते त्यांना मान देत असत. बापूसाहेब, मुतालिक घराण्यांतील कुलवधूंची परंपरा ही अशी आहे. उन्मार्गगामी पुरुषाला पुरुषोत्तम बनविण्यासाठीं स्त्रीजातीचा अवतार आहे. केवळ कामतृप्तीचं एकमेव साधन एवढंच तिचं जीवितकार्य नाहीं. म्हणून मुतालिक घराण्यांतील अशा गृहदेवतांच्या पंक्तीला बसण्याचा मान तुमच्या त्या नटव्या बाहुलीला आम्ही कदापि देणार नाहीं. बापूसाहेब, हा अप्रिय विषय आतां अधिक लांबविण्याची आमची इच्छा नाहीं. आतां एकदांच तुम्हांला निक्षून बजावतों कीं, शांत मनानं तुम्ही या गोष्टीचा पुन्हां एकवार नीट विचार करा. त्यासाठीं तुम्हांला दोन दिवसांचा अवधि देतों. त्या

अवधींत इथं न राहतां आम्ही आपल्या कुळांच्या गांवीं जाण्यासाठीं आतांच निघणार आहोंत ! दोन दिवसांनीं परत आल्यानंतर जर तुमचा हा हेका असाच कायम राहील तर मुतालिक घराण्याची सारी इस्टेट बेवारस समजून आम्ही ती खुशाल एखाद्या धार्मिक संस्थेस अर्पण करूं व सर्वसंगपरित्याग करून दूर कुठं तरी तीर्थयात्रेस निघून जाऊं; पण आमच्या प्रतिष्ठित घराण्याची अब्रू अशा तऱ्हेनं मलिन होऊं देणार नाहीं ! जातों आम्ही ! " आणि एवढें बोलून खरोखरीच ते जमदग्नीचे अवतार श्रीपतराव बसल्या जागेवरून एकदम ताडकन् उठले. संतापानें त्यांचा चेहरा लालबुंद झाला होता. त्राग्यानें त्यांचें सर्वांग थरथर कांपत होतें. तशा स्थितींत एखादी पिशाच्च-बाधा झाल्याप्रमाणें ते झपाट्यानें त्या दिवाणखान्यांत इकडून तिकडे थोडा वेळ येरझारा घालूं लागले; व नंतर गाडी जोडण्यास गड्याला ओरडून सांगून भर दोनप्रहरच्या उन्हाच्या वेळेस उपाशीच ते आपल्या वाड्याच्या बाहेर चालते झाले.

* * *

पिता-पुत्रांच्या दरम्यान झालेला संवाद मीं समग्र ऐकलेला असल्यामुळें त्याचा अशाप्रकारें शेवट झालेला पाहून माझ्या मनाची स्थिति त्यावेळीं किती शोचनीय झाली होती त्याचें यथातथ्य वर्णन करण्यास मी असमर्थ आहें. मस्तकावर एकाएकीं एखादा जबरदस्त प्रहार झाला असतां मनुष्याची जशी मूर्च्छित अवस्था होते, अगदीं तशीच अवस्था त्या अनपेक्षित प्रसंगानें माझी होऊन माझ्या शरीराचे सर्व व्यापार संज्ञा-विहीन झाल्यासारखे मला वाटूं लागले. श्रीपतरावांनीं आमच्या प्रेमाची संभावना आणखी काय करायची ठेवली होती ? 'बेजबाबदार ! स्वैरा-चारिणी ! नटवी बाहुली !' मला उद्देशून हे शब्द उच्चारण्यांत आणखी कोणतीं दूषणें त्यांनीं मला देण्याचें शिल्लक ठेवलें होतें ? आर्य स्त्रीच्या स्त्रीपणाची विटंबना यापेक्षां आणखी दुसरी ती कोणती असायची ? त्या शब्दांनीं माझ्या मनाला झालेल्या सहस्रावधि जखमांच्या वेदना असह्य होऊन मला जीव नकोसा वाटूं लागला. मरण प्रिय वाटण्यासारखें जोंपर्यंत मनाला दुःख असह्य झालेलें नसतें तोंपर्यंतच जगण्यांत स्वारस्य असतें. जगण्यासारखें माझ्या जीवनांत आतां काय राहिलें होतें ? श्रीपतरावांच्या

कोधाग्नींत जीवनांतील माझ्या सर्व आशा, आकांक्षा, मनोरथ यांची एका-मागून एक आहुति पडून तीं भस्म झाल्यानंतर माझ्या अश्रूंची ही शेवटची आहुति त्यांत पडली; व माझ्या डोळ्यांदेखत तिची राख झालेली मीं पाहिली. रागानें घराबाहेर पडण्यापूर्वी श्रीपतरावांनीं माझा प्राण कां घेतला नाहीं याबद्दल त्यांचा त्यावेळीं मला मनस्वी संताप आला.

श्रीपतरावांनीं आमच्या प्रेमसंबंधाचा धिःकार करून आमच्या विवाहास संमति देण्याचें नाकारलें यांत वास्तविक त्यांचा काय दोष होता? समाजांत प्रचलित असलेल्या रूढीच्या परंपरागत चालीरीतींस अनुसरून आमचा प्रेमसंबंध अनैतिक स्वरूपाचा वाटल्यामुळें अशा प्रेमसंबंधावर अधिष्ठित झालेल्या आमच्या विवाहास संमति देऊन रूढीच्या विरुद्ध जाण्याचें धैर्य त्यांनीं दाखविलें नाहीं यांत त्यांच्याकडून गैर तें काय झालें? पिढ्यान् पिढ्या रूढीच्या दृढ संस्काराखालीं दडपून गेलेल्या सनातनी मनाला बंडखोर बनून रूढीवर आघात करण्याचें धाडस करतां येणें शक्यच नव्हतें. श्रीपत-रावांच्या ठिकाणीं माझे आईबाप असते तर त्यांनीं तरी काय केलें असतें? त्यांनींहि आमच्या प्रेमसंबंधाला स्वैराचरण हेंच नांव दिलें असतें. मग श्रीपतरावांनाच त्याजबद्दल व्यर्थ दोष देण्यांत काय हंशील होतें? वर्षानुवर्षें आपल्या जुलमी नियंत्रणाखालीं समाजाला दडपून त्याला सर्वस्वीं गुलाम बनविणारा व आचारविचारांच्या स्वातंत्र्याची त्याला बिलकूल मुभा न ठेवणारा तो रूढीचा राक्षसच आमचा प्रेमसंबंध अशा तऱ्हेनें दुःखपर्यव-सायी होण्यास कारणीभूत झाला. धर्मशास्त्राच्या नांवाखालीं रूढीनें लाद-लेल्या जुलमी चालीरीतींचें नसतें स्तोम माजविणाऱ्या व खऱ्या धर्मतत्त्वां-कडे दृष्टि विशाल करून पाहण्याची संवय नसल्यामुळें एखाद्या रूढीविरुद्ध वाटणाऱ्या कृत्याचा निवाडा करतांना रूढिप्रणीत चालीरीतींच्या आधारानें आपलीं निर्णयाचीं पावलें टाकणाऱ्या लुळ्यापांगळ्या व स्वतंत्र बुद्धि आणि सारासार विचारशक्ति यांच्या अभावीं प्रगति खुंटल्यामुळें खुरटलेल्या अशा दास्यशील समाजाला आमचा प्रेमसंबंध विशुद्ध वाटणें शक्यच नव्हतें. भावना, प्रेम, आचार, विचार, मतें याबाबतींत परस्परांना विरोधी व वयानें, गुणानें, रूपानें एकमेकांशीं विसंगत अशा जोडप्यांना केवळ रूढि-संमत चालीरीतींचा त्यांनीं अवलंब केला एवढ्याच सबबीवरून समाजांत

पतिपत्नी म्हणून मिरवण्याचा समाजाकडून राजरोस परवाना मिळतो; पण उपर्युक्त सर्व गुणांनीं एकमेकांस पूर्ण अनुरूप असलेल्या एखाद्या आदर्श प्रणयी जोडप्याकडून विवाहाच्या पूर्वीं जर एखाद्या वेळेस भावनेच्या भरांत चुकून एखाद्या रूढीच्या निर्बंधाकडे दुर्लक्ष होऊन त्यांचा प्रेमसंबंध घडून आला तर तेवढ्यावरून त्यांच्या विशुद्ध प्रेमास स्वैराचाराचें स्वरूप येऊन रूढीच्या दृष्टीनें निषिद्ध ठरलेल्या त्यांच्या प्रेमसंबंधास विवाहाचा मार्ग राजरोसपणें चोखाळण्याची चोरी होते; आणि त्यामुळें अशा जोडप्यावर समाजांतून तोंड काळें करून निघून जाण्याचा व कोठें तरी चोरटें लाजिर-वाणें जीवन कंठण्याचा दुर्धर प्रसंग ओढवतो! हरहर! काय हा जुल्म! यापेक्षां अधिक भयंकर जुल्म दुसरा कोणता असेल का? आपल्या जुलमी चालीरीतींच्या सुरुंगानें आजपर्यंत समाजानें अशी कितीतरी प्रेमी जीवांच्या भावी संसारांचीं कल्पनेनें उभारलेलीं रम्य मंदिरें उडवून निराशेच्या खोल गर्तेत कायमचीं गाडलीं असतील; कितीतरी भावनाप्रधान हृदयांच्या साऱ्या आशा-आकांक्षांची राखरांगोळी केली असेल; व एकमेकांवर अनुरक्त होऊन संसारांत पडूं इच्छिणाऱ्या कितीतरी तरुण जोडप्यांना नाइलाज होऊन वैतागानें धर्मांतर करण्यास भाग पाडलें असेल! रूढीवरील फाजील अंधश्रद्धेनें सुविचारविन्मुख व परप्रत्ययनेयबुद्धि बनलेल्या समाजा, रूढीचें हें जुलमी प्राबल्य तूं असें किती काल सहन करीत राहणार? रूढीच्या अन्यायमूलक निर्बंधांनीं नाडलेल्या अश्राप प्रेमी जीवांचे शिव्याशाप ऐकून ऐकून तुला आपल्या अन्यायाची खंत कधीं वाटणार? व तुझ्या जुलमी बंधनांना कंटाळलेले कित्येक जीव नाइलाजानें परधर्मांत जाऊं लागल्यामुळें तुझी शक्ति क्षीण होत चाललेली पाहून भावी कालांत परधर्मीयांकडून तुझ्यावर होणाऱ्या संभाव्य हल्ल्यांना तोंड देण्यास तूं बलिष्ठ कसा राहणार? विचारांनीं माझें डोकें भडकून गेलें. अंगाची लाही लाही झाली. भावी परिस्थितीचें भयाण भेसूर भूत मला नजरेपुढें दिसूं लागलें. भीतीनें माझी गाळण उडून मीं आपले डोळे गच्च मिटून घेतले व निश्चल स्थितींत आपल्या बैठकीच्या खोलींत भिंतीला टेकून कितीतरी वेळ बसून राहिलें. जेवणाची वेळ होऊन गेल्यामुळें नोकर जेवणाचें ताट माझ्या खोलींत केव्हां ठेवून गेला तें मला समजलेंहि नाहीं. बऱ्याच वेळानें मीं डोळे उघडले. समोर

जेवणाचें ताट होतें. त्यांतील अन्न सुग्रास होतें; पण तें माझ्या रक्तबंबाळ झालेल्या प्रेमाच्या रुधिरस्रावानें माखलेलें मला दिसलें. तें मला कसें गोड लागणार ? खोलीच्या दाराबाहेर ताट तसेंच सारून देऊन मीं दार लावून घेतलें.

त्या दिवशीं त्या घडलेल्या प्रसंगानंतर संध्याकाळपर्यंत मि. मुतालिक कोठें होते तें मला समजलें नाहीं. त्या अनपेक्षित घटनेमुळें वाड्यांतील नोकरचाकरांसुद्धां सारी मंडळी एकदम आश्चर्यचकित होऊन ठिकठिकाणीं जमून आपसांत कांहींतरी कुजबुजूं लागली. थोड्या वेळापूर्वीं आनंदानें गजबजून गेलेल्या वाड्यांत आतां भयाण शांतता पसरली. प्रत्येकजण बावरून जाऊन आपल्या ठराविक कामाकडे लक्ष न देतां विमनस्कपणें उगाच इकडे तिकडे हिंडून वेळ काढूं लागला. मीं वाड्यांत पाऊल ठेवल्यापासून आतां-पर्यंत प्रत्येक बाबतींत माझी आस्थेनें चौकशी करणाऱ्या घरांतील वृद्ध आत्याबाई त्या प्रकारानंतर माझ्या खोलीकडे फिरकल्यादेखील नाहींत; अगर कोणत्याहि प्रकारें त्यांनीं माझी वास्तपुस्त केली नाहीं. एखाद्या जादूच्या प्रयोगाप्रमाणें पूर्वींचा सर्व देखावा एकदम पालटला. आतांपर्यंत माझ्याशीं अत्यंत आदरानें वागणारी सारी मंडळी माझ्याकडे कुत्सितपणानें बोट दाखवून माझी हेटाळणी करीत असल्याचा मला भास होऊं लागला. एखाद्या चोरट्या गुन्हेगारासारखी माझी अवस्था होऊन मला ती असह्य वाटूं लागली. सायंकाळ झाली रात्र पडूं लागली. विचारमग्न स्थितींत मी एकटीच खोलींत बसून होतें. आतां पुढें आपलें कसें होणार ? आपल्याला अशा स्थितींत पाहिल्यावर आपले आईबाप आपल्याला काय म्हणतील ? कुळाची अब्रू मलिन करणारी दुराचारिणी पोर म्हणून श्रीपतरावांप्रमाणें तेहि आपला तिरस्कार करतील ! कदाचित् ते आपलें मुखावलोकनहि करणार नाहींत ! अशा लाजिरवाण्या तोंडानें आईबापांकडे जाऊन लोकां-कडून त्यांची छीःथू होण्यास कारणीभूत होण्यापेक्षां त्यांच्याकडे आपण न गेलेलेंच बरें नाहीं का ? मग कुठें जायचें ? या अफाट दुनियेंत निर्धास्तपणें आपल्याला कोण थारा देणार ! आणि हा प्रकार कळल्यानंतर समाज-कंटकांकडून आपल्या अब्रूची जास्तच विटंबना होणार नाहीं का ? असें झाल्यावर जगांत मला जाहीर रीतीनें तनुविक्रय करणाऱ्या एखाद्या वेश्ये-

प्रमाणें निंद्य जीवन जगावें लागणार कीं काय? त्यापेक्षां असल्या जिण्याचा अंतच केलेला काय वाईट?—हे व असले अनेक विचार माझ्या डोक्यांत त्यावेळीं थैमान घालूं लागून माझें डोकें नुसतें भणाणून गेलें. त्यांतच थोड्या वेळापूर्वींचे 'बेजबाबदार, स्वैराचारिणी, नटवी बाहुली!' हे श्रीपतरावांच्या तोंडचे तिरस्कारव्यंजक शब्द माझ्या कानांत मधून मधून कर्कशपणानें प्रतिध्वनित होत असल्याचा मला भास होऊं लागल्यानें संतापानें माझें डोकें अधिकच भडकलें. व्यभिचारिणी स्त्री म्हणून श्रीपतरावांनीं माझी निर्भर्त्सना केली. या अपमानानें माझ्या देहाची नुसती आग आग होऊन गेली. ज्या घरांत आपली इतकी अप्रतिष्ठा झाली त्या घराचें आजन्म दर्शन घ्यावयाचें नाहीं असें मीं मनानें ठरविलें. पण या विचाराला मन निश्चयाचें स्वरूप देण्यापूर्वींच दुसरा विचार त्याच्यापुढें निर्माण होऊन त्याला सतावूं लागला. ज्यानें माझ्यावरील आपल्या निस्सीम प्रेमापायीं प्रत्यक्ष आपल्या पित्याचा आपल्यावर रोष ओढवून घेतला त्या माझ्या प्रियकराची, मी घराचा त्याग करून निघून गेल्यानंतर काय स्थिति होईल? माझ्या वियोगाचें दुःख असह्य होऊन माझा प्रियकर कदाचित् प्राणत्यागहि करील अशी भीति मनाला भेडसावूं लागली. त्या बरोबर दुःखविव्हलतेनें—माझें हृदय पिळवटून निघालें. भावप्रवणतेनें दुरभिमान होऊन माझा पहिला विचार डळमळूं लागला. माझ्या भावाच्या भगवंताकरितां या घरांत राहून वाटेल तो अपमान सहन करण्यास व त्यांच्या पायाची बटीक म्हणून आपलें जीवन जगविण्यास मी सिद्ध झालें. पण थोड्या वेळापूर्वी घराबाहेर पडतांना आपल्या पुत्राला कठोर शब्दांनीं बजावीत असलेली श्रीपतरावांची ती क्रुद्ध मूर्ति माझ्या डोळ्यांपुढें मूर्तिमंत दिसूं लागली; व त्या वेळचे त्यांचे ते कठोर शब्द माझ्या श्रवणेंद्रियावर जोरानें आघात करूं लागले—"...........जर तुमचा हाच हेका कायम राहील तर मुतालिक घराण्याची सारी इस्टेट बेवारस समजून मी ती एखाद्या धार्मिक संस्थेस अर्पण करीन व सर्वस्वाचा त्याग करून दूर कोठें तरी निघून जाईन; पण आपल्या प्रतिष्ठित घराण्याची अब्रू अशा तऱ्हेनं मलिन होऊं देणार नाही..." किती किती कठोर शब्द होते ते! तप्त ज्वालारस कोणी तरी माझ्या कानांत ओतीत आहे व त्यायोगें माझें शरीर

नखशिखांत जळून खाक होत आहे असेंच मला त्यावेळीं वाटलें. माझ्या प्रियकराच्या सान्निध्यसुखांत त्यांच्या पायाची दासी म्हणून त्या घरांत राहण्याचें सुखहि निष्ठुर दैवानें माझ्या नशिबीं लिहिलें नव्हतें. कारण माझ्यावरील अमर्याद प्रेमामुळें माझ्याशीं विवाह करण्याचा आपला हट्ट सोडण्यास मि. मुतालिक कधींच तयार होणार नसल्यामुळें मुतालिक घराण्याच्या इस्टेटीवरील त्यांचा वारसाहक्क नष्ट करण्याची आपली प्रतिज्ञा खरी केल्याशिवाय श्रीपतराव मुळींच राहणार नाहींत; इस्टेटीची विल्हेवाट लावून वैतागानें ते देशांतरास निघून जातील व अशा तऱ्हेनें मुतालिक घराणें नामशेष झाल्याचें दृश्य पाहण्याचा प्रसंग आमच्या हयातींतच आमच्यावर येणार, ही अनर्थपरंपरा मला स्पष्टपणें दिसत होती. माझ्या प्रियकराच्या वैभवशाली घराण्याची अशी वाताहत झालेली पाहवली असती का मला? एका स्वैराचारिणी तरुणीच्या नादांत दुराचरणानें वागून मुलानें आपल्या बापास देशोधडीस लावलें व कुलवान वैभवशाली घराण्याची प्रतिष्ठा धुळीस मिळविली असा आमचा दुर्लौकिक सगळीकडे पसरला असता. मला तें सहन झालें असतें का? म्हणून ज्या प्रेमसंबंधामुळें ही अनर्थपरंपरा ओढवणार होती त्याचें मूळच नाहींसें करून टाकणें मला इष्ट वाटलें. माझ्या जीवितेश्वराच्या सुखापुढें स्वतःच्या सुखाची या सुहासिनीला मुळींच पर्वा नव्हती. त्याच्या सुखसमृद्धिपूर्ण भावी आयुष्याला कळीकाळाची दृष्ट लागूं न देण्यासाठीं आपलें सुख स्वतःच्या पंचप्राणांच्या ज्योतींनें जाळून त्याच्या काजळाचें गालबोट त्याला लावण्यास ही सुहासिनी सदैव सिद्धच होती. ज्या माझ्या प्रेमाला स्वार्थी, स्वैराचारी अशीं दूषणें देऊन श्रीपतरावांनीं तुच्छ लेखलें तें माझें प्रेम किती त्यागी होतें, किती निरपेक्ष होतें, हें कालांतरानें कळून येऊन आपल्या अन्यायी वर्तनाचा कधीं काळीं त्यांना थोडा जरी पश्चात्ताप झाला तरी तेवढ्यानेंसुद्धां या सुहासिनीला आपलें दुर्दैवी जीवन कृतार्थ झाल्याचें समाधान वाटेल. ही सुहासिनी केवळ नटवी बाहुली नसून मुतालिक घराण्यांत आजवर होऊन गेलेल्या देवतातुल्य गृहलक्ष्मींच्या पंक्तीला बसण्याच्या योग्यतेची एक आदर्श स्त्री होती असेंच कालांतरानें त्यांना समजून येईल. प्रियकराच्या सुखसर्वस्वाच्या आड येणारें भावी अनर्थांचें वादळ शांत करण्यासाठीं त्याच्या सान्निध्यसुखाचा अनावर

होऊं पाहणारा मोह बाजूस सारून घराचा त्याग करून एकटीच कुठें तरी दूर निघून जाण्याचा माझ्या मनाचा ठाम निश्चय झाला. परस्परविरोधी विचारांच्या ओढाताणीमुळें आतांपर्यंत दोलायमान झालेली मनःस्थिति निश्चयाच्या केंद्रबिंदूवर स्थिर झाली. मनाला त्यामुळें थोडेंसें विसाव्याचें समाधान लाभलें. मनाला आलेला शीण घालविण्यासाठीं समोरच्या खुर्चीस दोन्ही हातांचा विळखा घालून हलकेंच तिच्या बैठकीवर मीं आपलें मस्तक टेकविलें: व डोळे मिटून घेतले. इतक्यांत खोलीच्या दाराचा करकर आवाज झाला. मी दचकून मागें वळून पाहिलें. खोलीचें दार उघडून अधोमुखानें हळूहळू जड पावलें टाकीत मि. मुतालिक आंत येत होते. त्यांच्या चेहऱ्यावरील पूर्वीचा तजेला पार मावळून जाऊन तो अत्यंत म्लान दिसत होता. पराकाष्ठेची खिन्नता त्यावर आलेली होती. दारुण निराशेनें त्यांची स्थिति अत्यंत केविलवाणी झाली होती. तशा स्थितींत त्यांच्याकडे पाहिल्यावर हृदयाला पीळ पडून मला हुंदका आवरेनासा झाला. डोळ्यांत अश्रू अनावर झाले. ते लपविण्यासाठीं झटकन् मीं तोंड एका बाजूस फिरविलें. दुःखाच्या सहसंवेदनेमुळें मि. मुतालिक यांचेंहि हृदय भरून येऊन रुद्ध कंठानें ते म्हणाले, " सुहासिनी, सुहासिनी, काय तुझी स्थिति झाली ही ! तुझी अशी अवस्था होण्यास मीच सर्वस्वीं कारण असतांना कोणत्या तोंडानं मी आतां तुझं समाधान करूं ? आपल्या उज्ज्वल चारित्र्यानं पतित पुरुषांना पावन करण्याचं सामर्थ्य तुझ्यासारख्या आदर्श रमणीच्या ठायीं वसत असतांना एखाद्या पतितेप्रमाणं अशा एकांत जागीं लाजिरवाणेपणानं तोंड लपविण्याचा अपमानास्पद प्रसंग केवळ माझ्यामुळं तुझ्यावर आला. कशाला या करंट्यावर प्रेम केलंस ? तुझ्या प्रेमाचा मी काय बडेजाव ठेवला ? मंगलदेवते, तुझ्यासारखं अनर्घ्य रमणीरत्न जर एखाद्या रंकाचा संसार सजवील तर आपल्या वैभवानं तो रंक कुबेराला लाजवील; तुझ्या मंजुळ वाणीनं निनादित झालेलं त्याच्या जीवनाचं संगीत गंधर्वकिन्नरादि स्वर्गीय गायकांच्या मधुर गायनाला बेसूर ठरवील; आणि तुझ्या प्रेमामृतप्राशनानं त्याच्या पुण्याईला लाभलेलं अमरत्व स्वर्गातील देवांचा अमरपणाबद्दलचा भ्रम दूर करील; तुझी योग्यता अशी असतांना रूढिगत जुन्यापुराण्या, बुरसलेल्या चालीरीतींच्या

व्यर्थ बडेजावासाठीं व घराण्याच्या पोकळ प्रतिष्ठेसाठीं माझ्या घरांत तुझा धिःकार व्हावा ना! तुझ्यासारख्या देवतातुल्य रमणीची ज्या घरांत विटंबना केली जाते त्या घराण्याचं वैभव व प्रतिष्ठा कशी वाढणार? बाबा, मूर्तिमंत प्रतिष्ठा आपल्या पायांनीं तुमच्या घराकडं चालून आली असतांना तिच्याकडं पाठ फिरविणाऱ्या तुमच्या घराण्याची भरभराट कालत्रयींहि होणार नाहीं! सुहासिनी, तुझ्या अशा स्थितीस कारणीभूत होणारी मुतालिक घराण्याची पोकळ प्रतिष्ठा धुळीस मिळविण्यासाठीं खुशाल तिच्यावर शापांचा वर्षाव कर! मग त्या शापानं मुतालिक घराण्याचं निसंतान झालं तरी त्याची मला यत्किंचित्‌हि फिकीर नाहीं..... "

संतापानें मि. मुतालिक लाल झाले होते. त्यांचें सर्वांग थरथरत होतें. संतापाच्या भरांत त्यांच्या तोंडून निघालेले ते अभद्र शब्द मला ऐकवेनात. ते आणखी कांहीं बोलणार होते; पण लगेच मी झटकन् उठलें व आपल्या हाताचा तळवा हलकेंच त्यांच्या तोंडावर ठेवून म्हणालें, "काय भलतंच बोलताय्! सर्व कांहीं मी समजलें आहें. पण त्याबद्दलचा काडीचाहि दोष मी आपणांस देऊं इच्छित नाहीं. विधात्यानं माझ्या अदृष्टांत जें जें कांहीं लिहिलेलं असेल तें निमूटपणें सहन करण्याची मीं माझ्या मनाची तयारी केली आहे. वाटेल त्या हालअपेष्टांना तोंड देण्यासाठीं मी मन दगडासारखं घट्ट केलं असतांना असल्या अभद्र भाषणानं आपण माझ्या मनाला अधिक कष्ट कां बरं देतां?" मी थांबलें. मला थांबावंच लागलं. पुढं बोलणं हुंदका दाटून आल्यामुळें अशक्य झालं मला. मीं ओंजळींत तोंड दडवलं. माझी ती अवस्था पाहून मुतालिकांना भडभडून आलं.

'सुहासिनी, सुहासिनी...' त्यांना खूप बोलायचं होतं पण अंतःकरणांतील भावनेचा आवेग असह्य होऊन ते एकदम गप्प झाले. त्यांचे डोळे भळभळ वाहूं लागले होते. त्यांची ती स्थिति पाहून माझं हृदय भरून आलं होतं. मनाला वाटत होतं, त्यांचं डोकं मांडीवर घेऊन तें थोपटावं. त्यांच्या केसांतून बोटें फिरवावींत. त्यांच्या गालांवरून हळुवारपणें आपल्या हाताचा मृदुल तळवा फिरवावा. पण...पण...तो मोह मीं आंवरला. तो आंवरणंच भाग होतं मला. किंबहुना मनाला भुरळ पाडणारे तसले विचार मनांत येऊं देणं म्हणजे कांहीं वेळांपूर्वी केलेल्या निश्च-

याला सुरुंग लावण्यासारखं होतं. छेः ! तो निश्चय बदलणं आतां अशक्य होतं. आमच्या प्रेमाचं भवितव्य मला कळून चुकलं होतं. आणि तें कळल्यानंतर काय करायचं हें मनाशीं नक्की ठरविल्यावर पुन्हां मुतालिकांच्या प्रीतीच्या मोहांत पडण्यांत केवढा धोका आहे याची जाणीव माझ्या मनाला झालेली होती. म्हणूनच ओंजळींत तोंड गच्च धरून मी तशीच मुसमुसत राहिलें. मुतालिकांच्याकडे डोळे भरून पाहण्याचा मोहसुद्धां मीं आंवरला.

"सुहासिनी, तुझ्यावांचून मला सुखी होतां यायचं नाहीं. तूं माझं जीवन आहेस. माझ्या आयुष्यांतील तुझं अस्तित्व संपलं तर एखाद्या निर्जळ ओढ्याप्रमाणें माझें जीवन उदास रखरखीत होऊन जाईल. सुहासिनी, किती भयंकर प्रसंग ओढवला हा. माझ्यामुळं हें संकट कोसळलं तुझ्यावर. पण मी तुला वचन देतों, मी तुझा विश्वासघात करणार नाहीं. प्रसंग पडला तर तुझ्याकरितां मुतालिक घराण्याच्या साऱ्या इस्टेटीवर लाथ मारीन पण तुला अंतर देणार नाही. सुहासिनी, मी सारखा विचार करतों आहें, सारखा विचार करतों आहें !..."

"कसला विचार ?" मीं हलकेंच वर मान उचलून कंपित आवाजांत विचारलं.

"कुठं तरी दूर निघून जाण्याचा. सुहासिनी, आपण कुठं तरी दूर निघून जाऊं या !" ते म्हणाले.

"हा विचार नाहीं; अविचार आहे !" मी निग्रहानें म्हटलें आणि एकाएकीं गप्प झालें. तसें म्हणण्याचें सामर्थ्य त्या वेळीं माझ्यांत कुठून आलें कोणास ठाऊक. माझ्या अनपेक्षित बोलण्यानें आश्चर्यानें थक्क होऊन ते माझ्या मुखाकडे पाहातच राहिले. माझ्या दृष्टीनें तो क्षण फार महत्त्वाचा होता. पदरानें डोळे टिपीत मीं म्हटलें, "तुम्ही पुरुष आहांत, पण माझी स्थिति तशी नाहीं. आई-बाबांच्या आठवणीनं माझं अंतःकरण तीळतीळ तुटतंय्. काय करावं, कसं वागावं हेंच मला कळेनासं झालंय्. गैरसमज करून घेऊं नका. आजपर्यंत मी कधीं तुमच्या शब्दाबाहेर गेलेलें नाहीं. आजची रात्र मला एकटीला विचार करूं द्या. उद्यां मी..." माझें वाक्य पुरें होऊंच दिलें नाहीं त्यांनीं.

"कर; खूप विचार कर. पण सुहासिनी, आपल्यापुढं मी म्हणतोंय्

तेवढा एकच मार्ग आहे. बाकीचे सारे रस्ते बंद आहेत आपल्याला. पण नाहींच बोलत आतां कांहीं." आणि एकदम मान फिरवून ते तडक खोलीच्या बाहेर निघून गेले.

मी मख्ख्यासारखी दाराकडे पाहात बसलें होतें. कांहीं क्षण गेले. कांहीं मिनिटें गेलीं. कांहीं तास गेले. रात्र झाली. मध्यंतरीं एकदां मुतालिक खोलींत आले पण मी त्यांच्याशीं चकार शब्द बोललें नाहीं. पण डोळ्यांनीं मी त्यांचं रूप माझ्या हृदयांत भरून घेत होतें. मी बोलत नाहीं हें पाहून ते निराशेनें निघून गेले. मीं आवंढा गिळला. एक मोलकरीण येऊन अन्नाचें ताट ठेवून गेली. अन्नावर वासना नव्हती माझी. पण मुतालिकांच्या—माझ्या घरचं अन्न म्हणून मी चार घांस खाल्ले. अश्रूंबरोबर रडण्याचा मोह मला असह्य झाला. खोली आंतून बंद करून घेऊन मी अंथरुणावर पडून खूप खूप रडलें आणि त्यांतच मला झोंपेची गुंगी आली.

मध्येंच केव्हां तरी मी दचकून जागी झालें. तेव्हां मध्यरात्र उलटून गेली होती. मी गडबडीनें अंथरुणावरून उठलें व खिडकी उघडून बाहेर पाहिलें... निद्रादेवीच्या भव्य आकाशमंदिराच्या मध्यभागीं चंद्रदीप मंदपणें तेवत होता. सहस्रावधि लहान लहान नक्षत्रदीप ठिकठिकाणीं लुकलुकत होते. जिकडे तिकडे निःस्तब्ध शांतता नांदत होती. पलिकडच्या कमलेश्वराच्या देवालयांतील मध्यरात्रीनंतरचा चौघडा नुकताच सुरू झाला होता. सनईचे श्रवणमधुर स्वरालाप प्रशांत वातावरणांत पसरून सर्व आसमंत नादभरित झालें होतें. नगाऱ्यावरील टिपरीचा तालबद्ध खणखणाट सनईच्या मंजुळ स्वरांत चैतन्य भरीत होता—'तुमबिन मेरी कौन खबर ले गोवर्धन गिरिधारी' या पद्यचरणानें सनई त्या विश्वप्रभूला आळवीत होती. पद्यचरणाच्या सनईमधून निघणाऱ्या श्रुतिमधुर स्वरालापांशीं मी इतकी समरस होऊन गेलें कीं, माझ्या देहाच्या अणुरेणूंत भरून राहिलेला प्रेमस्वरूपी परमेश्वरच माझ्या हृदयवीणेच्या तारा छेडीत आहे असाच मला क्षणभर भास झाला. त्या लीलालाघवी परमेश्वराशिवाय दुसऱ्या कोणाला मी माझ्यां हृदयाचें गाणें ऐकविणार? सनईमधून निघणारे त्या पद्यचरणाचे मंजुळ स्वर मी किती तरी वेळ तन्मयतेनें ऐकत उभी होतें. इतक्यांत पलीकडच्या मुख्य दिवाणखान्यांतील मोठ्या घड्याळाचे ठण् ठण् ठण् ठण् असे

चार ठोके पडलेले माझ्या कानांवर आले. माझी स्वरसमाधि एकदम भंग पावली. चार वाजले. आतां अधिक वेळ गमावणें इष्ट नव्हतें. कारण मुंबईकडे जाणारी पहिली एक्स्प्रेस ट्रेन कमलापूर स्टेशनवरून पहाटे पांच वाजतां सुटत असल्याचें मला माहीत होतें. ही गाडी गांठण्याचा माझा विचार असल्यामुळें आतां फक्त एक तासाचा अवधि राहिलेला होता. म्हणून विचारांत अधिक वेळ न दवडतां मीं माझ्याबरोबर आणलेले जरूरी-पुरतें सामान झटपट् बांधून घेतलें. प्रयाणाची जवळ जवळ सर्व तयारी झाली. निघण्याच्या विचारांत मी होतें. इतक्यांत एक शंका माझ्या मनाला डिवचूं लागली. उदयिक सकाळीं आपणांस एकाएकीं नाहींशी झालेली पाहून मि. मुतालिक यांना अपरिमित दुःख होईल. आपल्या घरचा पत्ता माहीत असल्या-मुळें तेथें ते जातील; त्यामुळें सारी हकीकत आपल्या आई-वडिलांना कळेल. दुःखानें ते वेडे होतील. आपल्या प्रियकराला वाटेल तें टाकून बोलतील, इतकेंच नव्हे तर कांहीं वेडीवांकडी शंका मनांत येऊन त्याला पोलिसांच्याहि ताब्यांत देण्याची धमकी देतील. त्याचा परिणाम भयंकर होईल. निराशेनें वैतागाच्या भरांत कदाचित् आपला प्रियकर आत्महत्त्येसहि प्रवृत्त होईल. छे छे, असें कांहीं होतां उपयोगी नाहीं. तसें कांहीं झालें तर आपल्या त्यागाचा काय उपयोग झाला ? आपला प्रियकर या आपत्तींतून वांचलाच पाहिजे ! पण कसा वांचणार तो ? उलट सुलट विचारांच्या भोंवऱ्यांत माझें मन गिरक्या खाऊं लागलें. चटकन् एक कल्पना मला सुचली. लगेच ती मी अमलांतहि आणली. माझ्या वडिलांना एक व मि. मुतालिक यांना एक अशा दोन चिठ्या मीं लिहिल्या. वडिलांच्या चिठ्ठींत कुठल्याहि स्वरूपाचा संकोच न बाळगतां आपल्या हातून घडलेल्या चुकीची कबुली देऊन तिचें प्रायश्चित्त म्हणून मी आत्महत्त्या करीत आहें असें लिहिलें. तसेंच या बाबतींत मि. मुतालिक यत्किंचित्हि दोषी नसल्याचें स्पष्टपणें लिहून त्यांना कुठल्याहि स्वरूपाचा त्रास होईल असें कांहीं न करण्याची विनंति केली; आणि तसें कांहीं झाल्यास आपल्या आत्म्याला शांति मिळणार नाहीं असेंहि लिहिलें. शेवटीं त्यांची क्षमा मागून पुढील जन्मीं त्यांच्याच उदरीं जन्माला घालण्याची ईश्वरास विनंति करून ती चिठ्ठी संपविली.

मि. मुतालिकांच्या चिठ्ठींत—" झाल्या प्रकाराबद्दल आपल्याला मी यत्किंचित्‌हि दोष न देतां मी आत्महत्त्या करीत आहे. आपण माझा शोध करण्याचा निष्फळ यत्न करूं नये. मला विसरून जाऊन एखाद्या अनुरूप मुलीशीं लग्न करून सुखी व्हावें. त्यांतच मला खराखुरा आनंद वाटणार आहे, " असा मजकूर लिहिला.

ह्या दोन्ही चिठ्ठ्या लिहिण्यांत मी या जगांतून कायमचीच नाहींशीं झालें असें वाटून माझ्या वडिलांनीं व मि. मुतालिकांनीं माझा शोध करण्याचा प्रयत्न करूं नये व मला विसरून जावें असा माझा उद्देश होता. चटकन् मीं माझी बॅग उघडून तिच्यांतून एक लिफाफा बाहेर काढला व त्यांत मि. मुतालिकांच्याकरितां लिहिलेली चिठ्ठी घालून तसेंच त्यांवर त्यांचें नांव लिहून तो खोलींत आल्यावर कुणालाहि सहज दिसेल अशा रीतीनें ठेवून दिला. वडिलांकरितां लिहिलेली चिठ्ठी कमलापूर सोडल्यावर पाठवायची असें ठरविलें. कारण जवळ पोष्टाचें पाकीट नव्हतें.

इतकें सर्व झाल्यावर माझ्या मनाची तगमग शांत झाली. प्रियकराच्या ताटातुटीची घटका भरली होती. निघण्यासाठीं मीं माझी बॅग उचलली. मि. मुतालिकांना एकदां डोळे भरून पाहावें अशी तीव्र इच्छा मनाला झाली आणि देहाच्या अणुरेणूंतील सगळें चैतन्य एकदम नाहींसें होऊन तो अगदीं विगलित झाल्यासारखा मला वाटूं लागला. निघण्यासाठीं मला पाय उचलवेना. एकदम अगदीं सुन्न झाल्यासारखें वाटूं लागलें. पोटांत भडभडून येऊन कालवाकालव सुरू झाली. दुःखानें ऊर भरून आला. हृदय कळवळून मूकरुदन करूं लागलें. प्रियकराचें मंगल दर्शन मला फिरून कधींहि घडणार नव्हतें. त्या प्रेमळ सहवासास मी कायमची अंतरणार होतें. परस्परांच्या हृदयांना जखडून टाकणारें भावबंधनाचे धागे निष्ठुर नियतीनें तटातट तोडून टाकल्यामुळें दोन्ही हृदयांचीं कायमची ताटातूट होणार होती. निर्घृण दैवाचा कुसुमकोमल स्त्रीहृदयावर तो वज्राघात होता. मला तो असह्य होता; पण तो सहन करणेंच प्राप्त होतें. हृदयांत उफाळलेला भावनावेग मोठ्या मनोनिग्रहानें मीं आंतल्या आंत दडपून टाकला. हट्टी हृदयाला काबूंत आणलें. डोळ्यांतील अश्रू पुसून टाकून मी झटकन् खोलीच्या बाहेर पडलें व झपझप जिना उतरून वाड्याच्या मुख्य दरवाजाजवळ आलें.

देवडीवर गडीमाणसें गाढ झोपेंत घोरत होतीं. दरवाजा उघडण्यासाठी त्याला आंतून लावलेला अडसर मीं हलकेंच आंत सरकविला. त्याच्या गड् गड् गड् अशा आवाजानें देवडीवरील झोंपलेल्या माणसांपैकीं एकजण अर्ध-वट जागा झाला व त्यानें जवळच्या माणसांपैकीं एकाच्या नांवानें हांक मारली. त्याबरोबर मी एकदम चपापलें व थबकून तेथेंच आडोशाला उभी राहिलें. आतां देवडीवरील माणसें जागीं होणार व त्यांच्या गडबडीमुळें मि. मुतालिकहि कदाचित् जागे होऊन आपला सर्वच बेत फसणार ही भीति मला तीव्रतेनें जाणवूं लागली. तशा स्थितींत एकदोन मिनिटें गेलीं. देवडीवरील माणसांपैकीं पुन्हां कोणीं कांहींच बोललें नाहीं. मी कानोसा घेतला. झोपेंत शांतपणें चाललेले त्यांचे श्वासोच्छ्वास मला स्पष्टपणें ऐकूं येऊं लागले. निर्धास्त होऊन मी हळूंच दरवाजा उघडून बाहेर पडलें व तो पुन्हां हलकेंच ओढून घेऊन झपाट्यानें तडक स्टेशनचा रस्ता धरला. कमलापूर गांवापासून कमलापूर स्टेशन सारें अर्धा मैल होतें, गांवापासून स्टेशनपर्यंतचा रस्ता आडवळणाचा नसून बैलगाडी, मोटार वगैरे वाहनांच्या रहदारीस उपयोगी पडण्याइतपत चांगला प्रशस्त होता. आकाशांत चंद्र नुकताच मावळला असून त्याच्या प्रकाशाचे अवशेष अगदीं अस्पष्टपणें रेंगाळत रेंगाळत नाहींसे होत चालले होते. आकाश साधारण ढगाळलेलें असून पावसाचे बारीक बारीक थेंब मधून मधून पडत होते. प्रणयनिधान निशानाथाच्या वियोगामुळें प्रणयज्योत्स्नेंत आतांपर्यंत खुललेलें रजनीदेवीचें अंतःकरण विरहव्यथेनें काळवंडून जाऊन प्रेमविव्हलतेनें ती जणूं अश्रू ढाळीत आहे असें मला वाटलें. सहसंवेदनेमुळें मला तिची कींव आली. माझी स्थिति तिच्यासारखीच नव्हती का? माझ्या हृदयाकाशांतील प्रणय-चंद्र अस्तंगत होऊन हृदय निराशेच्या दारुण अंधःकारानें दाटून भरलेलें होतें व डोळे अश्रूजलानें निथळत होते. निशादेवी आणि मी दोघीहि समदुःखी होतों. प्रणयविकल स्त्रीहृदयाच्या वांट्याला विधात्यानें दारुण निराशाच घातलेली असते का? सभोंवार अंधार पसरलेला असल्यामुळें मला पुढचा रस्ता स्पष्टपणें दिसत नव्हता. ठेंचाळत, अडखळत मी मार्ग कापीत चाललें होतें. आपलें भावी आयुष्यहि आतां यापुढें असेंच अंधः-

कारमय असणार व अशा निराशेच्या अंधःकारांतील जीवनपथावर भवितव्यतेच्या अस्पष्टतेनें आपणांस पदोपदीं संकटांच्या अशाच ठेंचा व आपत्तींचे असेच अडथळे सहन करावे लागणार, असा विचार त्यावेळीं माझ्या मनांत येऊन मला अत्यंत दुःख झालें. या अफाट दुनियेंत आतां आपणांला कोणाचा आधार मिळणार नाहीं हा विचार मनांत येतांच मला सगळीकडे निराशाच दिसूं लागली. माझें सगळें अवसान गळून गेल्यासारखें झालें. त्या आत्यंतिक निराशेच्या भरांत आपल्या असल्या दुःखद जिण्याचा अंत करावा असाहि भयंकर विचार त्यावेळीं माझ्या मनांत चमकून गेल्याशिवाय राहिला नाहीं. पण लगेच त्यावेळच्या माझ्या अवस्थेची मला जाणीव झाली. गर्भरूपानें माझ्या उदरांत वास करणाऱ्या एका निष्पाप जीवाची मी माता होणार होतें. अमूर्त मातृवात्सल्यानें माझ्या तशा विषण्ण मनःस्थितीवर निर्णायक विजय मिळविला. आत्महत्त्येचा भेकड विचार मीं मनांतून अजिबात काढून टाकला. त्या जगत्प्रतिपालक परमेश्वरावर विश्वास ठेवून भावी परिस्थितीला धैर्यानें तोंड देण्याचा मीं निर्धार केला. थोड्या वेळापूर्वीं मी ऐकलेले सनईचे ते गोड स्वर पुन्हां माझ्या कानांत घुमूं लागले. "तुमबिन मेरी कौन खबर ले गोवरधन गिरिधारी—" अहाहा! किती शीतल, किती उत्साहवर्धक ते सूर होते! माझ्या सर्व देहाची विकलता व मनाचा निरुत्साह पार नाहींसा होऊन भावी परिस्थितीबद्दल एक प्रकारचा दुर्दम्य बेफिकीरपणा माझ्या ठिकाणीं उत्पन्न झाला. संतश्रेष्ठ मीराबाईनें त्या दीनदयाळू परमेश्वराला अनन्यभावानें आळविलेले ते पद्यचरण मी गुणगुणूं लागतांच एकप्रकारचें अननुभूत चैतन्य माझ्या सर्व देहांत खेळूं लागल्यासारखें मला वाटूं लागलें. परमेश्वरश्रद्धेनें माझें अंतःकरण अथांग भरून गेलें. अनन्यभावानें मीं त्याची करुणा भाकली—"हे दयामय प्रभो! माझें गाऱ्हाणं मी तुझ्याशिवाय कुणाला सांगूं? दीनवत्सला, या गरीब अबलेची लाज आतां तुझ्याशिवाय कोण रक्षण करणार?" परमेश्वरचिंतनानें मनाला एकाएकीं समाधान लाभलें. देवानें माझें गाऱ्हाणें ऐकलें; तो आपला पाठिराखा असल्याची खात्री पटून मन उत्साहभरित झालें. प्रभु-चिंतनांत मनाची अशी तंद्री लागल्यामुळें मी स्टेशनच्या आवारांत येऊन पोहोंचल्याचें मला समजलेंहि नाहीं. त्या भावसमाधींतून एकदम

भानावर येऊन मीं सभोंवार पाहिलें. जिकडे तिकडे दिव्यांचा लख्ख प्रकाश पडला होता. प्रवाशांची तिकिटांसाठीं गडबड चालली होती. तिकीट घेतलेले कांहीं प्रवासी उत्सुकतेनें गाडीची वाट पाहात आपापल्या सामानासह प्लॅटफॉर्मवर उभे होते. गाडीची वेळ झाली होती. तिकीट काढण्यासाठीं पोलक्याच्या खिशांतील मनीबॅग मीं बाहेर काढली. पण तिकीट कुठचें काढायचें? मला कोठें जायचें होतें? हक्कानें आपलें म्हणतां येईल असें मालकीचें आश्रयस्थान मला आतां राहिलें होतें का? घरदार राहिलें नव्हतें. उदरंभरणाची पंचाईत होती. संकटप्रसंगीं सहानुभूतीनें धीर देणारें कोणीं जिव्हाळ्याचें माणूस नव्हतें. कांहीं दिवसांपूर्वीं निकट-वर्तीयांना आपल्या प्रेमळ रसवंतीनें आपलेंसें करून सोडणारी, सुसंस्कृत मनाच्या खाणींतील अमूल्य विचाररत्नें वाङ्मयनिर्मितीच्या ओंजळीनें उधळून आपल्या काव्यात्म हृदयाची दौलत गुणलुब्ध रसिकांना मुक्त-हस्तानें लुटणारी व आपल्या काव्यमय आदर्श जीवनाची भविष्यकालीन मनोज्ञ चित्रें मनांत रेखाटून त्या ब्रह्मानंदांत सदोदित रंगून जाणारी ही सुहासिनी; पण तिला दैवदुर्विलासामुळें या अफाट दुनियेंत भणंग भिकारी होऊन नीरस, रुक्ष, अपमानित जीवन कंठण्याचा यापुढें प्रसंग येणार ना? अथांग दर्यांत कर्णधार नसलेल्या नौकेप्रमाणें दुनियेंतील अफाट जनसागरांत माझ्या जीवननौकेला जिवाच्या जोडीदारावांचून काळाच्या लाटा नेतील तिकडे जाणें प्राप्त होतें. कुठें जायचें या विचारांत पैशाचें पाकीट हातांत धरून त्याकडे एखाद्या वेड्यासारखी पाहात मी उभी राहिलें. तोंच गाडी स्टेशनच्या आवारांत शिरत असल्याचा खाड् खाड् असा आवाज माझ्या कानांवर आदळला. विचारतंद्रींतून मी एकदम भानावर आलें. विचार करण्यास आतां बिलकूल अवधि नव्हता. प्रथम मुंबईसच जावें व तेथूनच पुढील बेत ठरवावा असा निर्णय घेऊन लगबगीनें जाऊन मी तिकीट घेतलें व स्त्रियांच्या कंपार्टमेंटमध्यें चढून बसतें न बसतें तोंच गाडी चालू लागली.

* * *

माझ्या कंपार्टमेंटमध्यें गर्दी मुळींच नव्हती. स्त्रीप्रवाशांनीं आपापल्या पथाऱ्या पसरून त्यांवर खुशाल आरामशीर ताणून दिलेली होती. एका कोपऱ्यांतील खिडकीजवळच्या रिकाम्या बांकावर मला आरामशीर जागा

मिळाली होती. माझ्याबरोबर विशेष असें सामान नव्हतेंच. कपड्यांची एक कातडी सूटकेस व एक छोटेंसें बेडिंग एवढेंच काय तें माझें सामान होतें. कमलापुरांतील आदल्या दिवशींच्या त्या अप्रिय प्रसंगानंतर ज्या दुःखद घटना घडून आल्या त्यामुळें मला अत्यंत मानसिक त्रास झाला होता. त्यांतच रात्रभर जागरण झाल्यामुळें अत्यंत थकवा येऊन मला अगदीं गळून गेल्यासारखें झालें होतें. शरीरस्वास्थ्य आणि मनःस्वास्थ्य या दोन्हींचीहि मला यावेळीं अत्यंत जरूरी होती. म्हणून डोक्यावरील बर्थवर मी माझी सूटकेस ठेवून दिली व बेडिंग पसरून त्यावर आडवी झालें. पहांटेच्या शीतल वायुलहरी माझ्या शिणलेल्या मनाला अतीव सुखकर वाटल्या. झोंप येण्यासाठीं मीं डोळे मिटून घेतले. पण मन स्थिर नसल्यामुळें झोंप मुळींच लागेना. गाडी वायुवेगानें पुढें धांवत होती तर माझें मन त्याच्या सहस्रपट गतीनें पण उलट दिशेनें कमलापुराकडे धांव घेत होतें. आतां थोड्या वेळानें उजाडेल; सकाळीं आपण एकाएकीं नाहींसें झालों हें पाहून घाबरून जाऊन मि. मुतालिक आकाशपाताळ एक करून सोडतील; नंतर आपण लिहिलेली चिठ्ठी दृष्टीस पडतांच आपल्या चिरवियोगाच्या दुःखानें वेडे होऊन त्यांची काय स्थिति होईल, हे दुःखद विचार मनाला सारखे भंडावून सोडीत होते. शेवटीं विचाराचा ताण मनाला असह्य झाल्यामुळें मीं तोंडावर पांघरूण ओढून घेतलें व असहाय्यपणें मूक रुदन करूं लागलें. किती तरी वेळ माझें अश्रुविमोचन चाललें होतें. अखेर रडण्याच्या श्रमानें ग्लानी येऊन मी केव्हां झोंपीं गेलें तें मला समजलें नाहीं.

सहस्ररश्मीचे कोमल किरण खिडकीवाटें आंत शिरून प्रेमानें माझें मुख कुरवाळूं लागले तेव्हां त्यांच्या संजीवक, उबदार स्पर्शानें जाग येऊन मीं डोळे उघडले. डब्यांत सगळीकडे लख्ख प्रकाश पडला होता. गाडी थांबली होती. बाहेर लोकांच्या गलबल्याचा व त्यांच्या इकडून तिकडे धांवण्यानें होणाऱ्या आवाजांचा संमिश्र ध्वनि कानठळ्या बसवीत होता. मधूनमधून मोठ्या विचित्र आवाजानें ' चै--कॉफी--काडी--बिडी - चिवडा--लाडू--भज्जै ' अशा पदार्थांचा एका दमांत पुकारा करीत कांहीं पोरें गाडीपुढून इकडून तिकडे गडबडीनें जात-येत होतीं. चटकन् उठून मीं खिडकींतून बाहेर डोकावलें. गाडी कल्याण स्टेशनवर येऊन उभी राहिली होती. माझ्या

इतर स्त्रीप्रवाशांचें हंसत खिदळत प्रभातकालीन चहापान चाललें होतें. मींहि गार पाण्यानें आपलें स्वच्छ मुखमार्जन करून कपभर गरम कॉफी घेतली. थोडीशी झोंप मिळाल्यामुळें व गरम कॉफी पोटांत गेल्यामुळें माझा सर्व शीण नाहींसा होऊन मनाला हुशारी वाटूं लागली. खिडकीच्या चौकटीवर आपली डावी बाजू रेलून व तिच्या खालच्या भागावर आपल्या डाव्या कोपराचा आधार घेऊन मी कुतूहलानें खिडकीबाहेर पाहूं लागलें. दुरून कोठून तरी गाण्याचा गोड स्वर माझ्या कानांवर येऊं लागला. क्रमाक्रमानें तो स्वर जवळजवळ व अधिकाधिक स्पष्ट ऐकूं येऊं लागला. ज्या दिशेकडून तो येत होता तिकडे मीं जिज्ञासेनें पाहूं लागलें. तों हातांतील एकतारीवर आपल्या गोड व खड्या आवाजांत गाणें म्हणत म्हणत व प्रत्येक डब्यापुढें थोडें थोडें थांबत थांबत एक भिक्षु माझ्या डब्याकडे येत होता. त्या भिक्षूचा आवाज अत्यंत श्रवणमधुर व पल्लेदार असून गाणें म्हणण्याची ढब हृदयंगम व ऐकणाराला मोहून टाकणारी अशीच होती. डोळे मिटून हातांतील एकतारीवर तो मोठ्या तन्मयतेनें गात होता. गाणें म्हणत म्हणत तो जसजसा जवळ येऊं लागला तसे त्याच्या गाण्याचे स्वर मला माझ्या परिचयाचे वाटूं लागले; म्हणून ते मी एकाग्रतेनें ऐकूं लागलें. आतां तो भिक्षु माझ्यापासून थोड्या अंतरावर येऊन पोहोंचला; व त्याचें गाणें मला स्पष्ट ऐकूं येऊं लागलें. आदल्या रात्रीं कमलापुरांत मध्यरात्रीनंतरच्या चौघड्याच्या वेळी सनईवर जें पद मीं ऐकलें होतें तेंच संत मीराबाईचें भक्तिरसानें ओथंबलेलें पद तो एकतारीवर गात होता. आतां तर तो अगदीं माझ्यासमोरच उभा राहून गाऊं लागला—

**तुमबिन मेरी कौन खबरले गोवर्धन गिरिधारी ॥ ध्रु० ॥**
**मोर मुकुट पितांबर सोहे । कुंडनकी छत्र न्यारी ॥**
**गोवर्धन गिरिधारी ॥**
**खडी सभामो द्रौपदी ठाडी । राखो लाज हमारी ॥**
**गोवर्धन गिरिधारी ॥**

पदांतील प्रत्येक चरण तो भक्तिरसांत रंगून जाऊन अत्यंत भावनोत्कटतेनें घोळून घोळून म्हणत होता. त्याचा तो बांसरीसारखा सुरेल आवाज, गातांना त्याची होणारी तल्लीनता, त्याचा तो भावपूर्ण स्वरविलास या

सर्वांच्या माझ्या संवेदनशील मनावर इतका विलक्षण परिणाम झाला कीं भक्तीच्या गहिंवरानें माझें अंतःकरण तुडुंब भरून येऊन अखेर त्याला सामावण्यास अंतःकरणांत वाव न मिळाल्यामुळें अश्रूंच्या रूपानें तो माझ्या दोन्ही गालांवरून झरझर पाझरूं लागला. इतक्यांत त्यानें आपलें गाणें संपविलें व डोळे उघडून माझ्याकडे पाहिलें. माझें अश्रुविमोचन चालूंच होतें. तें पाहून प्रथम तो बुचकळ्यांत पडला. त्याची मुद्रा एकदम गोरीमोरी झाली. क्षणभर विचारांत पडल्यासारखा होऊन तो खालीं पाहूं लागला. त्याची ती गोंधळलेली मनःस्थिति लक्षांत येऊन मला माझ्या तत्कालीन परिस्थितीची जाणीव झाली. लुगड्याच्या पदरानें चटकन् मीं आपले अश्रू पुसून टाकले. थोड्या वेळानें आपली करुणार्द्र दृष्टि माझ्यावर स्थिर करून अत्यंत वात्सल्यपूर्ण स्वरानें तो मला म्हणाला, "अवधड करूं नकोस माझे माई! तो मायबाप परमेश्वर तुझा पाठीराखा आहे! त्याच्यावर विश्वास ठेव; धीर धर; तो तुझें कल्याण, कल्याण करील!" त्याच्या या प्रेमळ सहानुभूतिपर शब्दांनीं माझें निराशेनें करपून गेलेलें अंतःकरण कृतज्ञतेनें भरून आलें. तो कृतज्ञतेचा भाव दृष्टींत सांठवून मी त्याच्याकडे पाहिलें व जवळच्या पैशांतून चटकन् एक अधेली काढून त्याच्या हातांवर टाकली. त्यानें ती घेऊन आपल्या कपाळाला लावली व कृतज्ञतापूर्ण दृष्टीनें पुन्हां एकवार माझ्याकडे पाहून तो पुढें चालूं लागला. तो दूर जाऊन दिसेनासा होईपर्यंत मी अतृप्त नेत्रांनीं त्याच्याकडे सारखी पाहात राहिलें. आपल्या मनांतील व्यथा त्याला नेमकी कशी ओळखतां आली याजबद्दल मात्र मला राहून राहून आश्चर्य वाटत होतें. जातेवेळीं मला आशीर्वाद देतांना त्यानें उच्चारलेले 'कल्याण, कल्याण' हे शब्द माझ्या कर्णरंध्रांत अजूनहि सारखे घुमत होते. इतक्यांत गाडी सुटण्याचा इशारा देणारी स्टेशनच्या आवारांतील घंटा ठण् ठण् ठण् वाजूं लागली. तिच्या नादलहरी स्पंदन पावत पावत सभोंवारच्या वातावरणांत घुमूं लागल्या. त्या स्पंदनशील नादलहरींतहि 'कल्याण, कल्याण' हे शब्द अस्पष्टपणें उमटत असल्याचा मला भास होऊं लागला. आतां गाडी सुटणार इतक्यांत हातांत सामानाची एक लहानशी ट्रंक घेतलेली एक प्रौढा घाईघाईनें माझ्या डब्यांत चढली आणि गाडीनें प्रयाणाची शिटी दिली.

माझ्या डब्यांत चढलेल्या बाई ब्राह्मणाच्या असून सकेशा गतधवा होत्या. त्यांचें वय पन्नाशीच्या आसपास असावें. शरीर कांहींसें पृथुपृथुल; वर्ण काळासांवळा, ठेंगणा बांधा व चेहऱ्याची घडण अगदीं सामान्य प्रतीची असें सर्वसाधारण त्यांचें रूप होतें. वेशभूषा व वागणूक साधारण खेडवळ पद्धतीची दिसत होती. यावरून त्यांच्या वयाचीं पहिलीं बरींच वर्षें ग्रामीण जीवनांत व्यतीत झालीं असावीत व नागर-जीवनाशीं त्यांचा परिचय अगदीं अलीकडे झाला असावा असा मीं मनाशीं सहज तर्क केला. मुद्रे-वरील हावभावांवरून त्या स्वभावानें भाबड्याहि असाव्यात असा माझा समज झाला. पण अधिक विस्तारांत न शिरतां त्यांच्या एकंदर राहणीचें अगदीं आटोपशीर वर्णन करावयाचें म्हणजे खेडवळ राहणीची अंतिम मर्यादा व सुधारलेल्या राहणीचा प्रारंभ या दोन्हींच्या संलग्न सीमारेषेवर कुठें तरी त्यांच्या राहणीचें स्थान दाखवितां येईल अशीच त्यांची राहणी होती. त्यांच्या एकंदर दर्शनानें माझ्या ठिकाणीं एक प्रकारचें कुतूहल निर्माण होऊन मी त्या दृष्टीनें त्यांच्या प्रत्येक हालचालीकडे पाहूं लागलें. डब्यांत शिरतांच प्रथम त्यांनीं आपली हातांतील सामानाची ट्रंक खालीं ठेवली व कृतकृत्यतेचा एक मोठा दीर्घ निःश्वास सोडला. हेतुसफलते-पासून होणाऱ्या एक प्रकारच्या समाधानाचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसून येत होता. चुकवूं पाहणाऱ्या गाडीला अखेर आपण पकडलेंच कीं नाहीं अशा आत्मप्रौढीच्या आविर्भावानें फुलून जाऊन त्यांची मुद्रा आपली विजयी नजर डब्यांत सगळीकडे फिरवूं लागली. नंतर तोंडानें हुश्श् हुश्श् करीत अंगावरील नेसत्या लुगड्याच्या पदरानें त्या आपल्या तोंडावरील व गळ्याखालील घर्मबिंदु टिपून काढूं लागल्या. तें करीत असतांना त्या मधून मधून अशा कांहीं कुतूहलयुक्त हास्यमुद्रेनें माझ्याकडे पाहात असत कीं, तेवढ्यावरून त्यांच्याशीं माझा परिचय फार पूर्वींपासूनचा असावा असाच तिऱ्हाइत पाहणारांचा सहज समज व्हावा. थोड्या वेळानें त्या आपली ट्रंक घेऊन मी बसलें होतें त्या ठिकाणीं आल्या. मी चटकन् आपलें बेडिंग गुंडाळून त्यांना बसण्यासाठीं बांकावर माझ्याजवळ जागा करून दिली. बांकाखालीं आपली ट्रंक सारून त्या माझ्याशेजारीं बसल्या. आम्ही दोघींनींहि एकमेकींकडे पाहून नुसतें औपचारिक हास्य केलें. पूर्व-

परिचयाच्या अभावीं संभाषणास प्रारंभ कसा करावा याचें मला मोठें कोडें वाटूं लागलें. म्हणून तो प्रसंग टाळण्यासाठीं मीं उगीचच खिडकींतून बाहेर पाहात राहाण्याचा बहाणा केला. त्या मात्र अनिमिष नेत्रांनीं माझ्याकडे सारखी टक लावून न्याहाळून पाहूं लागल्या. त्यांची दृष्टि आपल्याकडे लागली असल्याचें लक्षांत येऊन माझ्या मनाची स्थिति फारच गोंधळल्यासारखी झाली. एखाद्या अपराधी माणसाप्रमाणें मला अगदीं चोरट्यासारखें होऊन गेलें. त्यावेळची ती अनिश्चित शांतता मला असह्य होऊं लागली. अखेर शांततेचा भंग करून त्यांनींच प्रथम बोलण्यास सुरुवात केली—

" प्रवासाची दगदग बरीच झालेली दिसते आहे तुम्हांला ? " आस्थापूर्वक माझ्याकडे पाहात त्या म्हणाल्या.

" कशावरून म्हणतां तुम्ही हें ? " मुद्रेवर किंचित हास्य आणून मीं प्रश्न केला.

" तुमचं तोंड अगदीं उतरून गेलं आहे; डोळे निस्तेज नि खोल गेलेले दिसत आहेत ! "

" तसा कांहीं विशेष त्रास झाला नाहीं मला. पण प्रवासांत घरांतल्यासारख्या सगळ्याच सुखसोयी कशा असणार ? थोड्याफार गैरसोयी सहन कराव्या लागणारच ! त्यांतून कालचं गाडींतलं रात्रभर जाग्रण; त्यामुळं प्रकृतीवर थोडाफार परिणाम झालेला दिसत असेल एवढंच ! " किंचित बेफिकीरपणानें मी म्हणालें.

" फार लांबून आलां आहांत वाटतं ? इकडं कुठं निघालांत ? "

" मुंबईस ! "

" म्हणजे सासरला कीं माहेरला ? "

काय उत्तर देणार मी त्या प्रश्नाला ? स्त्री-जीवनांत क्रांति घडवून आणणारी जी वैवाहिक अवस्था त्या अवस्थेमुळें तिच्या जीवनांत सासर आणि माहेर असे जे दोन भाग निर्माण होतात तेच तिच्या भावी सांसारिक आयुष्यांतील अनेक सुखदुःखाच्या प्रसंगीं तिला आधारभूत होत असतात. माझ्या कमनशिबानें त्या दोन्हीहि आधारांना मी पारखी झालें होतें. त्यामुळें त्या बाईनीं सहज अजाणतेपणानें केलेला तो प्रश्न माझ्या जिव्हारीं झोंबला. अगोदरच दुःखानें विद्ध झालेल्या माझ्या हृदयावर तो एक जोराचा वारच

होता. काय उत्तर द्यावें या विचारांत मी क्षणभर गोंधळून गेलें. पण उत्तरास विलंब लावण्याची ती वेळ नव्हती; त्यामुळें त्या बाईच्या मनांत नसती शंका उत्पन्न झाली असती. म्हणून मी चटकन् "माहेरास" असें खोटेंच सांगून टाकलें.

"तुमचं सासर कोणतं गांव?"

"कमलापूर!"

"बरं झालं; तुमची एक नवीन ओळख झाली. तितकाच चार घटका बोलण्याचालण्यांत वेळ जाऊन प्रवास कंटाळवाणा होणार नाहीं! मी जरा गोष्टीवेल्हाळ बाई आहे. मला जरा विशेष बोलायला हवं असतं! पण त्यामुळं तुम्हांला त्रासबीस तर नाहीं ना होणार? हो! आपलं विचारलेलं बरं!" एवढें बोलून त्यांनीं मोठ्यानें एक निरर्थक हास्य केलें. किंचित् आठवल्यासारखें करून त्या पुन्हां म्हणाल्या, "अहो, पण तुमचं नांव विचारायचं मी विसरलें! तें समजल म्हणजे बोलाचालायला सोयीचं होईल!"

"माझं नांव सुहासिनी!"

"आडनांव?"

पुन्हां माझ्यावर एक निसटता वार झाला. उत्तरादाखल मी कांहींच बोललें नाहीं; आणि त्यांनींहि तो प्रश्न मला पुन्हां केला नाहीं. परंतु अधिक चौकसखोर व बोलण्यांत जरा अघळपघळ अशा या बाई असाव्यात अशी त्यांच्या आतांपर्यंतच्या एकंदर बोलण्याचालण्यावरून जी माझी समजूत झाली होती ती उत्तरोत्तर अधिकच दृढ होत चालली. त्यांच्या या अधिक चौकसखोरपणाची मला चीडहि येऊं लागली. शिवाय एखाद्या गुन्हेगाराकडे फौजदार ज्या शोधक दृष्टीनें पाहतो त्याच दृष्टीनें एखाद्या माणसाकडे पाहण्याची त्यांची जी खोड मला दिसून आली तीमुळें तर मला त्यांच्या सहवासाचा कंटाळा येऊं लागला; आणि जेव्हां त्या आपला पृथुपृथुल देह घुसळीत किंचित् हंसत हंसत अगदीं माझ्याजवळ सरकून बसल्या व फिरून फिरून त्याच त्या शोधक दृष्टीनें मला नखशिखांत न्याहाळूं लागल्या तेव्हां ज्याप्रमाणें एखादा गुन्हेगार आपल्याजवळील एखादी संशयित वस्तु पाहणाऱ्याच्या नजरेपासून लपविण्याची शिकस्त करतो त्याप्रमाणें आपलें अंग चोरून, सांवरून बसतां बसतां व आपल्या-

जवळील कांहीं तरी गुह्य लपविण्याचा प्रयत्न करतां करतां माझी अगदीं त्रेधा उडून गेली. मला त्यांचा त्यावेळीं इतका राग आला होता कीं जर त्यावेळीं गाडी उभी असती तर कांहीं एक विचार न करतां पटकन् त्या डब्यांतून खालीं उतरून मी दुसऱ्या डब्यांत जाऊन बसलें असतें. पण गाडी भरवेगांत असल्यामुळें माझा नाइलाज झाला. तथापि त्यांच्या वागणुकी-संबंधीं मला आलेला राग व माझी तीव्र नापसंती कपाळाला आंठ्या घालून व तोंड झटक्यानें दुसरीकडे फिरवून मी त्यांना दर्शविण्यास कमी केलें नाहीं. पण त्या बाई खऱ्याच लोंचट आणि वस्ताद. मी इतकें करूनहि पुन्हां त्यांनीं आपल्या चौकशीस सुरुवात केलीच.

"तुम्हांला कांहीं दिवसहि गेलेले दिसतात. बाळंतपणासाठीं माहेरला पहिल्याच खेपेला जातां आहांत वाटतं?"

या प्रश्नानें माझ्या विद्ध हृदयाला पुन्हां एक जोराची डागणी बसून मूक आर्ततेनें तें आंतल्या आंत तळमळलें. मोठीं धैर्यवान् माणसेंहि आत्महत्या कां करतात; किंवा हरएक साधनसामुग्रीनें सुसज्ज असलेलीं मोठमोठीं बलाढ्य राष्ट्रेंहि गनिमी काव्यापुढें हार खाऊन एकदम तहास कां कबूल होतात याचें कारण त्यावेळीं मला कळून आलें. त्या प्रश्नास उत्तर देण्यास माझ्या वाचेंत शक्ति राहिली नव्हती. हरहर! काय माझी त्यावेळची लाचार स्थिति! वास्तविक मातृपद हें स्त्रीजातीला भूषणास्पद आहे. मातृत्वानं स्त्रीच्या जन्माचा पांग फिटत असतो. मातृत्वाच्या स्थितीचा उच्चार करतांना स्त्रीला एक प्रकारचा सात्त्विक अभिमान वाटत असतो. पण त्याच अभिमानास्पद स्थितीचा उजळ माथ्यानें उच्चार करण्याची माझ्या दुर्दैवानें मला चोरी झाली होती. त्यांच्या त्या साध्या दिसणाऱ्या प्रश्नानें माझी एकदम अस्वस्थ झालेली मनःस्थिति त्यांच्या लक्षांत आल्यामुळें कांहींशा साशंक विस्मयपूर्ण नजरेनें त्या माझ्याकडे पाहात होत्या. आमची नजरा-नजर होतांच पुढील चौकशीसाठीं पुन्हां त्यांची मुद्रा खुलून येऊन त्यांनीं चौकशीस सुरुवात केली—

"तुमच्याबरोबर सामानसुमानहि कांहीं विशेष दिसत नाहीं? हो, बरोबर घरचं पुरुषमाणूस कोणीतरी असेलच. सामानसुमान असेल त्यांच्याजवळच पुरुषांच्या डब्यांत?" त्यांनीं स्वतःच्या प्रश्नास स्वतःच उत्तर दिलें.

आतां निगरगट्ट झाल्याशिवाय नसती चांभारचौकशी करणाऱ्या या वाचाळ बाईपुढें आपला निभाव लागणार नाहीं अशी माझ्या मनाची खात्री होऊन यापुढें त्यांचें बोलणें मनाला लावून न घेतां त्यांच्या प्रश्नास बेफिकीरपणानें उत्तर देण्याचा निश्चय करून मी सडेतोडपणानें म्हणालें—

" पुरुषमाणूस वगैरे माझ्याबरोबर कोणी नाहीं. मी एकटीच्च प्रवास करीत आहे; आणि दिसतें आहे एवढेंच्च काय तें माझ्याबरोबर सामान आहे. "

माझ्या उत्तरानें त्या आश्चर्यानें आ वासूनच्च माझ्याकडे पाहात राहिल्या. क्षणभरानें आश्चर्याचा भर ओसरल्यानंतर नवल दर्शवीत त्या म्हणाल्या,

" काय बाई ! तुम्हां अलीकडच्या सुधारलेल्या मुलींचं एकेक ऐकावं तें नवलच्च. तुम्ही शिकल्या सवरलेल्या मुली वेळीं अवेळीं असा लांबचा प्रवास बिनदिक्कत स्वच्छंदानं अशा एकेकल्या कसा करतां; नि घरची वडीलधारी माणसं तुम्हांला तशी मोकळीक तरी कशी देतात याचंच्च मला नवल वाटतं. आमच्या वेळेला बायकांना अशी मोकळीक मुळींच्च मिळत नव्हती. मग पोरसवदा तरण्याताठ्या मुलींबद्दल तर विचारूंच्च नका. इतरांची गोष्ट कशाला हवी. आतां सुहासिनीबाई ओघानंच्च आलं म्हणून माझीच्च तरुणपणची हकीकत मी तुम्हांला सांगतें. ती ऐकाल तर तुम्ही खाचित हंसाल. ती सांगीवांगी नाहीं; खरीखुरी घडलेली अनुभवाची गोष्ट आहे. सांगतेंच्च मी तुम्हांला ती. माझ्या लग्नांत मी जरा मोठीच्च होतें म्हटलं तरी चालेल. पंधरा वर्षांची होतें मी. माझं सासर आनंदपूर..... "

त्यांच्या तोंडून ' आनंदपूर ' हें नांव निघतांच्च माझ्याहि तोंडांतून एकदम आश्चर्यानें ' आनंदपूर ! ' असा उद्गार बाहेर पडला. त्याबरोबर त्यांनीं आपलें भाषण अर्धेंच्च थांबविलें व कुतूहलानें त्या मला म्हणाल्या, " कां ? आनंदपूर हें गांव तुमच्या माहितीचं आहे वाटतं ? "

" नाहीं. तसं कांहीं नाहीं. पण हें नांव पूर्वी केव्हांतरी मीं ऐकल्या-सारखं मला वाटलं. " मीं खोटीच्च बतावणी केली. पण माझ्या अंतर्यामीं त्या नांवानें मोठीच्च खळबळ उडवून दिली होती. कसली तरी आपुलकीची अस्पष्ट संवेदना मला त्या नांवासंबंधानें वाटूं लागली. एक प्रकारची करुण संमिश्र हुरहूर अंतःकरणांत जागृत झाली; व त्या नांवाशीं निगडित अस-

लेल्या भूतकालीन अनेक प्रसंगांच्या स्मृतींकडे मन हट्टानें व उतावीळपणानें ओढ घेऊं लागलें. मात्र अंतर्यामीं चाललेल्या या प्रक्षोभाचा लवलेशहि मीं माझ्या मुद्रेवर दिसूं दिला नाहीं. आपली हकीकत त्यांनीं पुढें सांगण्यास सुरुवात केली—

" माझ्या सासरच्या कुटुंबांत माझे पति, सासुसासरे, तिघीजणी नणंदा व मी अशीं आम्ही माणसें होतों. कुटुंब अगदीं बाळबोध वळणाचें होतें. सारीच मंडळी माझ्यावर अत्यंत प्रेम करीत. पण स्वतंत्रता मात्र मला बिलकूल नसे. कधीं तरी देवदर्शनास जाण्याचा प्रसंग आला तरी तिघी नणंदांच्या सक्त पाहाऱ्यांत मला जावं लागे. स्त्रियांना स्वतंत्रता नसावी; त्यांना फाजील मोकळीक दिल्यास त्या बिघडतात, अशा ठाम मताचीं सारींच माणसें होतीं. पण हाडानें मात्र तीं सारींच प्रेमळ व मनमिळाऊ होतीं. एवढ्या बाबतींत माझ्याविषयीं त्यांची अशी सावधगिरीची वागणूक असावी याचा त्यावेळीं मला मोठा जाच वाटत असे. पण हल्लींच्या माझ्या बेलगामी व मायेचा ओलावा नसलेल्या एकलकोंड्या स्वातंत्र्यापेक्षां त्या-वेळचा तो प्रेमळ जाचच शतपटीनं अधिक चांगला होता असं आतां मला वाटत आहे. माझ्या कमनशिबानं माझ्यावर प्रेम करणारी तीं माझीं माणसं दुर्दैवाच्या फेऱ्यांत सांपडून अकालीं कालवश झालीं आणि मी करंटी माणसांनीं गजबजलेल्या या अफाट जगांत असं एकाकी कंटाळवाणं जीवन कंठण्यासाठीं मागं राहिलें आहें." बोलतां बोलतां त्या एकदम गंभीर झाल्या. त्यांचा कंठ दाटून येऊन डोळे पाण्यानें डबडबले.

पुढें त्यांच्या तोंडून जी हकीकत मला समजली तीवरून त्यांचें पूर्वायुष्य खरोखरीच दुःखपर्यवसायी अशा घटनांनींच भरलेलें होतें. त्यांचे आईबाप त्यांच्या लहानपणींच निवर्तले असल्यामुळें लहानपणापासून त्यांचा सांभाळ त्यांच्या मामांनीं केलेला होता. त्यांना बहीण, भाऊ यांपैकीं कोणीच भावंड नव्हतें वयांत आल्यावर त्यांच्या मामांनीं त्यांचा विवाह आनंदपूर येथील दयार्णव धर्मात्मे या नांवाच्या मध्यम स्थितींतील तरुणाशीं लावून दिलेला होता. सांपत्तिक दृष्ट्या त्यांच्या सासरची स्थिति बेताचीच होती. त्यांचे पति आनंदपुरापासून जवळच असलेल्या एका तालुक्याच्या गांवीं कोर्टांत नाझर होते. त्यांच्या लग्नानंतर पुढें थोड्याच वर्षांनीं आनंदपुरांत प्लेगची

साथ येऊन तींत त्यांचे सासुसासरे व तिघी नणंदा एकामागून एक मृत्यु-मुखीं पडल्या होत्या. घरावर कोसळलेल्या त्या आपत्तीचा त्यांच्या पतीच्या मनावर भयंकर परिणाम होऊन तेव्हांपासून त्यांचे पति साधारण अर्धवट बनले होते. तशा स्थितींत ८ १० वर्षांचा काल गेला होता. दरम्यान त्यांना तीन अपत्यें झालीं होतीं. नोकरीवर असतांना एकाएकीं प्रकृति बिघडल्या-मुळें विश्रांतीसाठीं रजा घेऊन त्यांचे पति बायकोमुलांसह एके दिवशीं बैल-गाडींतून आनंदपुरला येण्यास निघाले होते. दिवस पावसाळ्याचे असल्या-मुळें मधूनमधून पाऊस पडत होता. तशा स्थितींत त्यांची बैलगाडी एक मोठा रुंद ओढा ओलांडीत असतां अकस्मात् ओढ्याला मोठा पूर येऊन त्यांत त्यांच्या गाडीला अपघात झाला होता व त्या अपघातांत त्यांचे पति व तिन्हींहि मुलें पुरांत वाहून गेलीं होतीं. आणि दुर्दैवानें त्या एकट्याच त्या भीषण अपघातांतून वांचल्या होत्या.—येथपर्यंतची हकीकत त्यांनीं कशी तरी निवेदन केली. पण दुःखावेगानें ऊर भरून आल्यामुळें त्या थांबल्या होत्या. बराच वेळ सुन्न होऊन एखाद्या वेडसर माणसाच्या निश्चल, भावशून्य नजरेनें त्या बाहेरच पाहात होत्या. शेवटीं बऱ्याच वेळानें त्यांनीं आपली दृष्टि माझ्याकडे वळविली व एक दीर्घ निःश्वास सोडला. कांहीं तरी त्या पुटपुटल्या. मला कांहीं तरी सांगण्याचा त्यांचा मानस दिसला. संवेदनशील श्रोत्याच्या आर्जवी व श्रद्धाळु नजरेनें मी त्यांच्याकडे पाहूं लागतांच पुन्हां त्यांनीं आपली हकीकत पुढें सांगण्यास सुरुवात केली—

" सुहासिनीबाई, दैवी योगायोगानेंच आपली अशा अनपेक्षित ठिकाणीं गांठभेट झाली. धंद्याच्या निमित्तानं आजपर्यंत माझा अनेक स्त्रियांशीं परिचय झाला; पण तुम्हांला पाहिल्यापासून जशी एक प्रकारची आपुलकीची भावना तुमच्याबद्दल माझ्या ठिकाणीं जागृत झाली तशी ती यापूर्वी कोणत्याहि स्त्रीबद्दल झाली नव्हती. त्या भयंकर अपघातांतून ज्यांनीं मला वांचविलें त्यांनींच आनंदपुरला मला सुखरूप पोहोंचतें केलें. त्यावेळीं माझी काय स्थिति झाली होती ! अपघाताचा तो दुर्धर प्रसंग इतक्या अनपेक्षित रीतीनं व इतक्या थोड्या वेळांत घडून आला होता कीं, कांहीं वेळ मला तो खराच वाटला नाहीं. आम्ही सर्व आनंदपुरला आमच्या घरीं सुखरूप पोहोंचलों आहोंत अशीच माझी समजूत होऊन मी माझ्या

मुलांना त्यांच्या लाडक्या नावांनीं हांका मारण्यास सुरुवात केली. इतकी माझी भ्रमिष्टासारखी अवस्था झाली होती. बऱ्याच वेळानं मला वस्तुस्थितीची जाणीव झाली. घटकेपूर्वीं माझ्या ललाटीं शोभणारा सौभाग्यतिलक निष्ठुर दैवानें पुसून टाकला होता. माझ्या तीन गोजिरवाण्या बाळांच्या संगतींत थोड्या वेळापूर्वीं मी आनंदांत दंग झालें होतें; पण तीं माझीं चिमणीं बाळें निर्घृण नियतीनें आतां माझ्यापासून हिरावून नेलीं होतीं व फिरून कधींहि मला तीं दिसणार नव्हतीं. मनोहर रंगछटांनीं खुलून दिसणारं माझ्या संसाराचं चित्र, काळानं पुराचं पाणी सांडून त्याजवरील रंग धुऊन टाकल्यामुळं तें आतां विद्रूप व भेसूर झालं होतं. माझ्यावर दुःखाचा डोंगर कोसळला. तशा स्थितींत मला प्रेमानं जवळ घेणारं व धीराचे चार शब्द सांगणारं माझं मायेचं माणूस कोणी नव्हतं. एका परमेश्वराशिवाय माझं रक्षण करणारं कोण होतं त्यावेळीं ? पण सुहासिनीबाई, काय सांगूं तुम्हांला ! तशा संकटसमयीं श्रीमंत घराण्यांतील एक तरुणी एखाद्या देवतेप्रमाणं माझ्या रक्षणाकरितां धांवली. तिनं मला आपल्या वाड्यांत आश्रय दिला. अमृतमधुर शब्दांनीं माझी परोपरीनं समजूत घालून माझा दुःखभार हलका केला व आपली बहीण म्हणून मला जन्मभर आश्रय देण्याचं आश्वासन दिलं. अहाहा ! केवढं थोर हृदय तें ! जो संसार दुःखमय घटनांनीं घडविल्याबद्दल आपण त्या परमेश्वराला शिव्याशाप देतों त्याच संसारांत अशा पुण्यशील, उदारचरित थोर हृदयाच्या विभूतींना जन्माला घालून तोच परमेश्वर त्याला अमृताची मधुरता आणीत असतो. मानवजातीचा दुःखभार हलका करण्याचं परमेश्वरी कार्य अशाच विभूति करीत असतात. ”

“ अशी देवतातुल्य थोर स्त्री कोण बरं ? अशा परोपकारी स्त्रीचं नांव मला कळेल का ? ” त्यांच्या भाषणांतील त्या थोर स्त्रीच्या उल्लेखामुळें माझी जिज्ञासा अधिकच वाढून मीं प्रश्न केला.

“ कां नाहीं कळणार ? ज्याचा जप आज बारा वर्षें मोठ्या अभिमानानं मी करीत आलें आहें त्या माझ्या मंगलदेवतेच्या नांवाचा उच्चार जो भेटेल त्याच्याजवळ करण्यांत मला धन्यताच वाटेल. ती थोर स्त्री आनंदपूरचे इनामदार श्रीमंत धनंजयराव मुजुमदार यांची कनिष्ठ कन्या डॉ.

सुमतिबाई मुजुमदार ह्या होत. ”

आपल्या उपकारकर्तीच्या नांवाचा उल्लेख करतांना तिच्याबद्दलच्या पूज्यभावनेनें त्यांचें अंतःकरण जणूं ओसंडून वहात होतें. मीहि त्यांनीं उल्लेखिलेलीं तीं तीन नांवें—‘ आनंदपूर, श्रीमंत धनंजयराव मुजुमदार, त्यांच्या कनिष्ठ कन्या डॉ. सुमतिबाई मुजुमदार ’—आळीपाळीनें माझ्या मनांत सारखी घोळवूं लागलें. त्या नांवानीं मला इतकें वेडें करून सोडलें कीं त्यासंबंधीं आणखी कांहींतरी समजून घेण्याची उत्कंठा दाबून ठेवणें मला अशक्य झाल्यामुळें कांहींशा उतावीळपणानें मीं म्हणालें,

“ ह्या डॉ. सुमतिबाई हल्लीं कोठें असतात ! नि तुम्ही आज इकडं कुठं निघालांत ? ”

“ तें सर्वच मी तुम्हांला आतां क्रमाक्रमानं सांगणार आहें. सुमतिबाईंच्या प्रेमळ सहवासांत माझं दुःख हळूहळू कमी होऊं लागलं. सुमतिबाईंची डॉक्टरची परीक्षा पास होऊन त्यावेळीं दोन वर्षें झालीं होतीं. आनंद-पुरांतच खाजगी दवाखाना काढून त्यांनीं आपल्या वैद्यकीय धंद्यास सुरुवात केली होती. त्या अविवाहित राहिल्या होत्या. अविवाहित राहण्याचं कारण असं कीं, मेडिकल कॉलेजांत असतांना त्यांचें कॉलेजमधील एका तरुणावर प्रेम जडलें होतें. त्या तरुणाचेंहि त्यांच्यावर तसेंच अकृत्रिम प्रेम होतें. विवाहाच्या कामीं दोघेंहि एकमेकांस वचनबद्ध झालीं होतीं. पण पुढं त्या तरुणाच्या सनातनी वडिलांनीं सगोत्रीय वधूवरं म्हणून त्यांच्या विवाहास नकार दिला होता. त्या प्रेमभंगामुळं निराश होऊन तेव्हांपासून आजन्म अविवाहित राहण्याचा व एखाद्या लोककल्याणाच्या कार्यास स्वतःस आमरण वाहून घेण्याचा त्यांनीं दृढनिश्चय केला होता. दुसऱ्या एखाद्या अनुरूप तरुणाशीं विवाह करून संसारांत पडण्याबद्दल त्यांच्या मातापित्यांनीं त्यांना पुष्कळ आग्रह करून पाहिला होता, परंतु त्यांनीं आपला निश्चय अढळ ठेवला होता व अंगीकृत कार्यास वाहून घेण्यासाठीं योग्य संधीचीच त्या वाट पाहात होत्या. त्या सुमारास बनारसला एका धनाढ्य व दानशूर गृहस्थानं आपल्या अलोट संपत्तींतून एक मोठा निधि परोपकारार्थ देणगी-च्या रूपानं बाजूला काढून सदर निधींतून सार्वजनिक उपयोगासाठीं एक रुग्णालय धर्मार्थ चालविलें होतें. रुग्णालयाच्या चालकवर्गास सदर रुग्णा-

त्याच्या महिला–विभागासाठीं होतकरू, प्रेमळ, सार्वजनिक कार्याची हौस असणाऱ्या अशा एका तज्ज्ञ डॉक्टरणीची जरूरी होती. सुमतिबाईंची कॉलेजमधील एक सहाध्यायिनी मैत्रीण त्यावेळीं बनारसला राहात होती. तिनें संस्थेच्या चालकांजवळ त्या जागेसाठीं सुमतिबाईंची शिफारस केली होती व ती स्वीकारण्याबद्दल पत्रद्वारें सुमतिबाईंच्या मागें आग्रहपूर्वक सारखा लकडा लावला होता. अखेर मैत्रिणीचा शब्द मोडणें जिवावर येऊन सुमतिबाईंनीं ती जागा स्वीकारण्यास आपली संमति दिली व नेमलेल्या जागेवर हजर होण्यासाठीं मला बरोबर घेऊन त्या बनारसला गेल्या.

बनारसला गेल्यावर थोड्याच दिवसांत आपल्या प्रेमळ, मनमिळाऊ स्वभावामुळं, अंगच्या सौजन्य, विनयादि गुणांमुळं व वैद्यकीय ज्ञानांतलि आपल्या प्रावीण्यामुळं त्या सर्वांना हव्याशा वाटूं लागल्या. त्यांच्या दैवी हातगुणांविषयीं जिकडं तिकडं बोलबाला होऊं लागला. समस्त महिला वर्गास तर अबलांचीं दुःखं हरण करण्यासाठीं परमेश्वरानं पाठविलेल्या एखाद्या देवतेसारख्या त्या वाटूं लागल्या. संस्थेच्या चालकांत त्यांच्याविषयीं नितांत आदरबुद्धि निर्माण होऊन त्यामुळं त्यांची उत्तरोत्तर बढती होत गेली. एवंच थोड्याच काळांत धन आणि लौकिक या बाबतींत त्यांचा उत्कृष्ट जम बसला.

रुग्णालयांत स्त्रीरोग्यांच्या शुश्रूषेसाठीं ज्या नर्स होत्या त्या प्रत्येकीच्या हाताखालीं मदतनीस म्हणून प्रथम थोडे थोडे दिवस आळीपाळीनें सुमतिबाईंनीं मला काम करण्यास लावलं. याप्रमाणं दोन वर्षं काम केल्यानंतर नर्सिंगच्या कामाचा मला चांगला अनुभव मिळाला. दरम्यान नर्सिंगच्या कोर्सला लागणारें आवश्यक तें शिक्षण मला देऊन सुमतिबाईंनीं तो कोर्स माझ्याकडून पुरा करविला. यथाकाळीं मी नर्सची परीक्षा पास झालें व नर्स म्हणून स्वतंत्रपणें काम पाहूं लागलें. सुमतिबाईंच्या आदर्श व्यक्तिमत्वाची छाप माझ्यावर पडली असल्यामुळं पुढं थोड्याच काळांत उत्तम नर्स म्हणून माझी सर्वांकडून प्रशंसा होऊं लागली. अर्थात् त्याचं सर्व श्रेय सुमतिबाईंच्या कर्तबगारीलाच होतं. माझा जन्म सार्थकीं लागल्याबद्दल त्यांना आनंदानं अस्मान ठेंगणं वाटूं लागलं. माझ्या कामांतील आस्थेवाईकपणाबद्दल, प्रेमळ

स्वभावाबद्दल व विनयशील वागणुकीबद्दल ज्याच्या त्याच्याजवळ त्या माझी मुक्तकंठानं स्तुति करीत असत. त्यामुळं मला माझ्या अंगावर मूठभर मांस चढल्यासारखं वाटत असे व त्यांच्या प्रोत्साहनामुळं आपलं कर्तव्य अधिक तत्परतेनं बजाविण्यास मला एक प्रकारचा हुरूप येई. अशा तऱ्हेनं लोकसेवेच्या कार्याची नवीन दिशा त्यांनीं माझ्या आयुष्यास दाखवून दिल्यामुळं व त्या मार्गानं कार्य करण्यांत माझा बहुतेक सारा वेळ खर्च होऊं लागल्यामुळं माझ्या सांसारिक गतदुःखांची मला हळूहळू विस्मृति पडूं लागली. आणि ज्या ज्या वेळीं माझ्या दुःखांची मला आठवण होत असे त्या त्या वेळीं सुमतिबाईंचं आदर्श चरित्र माझ्या डोळ्यांपुढं उभं राहात असे. मुसमुसलेलं तारुण्य, रतितुल्य रूपसंपदा, वैभवसंपन्न गृहपरिस्थिति व मस्तकावर सरस्वतीचा पूर्ण वरदहस्त अशा सर्व गोष्टींची अनुकूलता असतांहि मनानं निवडलेल्या जन्माच्या जोडीदाराची संगत दुर्दैवानं लाभली नाहीं एवढ्यावरून दिव्य आत्मसंयमनानं जिनं आपल्या सर्व यौवनसुलभ वासनांचा होम केला व ऐहिक सुखविलास तुच्छ लेखून लोकसेवेच्या खडतर कार्यास तिनं आपणांस आमरण वाहून घेतलं, ती कर्मयोगिनी त्यागमूर्ति मला अहर्निश मार्गदर्शन करीत असतांना स्वतःच्या वैयक्तिक सुखदुःखांच्या विचारांतच मन गुरफटून जाऊन त्यास स्वकर्तव्याचा विसर पडावा याची माझी मलाच खंत वाटत असे व माझें मन पुन्हां कर्तव्याभिमुख होत असे.

सुमतिबाईंच्या सार्वजनिक कार्याचा व्याप हळूहळू वाढूं लागला. पुढं दोनतीन वर्षांनींच त्यांनीं स्वतःच्या मालकीची 'पूर्णानंद प्रसूति-गृह' नांवाची संस्था स्थापन केली व तिच्या देखरेखीचं काम माझ्याकडं सोंपविलं. तेव्हांपासून आजतागायत सदर संस्थेंत प्रमुख रुग्णपरिचारिका म्हणून मी काम पाहात आहें. आज ही संस्था सुमतिबाईंच्या सार्वजनिक कार्यांतील निष्ठावंत तत्परतेचें जिवंत स्मारकच आहे.

सत्कर्माचरणापासून माणसाला लाभणाऱ्या समाधानाच्या आनंदाची माधुरी कांहीं औरच असते. असल्याच निर्भेळ आनंदाचा आस्वाद सदर संस्थेंत काम करीत असतांना मला नित्य चाखायला मिळतो. संस्थेंतील

माझ्या धर्मकन्यांची, धर्मभगिनींची मनोभावें सेवा करण्यांत मला जसा एकप्रकारचा अनिर्वचनीय उल्हास वाटतो तसा तो स्वतःचीं संसार-विषयक कर्तव्यें बजावितांनादेखील मला वाटला नसता. एवढी माझ्या मनावर संस्थेची आज मोहिनी पडली आहे. आणि म्हणूनच तिच्या सेवेला मी स्वतःला आमरण वाहून घेतलें आहे. मायाममतेचा पाश या जगांत परमेश्वरानं मला कसलाहि ठेवलेला नाहीं. आनंदपूरला माझ्या पतींची थोडीशी स्थावर मिळकत होती. परंतु आपलं उर्वरित आयुष्य बनारसलाच सदर संस्थेच्या सेवेंत व्यतीत करण्याचा माझा संकल्प असल्यामुळं सदर मिळकतीची विल्हेवाट लावण्यासाठींच मी १५ दिवसांपूर्वीं इकडं आनंद-पूरला आलें होतें. तो व्यवहार पुरा करून मी आज बनारसला परत निघालें आहें. संस्थेच्या कांहीं जरुरीच्या कामानिमित्त एक दिवस मुंबईस थांबून नंतर मी पुढं जाणार आहें. माझ्या जीवनाची आतांपर्यंतची कर्म-कहाणी ही अशी आहे. सुहासिनीबाई, मी एक हतभागिनी स्त्री खरी; पण त्या किमयागारिणीनं या वत्सलाबाईच्या मातीमोल झालेल्या आयुष्याचं सोनं करून दाखविलं. त्या देवतेच्या कृपादृष्टीनं आज मला ही स्थिति प्राप्त झाली आहे. ” मी आतांपर्यंत त्यांचें भाषण लक्षपूर्वक ऐकत होतें. मूर्ति-मंत कृतज्ञता त्यांच्या शब्दाशब्दांत अवतीर्ण झालेली होती. त्यांनीं आतां-पर्यंत कथन केलेल्या त्यांच्या जीवनवृत्तान्तानें मला अगदीं तल्लीन करून सोडलें होतें. विशेषतः आपली हकीकत सांगत असतांना त्यांनीं मधून मधून सुमतिबाईच्या नांवाचा जो गौरवपूर्ण उल्लेख केला त्यामुळें तर त्या नांवा-विषयीं माझ्या मनांत कुतूहल, आदर, प्रेम, आशा, निराशा अशा परस्पर-विरोधी भावना एकामागून एक निर्माण होऊन त्यांनीं मला अगदीं बेचैन करून सोडलें. तशाच भांबावलेल्या व कांहींशा बेभान मनःस्थितींत मी विचारांत मग्न झालें असल्यामुळें त्यांनीं आपलें बोलणें थांबविलें असल्याचें, कुठल्याशा स्टेशनवर गाडी उभी असल्याचें, व उतारूंच्या कोलाहलानें सगळा प्लॅटफॉर्म भरून गेला असल्याचें बराच वेळ माझ्या लक्षांत आलें नाहीं. विचारमग्न स्थितींत माझ्या बालपणचे एक एक प्रसंग मी आठवूं लागलें. आठवतां आठवतां अशाच एका प्रसंगाची मला आठवण झाली.

पंधरा वर्षांपूर्वींची गोष्ट. त्यावेळीं मी साधारण आठ वर्षांची होतें व

आईबरोबर एकदां आनंदपुरला माझ्या आजोळीं गेलें होतें. आजोळीं मी सर्वांचीच लाडकी होतें. पण त्यांतल्या त्यांत माझी धाकटी मावशी माझा अत्यंत लाड करीत असे. मलाहि त्यामुळें मावशीचा अत्यंत लळा लागलेला होता. एकदां आई व मावशी अशाच बोलत बसल्या होत्या व मी लडिवाळपणानें मावशीच्या गळ्यांत दोन्ही हात अडकवून तिच्याशीं दांडगाई करीत होतें. कृतककोपानें मावशी मला वरचेवर दूर ढकलीत होती. असें बराच वेळ आमचें चाललें होतें. पण अखेर मी लगट करून मावशीच्या गळ्यास दोन्ही हातांचा घट्ट विळखा घातला होता. माझी मिठी सोडविण्याचा तिनें निष्फळ प्रयत्न केला होता. अखेरीस मला तशीच आपल्या पोटाशीं घट्ट धरून प्रेमभरानें माझें चुंबन घेत ती आईला म्हणाली होती—

" ताई, तुझी एवढी चिमुरडी मला देऊन टाक. "

" असली खट्याळ पोरगी तुला आवडत असल्यास घे बापडी. हिच्या खोडकरपणामुळं मला तर ही अगदीं नकोशी झाली आहे. " माझ्यावरील उसन्या रागानें आई म्हणाली होती.

" बरं ! बरं ! झालें तर झालें. मी आपली मावशीजवळच राहीन. तुझ्याकडं कध्धीं कध्धीं येणार नाहीं. " रागानें मी आईला म्हणालें होतें. यानंतर थोड्याच दिवसांनीं मावशी शिक्षणासाठीं कुठें तरी परगांवीं निघाली होती. सुमामावशीबरोबर जाण्याचा मी हट्ट घेऊन बसलें होतें. मावशीनें माझी पुष्कळ समजूत करून पाहिली होती पण मला ती पटली नव्हती. अखेरीस मी झोंपल्यावर मला चुकवून मावशी निघून गेली होती. मला अत्यंत दुःख होऊन त्यावेळीं मी रडरड रडलें होतें.

त्या गतकालच्या प्रसंगाच्या आठवणीनें माझें अंतःकरण दुःखानें भरून आलें. त्यावेळीं माझ्यावर प्राणापलीकडे प्रेम करणारी माझी मावशी माझ्या दुर्दैवानें मला आतां दुरावली होती व आजन्म फिरून तिची भेट होण्याची मला मुळींच आशा नव्हती. तिच्या भेटीची आशा तर दूरच राहिली पण तिच्यासंबंधीं राजरोसपणं नुसती शाब्दिक विचारपूस करण्याचें समाधानहि सांप्रतच्या आपल्या स्थितीमुळें आपणांस लाभूं नये या जाणिवेनें माझें अंतःकरण पिळवटून निघालें. डोळ्यांत नकळत अश्रू उभे राहून हळू हळू ते गालांवर ठिपकूं लागले. दुःखातिशयानें देहभान विसरून मी थोडा वेळ

मूकरुदन करीत होतें. पण इतक्यांत गाडी चालू झाल्यामुळें त्या बाईंनीं आपली बाहेरची दृष्टि पूर्ववत् माझ्याकडे वळविली. माझ्या लक्षांत तें येतांच मी चटकन् भानावर आलें व आपली शोकाकुल मनःस्थिति त्यांना कळूं नये म्हणून वाऱ्यानें डोळ्यांत धूलिकण गेल्याचें निमित्त करुन मीं पदरानें झटकन् डोळे पुसून कोरडे केले व त्यांच्याकडे पाहून मुद्रेवर लटकेंच हास्य उमटविण्याचा आव आणला.

वत्सलाबाईंची मुद्रा अत्यंत गंभीर दिसत होती. किंचित् विषण्णतेची छटाहि तिच्यावर स्थिरावली होती. कसल्या तरी आगामी गंभीर प्रसंगाचा विचार त्यावेळीं त्यांच्या मनांत घोळत असावा. आत्यंतिक असहाय्यतेनें त्यांची दृष्टि सुस्तावल्यासारखी झाली होती. थोड्या वेळानें एक दीर्घ सुस्कारा सोडून किंचित् रुद्ध कंठानें त्या मला म्हणाल्या—

“ सुहासिनीबाई, कांहींतरी दैवी योगायोग म्हणूनच तुमची व माझी आज अशा अनपेक्षित ठिकाणीं गांठभेट झाली. पण आतां थोड्या वेळांत आपली ताटातूट होणार ! तुमचा व माझा मार्ग वेगवेगळा होणार ! कां कुणास ठाऊक पण मघांपासून हा विचार मनांत येऊन पोटांत कसं कालवून येत आहे. काय सांगूं तुम्हांला ? तुमचा परिचय झाल्यापासून तुमच्याविषयीं कसली तरी आंतरिक ओढ माझ्या मनाला सारखी लागून राहिली आहे. वाटतं कीं, तुम्हांला सोडून क्षणभरसुद्धां दूर राहूं नये ! इतकी आपुलकी एकाएकीं तुमच्याविषयीं मला कां बरं वाटूं लागली ? पूर्वजन्मींचा तुमचा माझा कांहीं ऋणानुबंध तर नसेल ना ? तुमच्यासारखी एखादी जरी कन्या परमेश्वरानं मला ठेविली असती तरी त्या मायेच्या पाशांत मी त्रिभुवनांतलीं दुःखं विसरलें असतें. पण तेवढं भाग्य विधात्यानं माझ्या ललाटीं लिहिलं नाहीं; म्हणून तर संसारांतील खडतर जीवनयात्रा अशी एकाकी करण्याचं माझ्या नशिबीं आलं आहे. बाकी भवसागराच्या अस्थिर परिस्थितीच्या पृष्ठभागावर तरंगणारे मनुष्यमात्राचे सहवासबुद्बुद असेच क्षणभंगुर नाहींत का ? कालप्रवाहाबरोबर यदृच्छेनं त्यांनीं एका ठिकाणीं यायचं आणि नंतर एकमेकांपासून कुठं तरी दूर दूर जाऊन त्या अनंतकालाच्या पोटांत विलीन व्हायचं... ” त्यांचे डोळे पाणावले. हृदय भरुन आल्यामुळें त्या बोलतां बोलतां थांबल्या. त्यांच्या भावनास्पर्शी भाषणानें माझेंहि

अनुक्रम २९३५९१
विभाग ....
क्रमांक १५५७
ता. दि.
वाचनालय शाखा

अंतःकरण सहसंवेदनेनें कळवळून आलें. भूतमात्रांच्या ऐहिक समागमाच्या क्षणभंगुरतेसंबंधीं नुकत्याच आपल्या भाषणांत त्यांनीं केलेल्या उल्लेखामुळें माझ्या विद्ध अंतःकरणाची जखम डिवचली जाऊन तिच्या वेदना मला पुन्हां विव्हल करूं लागल्या. त्यांच्या उक्तीची सत्यता मला स्वानुभवानें पटली. कारण आतांपर्यंतच्या माझ्या आयुष्यांत मला हाच अनुभव नव्हता का आला? लहानपणीं अनुभविलेल्या मावशीच्या प्रेमळ सहवाससुखाला मी आतां कायमची पारखी झालें नव्हतें का? आणि अगदीं अलीकडेच वढून आलेला आमचा प्रेमसंबंध असाच क्षणजीवी ठरून नुकतीच माझी व माझ्या प्रियकराची झालेली ताटातूट आतां कायमचीच नव्हती का? या दोन्हीहि घटनेच्या दुःखद आठवणी माझ्या मनांत पुन्हां ताज्या झाल्या. पराकाष्ठेची विषण्णता माझ्या मुद्रेवर पसरली व लवकरच मला रडूं कोसळतें कीं काय असें वाटूं लागलें. एकाएकीं झालेली माझी अशी विषण्णावस्था त्यांच्या लक्षांत आली असावी. आपलें बोलणें अप्रासंगिक झालें कीं काय ही शंका मनांत येऊन त्या खजिल झाल्यासारख्या मला दिसल्या. आपल्या आयुष्याचें रडगाणें ऐकवून उगाच एखाद्याच्या आनंदी, अमृतमधुर जीवनसंगीतांत निराशेचे बदसूर मिसळून त्याची माधुरी नष्ट करण्यांत आपल्या हातून खरोखरच विघ्नसंतोषीपणाची मोठी चूक झाली ही टोचणी त्यांच्या मनाला आंतून बोचत असावी. कारण हातून नकळत अपराध घडलेल्या एखाद्या समंजस माणसाच्या मुद्रेवर दिसावी तशी दिलगिरीची छटा त्यांच्या मुद्रेवर स्पष्ट उमटलेली दिसत होती. म्हणून चूक सुधारणेच्या उद्देशानें त्यांनीं आपल्या भाषणाचा ओघ तात्काळ बदलला व मला खुलविण्याच्या हेतूनें त्या म्हणाल्या—

“ सुहासिनीबाई, आजचा आपला हा भेटीचा प्रसंग यावज्जन्म मी विसरणार नाहीं. केवळ योगायोगानं झालेली आपली ओळख यापुढं परस्परांविषयींच्या अनन्यसाधारण स्नेहांत परिणत व्हावी व ती आमरण टिकावी अशी माझी उत्कट इच्छा आहे; आणि तुमच्या सौजन्यशील स्वभावामुळं ती पूर्ण होईल अशी माझी खात्री आहे. सुहासिनीबाई, तुमच्या रूपानं मूर्तिमंत भाग्यलक्ष्मीचं दर्शन आज मला घडत आहे. आज तुमचे यजमान तुमच्याबरोबर असते तर लक्ष्मीनारायणाची जोडी मला

अनायासें पहायला मिळाली असती. तथापि आपल्या बिऱ्हाडीं पोहोंचल्या-वर सवडीनुसार तुम्ही ज्यावेळीं आपल्या यजमानास खुशालीचं पत्र लिहाल त्यावेळीं त्यांत आपल्या आजच्या भेटीचा उल्लेख करण्यास विसरूं नका; आतां लवकरच तुम्ही मातृपदारूढ होणार. तुम्हांला सुंदर पुत्ररत्नाचा लाभ होईल अशी माझी आपली अटकळ आहे. ती खरी ठरल्यास बारशास हजर राहण्याचें मला आमंत्रण धाडा. अवश्य येईन अं मी ! ”

हें बोलत असतां मधून मधून त्या अगदीं मनापासून हंसत होत्या. भाबड्या बिचाऱ्या वत्सलाबाई ! माझ्या ठिकाणीं क्षणैक उत्पन्न झालेलें औदासीन्य घालविण्याच्या हेतूनें प्रणयी स्त्रीपुरुषांच्या मनाची खुलावट साधारणपणें ज्या विषयानें होते असाच विषय त्यांनीं मुद्दाम .काढला होता. पण त्याच विषयानें माझ्या हळव्या अंतःकरणावर केवढा प्राणांतिक आघात केला याची कल्पना त्या बिचारीला कोठून असणार ? त्या भयंकर आघा-ताच्या वेदना असह्य होऊन माझें हृदय तडफडलें. शरीराच्या मर्मस्थानावर एखादें गळू उद्भवून तें पक्वदशेला येऊन ठणकत असावें आणि तशाच स्थितींत त्याला अवचित कोणाचा तरी जोराचा धक्का लागावा म्हणजे जसा जीव कासावीस होतो अगदीं तशी स्थिति त्यावेळीं माझ्या दुःखजर्जर हृदयाची झाली. आपली सांप्रतची लाचार स्थिति, निराशामय झालेली जीवनदृष्टि व एखाद्या परित्यक्तेसारखा यापुढें आपणांस एकाकी कंठावा लागणारा अंधःकारमय भविष्यकाल या संबंधींचे विचार फिरून माझ्या मनांत प्रज्वलित झाले व त्या भडकलेल्या विचारानलाच्या कढानें आतांपर्यंत हृदय-पात्रांत मनोनिग्रहाच्या घट्ट झांकणाखालीं दडपून टाकलेला आतांपर्यंतच्या माझ्या अपेशी जीवनांतील दुर्दैवी घटनांचा कडू काढा जोरानें उकळला जाऊन उतास आला; व अखेर त्यानें हृदयपात्रावरील मनोनिग्रहाचें झांकण ताडकन् उडवून देऊन मुखावाटें दुःखोद्गाराच्या रूपानें उसळून बाहेर पडला. दुःखावेगानें ‘ मावशी ! मावशी ग ! ’ अशी करुण स्वरानें विव्ह-ळून हांक मारून असहाय्यपणें मीं आपलें मस्तक त्यांच्या मांडीवर टेकलें व स्फुंदून स्फुंदून रडूं लागलें.

एकाएकीं माझी अशी विकलावस्था कां झाली याची वत्सलाबाईंना कल्पना नसल्यामुळें त्या प्रथम घाबरूनच गेल्या व आपल्या मांडीवरील

माझ्या मस्तकावर हलकेंच आपला डावा हात ठेवून करुणार्द्र दृष्टीनें माझ्या तोंडाकडे पाहात म्हणाल्या—

" सुहासिनीबाई, काय झाल हो ! कांहीं दुखतंय् का ? " मी त्यांच्या-कडे अगतिक दृष्टीनं पाहिलं. तशा त्या अधिकच प्रेमळपणानें म्हणाल्या,

" मला सांगणार नाहींत का आपलं दुःख ? मला वाटतं तुम्हांला कांहींतरी मानसिक दुःख त्रास देत आहे. सांगा, सांगा ना कसला त्रास होतोय् तुम्हांला तें ? "

" वत्सलाबाई, तुमच्याप्रमाणेंच मीहि एक दुर्दैवी स्त्री आहें. माझं आयुष्य मातीमोल करणाऱ्या त्या दुःखद घटनेचा उच्चार मला कशाला करायला लावतां ? आतां यापुढील माझं आयुष्य जगाला दुर्दैवाचीं निर-निराळीं प्रात्याक्षिकें दाखविण्यासाठींच त्या लीलालाघवी परमेश्वरानं राखून ठेविलं आहे." हें बोलतांना दुःखाचा एक आवंढा येऊन मला पुढें बोलवे-नासें झालें. माझें हें संदिग्ध भाषण ऐकून त्या विस्मयपूर्ण आतुरतेनें माझ्याकडे पाहूं लागल्या. त्यावर काय करावें हें मलाच समजेना. आपली सारी हकीकत त्यांना सांगावी कीं कांहींच बोलूं नये अशा अनिश्चिततेच्या दोलायमान मनःस्थितींत मी क्षणभर घोटाळलें. पण माझ्याविषयीं आतां-पर्यंत त्यांनीं दाखविलेली कळकळ व आपल्या जीवनाची करुण कहाणी मला मनमोकळेपणानें कथन करण्यांत दिसून आलेला माझ्याविषयींचा त्यांचा आत्मीय भाव हीं लक्षांत घेतां आपल्या हृदयस्थ दुःखाचें कारण त्यांच्या-पासून गुप्त ठेवण्यांत आपण त्यांच्यासारख्या सरळ स्वभावाच्या, भाबड्या, सहृदय जीवाशीं प्रतारणा करीत आहोंत अशी नैतिक टोचणी माझ्या मनाला आंतून बोचूं लागली. शेवटीं मनाचा निर्धार करून आमच्या प्रणय-प्रसंगाची दुःखान्त कहाणी मी त्यांना थोडक्यांत इत्थंभूत निवेदन केली. अर्थात् ती निवेदितांना माझ्या जीवाला काय यातना झाल्या असतील त्या माझ्या मलाच ठाऊक. माझी हकीकत त्या एकाग्र चित्तानें ऐकत होत्या. मधून मधून सहृदयतेनें त्यांचेहि डोळे ओलावले जात होते. शेवटीं माझा वाक्प्रवाह आपल्या मार्गातील विविध भावनांच्या चढउतारांवरून वहात निवेदनाच्या निराशामय काळ्याकुट्ट अंतांत विलीन झाला.

माझी करुण कहाणी ऐकून दुःखातिशयानें त्या प्रेमळ माउलीची अगदीं

वेड्यासारखी स्थिति झाली. माझें डोकें आपल्या मांडीवर घेऊन जडमूढ स्थितींत त्या अश्रुपूर्ण नेत्रांनीं माझ्या तोंडाकडे नुसत्या पाहात राहिल्या. कसल्या तरी विचारांत त्या गुरफटलेल्या मला दिसल्या. थोडा वेळ अशा स्थितींत गेल्यावर एकदम कशाचें तरी स्मरण झाल्यासारखें करून अत्यंत आर्जवी स्वरांत त्या म्हणाल्या—

" सुहासिनीबाई, झाल्यागेल्या गोष्टीबद्दल आतां अधिक वाईट वाटून घेण्यांत काय बरं अर्थ आहे ? आपल्या प्रियकराच्या सुखाकरतां तुम्ही जशा प्रकारच्या दिव्य त्यागाचं धैर्य दाखविलंत तशाच धैर्यानं भावी कालांत तुम्ही आतां वागायला हवं. प्रियकरासाठीं तुम्ही केलेल्या अलौकिक स्वार्थत्यागामुळें मला खरोखर तुमच्याबद्दल अत्यंत आदर वाटत आहे. आणि म्हणूनच तुमच्या भावी आयुष्यांतील कसल्याहि बिकट प्रसंगीं ही वत्सलाबाई तुम्हांला वाटेल ती मदत करील; पण अगोदर मला तुमच्याकडून एका गोष्टीचा उलगडा करून घ्यायचा आहे. तुमची अशी दुःखविकल स्थिति होण्यापूर्वीं भावनातिरेकानं तुमच्या तोंडून ' मावशी ! मावशी ग ! ' असा करुणोद्गार एकदम बाहेर पडला होता. दुःखाच्या परमावधीच्या वेळीं माणसाला त्याच्या अत्यंत प्रिय व्यक्तीची आठवण होत असते. तुम्हांला तुमच्या मावशीची आठवण झाली यावरून तुमच्यावर तुमच्या मावशीचं अनन्यसाधारण प्रेम असावं. तसं असेल तर दुःखाची विस्मृति पडण्यास सांप्रत तुम्हांला तुमच्या मावशीसारख्या प्रेमळ माणसाच्या सहवासाची अत्यंत जरूरी आहे; व तुमची इच्छा असल्यास मी तुम्हांला तुमच्या मावशीकडं पोहोंचती करीन. तर मग मला सांगा तुमच्या मावशी कोण ? व हल्लीं त्या कुठं असतात ?"

" पण माझ्या सध्यांच्या स्थितीचं कारण माझ्या मावशीला कळल्यावर ती तरी मला उदार मनानं आश्रय देईल का ? " हताशपणानें मी म्हणालें.

" स्त्रियांच्या बाबतींत सरासच अनुदारवृत्ति दाखविणाऱ्या पक्षपाती समाजाबद्दल थोर हृदयाच्या प्रत्येक स्त्रीला तिरस्कार वाटल्यावांचून राहणार नाहीं. तुमच्या मावशी खरोखरच थोर हृदयाच्या असतील तर त्यांना तुमच्याबद्दल खात्रीनं सहानुभूतीच वाटेल. "

" तर मग माझ्या मावशी कोण व त्या हल्लीं कुठं असतात हें सारं तुम्हांला माहीत आहे. " मी एक जड सुस्कारा टाकून म्हटलें.

" म्हणजे ! " विस्मयाचा एक धक्का बसल्यासारखें करून त्या म्हणाल्या. " ज्यांच्या ध्येयनिष्ठ जीवनाची, थोर कर्तबगारीची व निष्कलंक चारित्र्याची तुम्हीं आतांपर्यंत माझ्याजवळ मुक्तकंठानें मनमुराद स्तुति केलीत त्या डॉ. सुमतिबाई मुजुमदार ह्याच माझ्या मावशी होत. " हें प्रगट करतांना माझ्या तशा असहाय्य स्थितींतहि माझ्या मुद्रेवर अभिमानाचा भाव चमकल्याशिवाय राहिला नाहीं. माझ्या त्या भाषणानें त्यांचा विस्मय इतका परमावधीला पोहोंचला कीं थोडा वेळ त्यांच्या देहाची चलनवलनादि क्रिया बंद पडल्यासारखी होऊन नुसत्या 'आ' वासूनच त्या माझ्याकडे पाहात राहिल्या. थोड्या वेळानें विस्मयाचा भर ओसरल्यावर एखादी प्रेमळ माता ज्याप्रमाणें आपल्या बराच वेळ दुर्लक्षिलेल्या वत्साला पाहतांच निर्भर वात्सल्यानें त्याला चटकन् उचलून पोटाशीं धरते त्याप्रमाणें त्यांनीं मला सप्रेम कौतुकानें आपल्या हृदयाशीं घट्ट कवटाळून धरलें. पण लगेच त्या मनांत एकदम चरकल्या. माझ्या देहाच्या स्पर्शानें त्यांच्या देहाला एकदम चटका बसल्यासारखें झालें. घाबरून जाऊन त्यांनीं माझ्या कपाळावर, छातीजवळ आपला हात ठेवून पाहिला. कमलापुरांत घडलेल्या त्या अप्रिय प्रसंगापासून दोन दिवसांच्या शारीरिक व मानसिक त्रासामुळें माझ्या अंगांत सणसणून ताप भरला होता. त्यांनीं माझ्या तोंडाकडे निरखून पाहिलें. फणफणत्या तापानें माझा चेहरा लालबुंद झाला होता. तापाची गुंगी माझ्या डोळ्यांवर येत चालली होती. त्यांनीं मला आपल्या कुशीजवळ घेतलें व ममतेनें माझ्या कपाळावर हलकेंच आपल्या हातानें थोपटण्यास सुरुवात केली. थोड्या वेळानें तापाच्या अंमलांत मी कांहीं तरी बरळूं लागतांना त्या मला आपल्या कुशींत जास्त बिलगून घेत असतांनाच 'मावशी, मावशी ग' असें अस्पष्ट पुटपुटत असतांनाच माझी शुद्ध हरपली.

* * *

सुमारें सातआठ दिवसांनंतर माझा ताप पूर्ण उतरल्यावर मी शुद्धीवर येऊन सभोंवार दृष्टि टाकली. एका प्रासादतुल्य बंगल्याच्या प्रशस्त व हवेशीर दालनांत पांढऱ्या शुभ्र पलंगपोसानें आच्छादिलेल्या मऊ गादीच्या एका पलंगावर मला निजविलें असून एखाद्या दिव्य तपस्विनीसारखी शोभणारी माझ्या मावशीची प्रसन्न तेजोमयी मूर्ति हास्यवदनानें माझ्यावर आपल्या

शीतल दृष्टींतून प्रेमामृतधारांचा वर्षाव करीत माझ्यासन्निध उभी असलेली माझ्या दृष्टीस पडली. माझे ओंठ कांहीं तरी बोलण्यासाठीं थरथरूं लागले.

" हं, बोलायचा त्रास घ्यायचा नाहीं. ओळखलंस ना मला. तुझी मावशीच आहें बरं मीं." मावशी माझ्या उशाशीं बसून हलकेंच मला थोपटत म्हणाली. पण मला राहवेना,

" मावशी, तूं नाहीं ना माझ्यावर रागावणार ? " असें म्हणून मी ओक्साबोक्सी रडूं लागलें.

" नाहीं बरं बाळ. मी तुझ्यावर मुळींच रागावणार नाहीं. बाळ, झाल्यागेल्या गोष्टींबद्दल तूं आतां आपल्या मनाला बिलकूल वाईट वाटून घेऊं नकोस बरं ! वत्सलाबाईंच्या तोंडून मला सर्व कांहीं समजलं आहे. तुझ्याबद्दल मला थोडासुद्धां अनादर वाटत नाहीं. आतां स्वस्थ झोंप घे. तापाच्या अशक्तपणामुळं तुला सांप्रत विश्रांतीची अत्यंत जरूरी आहे. "

किती विशाल व उदार माझ्या मावशीचं हृदय ! तिच्या अमृतमय वाणीनें माझा शारीरिक, मानसिक आजार पार पार नाहींसा झाल्यासारखें वाटून माझें मन प्रसन्न झालें. आपल्या पावित्र्याविषयीं प्रभु रामचंद्रजींनीं शंका घेतल्यामुळें विषण्ण झालेल्या सीतादेवीच्या मनाला, स्वतः अग्नि-नारायणानें प्रगट होऊन आपल्या शुद्धतेचा निर्वाळा दिल्यावर जें दिव्य समाधान लाभलें असेल तशाच प्रकारचें समाधान मावशीच्या प्रेमळ सांत्वनानें माझ्या मनाला वाटलें.

माझ्या आजारीपणांत मावशीचें अहोरात्र माझ्यावरील ममतेचें शीतल छत्र व वत्सलाबाईंची जिव्हाळ्याची शुश्रूषा यामुळें मी आजारांतून लवकरच बरी होऊन माझी प्रकृति झपाट्यानें सुधारूं लागली व थोड्याच दिवसांत ती पूर्वीप्रमाणें झाली. वत्सलाबाईंनीं आजारीपणांत जन्मदात्या आईप्रमाणें माझी सेवा केलीच; परंतु त्यापूर्वीं आगगाडींत मी त्यांच्या कुशींत बेशुद्ध झाल्यानंतर मला तशा स्थितींत बनारसला मावशीकडे घेऊन जातांना प्रवासांत त्यांना जे कष्ट सोसावे लागले व ज्या आपत्तींना तोंड द्यावें लागलें त्याबद्दलची सारी हकीकत नंतर मावशीच्या तोंडून जेव्हां मला समजली तेव्हां त्या माउलीच्या उपकाराबद्दल माझ्या अंतःकरणांत कृतज्ञतेचा महापूर वाहूं लागला. ते उपकार एवढे मोठे होते कीं शंभरदां जन्म घेऊनहि

मला ते फिटण्यासारखे नव्हते.

मावशीच्या धंद्यांतील प्राविण्याबद्दलच्या लौकिकामुळं तिच्या 'पूर्णानंद प्रसूतिगृह' या संस्थेच्या कार्याचा व्याप अलीकडे इतका बेसुमार वाढला होता कीं संस्थेच्या रोजच्या महत्त्वाच्या कामकाजांतून डोकें वर काढण्यास तिला दिवसांतून फारच थोडी फुरसत मिळत असे. बिचाऱ्या वत्सलाबाई तर संस्थेच्या दैनंदिन कार्यांत सतत निरलसपणें गढून गेलेल्या दिसत असत व त्यांच्या कर्तव्योन्मुख जीवाला त्यांतच ब्रह्मानंद वाटत असे.

मी पूर्वीप्रमाणें हिंडूं फिरूं लागल्यावर संस्थेचीं जीं महत्त्वाचीं कामें मावशीला स्वतः जातीनें पाहावीं लागत त्यांपैकीं कांहीं थोड्या कामांची माहिती मला दररोज देण्यास मावशीनें सुरुवात केली. तसें करण्यांत, माझें मन कांहीं तरी कार्यांत गुंतून जाऊन मला माझ्या गतदुःखांची विस्मृति पडावी व माझ्या विमनस्क मनाला विरंगुळा पडावा हाच तिचा प्रेमळ हेतु होता. आणि तो नंतर कांहीं दिवसांनीं सफलहि झाला. कारण जीं कामें मी मावशीच्या सहाय्यानें करीत होतें तीं पुढें कांहीं दिवसांनीं स्वतंत्रपणें करूं लागलें. त्यामुळें मावशीला भरपूर विश्रांति मिळूं लागली. शिवाय संस्थेच्या रोजच्या महत्त्वाच्या घडामोडींकडे लक्ष पुरवून वत्सलाबाईंच्या सल्ल्यानें नर्सच्या कामाची व्यावसायिक माहिती घेण्यासहि मीं सुरुवात केली. अशा तऱ्हेनें सदोदित कांहीं तरी कार्यांत मी गढून गेल्यामुळें पूर्वीच्या दुःखद घटनांचा मला हळूहळू विसर पडूं लागला.

दिवसांमागून दिवस जाऊं लागले व यथाकालीं मी प्रसूत होऊन एका सुंदर पुत्ररत्नाला जन्म दिला. किती दर्शनीय माझा बाळ होता तो! त्याचें तें राजबिंड्यासारखें रूप, मोहक मुखेंदु पाहून माझ्या प्रियकराची रम्य मूर्तीच जणूं काय बालरूप धारण करून माझ्या पोटीं अवतीर्ण झाल्याचा मला भास झाला. मावशीच्या आनंदाला सामावण्यास तर त्रिभुवन अपुरें पडलें. तिनें हौसेनें बाळाचें नांव 'गुणवंत' असें ठेविलें. अलीकडे तर तिचा दिवसाचा बहुतेक वेळ बाळाचें कोडकौतुक करण्यांत जाऊं लागला.

शुक्ल पक्षांतील चंद्रकलेप्रमाणें बाळ दिवसेंदिवस वाढूं लागला. त्याच्या बाललीलांनीं मावशीचें निवासस्थान आनंदानें फुलून गेल्यासारखें दिसूं लागलें. सोन्यामोत्यांचीं बाळलेणीं, हरतऱ्हेचे उंची उंची कपडे, नानाविध

मौल्यवान् वस्तू व खेळणीं वगैरे त्याच्या हौसेखातर मावशीचा पाण्यासारखा पैसा खर्च होत होता. आणि खरें म्हटलें तर मला आतां कशाची उणीव होती ? सुखी जीवनाला आवश्यक असणाऱ्या सर्व साधनांची मला अनुकूलता होती. पण इतकें असूनहि निर्भेळ समाधानाचें सुख माझ्या मनाला वाटत नव्हतें. माझ्या जीवनाच्या अतृप्त आकांक्षांची जहरी जाणीव अहर्निश माझ्या मनाला आंतून कुरतडत होती. त्यामुळें वैभवशाली राहणींत वावरतांना वरकरणी मी जरी समाधानी दिसत असलें तरी आंतून माझ्या मनाची हिरमोड झाल्यासारखीच स्थिति होती. मावशीच्या कृपेनें मी वैभवांत होतें; पण मला तें वैभव उसनें वाटत असे. मालकीहक्काच्या अभिमानाचा जिवंतपणा त्यांत मला दिसून येत नव्हता. माझ्या मृत मनाच्या यंत्रतुल्य देहावरचा नुसता वरपांगीं भडक दिसणारा तो निर्जीव साज मला वाटे. हृदयाच्या देव्हाऱ्यांत भक्तिभावानें पूजिलेल्या प्रियकराच्या परमेश्वरस्वरूप मूर्तीच्या चिरविरह ज्वालेनें आंतील मनःसुमन करपून निर्माल्यवत् झाल्यावर देहाचा बाह्यविलाससौरभ माझ्या मनाला तसल्या रित्या संसारांत रमवून टाकण्यास समर्थ होता का ? चारचौघींत असतांना मी वरकरणी आपल्या मुद्रेवर आनंदाचा व समाधानाचा तजेला दाखविण्याचा आविर्भाव जरी आणीत होतें तरी अंतर्यामीं मी कष्टी होतें ही गोष्ट मावशीच्या चाणाक्ष दृष्टीला दिसत नव्हती असें नव्हतें. ज्याप्रमाणें बनावट मोत्यावरील कृत्रिम तेजाची खुलावट मोत्याची पारख करणाऱ्याच्या विदग्ध दृष्टीला ताबडतोब कळून येते त्याप्रमाणें माझ्या मुद्रेवर अशा प्रसंगीं दिसून येणाऱ्या कृतक समाधानाचा नकलीपणा मावशीच्या कुशाग्र दृष्टींतून निसटूं शकला नाहीं. पण माझ्या मनाला दुःख होईल म्हणून त्याबद्दल उघडपणें जरी ती मला कांहीं बोलत नव्हती तथापि आडपडद्यानें मात्र माझ्या कष्टी मनःस्थितीबद्दल ती बोलल्याशिवाय रहात नसे. उच्च हेतूनें प्रेरित होऊन माणसानें केलेल्या एखाद्या त्यागाचें मोल, त्या त्यागाबद्दल पुढें त्याच्याकडून वेळोवेळीं व्यक्त होणाऱ्या अनुतापानें कमी होत जातें; त्यागानुसार वर्तन ठेवणाऱ्या त्यागी माणसाचें मन खंबीर, करारी, निग्रही असावें लागतें. नुसत्या भावनेच्या भरांत त्यागाच्या खडतर तपाची प्रतिज्ञा करून तिचें प्रत्यक्ष पालन करण्याच्या प्रसंगीं मात्र हरघडी पश्चात्तापानें कष्टी होणाऱ्या कमकुवत

मनाच्या माणसाचा त्याग जगाच्या दृष्टीनें हास्यास्पद ठरत असतो; वगैरे अशा प्रकारचीं तात्त्विक उदाहरणें देऊन ती माझी चूक मला पटवून देत असे. आणि अशाप्रकारें ऐकण्यास मंत्रमुग्ध करून सोडणारी तिची मंजुळ वाणी सुरू झाली म्हणजे माझी चूक मला कळून येत असे व माझें मन उत्साहभरित होत असे. पण माझ्या मनाची ही स्थिति जोंपर्यंत मी तिच्या सान्निध्यांत असें तोंपर्यंतच टिकून राहात असे. कांहीं कामानिमित्त ती कुठं तरी बाहेर गेली असतांना मी ज्यावेळीं एकटीच निर्मतिक स्थितींत असें त्यावेळीं मागील दुर्दैवी घटनांचा तो चित्रपट सजीव होऊन माझ्या मनःचक्षूंसमोर खडा उभा राही. आणि माझ्या शीघ्र परिवर्तनशील बनलेल्या मनाची पुन्हां भोंवऱ्यांत सांपडल्यासारखी अवस्था होत असे. त्यांत अलीकडे बाळाच्या बाळलीला, त्याचे बोबडे बोल, तें निरागस मनोज्ञ हास्य व त्याची मोहक बालछबी हीं सर्व पाहून तर माझ्या पोटांत भड-भडून येई. केवळ दारुण दैवदुर्विलासामुळें आपलें बाळ त्याचा पिता हयात असतांना पितृसुखाला कायमचें पारखें व्हावें असा दुःखद विचार मनांत येऊन माझें अंतःकरण शतशः विदीर्ण होई. पण त्याला मावशीचा काय इलाज होता? पण इतकें असूनहि माझी पूर्वजन्माची पुण्याई म्हणूनच मावशी व वत्सलाबाई यांसारखीं देवतातुल्य माणसें मला लाभलीं. त्यांच्या प्रेमाच्या शीतल छायेखालीं कसल्याहि बिकट परिस्थितीची झळ मला व माझ्या बाळाला अणुमात्र लागली नाहीं. त्यांच्या अमृतमधुर सहवासामुळेंच मला माझा विषमय जीवनपथ आक्रमिणें शक्य झालें. त्या चमत्कृतिनिधान परमेश्वरानें माझे नशिबीं परित्यक्तेसारखें लाचार जिणें जगण्याचें दुःख लिहून ठेवलें असलें तरी त्या दुःखाच्या भरपाईदाखल त्यानें या दोन देवतातुल्य स्त्रीरत्नांच्या दिव्य सहवाससुखाचा अमोल ठेवा माझ्या हवालीं केला. हा लाभ मला काय थोडा होता?

* * *

मध्यंतरचा सुमारें पंचवीस वर्षांचा काल उलटला होता. त्या दीर्घ कालांत माझ्या आयुष्यांत सुखदुःखाच्या बऱ्याच घटना घडून आल्या होत्या. माझा बाळ आतां थोर होऊन चांगला विद्यासंपन्न झाला होता. त्याची कायद्याची परीक्षा उत्तीर्ण झाली होती; व कायद्यांतील पारंगतते-

बद्दल त्याचा सगळीकडे बोलबाला झाला होता. बनारसला मावशीनें आपल्या असामान्य कर्तबगारीनें लौकिकाबरोबर बरीच मोठी मिळकतहि संपादन केली होती. 'पूर्णानंद प्रसूति-गृह' ही संस्था तिच्या खाजगी मालकीची होती. सदर संस्थेचा उत्तरोत्तर उत्कर्ष होत गेल्यामुळें तिच्या उत्पन्नांतून मावशीला दरसाल बऱ्याच मोठ्या रकमेची प्राप्ति होत गेली होती. संस्थेच्या इमारतीस लागून उघड्या हवेशीर जागेंत तिचा एक भव्य व प्रासादतुल्य बंगला होता. याशिवाय नोकरीच्या नात्यानें मिळालेल्या पगाराच्या पैशांतून बरीच मोठी रक्कम तिनें आपल्या नांवें ठेवीच्या रूपानें बँकेंत शिल्लक ठेविली होती. बाळावर तिचें पुत्रनिर्विशेष प्रेम असल्यामुळें ही सारी मिळकत तिनें बाळाच्या नांवें बक्षिस करून दिली होती. त्यामुळें बाळाला त्याच्या आयुष्यांत पैशासंबंधीं कसलीहि ददात राहिली नव्हती. एवंच मावशीच्या कृपेमुळें जसा तो विद्यासंपन्न झाला होता तसा तिच्या औदार्यामुळें तो वैभवसंपन्नहि झाला होता. तिच्या ठिकाणीं प्रकर्षानें वास करीत असलेल्या सच्छीलता, त्याग, कार्यनिष्ठा, करारीपणा, आत्मविश्वास, निरभिलाष सेवावृत्ति अशा उत्तमोत्तम गुणांचा साक्षात्कार त्याच्या बालपणापासून त्याला घडत गेल्यामुळें उपर्युक्त गुण त्याच्यांत उतरून तो आदर्श नागरिक झाला होता. आणि तिच्या स्वभावांतील प्रेमळपणा, मनमिळाऊपणा व मानवताधर्म या अमृतोपम गुणांच्या अनुकरणामुळेंच तो लोकादरास पात्र झाला होता.

पांच वर्षांपूर्वीच माझी देवतातुल्य मावशी मला सोडून गेली होती. माझ्या जीवनांतील ती ममतेची सरिता, ती कारुण्यगंगा, कालाच्या अजस्र, अखंड प्रवाहांत विलीन झाली होती. वाढत्या वयाबरोबर हृदयविकाराची व्यथा तिला जडून तीमुळेंच तिचें एकाएकीं देहावसान झालें होतें.

गरीब बिचाऱ्या वत्सलाबाई. जिनें जवळजवळ तीस वर्षे एखाद्या छायेप्रमाणें माझ्या मावशीची सोबत केली ती स्नेहरसवर्षिणी सहचरी मावशीच्या निधनानंतर दुःखानें हाय खाऊन सहा महिन्यांच्या आंतच परलोकीं तिच्या सेवेस रुजू झाली होती.

मावशीच्या व वत्सलाबाईच्या निधनानें मला सगळें जग शून्य दिसूं लागलें. अफाट अरण्यांत हरिणीपासून दुरावलेल्या तिच्या पाडसाप्रमाणें

माझ्या मनाची चुकल्याचुकल्यासारखी व कावरीबावरी अवस्था झाली. विषण्णता मनांत कायमचें ठाण देऊन बसली. कोणत्याहि गोष्टींत मन रमेनासें झालें. अष्टौप्रहर मावशीची प्रेमळ मूर्ति दृष्टिसमोरून हालेनाशी झाली. तिच्याविषयींच्या एकेक आठवणी मनांत येऊन अंतःकरणांत भडभडून येई. माझ्या दुःखी मनाचें सांत्वन करून त्याला धीर देणारें दुसरें कोणी पोक्त माणूस नसल्यामुळें अहर्निश मी दुःखांत मग्न होऊन राहिलें. पण बाळाच्या मनाला वाईट वाटूं नये म्हणून वरून मी आपलें दुःख त्याला उघडपणें दिसूं न देतां तें आंतल्या आंत गिळून टाकण्याचा प्रयत्न करूं लागलें. त्यामुळें माझ्या प्रकृतीवर त्याचा अनिष्ट परिणाम झाला. दुःखानें मी आंतल्या आंत झुरणीस लागून दिवसेंदिवस माझी प्रकृति खंगत चालली. माझी अशी अवस्था बाळाच्या ध्यानांत आल्यावांचून राहिली नाहीं. ताबडतोब त्यानें एका तज्ज्ञ डॉक्टरकडून माझ्या प्रकृतीची तपासणी करवली. माणसाच्या हृदयाला अहर्निश कुरतडणारा चिंतेसारखा दुसरा हृद्रोग नाहीं असा आपला वेदान्तस्वरूपी अभिप्राय डॉक्टरांनीं माझ्या प्रकृतीच्या निदानादाखल दिला व मन सदा प्रसन्न ठेवण्याचा मला उपदेश केला. पण प्रसन्नता माझ्या मनाला लाभणें आतां कधीं तरी शक्य होतें का ?

गतगोष्टींच्या दुःखद आठवणी माणसाच्या मनांत एकदां येऊं लागल्या म्हणजे त्यांना बिलगून तशाच प्रकारच्या अनेक आठवणी त्यांच्या पाठोपाठ येत असतात. माझ्याहि बाबतींत अगदीं तसेंच झालें. मावशीची एकेक आठवण काढून मी दुःख करूं लागतांच माझ्या सर्वच दुःखमय पूर्वायुष्याची आठवण मला होऊं लागली व ओघानेंच माझ्या प्रियकराचा विरह इतक्या वर्षांनंतर मला पुन्हां तीव्रतेनें जाणवूं लागला. माझ्या प्रियकराची यौवनावस्थेंतील ती धीरोदात्त रम्य मूर्ति इतक्या वर्षांनंतर मनश्चक्षूंसमोर अगदीं हुबेहूब दिसूं लागली. त्याचप्रमाणें कमलापुरांतील आमच्या अखेरच्या ताटातुटीचा तो रात्रींचा हृदयविदारक करुण प्रसंगहि दृष्टीपुढें जसाच्या तसा तरळूं लागला. हृदय धडपडूं लागलें; मन तडफडूं लागलें. आपला प्रियकर इतक्या वर्षांनंतर अजूनहि हयात असेल का ? आणि असला तरी आमची गांठभेट होणें आतां या जन्मीं तरी शक्य नाहीं या विचाराचें चिंतन मन रात्रंदिवस करूं लागलें. बाळ घरीं नसतांना प्रियकराचें

छायाचित्र पुढें ठेवून तासन् तास मी अश्रुपूर्ण नेत्रांनीं त्याच्याकडे पाहात बसूं लागलें. शांति, समाधान माझ्या मनाला कसली ती लाभली नाहीं. तें सदा निरुत्साही व उद्विग्न बनलें. पुढें पुढें मला रोज ताप येऊं लागला व थोड्याच दिवसांत क्षयाच्या अवस्थेचीं पूर्वचिन्हें माझ्या ठिकाणीं स्पष्ट दिसूं लागलीं. माझ्या आजाराच्या या अंतस्थ कारणाची माझ्या बाळाला बिलकूल कल्पना नव्हती. ज्या दुःखदायक प्रसंगाचें शल्य आज पंचवीस वर्षें माझ्या अंतः-करणांत अहोरात्र सलत होतें आणि ज्यामुळें एखाद्या परित्यक्तेसारखें लाचार जिणें जगणें भाग पडलें होतें त्या प्रसंगासंबंधीं एक अवाक्षरहि मी, मावशी अगर वत्सलाबाई—आम्ही कुणीच बाळाजवळ आजवर बोललों नव्हतों. शाळेंत त्याचें नांव घालतांना देखील कांहीं घोटाळा होऊं नये म्हणून मावशीच्या सल्ल्यानें बाळाचें आडनांव मुतालिक न लावतां कमलापूरकर असें लावलें होतें. असें करण्यांत आमच्या अस्तित्वाचा माझ्या प्रियकराला थांगपत्ता लागूं नये हाच उद्देश होता. माझ्या दुःखाची यत्किंचित्‌हि झळ माझ्या बाळाच्या सुमसुकुमार मनाला लागूं नये याविषयीं आम्ही दक्ष होतों. आठ-दहा वर्षांचा बाळ असतांना एकदां त्यानें बालस्वभावानुसार आपल्या पित्याविषयीं मला पृच्छा केली होती. त्या निरागस मनाशीं प्रतारणा करतांना त्यावेळीं माझ्या मनाची काय स्थिति झाली होती ती माझी मलाच ठाऊक. त्याच्या प्रश्नाला कांहींतरी उत्तर देणें त्यावेळीं मला भागच पडलें होतें. म्हणून पहिल्या युरोपीय महायुद्धांत किंग्ज कमिशन मिळवून एका वैद्यकीय पथकासमवेत त्याचे पिताजी कुठल्याशा आघाडीवर गेले होते; पण ते पुन्हां परत आले नाहींत. पुढें युद्ध स्थगित झाल्यावरहि त्यांच्यासंबंधीं कांहींच वार्ता समजली नाहीं, अशी खोटीच माहिती त्याला सांगून मी त्यावेळीं त्याची समजूत केली होती. पुढें बाळ सज्ञान झाल्यावर त्याच्या जन्माचें रहस्य त्याला सांगून टाकावें व आपलें अंतःकरण त्याच्या-जवळ उघडें करून एकदांचें मोकळें व्हावें असें यापूर्वीं एकदोन वेळ माझ्या मनांत आलें होतें. पण त्याप्रमाणें करण्याचें आजवर मी टाळीत आलें. माझ्या सांप्रतच्या आजारीपणाचे मूलभूत कारणाविषयीं अशाप्रकारें तो पूर्णपणें अज्ञानांत असल्यामुळें एकाएकीं माझी प्रकृति इतकी विकोपाला गेलेली पाहून तो घाबरून गेला. ती ताळ्यावर येण्यासाठीं त्यानें हरएक

उपाय करून पाहिले; पण त्यांचा कांहींएक उपयोग झाला नाहीं. दिवसें-दिवस माझा आजार वाढतच चालला.

इहलोकीं माझें वास्तव्य आतां थोडे दिवस राहिल्याचें मला स्पष्टपणें कळून चुकलें. पण त्याबद्दल माझ्या मनाला बिलकूल वाईट वाटलें नाहीं, इतका माझ्या आयुष्याचा मला वीट आला होता. जगण्याची मला मुळींच इच्छा नव्हती.

रुग्णशय्येवर पडून प्रत्येक जीवमात्राला आपल्या अनंत उदरांत चिरकाल शांतिसुखाचा आसरा देणाऱ्या त्या परोपकारी काळपुरुषाच्या पावलांची चाहूल घेत मी अखेरच्या क्षणाची मार्गप्रतीक्षा करीत राहिलें.

माझ्या दुर्दैवी जीवनाची कर्मकहाणी मी येथेंच संपवीत आहे. मला जें कांहीं सांगायचें होतें तें सर्व मीं निर्भीडपणानें कथन केलें आहे. दुर्धर रोगानें देह जर्जर झाल्यामुळें माझ्यानें यापुढें अधिक कांहीं लिहवत नाहीं. निर्घृण समाजपुरुषाच्या बेफिकीर पावलांखालीं तुडविलीं गेल्यामुळें निर्माल्यवत् झालेल्या माझ्या करपलेल्या जीवनलतेच्या कोमल भावनापुष्पांची माझ्या प्रणयसमाधीवर वाहिलेली हीच माझी अखेरची शब्दरूप श्रद्धांजलि ! ”

* * *

वाचतांना नेत्र वरचेवर अश्रूंनीं भरून येत असल्यामुळें चोपडींतील मजकूर मुनसफसाहेबांनीं अथपासून इतिपर्यंत मोठ्या कष्टानें वाचून संपविला. मजकूर समग्र वाचून झाल्यानंतर मातेची आठवण होऊन त्यांचें अंतःकरण कळवळून आलें. आपली माता किती थोर, त्यागी, आदर्श स्त्री होती व असल्या दिव्य मातृसुखाला आपण अकालीं आंचवलों हें आपलें केवढें दुर्भाग्य हा विचार त्यांच्या मनांत येऊन मातृप्रेमाच्या गहिंवरानें त्यांचें हृदय भरून आलें. शेवटीं त्यांना एक जोराचा हुंदका आला. दुःखातिशयानें “ आई, आई ग, कुठं आहेस तूं ? ” अशी करुण-स्वरानें एक आर्त हांक मारून एखाद्या लहान बालकाप्रमाणें समोरच्या लहानशा नक्षीदार चंदनी देव्हाऱ्यांतील आपल्या मातेच्या छायाचित्राकडे भावनावेगानें धांवत जाऊन त्यांनीं त्याला घट्ट मिठी मारली व त्यावर

आपलें मस्तक टेकवून ते ओक्साबोक्सी रडूं लागले. किती तरी वेळ ते तशा स्थितींत अश्रुविमोचन करीत होते. अश्रुसिंचनानें त्यांचें हृदय बरेंच हलकें झालें. नंतर एका हातानें तें छायाचित्र घट्ट धरून व दुसरा हात उशाखालीं घेऊन एकाग्र दृष्टीनें त्याच्याकडे पाहात ते जवळच्या कॉटवर पडून राहिले. जागरणाच्या श्रमामुळें त्यांना बराच थकवा आला होता. थोड्या वेळानें त्यांनीं आपले डोळे मिटून घेतले. त्यांच्या डोळ्यांवर एक प्रकारची गुंगी येऊं लागली. त्या गुंगींत आपल्या मातेच्या अंकावर डोकें ठेवून आपण स्वस्थ झोंपलों आहोंत व आपली माता आपल्या सर्वांगावरून वात्सल्यभरानें आपला प्रेमळ हात फिरवीत आहे व हलके हलके आपणांस थोपटीत आहे असा त्यांना भास होऊं लागला. अशा प्रकारच्या गोड संवेदनसुखाचा ते अनुभव घेत असतां त्यांची तंद्री लागून त्या तंद्रींतच ते केव्हां निद्रावश झाले तें त्यांचें त्यांनाहि समजलें नाहीं.

● ● ●

आपल्या जन्मरहस्याचा मुनसफसाहेबांना आतां पूर्ण उलगडा झालेला होता; व त्याच्या प्रकाशांत जीवन व राजाभाऊ आपले भाऊ असून आपलें खरें आडनांव कमलापुरकर नसून मुतालिकच आहे हेंहि त्यांना कळून चुकलें होतें. आणि त्यामुळें मुतालिकांच्या घराकडे पाहण्याची त्यांची दृष्टीच पार बदलून गेली होती. त्या घरीं त्यांचें जाणें-येणेंहि वाढलें होतें. पण इतकें असूनहि त्यांनीं आपल्या मातेच्या करुण कहाणीसंबंधीं एक अवाक्षरहि जीवन अगर रमाबाई यांपैकीं कुणाजवळच कधीं काढलें नाहीं. या गोष्टीला दोन कारणें होतीं. एक म्हणजे हें रहस्य उघड करण्यांत मुतालिक घराण्याच्या वडिलार्जित इस्टेटीवर वारसा सांगण्याचा आपला अंतस्थ हेतु असावा अशी त्यांची समजूत होऊन तीं माणसें कदाचित् आपल्याविषयीं गैरसमज करून घेतील; व दुसरें म्हणजे आपल्या मातेचा विवाहपूर्व प्रणय-संबंध त्यांच्या सनातनी रूढिप्रिय मनाला खात्रीनें आवडणार नसल्यामुळें आपल्या मातेच्या दिव्य निःस्वार्थी प्रेमास कदाचित् व्यभिचाराचें निंद्य स्वरूप देतील. तसें झाल्यास आपल्या मानधन स्वभावाला तें मुळींच सहन होणार नाहीं व त्यामुळें त्यांच्याशीं पूर्ववत् मनमोकळेपणानें स्नेहसंबंध टिकविणें आपणांस शक्य होणार नाहीं.

या कारणांशिवाय जीवनचा कनिष्ठ बंधु राजेश्वर यानें जीवनपासून वडिलार्जित मिळकतीपैकीं आपल्या निम्म्या हिश्शाची वांटणी करून घेऊन नादानपणानें तिची विल्हेवाट लाविली असल्याबद्दलची साधारण त्रोटक हकीकत कर्णोपकर्णी त्यांच्या कानांवर यापूर्वीच आलेली होती. मुतालिक घराण्यांत वास्तविक खरी शांतता व समाधान नांदत नसल्याचें त्यांच्या जीवनकडे रोजच्या जाण्यायेण्यावरून व वाढत्या परिचयावरून त्यांना समजून

आलें होतेंच. वरकरणी आनंदी दिसणाऱ्या मुद्रेवरील हास्याच्या झिरझिरीत आवरणाखालीं लपलेलें जीवनचें असंतुष्ट मन व कारुण्य, उदासीनता यांचें कायमचें ठाणें होऊन राहिलेली रमाबाईची मुद्रा त्या गोष्टींचें प्रत्यंतर त्यांना रोज पटवीत होतीच. म्हणून अशा अगोदरच स्फोटसुलभ झालेल्या असमाधानाच्या स्थितींत आपल्या रहस्यस्फोटानें आणखी असमाधानाची भर टाकणें त्यांच्या दूरदर्शी मनाला इष्ट न वाटल्यावरून त्या रहस्या-संबंधीं होतां होईल तों आपणहून चकार शब्द न काढण्याचें त्यांनीं आपल्या मनाशीं ठरविलें होतें.

आपल्या मातेचा जीवनवृत्तान्त कळल्यापासून आपल्या जन्मदात्या-विषयींची हकीकत समजून घेण्याची मुनसफसाहेबांना तीव्र इच्छा झाली. ज्या आपल्या पित्याच्या कल्याणाखातर आपल्या मातेनें अलौकिक स्वार्थ-त्याग करून ऐन तारुण्यांत आपल्या सर्व भावना, आशा, आकांक्षा यांचा होम केला व आजन्म एखाद्या तपस्विनीप्रमाणें आपलें आयुष्य वेंचलें, तो आपला पिता खरोखरीच आदर्श, दिव्यगुणमंडित, चारित्र्यवान् पुरुष असला पाहिजे व अशा थोर पित्याच्या जीवनासंबंधीं माहिती पुत्र या नात्यानें आपणांस असणें जरूर आहे असें त्यांना वाटूं लागलें. पण ती मिळविण्याचें साधन त्यांना कांहींच दिसेना. त्यांचा जीवनशीं परिचय झाल्यापासून जीवननें आपल्या घरगुती गोष्टीसंबंधीं कसलाच विषय त्याच्या-जवळ आतांपर्यंत काढलेला नव्हता. त्यामुळें त्याच्याकडून ईप्सित माहिती आपोआप मिळण्याची त्यांना आशा वाटत नव्हती. मग आपली जिज्ञासा-तृप्ति कशी होणार या एकाच विचारानें त्यांच्या मनाला रात्रंदिवस सारखी तळमळ लागून राहिली होती. सरळ जीवनकडे जावें व आपणांस पाहिजे असलेल्या माहितीसंबंधीं त्यास विचारावें, त्याशिवाय आपल्या मनाची तळमळ शांत होणार नाहीं असा विचार कित्येक वेळां त्यांच्या मनांत आला; पण पूर्ण विचारान्तीं तो त्यांना पसंत पडला नाहीं. कारण आपण कोण हें जीवनला माहीत नसल्यामुळें त्याच्या खाजगी बाबीसंबंधीं आपण केवळ मित्रत्वाच्या नात्यानें त्याच्याजवळ बारीकसारीक चौकशी करणें त्याला अप्रयोजकपणाचें वाटेल हें ते जाणून होते. म्हणून सदर बाबतींत निराश होऊन स्वस्थ बसण्याखेरीज त्यांना गत्यंतर नव्हतें. कांहीं दिवस

त्यांनीं अशाच मानसिक अस्वस्थतेंत घालविले.

पुढें लवकरच कमलापुरच्या स्थानिक जत्रेचा दिवस उगवला. कमलापुरांतील सर्व शाळा, कचेऱ्या, कोर्ट यांना जत्रेनिमित्त त्या दिवशीं सुट्टी होती. बंगल्यांत एकस्थानें वेळ जाईना म्हणून जीवनला बोलावून आणण्यासाठीं मुनसफसाहेबांनीं आपल्या नोकरास हांक मारली. पण लगेच त्यांना काय वाटलें कोणास ठाऊक; त्यांनीं आपला बेत बदलला. स्वतःच जीवनकडे जाण्यासाठीं ते उठले व कपडे करून बंगल्याच्या बाहेर पडले. त्यावेळीं दोनप्रहरचा दोन वाजण्याचा सुमार होता. ऊन्ह कडक पडलें होतें. ते जीवनच्या वाड्याजवळ येऊन थडकले. वाड्याचा दरवाजा नुसता ढकललेला होता. त्यांनीं हलकेंच दरवाजाची एक फळी उघडून आंत प्रवेश केला. वाड्यांत त्यावेळीं त्यांना जिकडे तिकडे सामसूम दिसली. वाड्याच्या दुसऱ्या मजल्यावरील प्रशस्त दिवाणखान्याच्या एका दालनांत जीवनची नेहमींची बैठक असे. वाड्याच्या सोप्यास लागून बाहेरच्या बाजूनें दुसऱ्या मजल्यावर जाण्यासाठीं असलेला जिना चढून ते वर गेले व हलकेंच त्यांनीं दालनांत प्रवेश केला. समोर दालनाच्या भिंतींत असलेलें एक भलें मोटें लांकडी कपाट उघडलेलें असून त्याच्याखालीं जमिनीवर आजूबाजूस बरींचशीं जुनीं पुस्तकें अस्ताव्यस्त पडलेलीं आहेत व मध्यें खुर्चीवर जीवन पाठमोरा बसलेला असून कसल्या तरी वाचनांत गर्क झालेला आहे असें दृश्य त्यांच्या दृष्टीस पडलें. जीवन वाचनांत इतका गढून गेला होता कीं, मुनसफसाहेबांच्या आगमनाची चाहूल त्याला बिलकूल लागली नाहीं. इतक्या एकाग्र चित्तानें जीवन काय वाचत आहे तें जाणण्याची इच्छा अनावर होऊन आपल्या आगमनाची यत्किंचित्‌हि वर्दी न देतां ते हलकेंच त्याच्या पाठीमागें येऊन उभे राहिले व त्याच्या हातांतील पुस्तकाकडे निरखून पाहूं लागले. जीवनच्या हातांतील पुस्तक छापील नसून मजबूत कापडी बांधणीची, पुस्तकाच्या आकाराची ती एक हस्तलिखित चोपडी असल्याचें त्यांना आढळून आलें. तिच्या मळकट झालेल्या एकंदर बाह्यरंगावरून ती बऱ्याच वर्षांची जुनी असावी असा जरी त्यांचा समज झाला तथापि तिच्यांतील एकंदर लिखाण मात्र ताजें, अगदीं नुकतेंच लिहिल्यासारखें व अक्षर पाणीदार मोत्यांच्या सराप्रमाणें टपोरें, दाणेदार, सुवाच्य व वळणदार असल्याचें त्यांना दिसून

आलें. तें परिचयाचें वाटल्यावरून एकंदर लिखाणाकडे ते नीट बारकाईनें पाहूं लागतांच त्याच्या प्रत्येक पानावर शिरोभागीं मधोमध ' भावगुंजन ' असें शीर्षक लिहिलें असल्याचें त्यांना आढळून आलें. त्याबरोबर आश्चर्याची विद्युल्लता क्षणमात्र त्यांच्या सर्व देहांतून चमकून गेली. आपल्या मातेच्या आत्मवृत्तान्तांत ' भावगुंजन ' या शब्दाचा उल्लेख कोणत्या प्रसंगाच्या निमित्तानें झाला आहे तें आठवलें व जीवनच्या हातांतील चोपडी कशाची व ती कुणीं लिहिली आहे हेंहि त्यांना कळून चुकलें. केवळ दैवी योगा-योगानें ती आज आपणांस पाहण्यास मिळाली असें वाटून त्याजबद्दलचा त्यांना झालेला ब्रह्मानंद त्यांच्या पोटांत मावेनासा झाला. पण तो व्यक्त करण्याची ती वेळ नव्हती. आत्यंतिक मनःसंयमानें त्यांनीं आपला मोह आंवरला व जीवन पुढें काय करतो तें पाहण्यासाठीं तशाच निश्चल स्थितींत त्याच्या मुद्रेवर क्षणोक्षणीं होत असलेले विविध भावनांचे बदल सूक्ष्मदृष्टीनें पाहात ते त्याच्या पाठीमागें उभे राहिले.

चोपडी वाचत असतांना भावनास्पर्शी चित्तवेधक प्रसंग जसजसे जीवनला तीमध्यें आढळून येत होते तसतसे त्या त्या प्रसंगानुरूप ते ते भाव त्याच्या हृत्पटलावर उमटून त्याच्या मुद्रेवर प्रतिबिंबित होत असल्याचें मुनसफसाहेबांना स्पष्ट दिसत होतें. मध्येंच जीवनच्या तोंडून अभावितपणें ' वा ! किती सुंदर ! ' असा प्रशंसोद्गार बाहेर पडला. वाचन थांबवून त्यानें चोपडीचें पहिलें पान उघडलें व नितांत आदरयुक्त कौतुकानें लेखिकेच्या नांवावरून आपली दृष्टि फिरविली. सुरुवातीच्या पानावर शिरोभागीं ' भावगुंजन ', व खालीं कंसांत ' भावविश्लेषणात्मक प्रणयकाव्य ', मध्य-भागीं ' कवयित्री भ्रमरी ' व खालीं कंसांत ' सुहासिनी कुलकर्णी ' अशीं मोठ्या अक्षरांत लिहिलेलीं नांवें मुनसफसाहेबांच्या स्पष्ट नजरेस पडलीं. जीवननें चोपडी मिटली. त्याची मुद्रा अत्यंत समाधानी दिसत होती. अनिर्वचनीय असा आनंद चोपडी वाचून त्याला झाला होता. त्यानें चोपडी तशीच आपल्या मांडीवर ठेवली व दुसरें कसलें तरी पुस्तक त्याला पाहिजे होतें म्हणून तेथें आजूबाजूस पडलेल्या पुस्तकसंभारांत तें पाहण्यासाठीं तो सहज खालीं वांकला. तों खुर्चीच्या पायांमधून मागें उभे राहिलेल्या मुनसफसाहेबांच्या दोन्ही पायांचा गुडघ्यापर्यंतचा भाग त्याच्या

दृष्टीस पडला. आपल्या पाठीमागें कोणी माणूस उभा असल्याची त्याला बिलकूल कल्पना नसल्यामुळें तो ताडकन् उभा राहिला. तशी मुनसफ-साहेबांनीं मोठमोठ्यानें हंसण्यास सुरुवात केली. त्याबरोबर खरा प्रकार त्याच्या ध्यानांत आला. किंचित् हास्ययुक्त मुद्रेनें त्याच्याकडे पाहून आश्चर्य दर्शवीत तो म्हणाला,

" कोण ? साहेब ! चांगलंच घाबरवलंत मला ! केव्हां आलांत ? "

" झाला बराच वेळ. वाचनांत तुमची समाधि लागली होती. म्हटलं कशाला मोडा. "

" छे ! कांहींतरीच. विनाकारण किती वेळ उभं राहावं लागलं तुम्हांला. निदान आतां तरी बसा ना कोचावर. "

" कसलं वाचन चालू होतं. " कोचावर बसत मुनसफसाहेबांनीं विचारलं.

" ही चोपडी वाचत होतों. " जीवन हातांतील चोपडी त्यांना दाखवीत म्हणाला.

" चोपडी ? कसली हो ? " मुनसफसाहेब लडीपणानें म्हणाले.

" काव्याची. "

" कसलें काव्य ? "

" नितांत रम्य असं हें एक प्रदीर्घ भावगीत आहे. आणि त्याचें नांव आहे ' भावगुंजन. ' "

" कुणी लिहिलेंय् ? "

" भ्रमरी हें टोपणनांव धारण करणाऱ्या एका कवयित्रीनें. "

" ह्या टोपणनांवाखालीं काव्य लिहिणाऱ्या या कवयित्री कोण बुवा ? "

" सुहासिनी कुलकर्णी ! "

" कशाबद्दल आहे ? कथानक तरी सांगा. "

" एका काव्यात्म प्रणयी जोडप्याच्या सांसारिक जीवनांतील विविध प्रसंगांचीं भावपूर्ण चित्रें लेखिकेनें आपल्या तरल कल्पकतेच्या कुंचल्यानें अत्यंत कुशलतेनें, मार्मिकतेनें व सहृदयतेनें प्रस्तुत काव्यांत रेखाटलेलीं आहेत. स्वतः स्त्री असल्यामुळें कवयित्रीनें स्त्रीच्या प्रेमविषयक मनोभावनांचें केलेलें विश्लेषण जिव्हाळ्याचें व वास्तवपूर्ण वाटतें. विशुद्ध, उदात्त, त्यागी

प्रेमाचें दर्शन घडविणारें या काव्याइतकें रम्य काव्य, साहेब, आजपर्यंत माझ्या वाचनांत आलेलें नाहीं. विशेष म्हणजे माझे परमपूज्य पिताजी कै. भगवंतराव ऊर्फ बापूसाहेब मुतालिक यांनीं कॉलेजांत असतांना सदर काव्याचा गौरवपूर्ण परामर्श त्यावेळच्या कॉलेज-मॅगेझिनमध्यें घेतलेला होता. पूर्वीचीं कांहीं जुनीं पुस्तकें मी सहज चाळीत असतां त्यांत कांहीं जुने मॅगेझिनचे अंक मला पाहाण्यास मिळाले. त्यांपैकीं एकांत 'भावगुंजन' काव्यावर माझ्या पिताजींनी लिहिलेला परीक्षणात्मक लेख मला वाचण्यास मिळाला. प्रस्तुत काव्याची प्रतिभासंपन्न कवयित्री म्हणून पिताजींनीं सदर लेखांत सुहासिनी कुलकर्णी—कवयित्री भ्रमरी—या नांवाचा गौरवपूर्ण उल्लेख ठिकठिकाणीं केला आहे. पूर्वी याच नांवाच्या कॉलेजांतल्या एका तरुणी-संबंधीं कांहीं माहिती माझ्या मातुश्रींनीं मला सांगितली होती. त्यावरून ती तरुणी आणि प्रस्तुत काव्याची जननी सुहासिनी कुलकर्णी ह्या दोन्ही व्यक्ति एकच असल्याचें मला खात्रीनें वाटतें." हें बोलत असतां जीवननें जवळच पडलेल्या पुस्तकांतून एक अंक शोधून काढला व 'हाच तो अंक' असें म्हणून तो मुनसफसाहेबांच्या हातांत दिला.

"सुहासिनी कुलकर्णी यांच्यासंबंधीं माहिती तुमच्या मातुश्रींना असणें संभवनीय आहे. पण त्यांनीं ती तुम्हांला सांगण्याचें काय प्रयोजन बरें?" अंक चाळीत चाळीत मुनसफसाहेब म्हणाले.

"त्याचें असें झालें; मी १०-१२ वर्षांचा असेन. एकदां माझ्या मातुश्री एका स्त्रीच्या छायाचित्रास ताज्या फुलांचा हार घालीत असतांना माझ्या दृष्टीस पडल्या. दररोजच त्या त्याप्रमाणें करीत असत. माझ्या घरांत इतर अनेक फोटो असतांना याच एवढ्या फोटोस आपली आई हार कां घालते याचें मला मोठें कोडें वाटे. म्हणून मीं त्यांना एकदां त्याचें कारण विचारलें. प्रथम त्यांनीं मला तें सांगण्याची टाळाटाळ केली. पण त्या बाब-तींत पुढें मीं जास्तच हेका धरल्यामुळें त्यांनीं मला त्याचें कारण सांगितलें. छायाचित्रांतील स्त्री आपल्या अनेक अलौकिक गुणांमुळें माझ्या पिताजींच्या आदरास व प्रेमास पात्र झालेली होती. आपल्या मृत्युसमयीं पिताजींनीं माझ्या आईस जवळ बोलावून तिच्याजवळ त्या स्त्रीचें छायाचित्र दिलें होतें व छायाचित्रांतील स्त्रीस गृहदेवतेप्रमाणें मानून कोणत्याहि प्रसंगीं त्या

छायाचित्राचा उपमर्द कोणींहि करूं नये अशी आपली अंतिम इच्छा प्रगट केली होती. माझ्या पतिभक्तिपरायण मातेनें पिताजींची ती आज्ञा शिरसा-वंद्य मानून तदनुसार वागण्याचा निश्चय केला. तेव्हांपासून आजतागायत माझ्या परमपूज्य मातुश्री छायाचित्रांतील त्या देवतेची वरीलप्रमाणें नित्य-पूजा अविरतपणें करीत आल्या आहेत. आणि जेव्हां जेव्हां मी छाया-चित्रांतील त्या मंगल देवतेकडे निरखून पाहातों तेव्हां तेव्हां दिव्यगुणांचा साक्षात्कार घडत असल्याचा मला भास होऊं लागतो. साहेब, आपणहि तो फोटो पाहिलेला आहे. मागें बैठकीच्या निमित्तानें माझ्या घरीं आपण भोजनास आल्यावेळीं आपल्या मस्तकावर एकाएकीं जीं फुलें ओघळलीं होतीं तीं त्या छायाचित्राच्या हाराचींच होतीं; आणि त्या छायाचित्रास पुन्हां दुसरा नवीन ताजा हार आपणच घातलेला होता.

जीवन आणि मुनसफसाहेब ज्या दालनांत बोलत बसले होते त्यालाच लागून असलेल्या पलीकडच्या खोलींत रमाबाई दुपारचें ऊन टाळीत स्वस्थ पडल्या होत्या. अलीकडे कित्येक दिवस त्यांची प्रकृतीबद्दलची कुरकुर चाललेली होती. त्यांत अलीकडे लोकांत राजाभाऊ मुतालिकाच्या जमिनीचा आतां लवकरच लिलांव होणार असल्याबद्दलची उघड उघड चाललेली चर्चा त्यांच्या कानांवर जात असल्यामुळें आतां तर त्यांनीं देवदर्शनासाठींमुद्दां घराबाहेर जाण्यानें टाकलें होतें. दुर्मुखलेल्या स्थितींत त्या नेहमीं घरांतच पडून रहात असत. नेहमींप्रमाणें आजहि त्या तशाच पडल्या होत्या. पलीकडच्या दालनांत जीवन मोठमोठ्यानें कोणाशीं तरी बोलतो आहे एवढें त्यांना मधून मधून साधारण ऐकूं येत होतें. परंतु त्या अर्धवट झोपेच्या गुंगींत असल्यामुळें तो नक्की कोणाशीं काय बोलतो आहे हें त्यांना समजून येत नव्हतें. जीवन आणि मुनसफसाहेब यांचें बोलणें थांबल्यावर थोड्या वेळानें त्या जीवन बसला होता तेथें आल्या. दालनांत पाऊल टाकतांच समोरच कोचावर बसलेले मुनसफसाहेब त्यांच्या दृष्टीस पडले. त्यांना पाह-तांच रमाबाईना बरें वाटलें. "कोण? गुणवंतराव! साहेब न म्हणतां तुम्हांला तुमच्या नांवानेंच हांक मारीत जाण्याबद्दल मागें तुम्ही मला सूचना केली होती; म्हणून तुमच्या नांवानेंच आज मी तुम्हांला संबोधीत आहें बरं का! खरं सांगूं, माझ्या जीवनच्यांत आणि तुमच्यांत मला कांहीं फरक वाटत

नाहीं." आणि पुन्हां त्या किंचित् हंसल्या. त्यांच्या बोलण्यानें एक अननु-भूत सुखलहर मुनसफसाहेबांच्या साऱ्या देहावरून चमकून गेली. ते कांहीं बोलणार तेवढ्यांत रमाबाईनींच विचारलें, "दोनप्रहरीं अशा उन्हांतच आज तुम्ही इकडे आलांत?"

"का कोणास ठाऊक, पण आज सकाळपासून बंगल्यांत मला एकट्याला अगदीं करमेनासें झालें. दोनप्रहरपर्यंतचा वेळ मीं कसातरी काढला. शेवटीं अगदीं चैन पडेना म्हणून वेळ घालविण्यासाठीं इकडे निघून आलों." मुनसफसाहेब म्हणाले.

"ठीक, ठीक केलंत!..." असें म्हणून रमाबाई मनमोकळेपणानें हंसल्या व जीवनकडे वळून म्हणाल्या,

"काय रे जीवन, आतांपर्यंत गुणवंतरावांशीं तूं एवढी कसली चर्चा करीत होतास?..."

"कांहीं विशेष नाहीं आई. पण या कपाटांतील कांहीं जुनीं पुस्तकें मी चाळीत असतां ही एक हस्तलिखित चोपडी त्यांत मला आढळली. तीव्र जिज्ञासेमुळें मी मोठ्या औत्सुक्यानें ही समग्र वाचून पाहिली. भावनापरिप्लुत असें हें एक नितांत हृद्य काव्य आहे. ही सुंदर निर्मिति एका कवयित्रीची आहे. ती कवयित्री कोण असावी असा तुझा तर्क आहे?" आपल्या आईची तर्कबुद्धि अजमाविण्याच्या हेतूनें तिच्याकडे सस्मित पाहात जीवन म्हणाला.

"माझा कांहीं तर्क चालत नाहीं बाबा!" हतबुद्ध झाल्याचा आव आणून मुलाकडे कुतूहलानें पाहात रमाबाई म्हणाल्या.

"ज्या छायाचित्राची तूं नित्यनेमानें पूजा करतेस त्यांतील दुर्लभ-गुणमंडिता विदुषीच या नितांतसुंदर कलाकृतीची निर्माती होय!" जीवन अभिमानानें म्हणाला.

"कोण? सुहासिनी देवीच ना? आपल्या अलौकिक गुणांमुळें तुझ्या पित्याच्या आदराला व प्रेमाला पात्र झालेलें तें एक दुर्लभ स्त्रीरत्नच होतें." आदरभावनेनें रमाबाई उद्गारल्या.

थोडा वेळ कोणीं कांहींच बोललें नाहीं. जीवन कसला तरी विचार करीत होता. नंतर मनाचा कसला तरी निश्चय झाल्याचें दर्शविणारा एक

लहानसा झटका आपल्या मानेला देऊन मुनसफसाहेबांकडे वळून तो म्हणाला,

" साहेब, अगदीं अनपेक्षित रीतीनें मला आज या काव्याची प्राप्ति झाली आहे. इतकें सुंदर काव्य आज इतकीं वर्षें अप्रकाशित राहिलें हें मराठी साहित्याचें दुर्भाग्य होय. म्हणून आतां पुस्तकरूपानें तें छापून घेऊन कै. बापूसाहेबांच्या यंदाच्या श्राद्धदिनानिमित्त याचें प्रकाशन करावें असा माझा मानस आहे. पाहा ना एकदां तुम्हींहि वाचून हें काव्य, किती उत्कृष्ट आहे तें." असें म्हणून त्यांनीं हातांतील चोपडी त्यांचे हातीं दिली.

चोपडी हातांत धरून मुनसफसाहेब कितीतरी वेळ तिच्याकडे एकाग्र दृष्टीनें सारखे पाहात राहिले. तिच्यांतील अक्षराअक्षरांत प्रतिबिंबित झालेलें त्यांच्या मातेचें हृद्गत नेत्रावाटें जणूं काय ते आपल्या हृदयांत सांठवीत होते. समाधि लागल्याप्रमाणें त्यांच्या देहाची थोडा वेळ संज्ञाविहीन स्थिति झाली. त्यामुळें आजुबाजूस इतस्ततः पसरलेलीं पुस्तकें कपाटांत नीट ठेवीत ठेवीत जीवन आपल्या आईशीं कांहींतरी बोलत असल्याचें व रमाबाई कुतूहलपूर्ण दृष्टीनें आपल्याकडे पाहात असल्याचें कांहीं वेळ त्यांच्या ध्यानांतहि आलें नाहीं. थोड्या वेळानें शुद्धीवर आल्यासारखें करून त्यांनीं जेव्हां रमाबाईकडे पाहिलें तेव्हां त्यांना तें कळून आलें. लगेच आपल्या मोहवश झालेल्या मनाला सांवरून ते रमाबाईंना म्हणाले,

" केवळ आपल्या भाषणानें जिज्ञासा अनावर होऊन जर मीं आपल्याला कांहीं माहिती विचारण्याचें धाडस केलें तर तेवढ्यावरून आपण मला अतिप्रसंगी म्हणणार नाहीं अशी माझी खात्री आहे. "

" छे ! मुळींच म्हणणार नाहीं. तुम्हांला जें कांहीं विचारायचें असेल तें बिलकूल संकोच न धरतां बेलाशक विचारा." रमाबाईंनीं आश्वासनपर उद्गार काढले.

" ज्या सुहासिनीबाईंच्या विषयीं आपण नुकतेच गौरवपूर्ण उद्गार काढले त्यांच्यासंबंधीं कांहीं माहिती मला आपल्या तोंडून ऐकायला मिळावी अशी माझी इच्छा आहे." अत्यंत आर्जवी स्वरानें मुनसफसाहेब म्हणाले. पण त्यांच्या या उद्गारानें रमाबाईंना अत्यंत आश्चर्य वाटलें. इतरांसंबंधीं उगाच फालतू चौकशी कधींहि न करणारे मुनसफसाहेब आज इतक्या आर्जवानें आपणास

ही माहिती कां विचारतात याचें कारण त्यांना समजेना. तथापि त्यांची इच्छा मोडण्याचें त्यांच्या अगदीं जिवावर येऊन त्या म्हणाल्या,

"जीवनच्या पित्याचें तें एक नाजुक रहस्य आहे. तथापि तुम्ही आम्हांला अगदीं घरच्यासारखे असल्यामुळें तुम्हांला तें सांगण्यास मला कांहींच हरकत दिसत नाहीं." असं बोलून रमाबाईनीं हकीकत सांगण्यास सुरुवात केली—

भगवंतराव व सुहासिनी यांच्या प्रेमसंबंधाची जी कांहीं त्रोटक हकीकत रमाबाईना त्यांचे श्वशुर श्रीपतराव यांच्याकडून समजली होती ती त्यांना जशी आठवली तशी त्या मुनसफसाहेब यांना सांगूं लागल्या. कॉलेजांत शिक्षणाच्या निमित्तानें एकत्र आल्यानें त्यांचे पति भगवंतराव व सुहासिनी यांचा एकमेकांशीं झालेला परिचय, त्या परिचयाचें पुढें त्या दोघांच्या प्रेम-संबंधांत झालेलें रूपांतर, सुहासिनीच्या ठिकाणीं झालेला गर्भसंभव अनीतिमूलक म्हणून त्यांच्या विवाहास श्रीपतरावांनीं दिलेला नकार, सुहासिनीचा गृह-त्याग, तिच्या वियोगानें भगवंतरावांची झालेली भ्रमिष्ट मनःस्थिति व तिच्या-मुळें दिवसेंदिवस त्यांची खालावत गेलेली प्रकृति, घर सोडतांना सुहासिनीनें लिहून ठेवलेलें स्वदस्तुरचें पत्र व त्यामुळें तिच्या प्राप्तीची निराशा, एकुलत्या एका पुत्राच्या संसारनाशास कारणीभूत झाल्याबद्दल श्रीपतरावांस कृतकर्माचा झालेला पश्चात्ताप, कुटुंबांतील पूर्वींचें आनंदी वातारण बदलून त्या ठिकाणीं एकदम पसरलेली उदासीनतेची छाया, तशांतच अवर्षणाच्या आपत्तीनें जमिनीचें उत्पन्न बुडाल्यामुळें कुटुंबाच्या आर्थिक परिस्थितींत अनपेक्षित घडून आलेला बदल, कुटुंबपोषणाच्या निमित्तानें घरांत कर्जानें केलेला शिरकाव व त्याजबद्दलच्या मानसिक आघातानें खंगत गेल्यामुळें श्रीपत-रावांचा घडून आलेला मृत्यु, भगवंतरावांची दिवसेंदिवस वाढत गेलेली संसारावरील अनासक्ति, घराण्याची उत्तरोत्तर झालेली हलाखीची स्थिति, सुहासिनीबद्दलचें अहर्निश चिंतन व तज्जन्य मानसिक त्रास या योगानें वरच्चेवर प्रकृति ढासळत गेल्यामुळें भगवंतरावांचें अखेर क्षयानें झालेलें देहावसान इत्यादि दुःखद घटना अत्यंत जड अंतःकरणानें त्यांनीं मुनसफ-साहेबांस निवेदन केल्या. त्या करीत असतांना हृदय भरून आल्यामुळें त्या मधून मधून थांबत असत, गळ्यांशीं आलेला आवंढा मोठ्या कष्टानें गिळीत

असत व पुन्हां सांगण्यास सुरुवात करीत.

"गुणवंतराव, घराण्यांतील जबाबदार कर्त्या माणसानें केवळ आपल्या मताभिनिवेशाच्या फाजिल दुराग्रहामुळें घराण्यांतील इतर माणसांच्या मनोभावनांना कवडीमोल लेखून केवळ अहंकाराच्या धुंदींत त्यांच्यावर आपला अनियंत्रित अधिकार चालविण्याचा अदूरदर्शी हेका धरल्यामुळें त्यांच्या भावना दुखविल्या गेल्या व घराण्याच्या एकंदर कल्याणाविषयीं ते उदासीन राहिले; आणि त्यामुळेंच एका वेळच्या या वैभवशाली घराण्याला आज अशी लाजिरवाणी दुःस्थिति प्राप्त झाली आहे. आतां सहज ओघानेंच आलें म्हणून कांहीं आडपडदा न ठेवतां तुम्हांला स्पष्टच सांगतें. माझे पति आणि सुहासिनीबाई यांनीं पतिपत्नी म्हणून केलेली एकमेकांची निवड एकमेकांस अगदीं अनुगुणरूप अशीच होती. माझ्या पतींच्यासारख्या सकलगुणालंकृत, असामान्यबुद्धीच्या कर्तबगार, भावनाप्रधान उमद्या तरुणास सुहासिनीबाईसारखी रूपसंपन्न, दुर्लभगुणमंडित, स्वतंत्रबुद्धीची अशी तेजस्विनी पत्नीच योग्य होती. पण मामंजींच्या दुराग्रही दृष्टीला त्यांचें दिव्य प्रेम व्यभिचारस्वरूपाचें दिसलें. त्याचें पर्यवसान असें झालें कीं, सुहासिनीदेवीसारख्या स्त्रीरत्नाचा आमच्या घराण्यास अनायासें झालेला लाभ त्याच्या दुर्दैवानें त्याला कायमचा दुरावला व माझ्या पतीच्या मनाची दुर्दम्य उमेद भावनांच्या चुराड्यांत अकालीं खच्ची झाल्यामुळें त्यांच्या अंगीं असलेल्या असामान्य कर्तबगारीचा घराण्याच्या उत्कर्षाच्या कामीं कांहीं उपयोग झाला नाही. मामंजींना ही आपली चूक पुढें पुढें कळून आली. पण त्यावेळीं त्याचा कांहीं उपयोग नव्हता. सुहासिनीच्या रूपानें आलेल्या साक्षात् भाग्यदेवतेला लाथाडल्याबद्दल त्यांच्या मनाला दारुण पश्चात्ताप झाला. त्या पश्चात्तापाच्या प्रखर ज्वालांनीं होरपळत होरपळतच त्यांनीं प्राण सोडला. काय सांगूं तुम्हांला गुणवंतराव! सुहासिनीबाई ही आमच्या घरीं आपल्या पायांनीं चालून आलेली मूर्तिमंत लक्ष्मी होती. त्या भाग्यश्रीचें पाऊल आमच्या घरांतून बाहेर पडलें आणि तेव्हांपासूनच आमच्या घराण्याला वाईट दिवस येत गेले. गरोदर अवस्थेंतच सुहासिनीदेवीनें त्यागानें घर सोडलें. या घरांत तिचा तेवढा अंकुर जरी राहिला असता तरी आपल्या पंचप्राणांचें त्याला खतपाणी घालून आज मीं त्याचा

सुंदर जोमदार वृक्ष करून दाखविला असता व सुदैवानें तोच पुत्रसंतानाच्या स्वरूपांत असता तर आज या घराण्याचा सर्वस्वाचा होऊं घातलेला उन्हाळा सह्य होण्यास त्याच्या शीतल छायेची आम्हांला खात्रीनें मदत झाली असती. पण विधिघटनेपुढें कोणाचें काय चालणार ?... " रमाबाई तळमळून बोलत होत्या. बोलतां बोलतां त्या थांबल्या. दुःखावेगानें हृदय भरून येऊन पुढें त्यांच्या तोंडांतून शब्द बाहेर पडेना. दुःखाचा गहिंवर येऊन त्यांच्या नेत्रांतून अश्रुबिंदु झरझर ओघळूं लागून ते जमिनीवर टपटप पडूं लागले. त्या करुण दृश्यानें मुतालिकसाहेबांच्या नेत्रांतहि अश्रूंची गर्दी होऊन क्षणार्धांत तेहि अश्रुविमोचन करूं लागले. तें पाहातांच रमाबाईनीं चटकन् आपले अश्रू पुसून टाकले. मुनसफसाहेबांनींहि आपले डोळे कोरडे केले. सहसंवेदनेमुळें दोघांनाहि एकमेकांच्या अंतःकरणाची व्यथा कळून आली. थोड्या वेळानें पुन्हां रमाबाईनीं आपली हकीकत सांगण्यास सुरुवात केली—

पतीच्या निधनानंतर जमिनी कर्जापायीं सावकारांच्या ताब्यांत कशा गेल्या, मुलें अज्ञान असल्यामुळें मिळकत सरकारव्यवस्थेखालीं कशी देण्यांत आली, मिळकत देखरेखीखालीं असतांच सरकारांतून मिळत गेलेल्या वार्षिक पोटगीच्या रकमेंतून काटकसरीनें राहून बरीचशी रक्कम आपण कशी शिल्लक टाकली व सावकारांच्या कर्जाची फेड करून मिळकत ऋणमुक्त कशी केली, पुढें धाकटा मुलगा दुर्वर्तनी निघाल्यामुळें हेकेखोरपणानें त्यानें आपली निम्मी मिळकत वांटून घेऊन वाईट लोकांच्या नादानें वागून ती कर्जांत कशी गुंतवली व आतां ती लवकरच लिलांवास निघण्याचा कसा संभव आहे वगैरे सारी हकीकत अत्यंत हृदयस्पर्शी भाषेंत निवेदन करून शेवटीं त्या म्हणाल्या,

" गुणवंतराव, मी एक हतभागिनी स्त्री आहें; म्हणून अब्रूचे हे धिंडवडे उघड्या डोळ्यांनीं बघण्यासाठीं परमेश्वरानें मला जिवंत ठेविलें आहे. जमिनींच्या रूपानें उद्यां मुतालिक घराण्याची इभ्रत लिलांवास निघणार ! आतांपर्यंतच्या माझ्या कष्टांचें व परिश्रमांचें हेंच का हो फळ ! गुणवंतराव, राजाची जमीन सोडविण्याचें सामर्थ्यहि आज नाहीं हो आमच्याजवळ. सारा पैसाअडका ह्या साऱ्या जमिनी सावकारांच्या कडून सोडविण्यांतच खर्च होऊन गेला. मी म्हणतें जमिनीचा लिलांव होऊं द्या मेला. पण तो झाल्या-

वर माझ्या राजाचं कसं होईल ह्या विचारानं माझं काळीज कापतंय. काय करील तो. राजाचे डोळे अजून तरी उघडतील का? ते उघडणार असतील तर ह्या लिलांवालाहि मी इष्टापत्तीच समजेन. माझ्या डोळ्यांदेखत माझीं दोन पोरं एकमेकापासून दूर गेलीं. माझ्या अंतःकरणाला ह्या गोष्टीच्या किती यातना होताहेत म्हणून सांगूं. निदान मृत्यूपूर्वी तीं दोघं पुन्हां एक झाल्याचं पाहाण्याचं सुख तरी परमेश्वरानें ह्या अभागिनीला द्यावं. तसं झालं नाहीं तर समाधानाचं मरणहि येणार नाहीं मला.

दुःखानें दोघांचीहि अंतःकरणें भारावलीं होतीं. दुःखभावनेचा त्यांच्या हृदयांना बसलेला ताण दोघांनाहि असह्य झाला. त्या हकीकतीनें त्या ठिकाणीं उत्पन्न केलेलें विषण्णतेचें तंग वातावरण बदलून टाकण्याची दोघांनाहि जरुरी भासूं लागली. त्यासाठीं रमाबाई कांहींतरी निमित्त शोधित होत्या. इतक्यांत गांवांतील जत्रा पाहण्यासाठीं गेलेल्या घरांतील मुलांनीं खालीं तळमजल्यांत आळीपाळीनें शिट्या वाजवून केलेला गोंगाट त्यांच्या कानांवर येऊं लागला. त्याबरोबर त्या तेथून हळूं हळूं खालीं निघून गेल्या जीवन कपाटांत पुस्तकें नीट लावण्यांत गर्क झाला होता. कोचावर मुनसफसाहेब एकटेच आपल्या मनाशीं विचार करीत बसले.

सायंकाळीं जीवनच्या वाड्यांतून आपल्या निवासस्थानीं आल्यावर रमाबाईच्याकडून कळलेल्या एकंदर हकीकतीवर मुनसफसाहेबांनीं खूप विचार केला. सरकारी कामकाज पाहतांना राजाभाऊंच्या सावकारांनीं त्याच्यावर केलेल्या दिवाणी दाव्याचें बजावणीवर शिल्लक असलेलें काम त्यांनीं साद्यंत काळजीपूर्वक वाचलें होतें. त्यावरून हुकुमनाम्याप्रमाणें दाव्यांतील रक्कम रुपये दहा हजार लिलांवाच्या नेमलेल्या तारखेच्या पूर्वी जर प्रतिवादी राजानें कोर्टांत रोख भरली तरच लिलांव रद्द होणार होता. आणि एवढी मोठी रक्कम कर्जबाजारी झालेला राजा कोर्टांत भरील ही सुतराम अशक्य गोष्ट होती. जीवन व रमाबाई यांनाहि ही गोष्ट आज-मितीला शक्य नव्हती. तेव्हां लिलांवाच्या रुपानें होणारी मुतालिक घराण्याची बेअब्रू थांबवायची तर... मुनसफसाहेबांच्या डोक्यांत कांहींतरी धाडसी विचार येत होता.

●●●

—८—

अलीकडे राजाभाऊची स्थिति अत्यंत हलाखीची झाली होती. त्याच्या मूर्खपणाचा फायदा घेऊन त्याच्या आपमतलबी सोबत्यांनीं त्याला सर्वस्वीं नागविलें होतें. त्याच्या बहुतेक सर्व जमिनींवर त्यांनीं त्याला न फिटण्यासारखा दहा हजार रुपयांच्या कर्जाचा बोजा करून व सदर रकमेबद्दल त्याच्यावर दिवाणी-कोर्टांत दावा करून हुकुमनामाहि मिळवला होता. त्याप्रमाणें कोर्टांतून राजाच्या जमिनीचा लिलांव करवून त्यांत लिलांवदार या नात्यानें आपणच त्या जमिनी गिळंकृत करण्याचा त्यांचा डाव आतां पूर्णपणें यशस्वी होण्याच्या मार्गावर होता. कांहीं दिवसांतच आपण कंगाल, भिकारी बनणार याची कल्पना राजाला येऊन चुकली होती. भयाण-भवितव्याच्या चाहुलीनं तो दडपून गेला होता. आतांपर्यंत हातून घडलेल्या सर्व चुकांची त्याला आतां खंत वाटत होती. कृतकर्माच्या पश्चात्तापाचे दाहक चटके त्याला होरपळून काढीत होते. लोकांत बेअब्रू झाल्यानें घराबाहेर पडण्याची त्याच्या मनाला चोरी वाटत होती. रात्रंदिवस तो घरांत पडून होता. भावास व आईस आपलें काळें तोंड दाखविण्याची त्याला शरम वाटत होती. त्याची अशी स्थिति झालेली कळून रमाबाईचें मातृ-हृदय दुःखानें तळमळत होतें. थोर व प्रेमळ मनाच्या जीवनला आपल्या बंधूची ही निकृष्ट स्थिति पाहावत नव्हती. पूर्वींची त्याचीं सर्व दुष्कृत्यें विसरून त्याची समजूत करून त्याला परत घरीं आणण्याचा मध्यंतरीं जीवननें एकदोन वेळां प्रयत्न करूनहि पाहिला होता. परंतु असल्या लाजिरवाण्या स्थितींत आपल्या बंधूस व आईस तोंड दाखविण्याची शरम वाटल्यामुळें राजानें त्यांची भेट घेण्याचें टाळलें होतें. म्हणून आपले कसेहि हाल झाले किंबहुना त्या हालअपेष्टांत आपल्याला मृत्यु आला तरी हरकत

नाहीं पण इतःपर आपलें काळें तोंड त्यांना दाखवायचें नाहीं असा आपल्या मनाशी दृढनिश्चय करुन प्राप्त परिस्थितींत मानसिक चिंतेनें मनांतल्या मनांत झुरत तो कसेतरी दिवस कंठीत होता.

रविवारचा दिवस होता. आणखी दोनच दिवसांनीं त्याच्या जमिनीचा लिलांव होणार होता. भवितव्याच्या भयाण कल्पनांशीं खेळत तो आपल्या वाड्यांत पडून होता. सकाळीं नऊ-दहाचा सुमार असावा. तेवढ्यांत मुनसफ-साहेबांच्या बंगल्यावरुन एक नोकर 'साहेबांनीं आपल्याला बोलाविलं आहे,' असा निरोप घेऊन त्याच्याकडे आला. त्याला तो निरोप ऐकून अत्यंत आश्चर्य वाटलें. मुनसफसाहेबांनीं आपल्याला कां बोलाविलें असावें हेंच त्याला कळेना. तथापि त्यांच्या निरोपानुसार वागण्यावांचून त्याला गत्यंतर नव्हतें. मुनसफसाहेब एक नामवंत अधिकारी होते. त्यांच्या निरोपाला डावलण्याचें धाडस त्याला झालें नाहीं. मुनसफसाहेबांच्या नोकरा-बरोबर तो त्यांच्या बंगल्यावर जाण्यास निघाला.

इकडे आपल्या बंगल्यांत मुनसफसाहेब त्याची वाटच पाहात होते. थोड्या वेळानें राजाला घेऊन त्यांचा नोकर बंगल्याच्या सभोंवार असलेल्या तारेच्या कुंपणाच्या प्रवेशद्वारांतून आंत येत असतांना त्यांनीं खिडकींतून पाहिला. तेथून मधलें पटांगण ओलांडून बंगल्याच्या मुख्य दरवाजाजवळ ते दोघे येईपर्यंत मुनसफसाहेब राजाकडे एकसारखे टक लावून पाहात राहिले. नोकरानें राजाला त्यांच्यापुढें आणून उभें केलें राजाचा चेहरा निस्तेज व अत्यंत केविलवाणा झालेला त्यांना दिसला. प्रतिष्ठित व वैभव-संपन्न घराण्यांतील या तरुणानें आपल्या अपवित्र आचरणानें व बेजबाबदार वर्तनानें आपली अशी अनुकंपनीय व लाचार स्थिति करून घेतलेली पाहून त्यांना त्याची कींव आली. करुणार्द्र दृष्टीनें ते राजाच्या चेहऱ्याकडे पाहूं लागले. विशुद्ध चारित्र्याच्या निष्कलंक तेजानें कांतिमान् दिसणाऱ्या त्यांच्या मुद्रेकडे पाहण्याचें त्याला धैर्य झालें नाहीं. एखाद्या अपराध्याप्रमाणें खालीं मान घालून तो त्यांच्यापुढें उभा राहिला. मुनसफसाहेब लगेंच आपल्या खुर्चीवरून उठले व त्याच्याजवळ येऊन त्याचा उजवा हात स्नेह-भरानें त्यांनीं आपल्या हातांत धरला. सहानुभूति, प्रेम, ममत्व या

भावनांचा संमिश्र अनुभव त्यांच्या त्या स्पर्शात एकसमयावच्छेदेंकरून राजाला अनुभवण्यास मिळाला. रमाबाईंच्या अपार वात्सल्यप्रेमाला व जीवनच्या निस्सीम बंधुप्रेमाला तो आज बरींच वर्षे अंतरला होता. तें या स्पर्शानें आज त्याला परत मिळाल्यासारखें वाटूं लागलें. कृतज्ञतेच्या जाणीवेनें त्याचें अंतःकरण गहिंवरून येऊन त्याच्या डोळ्यांतून दोन कढत अश्रुबिंदु मुनसफसाहेबांच्या हातावर पडले. त्याची त्या वेळची ती अनुतापप्रवण अंतःकरणप्रवृत्ति मुनसफसाहेबांनीं तात्काळ ओळखली व आपण मनांत योजिलेल्या आपल्या हेतूस अभिप्रेत स्वरूप येण्यास हीच संधि योग्य आहे हें जाणून त्यांनीं त्याला स्नेहभावनेनें आपल्याजवळ ओढलें व जवळच्या एका खुर्चीवर बसवून घेऊन अत्यंत प्रेमळपणानें ते त्याला म्हणाले,

"राजाभाऊ, मी इथें आल्यापासून तुमची ओळख करून घेण्याची आजवर मला एकदांहि संधि मिळाली नाहीं. तुमचे बंधु जिवनराव व तुमच्या पूज्य मातुःश्री यांच्याशीं माझा परिचय होऊन तो हल्लीं इतका दाट झाला आहे कीं, मी आतां त्यांना परका असा वाटतच नाहीं. तुमच्याशीं परिचय व्हावा म्हणून मीं मुद्दाम तुम्हांला आज इकडे बोलावून घेतलें आहें. मी कोणी एक बडा अधिकारी आहें असें समजून तुम्ही आपल्या मनाला बिलकूल संकोच वाटूं देऊं नका. आपण उभयतांनीं एकमेकांशीं अत्यंत मनमोकळेपणानें व बंधुभावनेनें विचारविनिमय करावा अशी माझी इच्छा आहे."

मुनसफसाहेबांचे हें सहानुभूतीनें ओथंबलेले शब्द राजाच्या अगदीं हृदयाला जाऊन भिडले. आपला भाऊ जीवन याजकडे मुनसफसाहेबांचें वरचेवर जाणेंयेणें असल्याचें राजाला ठाऊक होतें. म्हणूनच मुनसफसाहेबांकडून जेव्हां त्यांचा नोकर त्यास बोलाविण्याकरितां आला तेव्हां आपल्या भावाकडून आपला सर्व इतिहास कळल्यानें आपली हेटाळणी करण्यासाठीं ते आपल्याला घरीं बोलावीत असावेत अशी शंका त्याच्या मनांत डोकावून गेली होती. त्याचें मन नाराज झालें होतें. तरीपण नाइलाजानें का होईना, परंतु त्याला त्याच्याकडे यावें लागलें होतें. तथापि तो त्यांच्या बंगल्यावर आल्यावर त्याच्याकडून त्याला जी प्रेमाची अनपेक्षित वागणूक मिळाली त्यामुळें त्याच्या मनांत त्यांच्याविषयीं आदराचीच भावना निर्माण झाली.

आणि आपल्या क्षुद्र अंतःकरणाची शरम वाटून तो ओशाळला नि म्हणाला,—

" साहेब, मला बंधुसमान लेखून आपण माझा गौरव केलात; पण त्या गौरवास मी सर्वथैव अपात्र आहें. आतांपर्यंत माझ्या हातून जीं लाजिरवाणीं दुष्कृत्यें घडून आलीं तीं जर आपल्याला समजलीं तर माझा आपल्याला तिरस्कार वाटूं लागेल. माझ्या निंद्य आचरणाची आपल्याला किळस येईल व माझा सहवास आपल्याला क्षणभरहि सहन होणार नाहीं. साहेब, माणुसकीच्या पदापासून भ्रष्ट झालेला मी एक अधम माणूस आहें.....

" साहेब, माझा बंधु जीवन याच्याशीं आपला जडलेला स्नेहसंबंध आपणां उभयतांमधील परस्परांबद्दलचा भूष्यभूषणभाव वाढविणाराच आहे. आपल्यासारख्या उदारचरित थोर पुरुषाशीं बंधुभावनेनें व बरोबरीच्या नात्यानें वागण्याची योग्यता त्या माझ्या सच्छील, सरलहृदयी जीवनचीच आहे. पण ज्यानें आतांपर्यंतचें आपलें सर्व आयुष्य अघोर, किळसवाणीं कृत्यें करण्यांत घालविलें, त्या माझ्यासारख्या नरराक्षसाची आपल्याबरोबर शुद्ध स्नेहभावनेनें वागण्याची पात्रता तरी आहे का? माझा परिचय करून घेण्याच्या हेतूनें, साहेब, आपण मला इकडे बोलावून घेतलेंत खरें; पण आपल्यासारख्या गुणवंतांना अभिमानानें सांगतां येईल असा एक तरी गुण माझ्या ठिकाणीं आहे का? साहेब, माझ्या कुकर्मांचा इतिहास तुम्हांला माहीत नाही. तो कळल्यास तुम्ही माझा तिरस्कारच कराल!" पश्चात्तापाच्या दाहक आगीनें त्याच्या हृदयाचा नुसता भडका उडाला होता. तो एकदम थांबला.

" तो सारा इतिहास मला ठाऊक आहे राजाभाऊ, पण झाल्यागेल्या गोष्टींबद्दल मनाला व्यर्थ वाईट वाटून घेण्यांत आतां काय बरें अर्थ आहे! झालेली चूक आतां सुधारून घेण्यांतच खरें हित आहे असें नाहीं का?"

" पण झालेली चूक मला आतां सुधारतां येईल का?" काकुळतीच्या स्वरानें राजाभाऊ म्हणाला.

" कां नाहीं येणार? तुमची अधमवृत्ति सुधारणेच्या मार्गाच्या पार पलीकडे गेलेली असावी, असें तुमचा प्रत्यक्ष परिचय होण्यापूर्वीं मला

वाटत होतें. पण आतां तुमच्या प्रत्यक्ष भेटींत माझी ती समजूत साफ चुकीची ठरली याचा मला आनंद वाटत आहे. तुमच्या हल्लींच्या अनुतापाच्या अग्निदिव्यानें तुमच्या निंद्य व लाजिरवाण्या गतायुष्याचा आतां आमूलाग्र कायापालट झालेला मला दिसत आहे. पूर्वींची तुमची दूषित दृष्टि व्यवहारी जगाच्या कटु अनुभवाच्या अंजनानें निवळून तुम्हाला नवीन दृष्टि प्राप्त झाली आहे. तुम्हाला तुमच्या स्वत्वाची जाणीव झाली आहे. मग पूर्वींची चूक सुधारणें तुम्हाला कां अशक्य वाटावें ? जीवनसारखा विशाल हृदयाचा तुमचा बंधु व रमाबाईसारखी कारुण्यरसाची गंगा तुमची माता, अनुतापपुनित अशा तुम्हाला तुमच्या सांप्रतच्या असहाय्य स्थितींत खात्रीनें अंतर देणार नाहींत. ''

" पण एकदां त्यांच्या मर्जीविरुद्ध जमिनींची फाळणी करून घेऊन त्यांच्यापासून विभक्त झाल्यानंतर अशा लाचार स्थितींत नाक मुठींत धरून पुन्हां त्यांच्याकडे मी कसा जाऊं ? ''

" जी मिळकत परक्यांच्या ताब्यांतून परत मिळविण्यांत तुम्हाला कसलेहि आयास पडले नाहींत त्या मिळकतीचा गैरवाजवी अभिलाष धरण्याचा नैतिक दृष्ट्या तुम्हाला कांहीं हक्क नव्हता. अनधिकारानें तिचा अपहार करण्याचा लोभ धरून भावाकडून तिची वांटणी मिळविण्याच्या कामीं सूक्तासूक्त सर्व साधनांचा उपयोग करून भावाच्या मर्जीविरुद्ध तुम्ही तिची फाळणी करून घेतलीस. गृहकलहामुळें आपल्या घरांत परक्याला आपला हात शिरकविण्यास वाव मिळूं नये म्हणून तुमच्या बंधूनें मोठ्या दूरदर्शीपणानें व समयज्ञतेनें तुम्हाला मिळकत वांटून दिली. त्या आपल्या हिश्शाचा योग्य सांभाळ व संवर्धन करण्याच्या कामीं तुम्ही आपला स्वाभिमान, कर्तबगारी व धडाडी दाखविली असती व आपला संसार आदर्श करण्यास झटला असता तर तुमच्या बंधूला व मातेला त्याजबद्दल धन्यता वाटली असती व आज तुम्हाला ही जी स्थिति प्राप्त झाली आहे ती कधींच झाली नसती. राजाभाऊ, कोणतीहि मिळकत संपादन करण्यापेक्षां तिचा जागरूकतेनें सांभाळ करणें, ती टिकविणें व तिचें संवर्धन करणें हेंच अधिक अवघड काम असतें. भावापासून विभक्त होऊन तुम्ही स्वतःचा स्वतंत्र संसार थाटलांत हें खरें; पण तो यशस्वी होण्यासाठीं त्याचा पाया भक्कम करण्यास लागणारें जें

आर्थिक स्थैर्य तें कटाक्षानें साधण्याकडे तुम्ही बेजबाबदारपणानें दुर्लक्ष केलें. प्रपंच मग तो एखाद्या व्यक्तीचा असो अगर एखाद्या राष्ट्राचा असो, त्याचा आर्थिक पाया मजबूत नसेल तर प्रतिकूल परिस्थितीच्या झंझावातांत त्याचा पोकळ डोलारा कोलमडून पडल्याशिवाय कधींच राहात नाहीं. पण हें तुम्हाला सांगायची आतां गरज नाहीं. व्यवहारी जगाचें हें तत्त्व तुम्ही विसरलात म्हणूनच परक्याची आर्थिक गुलामगिरी पत्करून आपल्या नवस्थापित संसाराचें–सर्वस्वाचें वाटोळें करून घेतलेंत. असो. कोळसा अधिक उगाळण्यांत अर्थ नसतो. जें झालें तें भूतकाळांत गेलें. वर्तमानकाळांतच अजून पुष्कळ जगायचें आहे तुम्हाला. त्या दृष्टीनें तुमच्यांतील परिवर्तन शुभ व आशादायी आहे. तुमची दृष्टि आतां निवळली आहे. तुमचे सद्विचार आतां जागृत झाले आहेत. झाल्या गेल्या गोष्टी विसरून जा व यापुढें आपल्या बंधूशीं व मातेशी एकदिलानें व प्रेमानें वागून त्यांना सुखी करा.''

"त्यांना सुखी करूं? आतां कसं शक्य आहे तें? उद्यां माझ्या जमिनींच्या लिलावाच्या रूपानें मुतालिक घराण्याच्या अप्रतिष्ठेचा डंका सगळीकडे वाजत राहील; आपल्या पुरुषार्थानें मुतालिक घराण्याचें वैभव कळसास पोंचविण्याची आपली महत्त्वाकांक्षा अशा रीतीनें धुळीस मिळालेली पाहून माझ्या मानधन बंधूला मरणप्राय दुःख होईल; कुळाला कलंक फासणाऱ्या एका कुसंतानाला जन्म दिल्याबद्दल शरम वाटून माझ्या मातेला आपल्या जिण्याचा वीट येईल; अमक्या तमक्याचा हाच तो दिवटा मुलगा म्हणून माझ्याकडे बोट दाखवून लहानापासून थोरापर्यंत सर्व माझी हेटाळणी करतील; माझ्या पैशांवर आजवर चैन मारणारे माझे हलकट सोबती माझी लाचार स्थिति पाहून फिदीफिदी हंसतील; साहेब, माझ्या त्या स्थितीपेक्षां निरयगति अधिक किळसवाणी असेल का? असल्या स्थितींतून माझ्यासारख्या चांडाळाचा उद्धार करण्यासाठीं धांवून येण्याला तो न्यायी परमेश्वर नादान बनलेला नाहीं. मुतालिक घराण्याची कुलस्वामिनी माझ्या हांकेला यावेळीं ओ देणार नाहीं. माझ्या पूर्वजांची पुण्याई यावेळीं माझ्या पाठीशीं उभी राहणार नाहीं. माझ्या अधम करणीची किळस येऊन त्या सर्वांनीं माझ्याकडे केव्हांच पाठ फिरविली आहे. कोणत्या तोंडानें मी त्यांची करुणा भाकूं? माझें भवितव्य आतां मला स्पष्ट दिसत आहे. याच

देहीं याच डोळां माझ्या कुकर्मांचें प्रायश्चित्त मला भोगायला लावल्याशिवाय तो न्यायी परमेश्वर कधींहि राहणार नाहीं. जीवन! माझ्या बंधुराजा! तुझ्या लाडक्या राजासाठीं तळमळणारें तुझें कोमल हृदय कृतांतासारखें निष्ठुर कर! या चांडाळासाठीं त्यांत मायेचा लवलेशहि उरूं देऊं नकोस! आई, ज्या मुखानें तूं आजवर मला मंगल आशीर्वाद दिलेस त्या मुखानें माझ्यावर कठोर शापांचा असा वर्षाव कर, की त्या योगानें माझ्या देहाची क्षणमात्रांत राखरांगोळी होईल. म्हणजे तरी मुतालिक घराण्याला लागलेलें माझ्या संपर्काचें हें पाप कायमचें धुऊन जाईल व त्याचें पुढें होणारें अधःपतन तरी थांबेल! माझ्या स्वर्गस्थ पितृदेवा..... ..." पश्चात्तापाचा आवेग अनावर झाल्यामुळें त्याच्यानें पुढें बोलवेना. शरिराची आबाळ होऊन तो अगोदरच बराच अशक्त झाला असल्यामुळें तीव्र मानसिक त्रासानें त्याचा चेहरा श्रमिक होऊन त्याचें सर्वांग थरथर कांपत होतें. प्रक्षुब्ध भावनांच्या ऊर्मि त्याच्या अंतःकरणांत थैमान घालून त्याच्या बंधाऱ्यावर जोरानें आघात करीत होत्या. शेवटीं भावनावेग असह्य होऊन त्या आवेशांत त्यानें आपल्या दिवंगत पित्याच्या नांवानें मोठ्यानें करुण स्वरानें टाहो फोडून आपले थरथरते दोन्ही हात वर करून असहाय्य नजरेनें सहज वर पाहिलें. तों समोरच्या भिंतीवर टांगलेली त्याच्या पित्याची प्रतिमा त्याच्या दृष्टीस पडली. एकदम तो दचकला. डोळे विस्फारून एखाद्या भ्रमिष्टासारखा तो त्या प्रतिमेकडे ताठ नजरेनें पाहूं लागला. आपल्या पित्याची प्रतिमा अशा परक्या ठिकाणीं अकल्पितपणें आपणांस पाहण्यास मिळेल याची त्याला बिलकूल कल्पना नसल्यामुळें ती दृष्टीस पडतांच पश्चात्तापानें कमकुवत झालेल्या त्याच्या पापी मनाला, आपल्या अघोर कर्मांबद्दल आपला पिता क्रुद्ध मुद्रेनें आपल्याकडे पाहात आहे असा भास झाला. भेदरून जाऊन त्यानें आपले थरथरते दोन्ही हात जोडले व "बापूसाहेब, मी अपराधी आहें, मला क्षमा करा!" असें कंपित स्वरानें बोलून आपले डोळे मिटले आणि त्याच्या त्या भ्रमिष्ट स्थितीकडे मुनसफसाहेब साश्चर्य नजरेनें पाहात आहेत तोंच तो बसल्या जागीं मूर्च्छित होऊन खुर्चीवरून एकदम धाडकन् खालीं जमिनीवर पडला.

* * *

राजाच्या जमिनीचा उदईक कोर्टामार्फत लिलांव होणार होता. लिलांवाचा ठरलेला दिवस गांवांत अगोदरच दवंडीनें जाहीर करण्यांत आलेला असल्यामुळें लहानापासून थोरापर्यंत ज्याच्या त्याच्या तोंडून अलीकडे हाच विषय प्रामुख्यानें चर्चिला जात होता. मुतालिक घराणें आसपासच्या पांच पंचवीस खेड्यांत प्रतिष्ठित, लौकिकवान व वैभवसंपन्न असें समजलें गेलें असल्यानें सर्वांना या प्रकाराचें मोठें आश्चर्य वाटत होतें. गांवांत समंजस, सत्प्रवृत्तीचे जे कांहीं थोडे लोक होते त्यांना या घडून येणाऱ्या अनिष्ट प्रकाराची हळहळ वाटत होती. परंतु छिद्रान्वेषी टवाळखोरांना मात्र तो एक टवाळीचा व हंसण्याचा विषय झाला होता. कमलापुरांतील कुटाळकंपूच्या आजीव सदस्यांना अर्थात् तो प्रकार एखाद्या महोत्सवासारखा वाटत असल्यास त्यांत नवल कांहींच नव्हतें. म्हणून आदल्या दिवशीं रात्रीं देसाई सावकाराच्या वाड्यांतील एका दालनांत कुटाळकंपूची खास बैठक भरली. रात्री दहा वाजण्याच्या सुमारास त्या कुटाळकंपूचा एक एक सभासद बैठकीला हजर होऊं लागला. थोड्याच वेळांत सर्व सभासद हजर होऊन त्यांच्या एकमेकांना नेहमीच्या ठराविक नांवांनीं संबोधण्यानें, अरे तुरे करून एकमेकांना शिव्यांच्या आदानप्रदानांनीं व पल्लेदार हंसण्याखिदळण्यानें बैठकीला रंग चढूं लागला. राजाचे पूर्वीचे सोबती—त्याच्या सावकारांचे पुत्र—बैठकीला हजर होतेच. त्यांचा म्होरक्या तर आज अगदीं खुषींत होता. चंगीभंगी पोषाख करून व अंगाला चोपडलेल्या अत्तराचा दर्प हवेंत सोडीत स्वारी मदिरेच्या यथेच्छ सेवनानें तर्र होऊन बैठकीच्या ठिकाणीं हजर झाली. तो येतांच तेथें जमलेल्या सर्व सभासदांनीं 'या देसाई, या सावकार' म्हणून त्याच्या नांवानें एकच गिल्ला केला त्याबरोबर आपण कोणी एक मोठे राजपुत्र आहोंत अशा आविर्भावानें त्या सर्वांच्या मध्यें स्वारी मोठ्या आढ्यतेनें जाऊन बसली व दोन्ही बाजूंस बसलेल्या आपल्या दोस्तांच्या पाठीवर आपले दोन्ही हात मारून मदिरेच्या तारवटलेल्या नजरेनें सर्वांकडे पाहात स्वारीनें मोठ्यानें हंसण्यास सुरुवात केली. त्याबरोबर बाकीच्यांनींहि त्याच्या हंसण्यास साथ देऊन सर्व वातावरण हास्यनिनादानें दणाणून सोडलें. थोड्या वेळानें तो हंसण्याचा भर ओसरल्यावर जमलेल्या सभासदांपैकीं एकजण त्या म्होरक्याला उद्देशून सर्वांकडे आपली नजर फिरवीत म्हणाला—

" उद्या राजा बामनाच्या जिम्नीचं आपन मालक होनार म्हनून ह्यो देसाई सावकार आन् त्येच्या पुठ्यातलं हे समदं सावकरगडी गरवानं अश्शी चढून गेल्याती! त्येना सरग दोन बोटं उरल्यागत वाटतुया जनू! रोजचं मानुसबी त्येंच्या नजरंला दिसंनासं झालंया! बैटकीला जमन्यापायी ह्येंच्या घराकडं चार चार येळा मानूस धाडला तरी ह्येंचं खेटरबी ऐकून घेत नाय! जवा तवा आपल्याच्र ताऱ्यांत असत्यात! पन मी म्हनतो ह्येना इकतं राजपद कशानं आलंय?"

यावर सगळेजण मिस्किलपणानें त्या देसाई सावकाराकडे व त्याच्या सावकारदोस्तांकडे आळीपाळीनें पाहूं लागले. त्यावर त्या भाषणानें मनांत ओशाळून जाऊन राजाच्या सावकार पुत्रांपैकीं एकजण म्हणाला,

" कशापायी गरव आलाय आमास्नी? रानामाळांतल्या यापानं लई जिकिर हुतीया. दिसभर शेतामंदी गड्यामानसांपुडं बुलून बुलून त्वांड दुकून येतंय; आन जीव अश्शी दमून जातुया बगा. म्हनूनशान रातचं बैटकीला येन्याचा कटाळा येतुया. वळंनं, माजुरपनानं येत नाय व्हंय आमी? आन् राजा बामनाच्या जिम्नीचा मालिकपनाचा आमास्नी गरव हुयाला आमी काय त्येच्या जिम्नीचं अजून मालक झालुया व्हंय? उंद्या लिलाव व्हनार. त्यांत आमच्यापरास दिसऱ्या कुनीतरी चडाचा सवाल बोललं म्हंजी आमी पडनार उतानं. तवा उंद्या काय हुईल तें कुनी सांगावं?"

त्यावर त्या सावकारपुत्रांना आश्वासन देण्याचा आविर्भाव आणून दुसरा एकजण म्हणाला,

" उगीच्र जिवाला घोर करूं नगा बाबानु! त्या बामनाच्या जिम्नी तुमच्या तुमास्नीच लकलाब असूद्यात. कुनीबी तुमच्यावर वरचडपना करनार नाय! आन् इकता पैका घालाया हाय कुनाच्या बाजवळ?"

" जयवंत्या, तुमचा कितीचा रं बोजा है राजा बामनावर?" तिसरा म्हणाला.

" अरं बाबा, थोडा थोडका नाय, चांगला चार हजाराचा हाय!" सावकाराचा पुत्र जयवंत अभिमानानें म्हणाला.

इतक्यांत चवथा कुणीतरी जमलेल्या मंडळींकडे पाहून खवचटपणानें

म्हणाला,—

"त्या बामनाच्या पोराला येनी इकता पैका दिला त्यो अक्षी पैन् पै मोजूनशानच दिला असंल जनुं काय! भावाभावांत भांडाण लावून या सावकारानी त्येची जिमिन फुकटांत खाल्ली; आन् खोटानाटा हिसाब दावून त्येच्यावर रिनाचा बोजाबी केला. त्या बामनाला या गुलामांनीं सपशेल पालता घातला हें समद्या गांवाला ठाव नाय जनूं?"

यावर आणखी कुणीतरी मानभावीपणानें म्हणाला,

"गनप्या लेका, हे तुजं भाषान बराबर नाय! राजा बामनाला आपल्या जिम्मी संबाळतां आल्या न्हाइती त्येला सावकार रं काय करनार! त्येनी आपला पैका बामनाच्या काई मागं लावला हुता व्हंय?"

आपल्या विरोधकाची अशा तऱ्हेनें परभारेंच तोंडफोड झालेली पाहून सावकारांच्या मुलांना अर्थातच समाधान वाटलें. तेथें जमलेल्या टवाळखोरांत एक गांजिकस मनुष्य होता. त्यानें आपली वडिलार्जित पोटापुरती असलेली जमीन गांजाच्या व्यसनांत घालविलेली असून आतां तो मोलमजुरी करून आपला उदरनिर्वाह करीत होता. राजाला आपल्या जमिनी सांभाळतां आल्या नाहींत म्हणून त्याची हेटाळणी करणाऱ्या टवाळखोरांच्या निंदेत त्यालाहि हिरीरीनें भाग घेण्याची इच्छा झाली. आपली कर्तबगारी तेथें जमलेल्या आपल्या सोबत्यांना पटविण्याच्या हेतूनें तो मोठ्या आवेशानें म्हणाला,

"राजा बामनाची एक एक जिमीन म्हंजी निस्ता सोन्याचा टुकडा हाय. पन त्या लेकाला संबाळण्याची आक्कल कुटं हाय! तसल्या जिम्नी मला हुव्या होत्या! दारामंदी हत्ती झुलाय लावला नसता तर या पठ्ठ्यानं त्वांड दावलं नसतं. है का ठावं?"

त्याबरोबर "शाबास ग्यानबा!" म्हणून सर्वांनीं एकच गिल्ला करून मोठ्यानें हंसण्यास सुरुवात केली. थोडा वेळ एकामागून एक हंसण्याच्या फैरीवर फैरी झडल्यानंतर त्यांतला एकजण सर्वांना शांत राहण्याचा इशारा देत म्हणाला,

"अरं, इकतं हंसाय काय झालं काय तुमास्नी? राजा बामनाच्या जिम्मी खरुखरच सोन्याचं टुकडं हैती टुकडं! त्येंतल्यात्यांत त्येचं दोन

मळं— एक त्यो सोनहिऱ्याचा मळा आन् दिसरा ठेसनाच्या वाटंकडचा त्यो मानिकरास मळा ह्ये तर लई फाकड्ड हैती. ह्या दोन मळ्याचं धनी होनं आन् राजा होनं सारकंच. हाय ठाव तुमास्नी ? पण कायरं जयवंत्या, तुमच्या समद्या सावकारांचा ह्या दोन मळ्यामंदी आँदा काय काय जित्राप करन्याचा इच्चार हाय ? ”

त्यावर मोठ्या अभिमानानें जयवंत म्हणाला,

“ माज्या बाचं म्हननं सोन्याहिऱ्याच्या मळ्यांत संत्री, मुसंबी, लिंबू यांच्या बागा कराव्या आन् मानिकरास मळ्यामंदी समदा ऊस लावावा असं हाय; पन समद्या सावकारांच्या इचारानं काय घडल तें घडल. ” यानंतर सर्वांनीं यथेच्छ धूम्रपान करून हवेंत धुराचे लोट पसरून दिले. धूम्रपानानंतर एकजण कसलीशी आठवण झाल्यासारखें करून म्हणाला,

“ पन कायवं मंडळीनु, मला एक गंमत उमांग्ली हाय ती खरी हाय का ? ”

सर्वांनीं एकदम आतुरतेनें विचारलें,

“ अरं, कस्ली गंमत ? राव, सांगा तर खरं ! ”

“ गंमत नामी पन नामी हाय अक्षी ! ”

तो जी गंमत सांगणार होता ती ऐकण्यासाठीं त्याचे सोबती अगदीं उतावीळ झाले होते म्हणून ती सांगण्याच्या कामीं त्यानें चालविलेल्या दिरंगाईबद्दल निषेध व्यक्त करण्याच्या हेतूनें मंडळींतून कोणीतरी म्हणाला,

“ अरं गधड्या, म्होरं सांगशील कां नाय ! कां फुका नम्नाखालीच घडाभर त्याल जाळण्याचा इच्चार हाय तुजा ?

“ आज दोनपारच्या सुमारास राजा बामन मुनसफ सायबाच्या बंगल्यावर गेला व्हता म्हनं. आपल्या जिम्नीपायी त्येनं सायबाची लई मनधरनी केली. पन सायबानं त्येचं अक्षी ऐकलं नाय. सायब त्येच्यावर लई रागावला. म्हनून खापरावानी त्वांड करून आपल्या भावाकडं गेला. सांचीपारा सायबाच्या शिपायाची गाट पडली व्हती. तवा त्यो सांगत व्हता की राजा बामन तापजाळानं भयंकार आज्यारी झाला हाय. सारका तापांत बडबडतोय म्हनून. ”

त्यावर सावकाराचा जयवंत म्हणाला,

" अवं मंडळीनु, हें निस्तं स्वांग हाय. उंद्याचा लिलाव थांबविन्याची ही इगत हाय. पन अशानं सायब फसनार नव्हं म्हनावं. इक्तं दिस लोकांचं पैसं उपासतांना ग्वाड वाटलं. आन् आता देनं देन्याच्या टायमाला कसा जिव जातुया गुलामाचा ! पन असं त्वांड लपवून भागनार नाय आता. पैका फुकाटचा न्हवता. म्हमईंत माझ्या बानं च्याळीस वसं गिरनींत घाम गाळलाय तवा पैका घरांत आलाय बाबा ! त्यो झाडास्नी चिकाटला न्हवता वरबाहून आनायला ! आन् त्यो देन्यापायी आतां आज्यारीपनाचं स्वांग घेतलंया बेस्यानं. तापांत बडबाडतुया म्हनं. पन काय बी केलंस तरी आता जिम्नी परत मिळणार न्हवत सज्यां तुला !... ."

जयवंता चिडून बोलत होता. आणखी बराच वेळ तो तसाच बोलत राहिला असता. पण मध्येंच त्याला थांबवून एकजण डोळे मिचकावीत रावांकडे पाहून त्याला म्हणाला,

" अरं, पन उगाच का तावातावानं बडबाडतुयास. बामनाच्या जिम्नी गिळन्यापायी तर तुमी येवडं कारास्तान केलंय. तवा त्येला त्येच्या जिम्नी तुमी परत देनार नाय हें समद्या गांवाला आता ठावं झालं हाय. मंग इक्ता कांगावखोरपना कशापायी करतुयास. उंद्या राजा बामनाच्या जिम्नीचं मालक तुमीच व्हनार. म्हनून त्येच्याबद्दल हाथं जमलेल्या समद्यास्नी खूस करन्याचा काय इचार बिचार हाय का नाय ? "

त्यावर उदारपणाचा आव आणून जयवंता म्हणाला,

" अरं, असं कां घाबारलाया. म्होरल्या सालीं समद्या गांवाला लाडवाचं जेवान देनार हाय आमी ! "

" थत् त्येच्या ! म्होरल्या सालीं ह्यो गांवाला जेवान देनार ! आन् तो पातुर आमी जिबल्या चाटीत बसनार ! राजा उदार झाला आन् हातांत भोपळा दिला त्येच्यातली गत झाली." नंतर जयवंताकडे वळून तो म्हणाला,

" म्होरच्या म्होरं ! त्येची बात आतां नगं. ह्या घडीला काय देनार हाय का नाय; बोल ! "

इतका वेळ सावकारपुत्रांचा म्होरक्या देसाई सावकार मंडळीचें चाललेलें भाषण दारूच्या धुंदींत ऐकत पडला होता. वरील भाषणानें तो एकदम ताडकन् उठून बसला व मोठ्या औदार्याचा आव आणून म्हणाला,

" मंग काय म्हननं हाय मंडळीचं ते इचार त्येना जयवंत्या ? असं कासकुस काय करतुयास गरिबावानी ? दारू पिन्याची तलाप झाली हाय नव्हं त्येना ? मंग उटा तर. एका एकाला आज दारुनं अक्षी आंगुळ घालतो ! "

इतकें बोलून तो देसाई सावकार झोंके खात खात उठून चालूं लागला. त्याचरोबर सर्व मंडळी उटली व मोठ्या खुषींत एकमेकांशीं मोठ्यानें हंसत खिदळत त्याच्याबरोबर गांवांतल्या देशी दारूच्या चोरट्या भट्टीच्या जागेकडे वळली.

* * *

आज राजाच्या जमिनींचा लिलांव. लिलांवाची वेळ दोन प्रहरीं बारा वाजण्याची नेमलेली होती. पण सकाळीं दहा वाजल्यापासूनच कमलापूर कोर्टाच्या इमारतीपुढील विस्तृत पटांगणांत लोकांची गर्दी जमूं लागली. दाव्यांतील आपल्या येणें असलेल्या येवढ्या मोठ्या रकमेपेक्षां जास्त रकमेचा सवाल बोलण्याची कोणाची ऐपत नसल्यामुळें लिलांवांत कोणी बोलणार नाहीं व अनायासेंच जप्त झालेली प्रतिवादीची मिळकत—राजाच्या जमिनी— दाव्यांतील आपल्या रकमेच्या मोबदल्यांत आपल्या पदरांत पडणार याची राजाच्या सावकारांना पक्की खात्री असल्यामुळें सावकारांचे मुलगे झकपक पोषाख करून विजयी मुद्रेनें जमलेल्या जनसंमर्दामधून इकडून तिकडे सारखे फिरत होते. लिलांवाचें अर्थाअर्थी कांहीं सोयरसुतक नसलें तरी घटकाभर मौज पाहण्यास मिळेल या आसुरी आनंदानें कुटाळकंपूंतील सर्व छिद्रान्वेषी सदस्य सर्वांच्या अगोदरच लिलांवाच्या जागीं हजर झाले होते. प्रत्येकजण लिलांवाच्या वेळेची उत्सुकतेनें वाट पाहात होता. सर्व पटांगण माणसांनीं चिक्कार फुलून गेलें. बरोबर साडे अकरा वाजतां मुनसफसाहेबांची टूरिंगकार कंपौंडच्या फाटकामधून आंत शिरून कोर्टाच्या मुख्य इमारतीपुढें येऊन उभी राहिली. मुनसफसाहेब आलेले पाहतांच जमलेली मंडळी अदबीनें उभी राहिली; व ते टूरिंगमधून खालीं उतरतांच सर्वांनीं त्यांना नम्रतापूर्वक अभिवादन केलें. आपले हात जोडून सहास्य मुद्रेनें विनयपूर्वक सर्वांचे नमस्कार स्वीकारीत मुनसफसाहेब न्यायमंदिरांत जाऊन आपल्या न्यायासनावर स्थानापन्न झाले.

लिलांवाच्या कामास सुरुवात होण्यास अद्याप अर्धा तास अवकाश होता. कोर्टाच्या रोजच्या मामुली कामास सुरुवात झाली. राजाच्या सावकारांचे पुत्र आपल्या दोस्तांशीं हळूं हळूं कांहीं तरी बोलत व मधून मधून नेत्रसंकेत करीत एका बाजूला उभे होते. कधीं एकदां बारा वाजतील व लिलांवास सुरुवात होईल आणि राजाच्या जमिनींचे राजरोसपणें आपण कधीं एकदां मालक होऊं याविषयीं ते अत्यंत अधिर झाले होते. शेवटीं एकदां बाराचे टोले पडले. एकाग्रतेनें सर्वांचे डोळे पुढील कार्यक्रमाकडे लागले. थोड्याच वेळांत वादीतर्फेचे–सावकारांचे–वकील चिंचेचा कोळ प्याल्यासारखें आंबट तोंड करून न्यायमंदिरांतून बाहेरच्या व्हरांड्यांत आले व वादीची दाव्यांतील प्रतिवादीनें देणें असलेली रक्कम रुपये दहा हजार प्रतिवादी राजेश्वर भगवंत मुतालिक यानें कोर्टांत रोख भरल्यामुळें प्रतिवादीची जप्त झालेली स्थावर मिळकत–जमिनी–जप्तींतून खुल्या करून त्या प्रतिवादीच्या ताब्यांत देण्यांत आल्याबद्दलचा व लिलांव रद्द करण्यांत आल्याबद्दलचा कोर्टानें केलेला ठराव त्यांनीं आपल्या अशिलांच्या–त्या सावकारपुत्रांच्या–कानांवर घातला. या प्रकाराची कुणकुण तेथें जमलेल्या लोकांना लागण्यास वेळ लागला नाहीं. झालेला प्रकार लोकांना इतका अनपेक्षित वाटला कीं कांहीं वेळ लोकांचा त्याच्यावर विश्वासच बसेना. पण जेव्हां लिलांवाव्यतिरिक्त त्या दिवशींचीं दुसरीं कामें कोर्टापुढें सुनावणीस निघालीं तेव्हां मात्र लिलांव रद्द झाला असल्याचें त्यांना खरें वाटूं लागलें व एवढी मोठी रक्कम राजा मुतालिकानें कशी भरली या गोष्टीचें आपल्या मनांत आश्चर्य करीत जमलेली मंडळी आपापल्या घरांकडे निघून गेलीं.

आतांपर्यंत आपण मनांत उभारलेले आशांचे उंच उंच मनोरे अशा तऱ्हेनें क्षणार्धांत ढासळून जमीनदोस्त झाल्यामुळें राजाच्या सावकारांच्या मुलांचीं तोंडें निराशेनें काळींठिक्कर पडलीं. या अपयशानें त्यांना मरणापेक्षांहि अधिक दुःख तर झालेंच, पण त्यांत आणखी टवाळखोरांच्या निंदेची भर पडल्यामुळें आपलीं काळीं तोंडें कोठें कशीं दडवावीं असें होऊन गेलें. शरमेनें त्यांचे प्राण व्याकूळ होऊन गेले. एकंदर सर्व प्रकारामुळें त्यांच्याकडे जो तो उपहासपूर्ण नजरेनें पाहून गालांतल्या गालांत हंसत होता. लिलावांत राजाच्या जमिनी सावकारांच्या ताब्यांत

गेल्या असल्या तरी, अगर आतां त्या कामीं सावकारांची फट्फजिति झाली तरीहि बारशांत अगर बाराव्यांत दोन्हींतहि सारखाच आनंद मानणाऱ्या कुटाळ कंपूतील परनिंदाप्रिय टवाळखोरांना टवाळीच्या विषयाची वाण पडणार नव्हती. म्हणून राजाभाऊंच्या जमिनींचा अपहार करणाऱ्या सावकारांची अशाप्रकारें नाचक्की झालेली पाहून त्यांनीं आपला मोर्चा सावकारांच्या मुलांकडे वळविला. हिरमुसलीं तोंडें करून एका बाजूस उभे राहिलेल्या सावकारांच्या मुलांना टवाळखोरांपैकीं एकजण हंसत हंसत म्हणाला,

" काय जयवंतराव, म्होरल्या सालीं गांवाला लाडवाचं जेवान देनार त्ये बुंदीचं कां बेसनाच्या लाडवाचं ? "

त्यावर दुसरा म्हणाला,

" राजा बामनाच्या सोनहिऱ्याच्या मळ्यांत सऱ्यामुसऱ्याच्या बागा करन्याचा तुमी समद्या सावकारानीं ब्योत केला हाय त्यो लई नामी हाय ! एकदां कां बागा झाल्या मंजी काय पैकाच पैका घरामंदी. "

लगेच तिसरा म्हणाला,

" आन् मानिकरास मळ्यांत म्होरल्या सालीं गुराळ गाळणार त्यें उसाचं कां येरांडाचं रं ?"

यावर सगळेजण सावकारांच्या मुलांकडे चेष्टेनें पाहात व खदखदां मोठ्यानें हंसत चालते झाले. जयवंता पोळ, दिनू देसाई वगैरे सावकारांचे मुलगे तोंडांत मारल्यासारखे चेहरे करून खालीं मान घालून आपापल्या घराकडे निघून गेले.

* * *

दोन दिवसापूर्वी आपल्या बंगल्यांत राजाला प्रबल मूर्च्छा आल्यानंतर मुनसफसाहेबांनीं त्याला त्याच्या आईभावांकडे पोहोंचतें करून सारी हकिकत त्यांच्या कानांवर घातली होती. मुनसफसाहेबांच्या तोंडून ती ऐकतांच उद्यां होणाऱ्या राजाच्या जमिनीच्या लिलांवाचे दुःखापेक्षां राजा आपल्याला परत मिळाला ह्याचाच आनंद त्यांना अधिक वाटला होता. रमाबाई राजाचें मस्तक मांडीवर घेऊन ढसाढसा रडूं लागल्या होत्या. जीवन डॉक्टरना बोलावून आणण्यासाठीं उठूं लागला होता पण मुनसफसाहेब त्याला भावाजवळच बसावयास सांगून आपण स्वतः डॉक्टरला आणण्यासाठीं निघून

गेले होते. त्या प्रसंगानंतर गेले दोन दिवस मुनसफसाहेब डॉक्टरासह नियमितपणें जीवनच्या घरीं जाऊन राजाभाऊची प्रकृति पाहून येत होते.

राजाच्या जमिनीचा निकाल कांहीं वेळापूर्वीच लागला होता. पण जीवन व रमाबाई यांना त्याची कल्पनाहि नव्हती. राजाची प्रकृति आज जरा अधिकच बिघडली होती. सणसणून ताप भरून तो भ्रांतीत बडबडूं लागला होता. त्याची ती अशी अत्यवस्थ स्थिति पाहून रमाबाईच्या हृदयानें ठाव सोडला. तापांत त्याच्या जिवाची चाललेली तगमग कोमलहृदयी जीवनचें अंतःकरण शतधा विदीर्ण करूं लागली. दोघेंहि त्याच्या उशापायथ्याशीं बसून अश्रू ढाळूं लागलीं. आजचा लिलांवाचा दिवस होता. राजाभाऊच्या हट्टवादीपणामुळें हा अनर्थ ओढवला असून त्याच्या मालकीच्या जमिनी आज परक्याच्या मालकीच्या होणार होत्या. पण त्याजबद्दलच्या दुःखद विचाराला राजाभाऊच्या प्रकृतिविषयींच्या काळजीनें भारावलेल्या त्यांच्या मनांत क्षणभरहि थारा मिळाला नाहीं. चिंतातूर होऊन दोघेंहि त्याच्या देहाची चाललेली तळमळ व्यथित अंतःकरणानें पाहात होतीं. इतक्यांत डॉक्टरला बरोबर घेऊन मुनसफसाहेब अवचित त्या ठिकाणीं येऊन दाखल झाले. त्यांना पाहून रमाबाई व जीवन दोघांनाहि दुःखाचा हुंदका आला. मुनसफसाहेबांकडे तारवटलेल्या नजरेनें पाहात राजाभाऊ आपले दोन्ही हात जोडून " साहेब, दया करा. माझ्या जमिनींचा लिलांव करूं नका... " वगैरे पूर्वोक्त पुन्हां भ्रमांत बडबडूं लागला. तशा असहाय्य स्थितींतील त्याचे ते करुण शब्द त्या थोर पुरुषाच्या कोमल अंतःकरणाला जाऊन भिडले. त्यांचे नेत्र अश्रूंनीं डबडबले. त्याच्याजवळ जाऊन प्रेमभरानें त्याच्या तोंडावरून हळुवारपणें हात फिरवीत ते त्याला म्हणाले,

" राजाभाऊ, नाहीं बरं मीं तुझ्या जमिनींचा लिलांव केला! तुझ्या जमिनी मीं परत तुझ्या ताब्यांत दिल्या आहेत बरं! आतां स्वस्थ झोंप घे पाहूं! "

एकदम हर्षवायु झाल्याप्रमाणें आनंदानें ओरडून राजा म्हणाला, " खरंच? खरंच? "

" खरं, अगदीं खरं! " हळुवार हातानें त्याच्या कपाळाला थोपटीत मुनसफसाहेब कळकळीनें म्हणाले.

" साहेब, मग त्या जमिनी मला आतां नको. जीवनलाच त्या द्या. " राजा काकुळतीच्या स्वरानें म्हणाला.

डॉक्टरांनीं राजाच्या प्रकृतीची तपासणी करून त्याला कसलेंसें इंजेक्शन दिलें. त्यायोगानें त्याच्या डोळ्यावर झोंपेची गुंगी येऊन थोड्याच वेळांत तो निद्रावश झाला. आत्यंतिक मानसिक त्रासामुळें मेंदूवर क्षणिक परिणाम झाला आहे व त्यामुळें ताप भरला आहे; तथापि भिण्याचें कारण नाहीं; थोड्याच दिवसांत राजाच्या प्रकृतीला आराम पडेल असं आश्वासन देऊन डॉक्टर निघून गेले. राजाच्या जमिनीसंबंधीं मुनसफसाहेबांनीं नुकतेच जे उद्गार काढले ते परमार्थतः नसून तापाच्या भ्रांतींत बडबडणाऱ्या राजाभाऊंची तेवढ्या वेळेपुरती समजूत करण्यासाठींच काढले असल्याचें रमाबाई व जीवन यांना वाटलें. पण डॉक्टर जातांच जीवनकडे वळून मुनसफसाहेब म्हणाले,

" जीवन, राजाभाऊ आणि तुम्ही आतां एक झाल्यामुळें राजाभाऊंच्या इच्छेप्रमाणें त्याच्या ऋणमुक्त झालेल्या जमिनी पूर्ववत् आतां परत तुमच्या ताब्यांत आल्या आहेत. "

यावर आश्चर्याची परमावधि होऊन रमाबाई व जीवन दोघेंहि एकदम उद्गारलीं, " काय ? राजाभाऊंच्या जमिनी ऋणमुक्त ? म्हणजे कोणीं ऋणमुक्त केल्या ? "

" मीं. "

अजूनहि आश्चर्याच्या उत्तुंग शिखरावर घोटाळत जीवन उद्गारला,

" काय ? आपण ! दाव्याचे पैसे कोणी भरले ? "

" मीच. ही पाहिलीत पैसे भरल्याबद्दलची राजाभाऊंच्या नांवाची पावती. " मुनसफसाहेबांनीं पावती जीवनच्या हातांत दिली. खरा प्रकार कळून येतांच कृतज्ञतेनें जीवन आणि रमाबाई दोघांच्याहि नेत्रांतून घळघळ अश्रुप्रवाह सुरू झाला. भावनावेगांत मुनसफसाहेबांच्या पायांवर डोकें ठेवून सद्गदित अंतःकरणानें जीवन म्हणाला,—

" साहेब, साहेब, आपल्या मोठेपणाला तुलना नाहीं. तुम्हीं मनुष्य नसून परमेश्वर आहांत. मुतालिक घराण्यावर आपण जे उपकार केले आहेत ते आपल्या जीवनपथावर मुतालिक घराण्यांतील वंशजांनीं आपल्या प्राणपुष्पांच्या पायघड्या अंथरल्या तरी जन्मजन्मांतरीं फिटणार नाहींत.

आपल्यामुळं मुतालिक घराण्यास हा भाग्याचा दिवस दिसत आहे.

त्यास प्रेमभरानें उठवीत मुनसफसाहेब समोरील भिंतीवर टांगलेल्या आपल्या मातेच्या—सुहासिनीच्या—प्रतिमेकडे बोट दाखवून गहिवरल्या कंठानें म्हणाले, " जीवन, बंधुराजा, याला कारण मी नसून परमेश्वरस्वरूपीं विलीन झालेली ती माझी माता आहे."

" काय ! सुहासिनीबाई आपली माता ? "—जीवन विस्मयातिरेकानें उद्गारला.

राजाचें डोकें उशीवर टेकून रमाबाई उठूं लागल्या. त्या काय करताहेत हें जीवन व मुनसफसाहेब आश्चर्यानें पाहूं लागले. रमाबाई हलकेंच मुनसफसाहेबांच्याजवळ आल्या. त्यांनीं त्यांच्या कानशिलांवर कडाकड बोटें मोडली. त्यांच्या तोंडावरुन हात फिरविला. त्यांचे डोळे वाहूं लागले होते. मुनसफसाहेबांच्याहि डोळ्यांतून घळकन् अश्रू ओघळले. रमाबाईच्या चरणावर वांकत मुनसफसाहेब सद्गदलेल्या आवाजांत म्हणाले,—" जीवन, राजा-भाऊ यांच्याप्रमाणें हा तिसराहि तुमचाच मुलगा आहे आईसाहेब. "

" चिरंजीव भव ! गुणवंता ऊठ. माझा तर्क चुकीचा नव्हता तर. "

" कसला तर्क आई ? " मुनसफसाहेब उठत आश्चर्यानें म्हणाले.

" तूं जीवनचा आणि राजाचा भाऊ आहेस असं फार दिवसांपूर्वी वाटलं होतं मला. "

" काय म्हणतेस तरी काय तूं आई ?... " जीवन आश्चर्यानें थक्क होऊन त्यांच्याजवळ जात म्हणाला.

" मी म्हणतेंय् तें बरोबर आहे. त्या दिवशीं बैठकीच्या निमित्तानें गुणवंत जेवायला आला असतांना सुहासिनीबाईच्या फोटोवरुन त्याच्या मस्तकावर फुलें पडल्याचा प्रसंग नाहीं आठवत तुला ? उगीच का फुलें पडलीं तीं ? "

" हाराचा एक पदर सुटल्यामुळें झालं तसं— " जीवन.

" नाहीं ! त्याच दिवशीं बरा हाराचा पदर तुटला ? गेलीं वीस वर्षें कधीं असा प्रसंग कां घडला नाहीं ? आणि तुम्ही कधीं एकमेकांच्या तोंडाकडे निरखून पाहिलंय् का ? भावा-भावाशिवाय का इतकं सारखेपण असतं एकमेकाच्या तोंडावळ्यांत ? "

अनुक्रम २९३२५ विभाग सा. वा. क्रमांक १५०५ ता. दि.

" हें सगळं माहीत होतं तर यापूर्वी कधीं कां सांगितलं नाहींस मला—" जीवन.

" मला कांहींहि माहीत नव्हतं. पण मनाला वाटत मात्र होतं फार फार तसं. बोलणार होतें तुझ्याजवळ; पण मुद्दामच बोललें नाहीं. आपल्या राजाच्या जमिनीचा खटला गुणवंताच्या कोर्टात होता. कदाचित् माझा तर्क मी तुझ्याजवळ बोललें असतें; पण मला अशी भीति वाटत होती कीं, माझा तर्क खरा ठरून मुनसफसाहेबांना राजा आपला भाऊ आहे असें कळेल तर त्यांच्या न्यायदानाच्या कामांत बंधुप्रीतिमुळें एखादे वेळेस कुचराई होईल, आणि आजपर्यंतच्या त्यांच्या धवल कीर्तीला काळिमा लागेल. "

त्या थांबल्या तशा मुनसफसाहेबांनीं बोलावयास सुरुवात केली—

" मी बैठकीच्या निमित्तानें इथें जेवायला आलों असतांना आई-बाबांचे फोटो मला इथें पाहावयास मिळाले; तेव्हांच मी कोण आहें हें मला कळून चुकलें. तत्पूर्वी जीवननेंच या सर्व रहस्याला तोंड फोडलें होतें. त्याच्यांत आणि माझ्यांत कांहीं साधर्म्य आहे ही गोष्ट कमलापुरांत आल्यावर शाला-गृहाच्या उद्‌घाटनाच्या निमित्तानें आमचा परिचय झाला तेव्हांच माझ्या लक्षांत आली होती; पण मी तो एक योगायोग समजत होतों. पुढें बैठकीच्या निमित्तानें जीवन माझ्या बंगल्यावर आला आणि त्यानें तेथें वडिलांचा फोटो पाहिला व कुतूहलानें त्या बाबतींत मला विचारलें. तेव्हां त्याच्या-माझ्यांतील साधर्म्याला कांहीं अर्थ आहे याबद्दल माझी खात्री पटली. माझ्या आईनें मृत्युशय्येवर असतांना माझ्याजवळ एक मोहोरबंद पेटी दिली होती व त्यांत माझ्या जन्माचें रहस्य असल्याचें सांगितलें होतें. मात्र तसा प्रसंग आला तरच ती पेटी मी उघडावी असें सांगून ठेविलें होतें. कार्यकर्त्यांच्या बैठकीच्या निमित्तानें आलों असतांना मी आई-बाबांचा फोटो या घरीं पाहिला; आणि आईनें दिलेली ती पेटी उघडून त्यांतील स्वतःच्या जन्माचें रहस्य वाचण्याची वेळ आली आहे असं त्यावेळीं मला वाटलें. त्याप्रमाणें त्याच रात्रीं मीं तें वाचून काढलें आणि सर्व रहस्यावर प्रकाश पडला. "

" तुमचंसुद्धां मला नवल वाटतंय् साहेब—" जीवन पुढें कांहीं बोलणार तोंच त्याच्या तोंडावर हात ठेवत मुनसफसाहेब हंसून म्हणाले, " साहेब

व्हे, दादा !..." जीवननें त्यांना कडकडून मिठी मारली व वाक्य पुरें
लें, "तुम्ही तरी आतांपर्यंत गप्प कसे राहिलांत ?"

"राजाभाऊच्या जमिनीचा लिलांव होणार या कल्पनेंत तुम्ही मनांत
दुःखी होतां. आणि मलाहि ही सारी हकिकत तुमच्या कानांवर घालायला
योग्य अशी संधीच यापूर्वी मिळत नव्हती. शेवटीं राजाभाऊंनींच ती
मिळवून दिली."

"जीवन, तूं आणि राजा खरोखरच भाग्यवान् आहांत म्हणूनच
तुमचा प्रभुरामचंद्रासारखा प्रेमळ 'दादा' तुम्हांला परत मिळाला."
रमाबाई म्हणाल्या.

जीवन हळूच राजाच्या उशाशेजारीं जाऊन बसत म्हणाला, "आई,
खरंच आम्ही भाग्यवान् आहोंत." क्षणा दोन क्षणांनीं तो उठला आणि
बैठकीच्या दिवाणखान्यापर्यंत मुनसफसाहेबांच्या आईची प्रतिमा घेऊन
आला. ती पाहातांच मुनसफसाहेबांना भडभडून आलें. सद्गदित कंठानें
ते बोलूं लागले, "आई, आई, मृत्युशय्येवर असतांना तूं प्रकट केलेली तुझी
अखेरची इच्छा आज तृप्त झाली आहे ! आज तूं असतीस तर तुझ्या
या लाडक्या गुणवंताला प्रेमानें तूं आपल्या कुशींत घेतलें असतेंस. आई,
आईग !..."

"गुणवंता, खऱ्या आईची सर सावत्र आईला येणार नाहीं हें खरं
आहे. परंतु बाळा, माझ्या जीवन, राजाइतकाच तूंहि मला लाडका आहेस.
तुझ्यासारखा पुण्यचरित पुत्र मला लाभल्यामुळें मुतालिक घराण्याच्या
प्रतिष्ठेला इतःपर कलिकालाचीहि दृष्ट लागणार नाहीं."

मातृवात्सल्यानें रमाबाईंचें हृदय उचंबळून आलें. त्या भरांत त्यांनी
चटकन् मुनसफसाहेबांस जवळ घेऊन आपल्या पोटाशीं धरलें. मातृप्रेमाच्या
जीवनावांचून तडफडणारा मुनसफसाहेबांचा हृदय-मीन त्या वात्सल्याच्या
विशुद्ध व अथांग सागरांत निमग्न झाला.

—उजळत्या क्षितिजासारखं तें हृदय आनंदाचें आणि आशादायी
होतं.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा
विभाग ... ग्रा. बा.
क्रमांक २९५२५ ... १५७५
नों. दि. ...